|| निंबरगी संप्रदाय प्रणित ||

श्रीगुरुदेव डॉ. रा. द. रानडे

प्रेरित


# सबीज नाम




लेखक व संकलक

**डॉ. न. वि. कुलकर्णी**

अॅकॅडमी ऑफ कम्प्यरेटीव्ह फिलॉसॉफी अॅंड रिलीजन



अॅकॅडमी ऑफ कम्प्यरेटीव्ह फिलॉसॉफी अँड रिलीजन

## अर्पण पत्रिका

नामस्मरणात्मक भक्तियोगाने
आत्मोद्धार करून घेऊन
लोकोद्धाराचे बहुथोर कार्य
निंबरगी संप्रदायातील
गुरुपरंपरेने केले. त्या सर्वांचे चरणी
विनम्र भावाने सादर समर्पण.

----------

अविनाश धारवाडकर व परिवार, पुणे
यांच्याकडून सादर समर्पण
वैकुंठ चतुर्दशी निमित्त

# सबीज नाम

।। निंबरगी संप्रदाय प्रणित ।।

श्रीगुरुदेव रानडे प्रेरित

# सबीज नाम

**लेखक व संकलक :**

**डॉ. न. वि. कुलकर्णी**

अभय, २७ सावली सोसायटी, पौड रोड,

पुणे ४११ ०३८

दूरध्वनी : ०२०-२५४३५३५८, मो. ९०४९४५५९७७

© सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

प्रकाशक व वितरक :

अ‍ॅकॅडमी ऑफ कम्प्यरेटीव्ह फिलॉसॉफी अँड रिलिजन,

बेळगाव, कर्नाटक (ACPR, Belgavi, Karnataka)

अक्षर जुळणी : ऋतुराज एंटरप्रायझेस, पुणे

प्रथमावृत्ती : वैकुंठ चतुर्दशी, दि. २९-११-२०२०

सहवितरक

अविनाश धारवाडकर

फ्लॅट नं. ११, आनंद टेरेस, रामबाग कॉलनी,

पोड रोड, कोथरूड, पुणे ४११ ०३८.

मो. ९८५०५४३४९४

मुखपृष्ठ : चिन्मय धारवाडकर, ९२८४०१०६४५

मुद्रक : अजित ठोंबरे

प्रतिमा ऑफसेट, पुणे

किंमत रु. ३००

(श्रीगुरुदेव रानडे, यांची सर्व पुस्तके सहवितरक, पुणे यांच्याकडे उपलब्ध आहेत.)

वेबसाईट : www:gurudevranade.com

# प्रकाशकाचे मनोगत

'सबीज नाम' हे डॉ. न. वि. कुलकर्णी लिखित पुस्तक 'ॲकॅडमी ऑफ कम्प्यरेटीव्ह फिलॉसॉफी अँड रिलिजन', बेळगावी संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात आम्हास अतिशय आनंद होत आहे. 'जो साधकांचा निजस्वार्थ' तो साध्य होण्यास मदत व्हावी, यासाठी पारमार्थिक साहित्य प्रकाशित करण्याचे व्रत ॲकॅडमी ऑफ कम्प्यरेटीव्ह फिलॉसॉफी अँड रिलीजन संस्थेने घेतले आहे. हा ग्रंथ साधकाना, मुमुक्षुंना साधनेची वाटचाल करताना नक्कीच वाट दाखविण्याचे काम करेल.

प्रस्तुत पुस्तकात लेखकाने नामाविषयी, सबीज नामाविषयी. अगदी वेदकालापासूनचे दाखले देत त्याची महती सांगत असताना नामस्मरण, सत्संग, साक्षात्कार शास्त्र तसेच श्रीनिंबरगी महाराज, श्रीभाऊसाहेब महाराज, श्रीअंबुराव महाराज श्रीगुरुदेव यांच्या आठवणी कथन केल्या आहेत. या आठवणी वाचत असताना श्रीसद्‌गुरुविषयी व नामाविषयीची भावना व श्रद्धा अधिक बळकट होण्यास नक्कीच मदत होईल.

**''जोवरि दृढ असेल शरीर ।**
**तोवरी पुण्यमार्ग रहाटावे ।''**

अशी साधना आपल्याकडून घडावी, अशी आस प्रत्येकास नक्की वाटेल.

''श्रीरामनाम दो अक्षरांचे काम ।
हा रसनेचा निजधर्म बोलिलासे ।।''

या संतवचनानुसार रसनेस व मनास नामाची व्यग्रता व प्रेम लाभो हीच श्रीगुरुदेवांच्या चरणी प्रार्थना!

**मारुती जिराली**
सेक्रेटरी
ॲकॅडमी ऑफ कम्प्यरेटीव्ह फिलॉसॉफी अँड रिलीजन,
श्रीगुरुदेव मंदिर, बेळगावी

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | **देवाच्या नामाचा महिमा** | ६ |
| | अ) उपनिषदांतील ओंकाराचे महत्त्व | |
| | ब) गीतेत दिलेले नामस्मरणाचे महत्त्व | |
| २. | **सबीज नाम म्हणजे काय?** | ११ |
| | अ) सबीज व निर्बिज यातील फरक | |
| | ब) सबीज नाम व साक्षात्कारी सद्‌गुरुंचे महत्त्व | |
| | क) निंबाळची समाधी, पारमार्थिक उर्जा व प्रक्षेपण | |
| ३. | **नामस्मरण (नेम)** | ३५ |
| | अ) अहोरात्र आत्मध्यान | |
| | ब) सगुणभक्ती | |
| | क) हितगुज | |
| ४. | **नाम – नेम – कल्पना** | ५४ |
| | अ) तात्त्विक विचार | |
| | ब) कल्पना निर्मूलन पद्धती | |
| | क) शेवटचा उपाय | |
| ५. | **सत्कार** | ५९ |
| | अ) नेमास आवश्यक, बाह्य गोष्टी, मानसिक गोष्टी व वृत्ती | |
| | ब) ध्यानास आवश्यक अशा पारमार्थिक गोष्टी | |
| ६. | **कर्पूर आरती सोहळा** | ७६ |
| | अ) आरती करणे-पद्धत-सांप्रदायिक महत्त्व व पारमार्थिक महत्त्व | |
| | ब) साधकांचे जीवनातील आरतीची अनन्य स्थान | |

७. हेचि दान देगा देवा (पूर्वार्ध आरती) ८१
८. सुख सहीता दु:ख रहीता (उत्तरार्ध आरती) १०२
९. सत्संग १०७
अ) सत्संगाची व्याख्या
ब) विश्वात्मक प्रेरणा
क) योग क्षेम वहाम्यहम
ड) सत्संगाचे वर्गीकरण
१०. श्री गुरुदेव रा. दा. रानडे यांचे साक्षात्कार शास्त्र १३३
अ) प्रास्ताविक, साक्षात्काराचा पहिला टप्पा, दुसरा टप्पा व तिसरा टप्पा
ब) नैष्कर्म्य सिद्धी - स्थितप्रज्ञाची लक्षणे
११. गुरुदेवांचे भावाविषयी विचार आणि आठवणी १८३
अ) कर्मगती, गुरुदेवांची भक्तीसंबंधी विचार
१२. सबीज नाम आठवणी २१६
१३. लेखक परिचय २३९

# देवाच्या नामाचा महिमा

At some fabulously old time the Vedas lavishly sowed the seed of the most wide spread and universally appealing technique of spiritual practice, that of meditation on the name of God, to reap a harvest of peace and tranquility ...

(K. D. Sangoram in Pathway to God in the Vedas)

वेद काळापासून ईश्वर प्राप्तीसाठी नामस्मरणाच्या मार्गाचे महत्त्व प्रतिपादले गेले आहे. शांती व समाधानाचे पीक कापणीसाठी, देवाच्या नामस्मरणाचे दूर व्यापी, विश्वमान्य आकर्षक, निष्णातपणे करण्याच्या कृतीचे बीज सढळ हातांनी केव्हातरी एक अनाकलनीय पुरातन काळी वेदानी पेरलेले आढळते.

''अरे! राम कृष्णादी ही माझी केवळ नामे नसून या जगातील माझ्या सर्व भक्तांचे कोणत्याही प्रसंगी संरक्षण करण्यासाठी सतत सज्ज ठेवलेल्या सहस्रावधी नावा (होड्या) आहेत. आणि त्याचा मीच नावाडी बनलो आहे, असे लक्षात ठेव.''

शंकराचार्य ''ऋषि अनुस्मरणपि उपासनांगम्'' (अर्थ : सद्गुरुंचे स्मरण देखील नामस्मरणच होय) असे तैत्तरिय उपनिषद सूत्र १.५१ वर भाष्य करताना म्हणतात, येथे लिंगप्पा सवळगींची आठवण होते. ते म्हणत केवळ ''महाराज महाराज'' म्हंटले तरी मुक्त होऊन जाऊ.

इतर धर्मातही हे नामाचे महत्त्व प्रतिपादले गेले आहे. इग्निशस -- -- स्वर्गात राहणाऱ्या बापा, तुझ्या नावाचा जयजयकार असो. या वचनापासून सुरू होणाऱ्या प्रार्थनेच्या प्रत्येक शब्दाच्या शेवटी श्वास घ्यावा व टाकावा, अशी एक प्रक्रिया सांगितली आहे. बाराव्या शतकातील एक अनामिक लेखक आपल्या Cloud of Unknowing ग्रंथामध्ये Jesus Christ च्या नामावर नेम करण्यास सांगतो. तसे तेच मन्सूर (मुसलमान संत) सोहं (Abi) च्या स्मरणाचे महत्त्व प्रतिपादले आहे.

**दोन उदाहरणे पाहू.**

**अजो न क्षां दाधार पृथिवीं तस्तंभ द्यां, मंत्रेमि: सत्यै:।**
**प्रिया पदानि पश्वो नि पाहि विश्वायुरग्रे गुहा गुहं गा:।। ऋग्वेद १.६७.६**

जो कोणी सत्याची खूण असलेल्या मंत्राचे स्मरण/ध्यान करतो तो त्या उच्चतमात समाविष्ट होतो.

**ओ षू णो अग्रे शृणुहि त्वमीळितो देवेभ्यो ब्रवसि**
**यज्ञियेभ्यो राजभ्यो यज्ञियेभ्य:**
**युद्ध त्यामङ्गिरोभ्यो धेनुं देवा उदत्तन ।**
**वि तां दुहे अर्यमा कर्तरी सचाँ एष तां वेद मे सचा ।। ऋग्वेद १.१३९.७**

''अहो देवानो, अंगीरसास तुम्ही एक गाय प्रदान केलीत आणि आर्यमाने तिचे दूध प्राशन केले. मला व फक्त त्याला ती गाय म्हणजे काय ते माहीत आहे.'' ज्या नामास फळे येतात, ते नाम फक्त देव आणि गुरुस ज्ञात असते.

**उपनिषदांतील ॐकाराचे महत्त्व**

त्यांनतर आपण उपनिषदांकडे वळू या.

ॐ हे प्रत्यक्ष ध्यानाचे साधन आहे, असे सद्गुरुंनी आपल्या शिष्यास सांगितल्याचे वर्णन उपनिषदांत सर्वत्र सापडते. ॐ हे ध्यानाचे परमश्रेष्ठ

साधन आहे. इतकेच नव्हे तर तेच ध्यानाचे साध्यही आहे, असे अनेक उपनिषदांत प्रतिपादिले आहे. ख्रिस्ती धर्मग्रंथांत लॉगॉस म्हणजे शब्दब्रह्माचे जितके महत्त्व आहे तितकेच ॐचे भारतीय तत्त्वज्ञानात आहे. ॐ या परमश्रेष्ठ अक्षराचे ध्यान केले असता ध्यान सफल होते, असे उपनिषदात अनेकदा सांगितले आहे. 'सर्व वेद ज्या अक्षराचा घोष करतात, जे सर्व तपाचे साध्य आहे व जे प्राप्त व्हावे म्हणून लोक ब्रह्मचर्य पाळतात, ते अक्षर मी तुला संक्षेपत: सांगतो. ते अक्षर म्हणजे ॐ हे होय. ॐ हे परब्रह्म असून, तुरियाची खूण आहे. तेच सर्वांचे आश्रयस्थान आहे.' याप्रमाणे ध्यानाचे साधन व त्यापासून प्राप्त होणारे साध्य एक असल्याचे वर्णन कठोपनिषदात दिले आहे. सारांश, ॐ हे अध्यात्म ज्ञानाचे साधन व साध्य या दोहोंचे द्योतक आहे. झाडांची पाने ज्या प्रमाणे देठांत अनुस्यूत झालेली असतात, त्याप्रमाणे वाचा ओंकारात अनुस्यूत झाली आहे, असे छांदोग्य उपनिषदांत म्हटले आहे. मुंडकोपनिषदांत एक सुंदर दृष्टांत देऊन सांगितले आहे की, ''उपनिषत्रुपी धनुष्य हातात घेऊन त्यास भक्तीने तीक्ष्ण केलेला महान आत्मबाण लावावा व एकाग्र चित्ताने प्रत्यंचा ओढून ब्रह्मरूपी लक्ष्य भेदावे. प्रणव हेच धनुष्य, आत्मा बाण आहे व ब्रह्म हे त्याचे लक्ष्य आहे. अचूकपणे लक्ष्याच्या जागीच बाण मारला म्हणजे तो लक्ष्याशी एकरूप होतो.''

**गीतेत दिलेले नामस्मरणाचे महत्त्व :-**

यानंतर भक्तियुक्त अंत:करणाने करावयाच्या नाम स्मरणाबद्दल गीता काय म्हणते ते पाहू या.

देवाविषयी एकान्तिक कळकळीची भक्ती, एकविध भाव वाटू लागल्याशिवाय साक्षात्काराच्या दृष्टीनें दुसऱ्या कशाचाही काहीही उपयोग होणार नाही. भक्तिमय ध्यान यशस्वी होण्याला अवश्य असलेल्या सर्व प्रक्रिया गीतेत एका सुप्रसिद्ध श्लोकात संकलित केल्या आहेत. तो श्लोक

पाहा :

**अनन्यचेता: सततं यो मा स्मरति नित्यश: ।**

**तुस्याहं सुलभ: पार्थ नित्ययुक्तस्य योगिन :।। भ. गी. ८.१४**

या श्लोकांत तीन मुद्दे सांगितले आहेत :- (१) आपल्या अंत:करणात देवाबद्दल एकांतिक, एकविध, भक्ति उत्स्फूर्त व्हावी; दुसऱ्या कशाचीही ओढ किंवा आसक्ती मनाला असता कामा नये. ''अनन्यचेतस्त्व''; (२) एक क्षणही व्यर्थ न घालविता ध्यानाचा अभ्यास दिवसामागे दिवस, महिन्यामागे महिना, वर्षामागे वर्ष, असा आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत चालू ठेविला पाहिजे – ''नित्यश:'' व (३) नित्ययुक्तत्व.''

**स तु दीर्घकाल नैरंतर्य सत्कारसेवितो दृढभूमि: ।। यो. सू. १.१४.**

या सुप्रसिद्ध सूत्रांत पतंजलींनीही याच तीन गोष्टी अत्यंत आवश्यक म्हणून सांगितल्या आहेत. या सर्व गोष्टी साध्य झाल्या म्हणजेच परमार्थ साधनांत यश मिळण्याची निश्चिती होते. परंतु हे विसरता कामा नये की, भाव किंवा भक्ति यांची साक्षात्काराला सर्वात अधिक, अगदी मूलगामी, आवश्यकता आहे. ज्याचा अर्थ कोणी आजपर्यंत सांगितला नाही किंवा सांगणे शक्य नाही. असे ईश्वराबद्दल नितांत प्रेम म्हणजे भाव किंवा भक्ति, अशा प्रेमाच्या तुलनेनें सतत, दीर्घकाल, ध्यान इतकेच नव्हे तर अत्यंत एकाग्रतेने नामस्मरणही, फार कमी महत्त्वाचे आहे. आपल्या भक्तीत शरणागतीची भावना उत्पन्न झाल्यावाचून व ईश्वराच्या इच्छेने होणार असेल ते होवो, अशा वृत्तीने आपण आपला हवाला सर्वस्वी देवावर टाकल्यावाचून परमार्थात विशेष यश मिळणार नाही, असे गीतेने बजाविले आहे.

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।। भ. गी. १८.६२**

शेवटी गीता सांगते की केवळ अनन्य भक्तीनेंच ईश्वराला जाणणें, पाहणे व त्याच्याशी एकरूप होणे शक्य आहे.

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ।। भ. गी. ११.५४

ज्ञानेश्वर नाम महात्म्य गाताना म्हणतात,

''नामाचिया सहस्रावरी । नाना इया अवधारी ।
सजुनिया संसारी ।तारू जाहले ।।'' १२.९०

• • •

# सबीज नाम म्हणजे काय?

पुरंदरदासांचे 'पदसुम्मने दोरुकवदेनो रामन दिव्य नामवु' (रामाचे दिव्य नाम सहजासहजी मिळते काय?) ह्या पदावर भाष्य करताना श्री गुरुदेव म्हणतात, ''ह्या दिव्य नामाचा अर्थ काय? सर्वसाधारण नामे व ह्यातील फरक काय असावा? मग गुरुदेव तुकारामांचा अभंग...

**राम राम अवघेची म्हणती**
**कोणी न जाणती आत्माराम**
**राम हा कालचा सुत दशरथाचा**
**अनंत युगाचा आत्माराम**
**रामासी हा राम जरी ठावे असता**
**तरी का शरण जाता वसिष्ठांसी ?**

देऊन पुढे म्हणतात, प्रभु रामाचंद्राला पण आपल्या पारमार्थिक गुरुंना शरण गेल्यानंतरच आत्मारामाचे अनुभवजन्य ज्ञान झाले. तर हे (ज्याने आत्मारामाचा साक्षात्कार घडतो ते) खरे पारमार्थिक नाम, हे दिव्य नाम, दैवी नाम व भव्योदात्त नाम होय. ह्यास श्री निंबरगी महाराजांनी स्वर्गातून आणले. तेच हे नाम होय, जे सद्गुरु आपल्या शिष्याला उपदेश करताना व त्याची परमार्थ पथावरील वाटचाल सुरू होण्याआधी त्यास देतात. असे नाम प्रत्यक्ष देवाकडून येते व शिष्यास ते God in posse म्हणून सांगितले जाते. हेच सबीज नाम होय.

श्री गुरुदेवांची मूळ वाक्ये अशी – This name is the real spiritual name. The divya name which means divine or

sublime name. It was brought by Shri Nimbargi Maharaj from heaven to earth. It is the name, which is conveyed by the spiritual teacher to his disciple at the time of the latter's initiation into spiritual life. It comes directly from God, and is communicated to the disciple as God in posse.'

**सबीज नामाचे स्वरूप – अजर व अमर**

कबीरांच्या भाषेत हे अजर अमर इकनाम है सुमिरन जो आवै गुरुदेवांचा मूळ परिच्छेदच बघू या.

Now what name is Ajara and Amara? Kabir gives an answer which rarely any person has given. अजर अमर इक नाम है सुमिरन जो आवै not one which offers itself to our mind, but that which reveals itself to us supersensously in the process of meditation. There is a vast difference between these two conceptions. It is not the name which of our own accord take for ourselves that constitutes Ajara and Amara Name. "while we are meditating" says Kabir, "there is a celestial Name which unfolds itself to our auditory senses at the height of meditation" That name is 'Ajara and Amara'.

**अर्थ :**

तर कोठले नाम अजर व अमर म्हणावयाचे? कबीराने दिलेले उत्तर सहसा कोणास देता येणार नाही. अजर अमर इकनाम है सुमिरन जो आवे, ते नाम नव्हे. ज्याची आठवण आपल्या मनास, नाम स्वत:हून करून देते, तर ते असे नाम होय, जे अतिद्रिंय पद्धतीने स्वत:च आपल्या समोर प्रकट होते, जेव्हा नामस्मरण चालू असते. तेव्हा ह्या दोन संकल्पनेत जमीन अस्मानाचा फरक आहे. आपण आपणहून स्मरत

असलेले नाम अजर अमर नव्हे. तर कबीर म्हणतात, जेव्हा आपण नामस्मरण करीत असतो तेव्हा ते स्वर्गीय नाम स्वत: नामस्मरण करणाऱ्याच्या श्रवण ज्ञानेंद्रियाला प्रकट होते. ह्या वेळी नामस्मरण करणारा उच्चावस्थेत असतो. तर असे हे नाम अजर व अमर होय.

**सबीज व निर्बिज यातील फरक**

कबीरांच्या खालील दोह्यावर...

**राम नाम सब कोइ कहे, ठग ठाकुर अरु चोर ।**
**जिस से ध्रुव प्रहलाद तरे, वह नाम कुछ ओर ।।**

टिप्पणी करताना गुरुदेव तुकारामांचा वरील अभंग घेऊन म्हणतात–

We have heard the expressions सबीज and निर्बिज. Name with a seed, and name without a seed - a name viable and name non viable.

From the epistemological point of view, we might have names which came laden with meaning and others which are not so laden - significant names and non-significant names. From the point of view of science, a name might have the highest potentiality of spiritual energy, and another which has no such potentiality. The first kind of name would be the real atom-bomb of spiritual experience.

It is only the Name, which an aspirant might receive from his spiritual teacher who has reached the heights of spiritual realisation, that can be of any avail in this matter. It is entirely 'sui generis' unique and in a different category altogether, says Kabir : वह नाम कुछ और.

'सबीज' व 'निर्बिज', 'सजीव' व 'निर्जिव' नाम हे शब्दप्रयोग

आपणा सर्वांस परिचित आहेत. ज्ञानशास्त्रदृष्ट्या काही नामे अर्थपूर्ण, ज्ञानपूर्ण असतात, तर काही अर्थहीन व ज्ञानहीन असतात. अनुभूतीशास्त्रदृष्ट्या काही नामांमध्ये प्रसुप्त आध्यात्मिक शक्ती असते, तर काहींमध्ये अशी शक्ती मुळीच नसते. पहिल्या प्रकारचे नाम म्हणजे आत्मिक अनुभवाचा खरा ॲटमबाँब (अण्वस्त्र होय)

परमश्रेष्ठ आत्म-ज्ञान मिळविलेल्या खऱ्या सद्‌गुरुकडून मिळणारे नामच साधकास परमार्थ मिळविण्याच्या कामी उपयुक्त ठरते. ज्या नामामुळे साक्षात परमेश्वर दर्शनाचे फळ मिळते, ते खरे नाम होय. ते अद्वितीय व अनन्यसाधारण, अव्वल, स्वतंत्र दर्जाचे आहे. कबीर म्हणतात तसे ते ''वह नाम कुछ और.''

## स्वर्गातून नाम आणले म्हणजे काय?

श्री निंबरगी महाराजांनी स्वर्गातून नाम आणले. स्वर्ग शब्द परमात्मवाचक आहे. स्वर्ग शब्द सुखवाचक आहे व परमात्मसुख स्वरूप आहे.

श्वेताश्वेतर उपनिषद म्हणते -

**युक्तेन मनसा वयां देवस्य सवितुः सवे ।**
**सुवर्गैयाय शक्त्या ।।२।। (अ-२)**

**अर्थ :-**

एक चित्ताने आम्ही परमात्म्याचे ध्यान त्यांच्याच आज्ञेने साधनभूत स्वर्गप्राप्तीसाठी स्वतःच्या शक्तीनुसार प्रयत्न करतो.

तर स्वर्ग हे परमात्म्याशी ध्यानात आलेले ऐक्य दर्शविते व ह्या ऐक्यात असताना हे दिव्य नाम, कबिराचे अजर अमर नाम स्मरणात येते, अतिंद्रियरीत्या नामाचे ज्ञान ते दिव्यनाम स्वतःस करून देते, अशी अनेक नामे साधुच्या अनुभूतीस (अतिंद्रिय पद्धतीने) श्रवणी पडतात. अथवा दृगोचर होतात. साधु देवांशी ऐक्य पावलेल्या अवस्थेत, उन्मनी अवस्थेत असतो तेव्हा ह्याला या अतिंद्रिय अनुभवास निंबरगी संप्रदायात नामास नाम होणे असे म्हणतात. साधु देवांशी ऐक्य पावताना व

पावलेल्या स्थितीत देखील त्यांचे स्वत:चे नाम निरंतर स्मरत असतो, ते नाम त्याच्या सद्गुरुने दिलेले दिव्यनाम असते. ह्या ऐक्यात त्यास परमेश्वराचा साक्षात्कार अतिंद्रिय रीतीने, अनेक नामात घडतो, अशी त्या साधुजवळ जमलेली नामे तो देवाच्या संमतीने व आज्ञेने जगउद्धार करण्यासाठी वापरतो. अर्थात त्याच्या शिष्यांच्या अंत:करणात त्या दिव्य नामांची पेरणी करतो.

जेव्हा साधुला असा साक्षात्कार घडतो तेव्हा त्याची पारमार्थिक उर्जा देवाशी, सर्वोत्तम श्रेष्ठ अंतिम ऊर्जेत मिसळते. नदी सागराला मिळते म्हणा किंवा सागर नदीस मिळतो म्हणा. अशा सततच्या पारमार्थिक उर्जेच्या मिळकतीमुळे म्हणजेच निरंतर घडणाऱ्या उच्च साक्षात्कारामुळे साधुमध्ये देवांच्या सर्व शक्ती येतात. निर्मिती, पालन व संहार करण्याची शक्ती देखील येते. श्री गुरुदेव म्हणतात बादरायणाचे मते जी निर्मितीची शक्ती साक्षात्कारी व्यक्तिमध्ये येत नाही ह्याचे खंडन करताना म्हणतात की, जर एक तसूभर देखील निर्मितीची शक्ती अशा व्यक्तीमध्ये उतरली जी नाही तर त्या व्यक्तीस साक्षात्कार झाला असे म्हणणे उचित ठरणार नाही. येथे साक्षात्काराचा अर्थ अंतिम देव व भक्तांचे ऐक्य हा घ्यावयाचा आहे.

## तर हे नाम काय आहे?

श्री गुरुदेव म्हणतात Name is a symbol that carries with it Divine Power. नाम एक अशी खूण आहे, ज्यात दैवी शक्ती भरली आहे. श्री गोंदवलेकर महाराज नामास दृश्य जगातील देवाची खूण म्हणतात. ते God in posse आहे. in posse चा अर्थ in potentiality म्हणजे अव्यक्त शक्ती. ज्यात भरली आहे व जी काही संस्काराने व्यक्त होऊ शकते असा आहे. व ही शक्ती कोणती तर दैवी. देवच त्या नामात अव्यक्तपणे वास्तव्य करीत आहे व तो योग्य काळी प्रकट होऊन साधकास भेटणार आहे.

**सगुणातील सद्गुरुंकडून नाम प्रदान**

जेव्हा सद्गुरु देहात होते तेव्हा मुमुक्षु अनन्य भावाने शरण येऊन त्यांच्या चरणी आल्यानंतर सद्गुरु कृपावंत होऊन त्यास नामाची अक्षरे सांगत. गुप्तरीतीने शिष्याच्या आत्म्यामध्ये जी जाणीवेत मनात त्या अक्षरांचे रोपण होत असे. ते नाम सद्गुरु आपल्याकडील ठेव्यातील, त्या शिष्याच्या पारमार्थिक घडण होण्यास सुयोग्य जे असेल ते देत असत. ते सबीज नाम श्रवणी पडल्यानंतर तो शिष्य धन्य होत असे. त्याचा तो दुसरा जन्मच. त्याची species बदलते. त्याचे conversion होते. असो.

**सबीज नाम व सद्गुरुंचे महत्त्व**

अशा सद्गुरुंची ज्यास नाम देण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे व ज्याची योग्यता शिष्यांच्या पाप पुण्यांची जबाबदारी पेलण्याची असते. महत्त्वाची दोन अंगे पाहणे ह्या नामाच्या संदर्भात उचित होईल. त्यामुळे आपल्या सद्गुरुंची योग्यतेची थोडी फार चुणुक येईल.

कबीर आपल्या ''साधो सो सद्गुरु मोहिं भावै'' पदात म्हणतात,

**निस दिन सतसंगत में राँचै,**

**शब्द मे सुरत समावै**

गुरुदेव परमार्थ सोपानच्या टिप्पणीत ह्याचा अर्थ "Brings out an atonement between self and sound" असा करतात. atonement चा अर्थ Oxford Dictionary मध्ये the reconciliation of God and man असा करते. हा शब्द Christanity मध्ये प्रचिलित आहे.

Reconciliation चा अर्थ सलोखा, समेट, संगती असा आहे. तर साधू जो देवच झालेला असतो तो स्वत:मध्ये व नादात/ शब्दात सलोखा आणतो, समेट करतो. एकत्रित संगतीत आणतो. amalgamation करतो.

Pathway to God in Hindi literature मध्ये गुरुदेव म्हणतात – there are three mystical characteristics of such a Sadguru. The first such characteristic of a Sadguru is that the Spiritual teacher is able to make his self consciousness enter Shabda. शब्द मे सुरत समावे

... अशा सद्गुरुंचे तीन आध्यात्मिक विशेष असतात. पहिला असा की सद्गुरु स्वत:ची जाणीव शब्दांमध्ये भरतो....

श्री गुरुदेवांचे निकटवर्ती व भाष्यकार V. H. Date ह्या बद्दल फोड करताना लिहितात ...

This means that way, every utterence of the Name ought to be attended by Rupa. or that Name (sabda) and Rupa ought to be almost simultancously present. This will happen only in the case of a perfect saint who sees the face of God the moment he utters Name of God. and by face of God we now mean the immaculate face of the saint himself.

**अर्थ :-**

याचा अर्थ असा की, प्रत्येक नामाच्या स्मरणाबरोबर रुप पण हजर पाहिजे. किंवा नाम व रुप एकत्रितच जाणिवेत साकारले पाहिजेत. हे साधूच्या बाबतीत घडते. साधूच्या प्रत्येक नामाच्या स्मरणाबरोबर त्याला देवाचे स्वरूप म्हणजेच स्वत:चे पवित्र स्वरूप दिसते...

Pathway च्या दोह्याच्या Pilgrimage प्रकरणात सद्गुरुंचे गुणधर्म व कार्य सांगताना कबिरांचा हा दोहा घेऊन

**''क्षीर रूप सत नाम है, नीर रूप वेवहार ।**
**हंस रूप कोई साध है, तत् का छानन हार ।।''**

गुरुदेव म्हणतात...

The Guru separates Vyavahara from Paramartha, matter from spirit, just as the swan separates water from milk. This is the principle function which a spiritual teacher performs. Not everybody is capable of performing this miraculous function. In the same manner not every so called Guru can separate matter from spirit for the upliftment of his disciple."

**अर्थ :-**

सद्‌गुरु परमार्थापासून व्यवहार, जडापासून चैतन्य दूर करतात. ज्याप्रमाणे हंस दूध पाण्यापासून बाजूला करतो. हे सद्‌गुरुंचे सर्वप्रथम मुख्य कार्य आहे. प्रत्येक पक्षास हा चमत्कार करता येत नाही. तसेच कोणतीही व्यक्ती जी आपणास गुरु म्हणवून घेते, तिला चैतन्याची जडापासून सोडवणूक करणे, आपल्या शिष्याच्या पारमार्थिक प्रगतीसाठी, जमत नाही.''

ही सोडवणूक पारमार्थिक प्रगतीची पहिली पायरीच आहे. कारण आत्मा सेंद्रिय रुपात शरीरात मिसळला आहे. म्हणून उपदेश देते वेळी शिष्याच्या आत असलेल्या आत्म्याला सूक्ष्मरूपात, खसखशीच्या दाण्याएवढे तरी बाहेर काढून गुरु पाहतात व नंतरच त्याला नाम देतात. असे महाराज व बाबा म्हणत असत.

गुरुदेवांनी हे तीन प्रकारे सांगितले आहे. दोन व्यक्त प्रकट व एक अव्यक्त.

१) आत्मा व शरीर ह्यांचा सेंद्रिय संबंध असतो.

२) गुरुचे सर्वप्रथम मुख्य कार्य, शिष्याच्या पारमार्थिक प्रगतीसाठी ह्याची सोडवणूक.

३) जेव्हा नामास God in posse म्हटले तेव्हा अव्यक्तपणे असे सांगितले की, ... in posse ला दुसरा विरोधी शब्द in esse आहे.

तेव्हा सद्‌गुरु नाम देतात तेव्हा God in posse and God in esse दोन्ही देतात. फक्त in esse त्यांच्या इच्छेनुसार साधकास अनुभवास येतो इतकेच.

**सदेह सद्‌गुरुकडून नामोपदेश :**

१) सद्‌गुरुंच्या अंतकरणामध्ये नामास नामे झालेली अनेक नामे तयार असतात. क्वचित प्रसंगी लागल्यास ते देवास विचारून मुमुक्षुस देण्याचे नाम ठरवू शकतात.

२) अशा सद्‌गुरुंच्या अंगी निर्मितीची शक्ती आलेली असते. ते ह्या शक्तीयोगे आपल्या आध्यात्मिक ऊर्जेच्या साह्याने होणाऱ्या शिष्याच्या आत्म्याचे पारमार्थिक उर्जेचे रुपांतर बिंदू अथवा नाद वा प्रकाशामध्ये करून शिष्याच्या शरीरातून बाहेर काढून पाहून मग नाम देतात. महाराज व बाबा असे सांगत, गुरुदेवांनी फक्त वेगळ्या प्रकारे हे विशद केले आहे.

**निंबाळची समाधी, पारमार्थिक ऊर्जा व प्रक्षेपण**

येथे उर्जा परिवर्तनाबद्दल थोडा विचार करू या.

**१) व्यावहारिक सत्तेत उर्जा परिवर्तन**

काडेपेटीतील काडी ओढून अग्नी तयार करणे.

येथे काडी पेटवणे ही प्रेरणा आहे. अन्न सेवनामुळे शरीरात उर्जा तयार होते. त्या योगे हाताच्या चलनाने काडी ओढली जाते. काडी व काडेपेटीच्या पृष्ठभागावर घर्षण होते. Mechanical उर्जा तयार होते. तिचे रूपांतर उष्णता उर्जेत होते. उष्णतेने रासायनिक उर्जा निर्माण होऊन तिचे रुपांतर अग्नी व प्रकाश उर्जेत घडते व शेवटी अवकाशात मिसळते.

**२) पारमार्थिक सत्तेतील उर्जा परिवर्तन व प्रसारण**

(Energy Conversion and its transmission)

पहिले उदाहरण पारमार्थिक उर्जेचे Mechanical उर्जेमध्ये केल्याचे आहे.

१) १९१० साल. हिंचगिरी श्रावण सप्ताह. मुसळधार पाऊस...

पाणीच पाणी. मठा शेजारची ताल भरून पाणी मठात शिरले. नेमास बसण्यास जागा राहिलीच नाही. सगळीकडे पाणी. भिंतीला ओल चढू लागली. मातीच्या भिंती कोसळतात की काय? एक बाई भयंकर भयभीत. ''अरे सर्व मुलांना आणले. एखादे जरी घरी ठेवले असते तर नसते का बरे झाले?''

संकट खरोखरच भीषण. नंद्याप्पाने. नेमात असलेल्या भाऊसाहेबांना हकीकत निवेदन केले व मठाचे रक्षण करा म्हणून प्रार्थना केली.

भाऊसाहेब खोलीबाहेर आले.

पाण्याचा अफाट विस्तार पाहिला.

आकाशाकडे मग बघितले,

नमस्कार केला. देवाची संमती घेतली.

परत आपल्या खोलीत गेले.

आपली पारमार्थिक उर्जा त्यांनी तालेवर फेकली. जणू काही सुदर्शन चक्रच. 'ठो' ताल फुटली. सर्व पाणी वाहून गेले. गंडांतर टळले.

पारमार्थिक उर्जेचे रुपांतर mechanical उर्जेमध्ये घडून त्याचा प्रहार तालीवर बसला व ताल फुटली. हे देवांच्या संमतीनेच केले.

Conversion of Spiritual Energy to Matter ($E = mc^2$)

**पारमार्थिक उर्जेचे जडात रुपांतर**

सन १९२०. गुरुदेवांचा दुसरा आजार.

**देह राहो अथवा जाहो । पांडुरंगी दृढ भावो।।**

या एकाच विचाराने जुलैत हिंचगिरीस आले.

एके दिवशी नेमात शब्द 'आ हू तगो' (ते फूल घे). नेम संपवून गुरुदेव निंबरगी महाराजांच्या देवळात गेले. तेथे समाधीच्या पिंडीवर एकच पांढऱ्या चाफ्याचे फूल होते. ''कोणी बरे फूल वाहिले असेल?'' मनात प्रश्न. पुंडप्पा जवळ. मग पृच्छा ''सकाळी समाधीची पूजा केलीत का?''

''पूजा करावयाची आहे, फक्त समाधी स्वच्छ केली.'' पुंडप्पा

उद्गारले.

मग मठात कसून चौकशी. पण पत्ता लागला नाही. नेमातल्या शब्दाचा अर्थ उमजला. भक्तीभावाने फूल घेतले. थोडे थोडे औषध म्हणून सेवन केले व थोडे जपून ठेवले.

निर्गुणात असलेल्या भाऊसाहेबांनी पारमार्थिक उर्जेचे जड फुलात रुपांतर करून इकडे गुरुदेवांना अनाहत शब्दातून सांगितले, ''ते फूल घे.''

1st Law of Thermodynamics (Conservation of Energy) states that Energy cannot be created or destroyed. It is only convertible."'

उष्णता आणि यांत्रिक काम यांच्या परस्पर संबंधाचे शास्त्र.

**३) तज्ञलान :-**

साधुस ईश्वराच्या सर्व शक्तीमध्ये सहभाग घेता येतो. कार्यरत होता येते. हे सर्व तो देवाची संमती घेऊनच करतो. विश्वाची उत्पत्ती, स्थिती व लय म्हणजेच जडाची निर्मिती, सांभाळ व संहार. तो चैतन्यापासून पारमार्थिक उर्जेपासून करू शकतो. Gurudev म्हणतात, "We believe in the physical transmission of spiritual power." ''आध्यात्मिक शक्ती ही दृश्य जगातही पसरते व आपला प्रभाव पाडते, अशी आमची श्रद्धा आहे.''

ह्या बद्दल William James म्हणतो,

''व्यावहारिक विश्व आणि पारमार्थिक विश्व यांच्यात संबंध जोडण्यास तर्काच्या दृष्टीने (त्यांना) काहीच अडचण भासत नाही. व्यावहारिक विश्वात घडणाऱ्या गोष्टींच्या तपशीलावर पारमार्थिक विश्वाशी संबंध जोडला जातो. आणि त्यामुळे काही नवीन शक्ती, व्यावहारिक जगात अवतरतात व आपल्या प्रभावाने तेथे काही विशेष घटना घडवून आणतात. त्या पारमार्थिक शक्तीचे परिणाम सहजतेने प्राप्त करून घेण्याचा उपाय म्हणजे उच्च जाणिवेचा दरवाजा उघडणे. म्हणजेच त्या दिव्य शक्तीचे व्यावहारिक

विश्वावर प्रत्यक्ष परिणाम घडतात.

तर ही गुरुदेवांची, आपल्या सद्‌गुरुंची आध्यात्मिक उर्जा/शक्ती निंबाळच्या समाधीमधून प्रक्षेपित होते. निंबाळची समाधी पारमार्थिक उर्जा निर्मितीचे जनित्र व प्रक्षेपण केंद्र होय, हे निःसंशय.

**समाधीवर नाम मिळणे :**

निंबरगी संप्रदायाचा सदेह सद्‌गुरुमार्फत जगदोद्धाराचा काळ मर्यादित असल्या कारणाने व तद्‌नंतर भक्ती प्रसार घडविण्यासाठी समाधीवर नामाद्वारे – निंबरगी महाराजांनी आपल्या हयातीत समाधी महात्म्य ठसविण्यास सुरुवात केली.

तेव्हा संप्रदायातील समाधी महात्म्याचा तपशीलवार विचार करू या.

**निंबरगी सांप्रदायातील समाधी महात्म्य**

संप्रदायाच्या मूळ पुरुषांनी, श्री निंबरगी महाराजांनी फल्गुनदी गुप्त झाल्यानंतर म्हणजे सदेह सद्‌गुरु मुमुक्षुचा उद्धार करण्यास उपलब्ध नसताना म्हणजेच श्री गुरुदेवांच्या निर्याणानंतर. १९५७ सालानंतर ज्या सालापासून समाधीवरील नाम फलद्रूप करून भक्ती येणाऱ्या अनंत कालात चालवायची बांधिलकी परमेश्वरांनी त्यांच्यावर टाकली होती, त्यांनी १८८० पासूनच समाधीचे, सद्‌गुरुंच्या समाधीचे महत्त्व ठासविण्याचा प्रारंभ केला.

१) १८७९ रोजी साधुबुवांचे निर्वाण चिम्मडास झाले. १८८० साली तेथे त्यांची समाधी झाली. ही जागा काही वर्षापूर्वी आपल्या दौऱ्यात श्री निंबरगी महाराजांनी निश्चित केली होती, त्या ठिकाणी आपल्या समवेत तेव्हा असणाऱ्या त्यांच्या शिष्या लक्ष्मीबाई अक्कांच्या बरोबर त्या ओसाड स्मशानाच्या जागेत कापूर लावून अक्कानी, कारण विचारल्यानंतर येथे पुढे साधु पुरुषांची समाधी होणार आहे हे सांगितले होते. निंबरगी संप्रदायाचा दुसऱ्या शाखेच्या चिम्मड शाखेच्या प्रेषिततताकडून श्री रामभाऊ यरगट्टीकरांक़डून ते काम श्री निंबरगी महाराजांनी करवून घेतले. जसे

**आज्ञा करिती साधुकारण । तुम्हीच अनुग्रह करावा म्हणून ।**
**साधुबुवांनी मान्य करून । भाऊराव उपदेशिले ।।२।।**

तसेच श्री यरगट्टीकरांनाही निंबरगी महाराजांनी साधुबुआंतर्फे उपदेश दिला होता.

तेव्हा १८८० साली समाधी झाल्यानंतर श्री निंबरगी महाराजांनी भाऊसाहेबांना सांगितले, ''भाऊराया! तुझा गुरु चिम्मडास आहे. कार्तिक शु. ५ ला तेथे उत्सव होतो. दरसाल तू त्या समाधीचे दर्शन घेऊन येत जा.''

सद्गुरुंच्या आज्ञेप्रमाणे, श्री भाऊसाहेब प्रतिवर्षी आश्विन महिन्यात जमखिंडीला जाऊन, गुरुद्वादशीपासून पंचमीपर्यंत तेथे सप्ताह करून आणि नंतर तेथून चिम्मडास जाऊन गुरुंच्या समाधीचे दर्शन घेऊन येत. तसेच आपले गुरुबंधू रामभाऊ महाराजांना भेटून परमार्थाच्या गोष्टी करून येत.

हा त्यांचा उपक्रम इ. स. १८८० पासून इ. स. १९१२ पर्यंत झाला. मध्ये १-२ वर्षे बंद पडला असेल. श्री गुरुदेव देखील शेवटपर्यंत ह्या उत्सवास मनिऑर्डर पाठवित असत.

**२) श्री निंबरगी महाराजांची समाधी**

श्री निंबरगी महाराज यांची समाधी निंबरगी गावातील ओढ्याच्या अलीकडे आहे. ओढ्याच्या पलीकडे एक चौथरा बांधलेला असून तेथे मूळ समाधी होती. हिंचगिरी येथेही श्री निंबरगी महाराजांचे देऊळ आहे. तेथे पण समाधी आहे. तीनही वास्तूंचा वृत्तांत काटेकोरपणे व तारीखवार तयार करावा अशी श्री गुरुदेवांची इच्छा होती. त्यासाठी श्री भाऊसाहेब महाराज यांच्या डायऱ्या व पत्रे, तसेच इतर काही पत्रे पाहून, अनेक वर्षांच्या पंचांगावरून तिथी व तारखांचा मेळ घालून श्री गुरुदेवांनी श्री बाबासाहेब संगोराम यांच्या साह्याने सखोल अभ्यास करून १९४६ साली काही टिप्पणे तयार केली होती. त्यातील जो भाग आपल्या कथेस

लागू आहे तेवढा घेऊन पुढे प्रस्थान करू या.

**श्री निंबरगी महाराजांचा देहांत**

**चैत्र शु.।। १२/१३ शुक्रवार मध्यरात्रीचे सुमारास.**

**२७-२८ मार्च १८८५.**

भाऊसाहेबांच्या १९१० सालच्या डायरीत चैत्र शुद्ध ।।, १२/१३ मध्ये असे असून १९०४, १९१२, १९१३ या सालच्या डायऱ्यामधून चैत्र शुद्ध ।। १३ नमूद आहे. पंचांगामध्ये शुक्रवारी द्वादशी ४६ घटिका आहे. मध्यरात्री पर्यंत ४५ घटिका होतात. निंबरगी महाराजांनी देह ठेविल्यावेळी भाऊसाहेब त्यांच्याजवळ होते. त्यामुळे १२/१३ (द्वादशी उपरांतिक त्रयोदशी) असे महाराजांनी लिहिले असावे.

मूळ समाधी बांधण्याची तिथी वगैरे तपशील उपलब्ध नाहीत.

ही समाधी २ फेब्रुवारी १९०२ मिती माघ शु।। १४ शके १८२२ शनिवारी बुजविली. पाटलीण व गुरुवाने संगनमत करून. कारण जागा गुरुवाची होती. पहिल्या वर्षी नुसते दगड वगैरे काढले व दुसरे वर्षी समाधी बुजविली असे समजते.

त्यानंतर १९०१, चैत्र सप्ताह निंबरगी गावात झाला असावा. मूळच्या जागेत उत्सव करण्यास हरकत घेतली. २०-४-१९०१ रोजी सु डि. डे. सुब्रय्यानी कलेक्टर भिडे यांना तडजोड वजा एका अर्जाचा मसुदा केला असून त्यात निंबरगी महाराजांच्या अस्थी आपल्या स्वत:च्या खात्याच्या जमिनीत आणून समाधी बांधण्याची परवानगी मागितली होती.

तर ह्या वरून श्री निंबरगी महाराजांच्या निर्याणानंतर १९०१ सालापर्यंत मूळ समाधीचे दर्शन घेणेस व सप्ताह करणेस श्री भाऊसाहेब महाराज निंबरगीस जात होते. त्यानंतर हे विघ्न आले व आता भक्तीचे केंद्र कोठे करावयाचे ह्या चिंतेत असताना श्री भाऊसाहेबांना दृष्टांत झाला. ज्यात त्यांना श्री निंबरगी महाराजांचे शब्द ऐकू आले. ''माझ्या समाधीवरील मूठभर माती घेऊन तू कोठे ठेवशील तेथे तुझा जयजयकार

होईल'' व याच सुमारास गणेश शास्त्री चौथईना निंबरगीचा भीमाशंकर हिंचगिरीला गेला आहे, असा दृष्टांत झाला. भक्तीचे नवे केंद्र ठरले.

सोमवार ६, एप्रिल १९०३. चैत्र शु।। ९ शके १८२५ रोजी हिंचगिरी येथे पादुका स्थापन केल्या. ह्या पादुका निंबरगीचे साधक घेऊन आले होते. मार्गशीर्ष सप्ताहासाठी प्लेगमुळे लवकर मंडळी परतली. पादुका विसरून त्याच पादुकांची स्थापना केली. श्री बाबांनी एका जस्ताच्या डबीत निंबरगी महाराजांचा अंगारा व चार आणे घालून ती डबी समाधीखाली ठेवली, असे सांगितले. महाराजांनी ज्ञानदेवांच्या गाथेतील खाली दिलेले अभंग पाहून पादुका स्थापना केली.

## अभंग १

**पहाणेची पाहसी काय पाहणे तेथे नाही ।**
**पाहाणेची पाही पाहाणे रया ।।१।।**
**खुंटले बोलणे बोली बोला**
**बोलुचि मौन्ये ठेला मान्यमाजी ।।ध्रु।।**
**बाप रखुमादेवी वरा विठ्ठलाचिये खुणे।**
**अनुभविया बोलणे पारुषले ।।२।।**

## अभंग २

**अमोलिक रत्न जोडले रे तुज ।**
**का रे ब्रह्मबीज नोळखिसी ।।१।।**
**न बुडे न कळे न भिये चोरा ।**
**ते वस्तू चतुरा सेविजेसु ।।२।।**
**ज्ञानदेवी म्हणे अविनाश जोडले ।**
**आणूनि ठेविले गुरु मुखी ।।३।।**

ह्या संबंधी ज्ञानदेवांच्या गाथेत (गोंदवलेकर १९८४) अभंग नं. ४४९,

४५० असलेल्या पानावरचे श्री महाराजांचे टिप्पण स्वहस्ताक्षरात असे – ''पादुका स्थापनेचे शेकुण  १३१२ चैत्र शु.९ बारावर वाजता प्रश्न.''

श्री भाऊसाहेबांनी समाधीवरील पादुका स्थापनेच्या वेळी शकुन का पाहिला ह्याचे थोडे मुक्त चिंतन ज्या महाराजांना शकुन अपशकुनावर बिलकूल विश्वास नव्हता, म्हणून ही घटना त्या दृष्टीने पाहणे ही अवश्यक आहे. कारण...

१) श्री. महाराजांनी जमखंडीमध्ये ते पहाटे गावाबाहेर नेमास जात असत तेव्हा त्यांच्या मागे दोन–तीन तरुण लोक महाराज काय करतात ते बघण्यास गेले असता, नेम संपल्यानंतर त्यांची व तरुणांची भेट झाल्यावर व त्यांनी महाराजांच्या मागे येण्याचा उद्योग सांगितल्यानंतर महाराज म्हणाले, ''फार चांगले झाले. अवश्य पाहावे. आपला गुरु काय करतो, कोठे जातो, कसा वागतो हे सर्व पहावे.''

अपशकुन व्यवहारातील लोक रुढीप्रमाणे मानलेले.

एकदा महाराज घराबाहेर कामाकरता निघाले. तेव्हा हातात विस्तव घेऊन एक अलवण परिधानीत विकेशा त्यांच्यासमोर आली. हा अपशकुन म्हणून त्यांचे बंधू नानासाहेब यांनी महाराजांना थांबविले. तेव्हा महाराज म्हणाले, ''गंगा भागीरथी हातात ज्ञानाग्नी घेऊन माझ्यासमोर आली आहे. तेव्हा माझे काम यशस्वी झालेच पाहिजे.'' असे बोलून भाऊसाहेब तडक गेले आणि काम यशस्वीरीतीने पार पाडून आले.

२) १९०३ साली निंबरगी महाजांचे देऊळ व शिखर तयार. कळस कोणी ठेवायचा, मंदिरावर कळस ठेवणे म्हणजे आपल्या मृत्यूस आमंत्रण देणे, अशी एक समजूत त्या काळी होती. परंतु हा मान दुसऱ्याच्या वाट्याला देण्यास महाराज तयार नव्हते. मरणाअलीकडेच मुक्त झालेल्या त्यांना मरणाची भीती कसली. गुरुंच्या मंदिरावर कळस चढविण्याचा निर्णय आपल्या कार्याचा कळस व अवतार समाप्तीचा कायमचा निर्णय घेतला.

३) एकदा वतनाची रुसूम घेण्यासाठी जतला गेले होते. कचेरीतले

काम लवकर संपण्याची व्यवस्था करावी असे आधीच कृष्णाजी पंतांना सांगितले होते, घरातून बाहेर पडताच मांजर आडवे आले. बरोबर असलेले पुंडप्पा म्हणाले, ''कट्ट्यावर थोडा वेळ बसू या.'' महाराजांनी तसे केलेही. उठते वेळी म्हणाले, ''तू असे का म्हणालास ते समजले. मांजर आडवे आले म्हणजे अपशकुन, काम होत नाही. पण मला मांजरा अलीकडे वस्तू दिसते. काम लवकर होईल बघ. त्याचप्रमाणे झाले.''

तिन्ही प्रसंग श्री भाऊसाहेबांच्या वैयक्तिक जीवनाशी निगडीत आहेत.

पण जेव्हा जगदोद्धाराचे काम करावयाचे असते तेव्हा साधुला देवाची संमती घ्यावी लागते. उदाहरणादाखल जेव्हा ते आपल्या जवळील गोळ्या, औषधे म्हणून देत तेव्हा निंबरगी महाराजांच्या देवळाच्या कळसाकडे बघून संमती घेऊन देत.

हिंचगिरीत समाधी स्थापनेचा प्रसंग. भक्तीकार्यात अत्यंत महत्त्वाचा, दुसरे भक्ती केंद्राची उभारणी, अजून मंदिर व कळस होणेचे आहे. तेव्हा देवांची संमती घेणे, शकुन बघणे हे अत्यंत आवश्यक लौकिकदृष्ट्या, कारण निंबरगी महाराजांनी कोरा चेक दिला होताच. ''माझ्या समाधीवरील मूठभर माती...''

संतांची प्रत्यक्ष संगती नसते तेव्हा त्यांच्या ग्रंथाचे साहाय्य घ्यावे लागते.

म्हणून त्यांनी गोंदवलेकर प्रकाशित ज्ञानदेव गाथेतील पान उघडून अभंग पाहिले. देवाने संमती दिली, कौल दिला, शकुन झाला. त्या ऐतिहासिक प्रसंगांची नोंद महाराजांनी आपल्या सुवर्ण अक्षरात केली.

''पादुका स्थापनेचे शेकुण १३१२ चैत्र शुद्ध ९ बारावर वाजता प्रश्न.''

श्री निंबरगी महाराजांच्या अस्थि सुब्रायाकडून रा. कृष्णाजी बळवंत मोघे यांनी काढून ओढ्याच्या अलीकडे हल्लीचे जागी स्थापन केल्याची तारीख १ शनिवार/२ शनिवार जानेवारी १९१० मिती मार्गशीर्ष व ।। ६ शनिवार/७ रविवार शके १८३१.

मार्गशीर्ष सप्ताह २० ते २७ डिसेंबर हिंचगिरी येथे संपन्न. त्याकरीता श्री महाराज नंद्वापा व इतर मंडळी तेथे होती. सप्ताह समाप्तीनंतर नंद्वाप्पा २७–१२ रोजी जमखंडीस गेले. गुरुवार ३० रोजी श्री महाराज बालगाव मार्गे उमदीस गेले व नागप्पा जिगजेवणी मार्गे निंबरगीस आले. तोपर्यंत आपटे (फौजदार) व मोघे हे पण निंबरगीस आले. त्यांचे समक्ष निंबरगी महाराजांच्या अस्थी शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास काढल्या व त्या एका तांब्याच्या डब्यात घालून, तो डबा आत ठेवून वर वृंदावन बांधले. त्यावर पादुका स्थापन केल्या. त्या वेळी क्षितिजावर सूर्य अर्धा आला होता, अशी हकीकत नागप्पांच्या पत्रात आहे.

११–९–१९२६ रोजी समाधीचा मोघे यांनी बांधलेला प्लॅटफॉर्म वाढवून त्यावर हल्लीचे देऊळ बांधण्यास सुरुवात.

२–४–१९२९ रोजी समाधीवरील लिंग स्थापना झाली. व सप्ताह पुढे ७ दिवस झाला.

श्री निंबरगी महाराजांच्या अस्थीचे दर्शन न घडल्यामुळे श्री भाऊसाहेबांना अतोनात दुःख झाले.

ह्या सर्व गोष्टींचा विचार आपल्या सद्‌गुरुंनी पहिल्यापासूनच करून ठेवल्याचे आढळले. फल्गू गुप्त झाल्यानंतर भक्ती प्रसाराचे कठीण काम केवळ सद्‌गुरुंचे सामर्थ्य पुण्यमार्गांनी चालले म्हणून, त्यांचे ग्रंथ, व समाधी ह्या करवीच भगवंतास करावयाचे असते, ह्याचे एक एक पदर उलगडत जाऊ.

* श्री भाऊसाहेब महाराज यांचे जावक पत्र क्र. २५९ ता. २५–१–१९०६ चे त्यातला मूळ परिच्छेद असा :–

''मागे आवताराधिक होऊन गेले. त्यांचे उपासना आपआपले करीत आहे. अवतारा ।। संभवामि युगे युगे ।। आवतार धारण केला, तेव्हा सगुणात येऊन निर्गुण होऊन गेले आहेत. त्या आधारे निर्गुणकरीता या जगात सगुणच होऊन बसले म्हणून तो आपण काही सगुण जाहले नाही.

निर्गुण तो निर्गुणच होऊन गेले.

सगुणात सगुण होऊन निर्गुण वस्तूची भेट युगे युगे झालेली आहे. दर्शन, स्पर्शन, संभाषण जाहलेले आहे.''

साधक–बोधमध्ये श्री. काकासाहेब ह्याचा अर्थ असा करतात – ''सत्पुरुष सगुणात म्हणजे देहांत येऊन निर्गुण, गुणातीत ब्रह्मरूप होऊन जातात'', अशी अनेक उदाहरणे आहेत. सगुण देहात सगुण भजन करून निर्गुण होतात, कारण त्यांना निर्गुण वस्तूंचे, आत्म्याचे, देवाचे अनुभव येतात. निर्गुणाचा असा साक्षात्कार झाल्यामुळेच ते निर्गुण झाले. अशा पुरुषांनी आत्मसाक्षात्कारासंबंधी ग्रंथ, पदे लिहिली. त्या पदांच्या आधारे आताही लोक अशा निर्गुणाच्या साक्षात्काराने निर्गुण पदाला पोहोचत आहेत. असे पुरुष म्हणजे रामदास, ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादी. या निर्गुण पदाला पोहोचलेल्या संतांच्या सगुण रुपाची लोक भक्ती करतात व स्वत: निर्गुणाला पोहोचतातच. त्यांचे सगुण रूप म्हणजे त्यांचे ग्रंथ, चरित्रे, मूर्ती, फोटो, समाधी वगैरे. या प्रमाणे लोकांनी त्यांना सगुण रूप दिले तरी ते आत्मज्ञानी पुरुष काही सगुण, देहधारी किंवा गुणयुक्त होत नाहीत. ते निर्गुणात मिळून जाऊन निर्गुणच झालेले असतात.''

* ''अवतार धारणा केली तेव्हा सगुणात येऊन निर्गुण होऊन गेलेले आहेत. त्या आधारे निर्गुणाकरता या जगात सगुणच होऊन बसले. म्हणून तो आपण काही सगुण जाहले नाही. निर्गुण तो निर्गुणच होऊन गेले.'' ''ज्ञानी मुक्त होऊनि गेले । त्यांचे सामर्थ्य मागे चाले।'' समर्थांच्या या वाक्याप्रमाणे, सगुणात येऊन निर्गुण होऊन गेलेल्या ज्ञानी संतांच्या समाध्या झाल्या, देवळे झाली. त्यांच्या मागे त्यांची उपासना चालली आहे. त्यांची देवळे व समाध्या झाल्या म्हणून मुक्त झालेले ज्ञानी संत मुक्तच होऊन राहिले.

(भा. क. पा. १३५)

* श्री भाऊसाहेबांनी लोकांना एकत्र आणण्यासाठी, निंबरगी

महाराजांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार केलेल्या जागीच त्यांच्या समाधीची स्थापना केली. सगुण समाधी हे एक साधन करून त्यांनी आपल्या शिष्यांना एकत्र आणले. समाधी म्हणजे अवतारादिक ज्ञानी संतांचे ते एक सगुण प्रतिक असे महाराजांचे म्हणणे होते. निंबरगी महाराज असतानाची आपली वारी त्यांनी १८८५ नंतर तशीच पुढे चालू ठेवली. त्याचबरोबर समाधीची सगुण उपासनाही ते करू लागले. पूजा व भजन कार्यक्रम आरंभला. दत्तजयंतीचा ७ दिवसांचा सप्ताह व महाराजांच्या पुण्यतिथीचा सप्ताह असे दोन सप्ताहे ज्यात जास्तीत जास्त साधकांनी एकत्र येऊन परस्पर संगतीचा लाभ घ्यावा हा उद्देश होता.

**श्री अंबुराव महाराज :-**

१) एकदा बाबा, महाराजांच्या बरोबर तिकोट्यास गेले होते. तेव्हा महाराज म्हणाले, ''अंबुराया। तुझ्या गुरुची समाधी (सावळसंग भाऊराव त्यांच्या करवी नाम दिले होते) येथेच आहे. तेथे जाऊन समाधीपुढे नारळ फोडून, कापूर लावून ये.'' व मग बाबांनी ते आपले गुरू नव्हते, असे म्हटल्यावर ''मी सांगतो म्हणून तरी जाशील ना?'' असे म्हणून पाठविले.

हा परिपाठ बाबांनी जेव्हा ते तिकोट्यास गेले तेव्हा पाळला की नाही, हे अज्ञात आहे.

२) बाबांच्याकडे नाम घेणेस आलेल्याना ते महाराजांच्या समाधीस स्पर्श करून पथ्य पाळण्याची प्रतिज्ञा करण्यास सांगत. जर कोणी पथ्य मोडल्यास आपण त्यांना क्षमा न करता समाधीजवळ नेमास बसवून ते क्षमा मागणेस सांगावयाचे.

**इतिहासाची पुनरावृत्ती :-**

महाराजाचे निर्याणानंतर मठात द्वैत. बाबांचे मठात जाणे बंद ज्या समाधीचे दर्शन घेऊन तीर्थ घेतल्याशिवाय अन्न ग्रहण करीत नसत. तिथे उंबरठ्यावरून दर्शन देखील कठीण झाले. त्यांनी स्वतंत्र मठ स्थापन केला. तेथे महाराजांचा फोटो ठेवून भक्ती चालविली. हा क्लेष रोज

हयातीभर ते सहन करीत राहिले. त्यांना समाधी व फोटोबद्दल एकच भाव होता.

जमखंडीत एका बाईला बाबांनी नाम दिले. २–३ दिवसांत ती नाम विसरले म्हणून आली. पुन्हा नाम मागितले.

''दुसऱ्यांदा नाम देणेची परवानगी नाही. पुन्हा नाम देता येत नाही.'' बाई दु:खी. म्हणून एक उपाय सांगितला.

महाराजांच्या फोटोसमोर बसून रोज एक तास महाराज महाराज म्हण. नाम आठवेल. त्याप्रमाणे झाले. लक्ष्मण भटजींना त्यांनी या संदर्भात ''महाराज महाराज'' म्हटल्याने प्रचिती नक्की येईल असे सांगितले. कारण तो बिजमंत्रच होता त्यांना.

**श्री गुरुदेव :–**

आपल्या सर्व सद्गुरुंचा त्यांच्या सद्गुरुंच्या समाधी बद्दलचा भाव व सद्गुरु देहात असेपर्यंतचा त्यांच्यावरील भावात तूसभरही फरक पडला नव्हता. कसे ते पहा.

१) श्री. बाबांचे गुरुदेवांना पत्र – २०–६–१९१४

''आपल्या आज्ञेप्रमाणे समर्थांचे समाधीजवळ श्रुत केले आहे. आपले अंत:करणात भाव असे असेल तसे समर्थ पुरवून देणार समर्थ आहे यात काही अंदेशा तिळमात्र नाही. फक्त भक्तांचे काम देवाची चिंता करणे. देव सहजी आपले भक्तास सांभाळ करीत आहे. यात काही शंका नाही.

२) गुरुदेवांचे बाबांना १३–८–१९१७

''... त्याप्रमाणे समर्थचरणी साष्टांग नमस्कार सांगावा. म्हणजे सर्व संत मंडळींस पोहोचत आहे.''

३) गुरुदेवांचे बाबांना २१–८–१९१८

''... श्री समर्थांचे ठिकाणी एकनिष्ठ भक्ती ठेवून वागले असता हिंचगिरी येथील श्री समर्थांचे समाधीबद्दल कदापिही प्रेम कमी होणार नाही. श्री समर्थांचे ठिकाणी प्रेम कमी झाल्यास त्यात आत्मज्ञानाखेरीज

दुसरे काही तरी शिरले असे म्हणण्यास काही हरकत वाटत नाही.''

४) गुरुदेवांचे बाबांना २७–९–१९१८

''.... श्री समर्थांचे चरणी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना... कळावे. समर्थ चरणी श्रुत व्हावे ही विज्ञापना.''

५) गुरुदेवांचे बाबांना १३–१०–१९१८

''... अद्याप काही वर्षेपर्यंत समर्थांचे साधनाकडे लक्ष लाऊन आत्मज्ञान येथेच साध्य करून घ्यावे असे फार आहे. इच्छा पुरविणे समर्थांकडे आहे. हा मजकूर समर्थ चरणी विदित करावा व पत्रोतर यावे... समर्थ चरणी विदित व्हावे.''

६) १९२० श्री गुरुदेव हिंचगिरीत देह पडो अथवा देव जोडो ह्या एका भावनेनेच. मग दृष्टांत ''ते फूल घे.'' श्री निंबरगी महाराजांच्या समाधीवरील फूल घेतले. थोडे थोडे औषध म्हणून ग्रहण केले. त्या सालीच त्यांच्या पुरता त्यांच्या परमार्थ झाला.

७) गुरुदेवांचे बाबांना २९–२–१९२०

''... अशीच प्रकृती उत्तम होऊन समार्थांचे सेवेत सर्व शरीर, मन, धन, विद्या, वैभव खर्च करण्याची ताकद यावी. भक्ती मार्ग वाढावा, अशी समर्थ चरणी प्रार्थना आहे. श्रुत करालच.''

८) बाबांचे गुरुदेवांना – १३–६–१९१७

''... आपले पत्र समर्थांचे समाधीपुढे ठेवून समर्थांचा अंगारा व फुले लखोटीत घालून पाठविले आहे.''

९) बाबाचे गुरुदेवांना १०–३–१९३२

''... अंगारा समर्थांची लखोट्यात घालून पाठविले आहे.''

अत्यंत आनंदाची गोष्ट म्हणजे १९५७ नंतर आजपर्यंत व पुढे येणाऱ्या काळात ह्या सर्व सद्‌गुरुंच्या सामर्थ्याने सर्व साधक मंडळींचा समाधीवरील भाव तरतम या न्यायाने वाढतच आहे व आपल्या संसारातील सुख दुःखाच्या सर्व गोष्टी, साधकजन आपआपल्या परीने

समाधीस श्रुत करीत असतातच हे आपण सर्व जाणताच आहात.

**निर्गुणातील सद्‌गुरुंकडून नाम प्रदान**

निंबाळ आश्रमी समाधीवर नाम देणे-घेणेची प्रक्रिया सर्वांना ज्ञात आहेच. वैज्ञानिकदृष्ट्या दोन महत्त्वाच्या गोष्टी बघणे आवश्यक आहे.

१) नाम सबीज कसे होते?

२) साधकाच्या आत्म्याची सोडवणूक कशी घडते?

**१) नाम सबीज होणे**

समाधीतून प्रसारित होणाऱ्या पारमार्थिक लहरींच्या स्पंदनाचे तादात्म्य साधकाच्या मेंदूमधून निघणाऱ्या लहरींच्या स्पंदनाशी झाल्यावर साधकाच्या मनातील नाम (जे त्यांनी चिठ्ठीवर लिहिले असते) सबीज होते. त्यात सद्‌गुरुंची -गुरुदेवांची आध्यात्मिक शक्ती प्रवेश करते.

येथे ध्यानात घेण्याची मुख्य गोष्ट ही की साधकाचे अंत:करण ह्या प्रसंगी अत्यंत तरल व द्रवरूप झालेले असते. तो शरणागतीची, काकुळतीची प्रार्थना करतो. ''.... तुम्ही माझे गुरु, माझा स्वीकार करा...''

**२) आत्म्याची सोडवणूक**

येथे गुरुदेवांनी निर्मिलेला Theotropism हा शब्द लक्षात घेतला पाहिजे. Tropism चा अर्थ एखाद्या जीवांशाचे एका विशिष्ट दिशेला, बाहेरील प्रोत्साहनाने, वळणे घडते.

उदाहरणार्थ सूर्यफुलाचे सूर्याच्याकडे वळणे यास Heliotropism म्हणतात.

गुरुदेवांनी, Theo म्हणजे देव, देवाने भक्ताला ओढून घेणे या प्रक्रियेस Theotropism शब्द तयार केला. गुरुदेवांच्या मते हा एक पारमार्थिक अनुभव आहे.

साधक दृष्टिकोनातून याचा विचार करू. आपण समाधीपुढे नतमस्तक आहोत व ह्या Theotropism मुळे जसे शीव हा चुंबकीय +ve pole धरला तर जीव मायेच्या - अज्ञानाच्या आवरणामुळे -ve

pole च्या भूमिकेत असतो व खेचला जातो. तद्वत साधकाच्या आत्म्याची सोडवणूक घडते.

अर्थात ह्या सोडवलेल्या आत्म्याचा अनुभव साधकास योग्य वेळी गुरुकृपेने येतो.

शेवटी, सद्गुरु सगुणात असताना त्यांच्या संकल्पानुसार त्यांच्या आत्म्यातून त्यांची पारमार्थिक उर्जा बाहेर येऊन शिष्याच्या शरीरात मिसळलेल्या आत्म्यामध्ये शिरून त्याचा बिंदू किंवा इतर रुपाने बाहेर काढते/ सोडविते.

सद्गुरु निर्गुणात असताना, त्यांच्या समाधीतून (ज्यात त्यांच्या दिव्य अस्थी असतात) त्यातून पारमार्थिक उर्जा बाहेर येऊन वरील कार्य करते.

देवास, भक्ती चालवायची असते म्हणून हे कार्य घडते. त्यांच्या संकल्पनानुसार त्यांनी ज्यास निवडून समाधीपाशी शरण आणले आहे. त्याच्या बाबतीत. देवास समाधीमध्ये अस्थी असण्याची गरज नाही.

जसे तुकारामांच्या स्वप्नामध्ये येऊन गुरुमंत्र दिला.

दृश्यात असलेल्या मानवाच्या अल्पमतीस शरण आणण्यासाठी अनन्य भाव उत्पन्न करण्यासाठी ही भगवंतांनी केलेली तजवीज, व्यवस्था. System. त्या त्या काळाच्या Merit प्रमाणे इतकेच.

System एकच आहे. समोर सगुण सद्गुरु अथवा त्यांची सगुण समाधी. कार्य करणारा देव, कार्य सद्गुरुंच्या निर्गुण आत्म्यातर्फे जो सद्गुरुंच्या शरीरातून मुक्त झाला आहे. त्या करवी करून घेतो. साधकाला प्रतिक फक्त सद्गुरुंचा देह अथवा त्यांची समाधी दोन्ही एकच. प्रचंड अखंड पारमार्थिक उर्जेचे जनित्रच. श्रोतच.

● ● ●

# नामस्मरण (नेम)

## बोधसुधा वचन क्रमांक ५३

**अहोरात्र आत्मध्यान**

सद्‌गुरुंनी दिलेले नाम उठता बसता सारखे स्मरून, या डोळ्यानी आत्मप्रकाश पाहत असावे. कोणत्याही विकारात मन गुंतले तरी पुन: पुन्हा नामस्मरणच करावे. सर्व गोष्टींत नामच आपणास तारते. म्हणून आत्मध्यानाव्यतिरिक्त अन्य कामात केव्हाही आयुष्य वेचू नये. आपण जन्माला येऊन करावयाचे मुख्य काम म्हणजे आत्मध्यान हेच होय.

आत्म्याचे ध्यान केव्हाही सोडू नये, अहोरात्र करावे. रोज एकेक तास या प्रमाणे तीन वेळा, अगर दिवसा दोन व रात्री दोन या प्रमाणे नाम स्मरण करत बसावे.

साधन न कंटाळता, सदैव गुप्तरीतीने करावे. दुसऱ्याला कळू न देता. अहोरात्र ध्यानात असावे. गोप्य कळू देऊ नये.''

हे ideal ध्येय. याकडे वाटचाल कशी करावयाची त्याचा ह्यानंतर सूक्ष्मतेने विचार करावयाचा आहे.

श्री भाऊसाहेब महाराज नामस्मरणाच्या पद्धतीविषयी नेहमी चार गोष्टी सांगत. नामस्मरण नियमाने, निश्चयाने, कट्टाने व निष्ठेने करावे, असे ते सांगत.

**नियम :** म्हणजे साधनाचा काल. उदा. सकाळी, रात्री एक तासाप्रमाणे.

**निश्चय** : साधना विषयी संकल्प : तीच वेळ साधावयाची, न चुकता.

**कट्ट : त्याची पद्धत** : आसन, दृष्टी, श्वासात ठराविक अवधी पर्यंत.

**निष्ठा : त्या वेळची भावना** : हर्ष, प्रेम, आनंद इत्यादी भावना.

श्री. भाऊसाहेब जावक पत्र क्र. १८८ पहा :–

''नाम निष्ठेचा असला पाहिजे. म्हणजे दासबोध दशक ४, समास ३ ओव्या यात आहे, त्याप्रमाणे सर्वांनी करीत जावे. डोळ्यात गुंग असू नये. अंत:करणात हरुष असल्याने जांभया येत नाही, असे निष्ठेने, नामाने सकाळी दोन तास केल्याचे फळ अकरा तासाचे निरुषण होत आहे. संध्याकाळचे सात ते अकरा तासाचे व्यवसाईचे निरुषण होत आहे. तूक कळू लागते...''

२४ तासाचे निरसन २ तासांच्या नामस्मरणाने होते. त्याचा अर्थ श्री काकासाहेबांनी साधक बोधमध्ये असा केला आहे, ''पूर्वीच्या ११ तासांचे संस्कार मनावर जे अशुद्ध संस्कार करतात, ते पुसले जातात. मग सारासार विचार कळू लागतो. म्हणजेच १ तासाचे नास्मरण ११ तासाच्या प्रपंच्यापेक्षा बळकट आहे, असे कळू लागते व नामाची उत्सुकता लागते. दिवसाच्या जमाखातेच्या हा विचार बाकी पूज्य दाखवितो म्हणून १ तासाचे कमीत कमी अधिक नामस्मरण जमेची बाजू वाढविण्याकरीता.

सिटिंगच्या वेळी श्री गुरुदेवांनी नेमाच्या वेळेप्रमाणे गुणवत्ता एका साधकाला सांगितली...

| | | |
|---|---|---|
| सहा तासापुढे कितीही | – | Super First Class (A/c 1st class) |
| ६ तास | – | I क्लास |
| ५ तास | – | II क्लास |
| ४ तास | – | इंटर क्लास |
| ३ तास | – | III क्लास |

बोधसुधा वचन ५३ वरून लक्षात येईल की ४ तास व ३ तास हे एकाच गुणवत्तेचे आहेत. म्हणजेच इंटर क्लास म्हणा किंवा III class म्हणा किंवा हल्लीचा II class.

तर मुख्य मुद्दा असा की रोजचा नेम हा किती साधावयाचा हे ज्यांनी त्यांनी त्यांचा व्यवसाय, प्रपंच व इतर सर्व गोष्टी बघून ठरवायचे आहे.

आपणास सर्वांना माहीत असलेल्या नामस्मरण करण्याच्या श्वासातील करण्याबाबतच्या गोष्टी.

१) नामाची अक्षरे जीभ न हलविता, मनात श्वासाबरोबर घ्यावयाची. श्वास आत घेताना अक्षरे जितक्या वेळा घेता येतील, तितक्याच वेळेला सोडताना पण घ्यावयाची. घेणे म्हणजे मनात नामाच्या अक्षरांचे स्मरण, आठवण.

२) श्वासाबरोबर मनात स्मरत असलेल्या नामाच्या सर्व अक्षरांचा स्पष्टपणे उच्चार होतो किंवा नाही याकडे लक्ष असावे.

३) नाम एकदा तीव्र गतीने एकदा मंद गतीने स्मरत जाऊ नये

(दा. बो. सु. पान २५८/५९)

एक उदाहरण म्हणून आपण असे गृहीत धरू की एका साधकाचा नेम रोज दोन तास होतो. मग संपले का? येथून तर खरी सुरुवात व शेवट ही इथेच. सुरुवात अशी. उरलेल्या २२ तासांचे काय? नामस्मरण केव्हाही सोडावयाचे नाही. अहोरात्र करावयाचे आहे. मग हे सर्व कसे साधावयाचे. आपल्या सद्‌गुरुंनी हे सर्व स्पष्ट केलेले आहे. अनेक उदाहरणे देऊन, प्रत्येक क्षण कसा सार्थकी लावायचा हा बोध दिला आहे. तो पाहू.

ढोबळपणे दिवसाच्या वरील साधकाच्या बाबतीत असे भाग पाडता येतील.

२ तास नेम

८ तास झोप

१० तास व्यवसाय. व त्यासाठी जाण्या–येण्यात घेतलेला वेळ, जेवणाची सुट्टी इ.

४ तास प्रपंच. घरी कुटुंबासमवेत.

नेमाचा विचार ढोबळपणे झाला आहे. शेवटी त्याच्याकडे परत जावयाचे आहे. प्रथम झोपेबद्दल विचार करू.

ही श्री भाऊसाहेबांची आठवण. दा. बो. सु. क्रमांक ३६८, पान क्रमांक २०६ वर आहे.

**हर्षकाळी विषम काळी । पर्वकाळी प्रस्ताव काळी ।**
**विश्रांती काळी निद्रा काळी । नामस्मरण करावे ।।५।।**

दा. बो. दशक ४ समास ३

वर भाष्य करताना सांगितली आहे. ती अशी.

''एकदा कन्नूर मुक्कामी असता रात्री अंथरूणावर पडून पाच मिनिटे झाल्यानंतर आपल्याशेजारी झोपलेल्या कन्नूरच्या हणमंतरावांना महाराजांनी विचारले, ''आता तू काय करतो आहेस?''

''उगीच पडून राहिलो आहे'', असे हणमंतरावांनी उत्तर दिले.

त्यावर महाराज म्हणाले, ''उगीच पडून राहणे ठीक नव्हे. नामस्मरण करीत पडावे. स्वत: पडल्या ठिकाणीच दीर्घ श्वासोच्छवासाबरोबर नामस्मरण कसे करावयाचे दाखवून दिले. मग पुढे सांगितले तसे केल्याने झोप लागेपर्यंत नामस्मरण चालू राहते. व जाग आल्यावर तेच आठवते.''

किती थोर सद्‌गुरु. Psychology चे महान तत्त्व सांगून त्यात काळ सार्थक करण्याचा प्रत्यक्ष धडा दिला.

हेच गुरुदेवांनी वेगळ्या शब्दात सांगितले आहे. ''ज्या श्वासाला आपणास झोप लागते, त्या श्वासाच्या आधीच्या श्वासात (जागृतीचा शेवटचा क्षण व झोपेचा पहिला क्षण) नाम आठवावे आणि झोप संपल्यावर पहिल्या श्वासात (झोपेचा शेवटचा क्षण व जागृतीचा पहिला क्षण) नामाचे स्मरण असल्यास झोपेत नाम चालले होते असे समजावे.'' हे श्री

महाराजांनी सांगितल्याप्रमाणे अंथरुणावर पडल्यानंतर झोपेची आराधना करताना प्रयत्नाने साधावयाचे आहे.

या गोष्टीचे इंगीत आपल्या दुपारच्या भजनातल्या ह्या ओळींमध्ये दडले आहे.

**''अंतरंग से मार्ग जानिला लिंग संग जप होता है।''**

परमार्थ वाङ्मयात उल्लेखलेला ह्या लिंगाबद्दल विचार कानडी संतांनी फार सुंदर तऱ्हेने केला आहे. जो गुरुदेवांनी त्यांच्या Pathway to God in Kannada Literature मध्ये घेतला आहे.

१) निजगुण शीवयोगीचे इष्ट लिंग, प्राण लिंग, व भाव लिंग हे पद होय.

ह्या तीन प्रकारच्या लिंगाचे ध्यान करण्यास कवी सांगत आहे. तत्त्वज्ञानदृष्ट्या ह्याचे विवरण केले आहे ते पाहू. 'इष्ट लिंग' म्हणजे दृश्य जड प्राकृतिक लिंग होय. ह्याचे साळुंका, पिंडी, गोमुख इत्यादी भाग म्हणजे बिंदू, नाद व कला यांची प्रतिके होत. हे जीवन वृक्षाचे बी, मुळे व शाखांत आहे, असे समजावे. इष्ट लिंगाच्या नित्य पूजेच्या दृष्टीने ही माहिती पुरेशी आहे. तात्त्विकदृष्ट्या आणखी दोन महत्त्वाच्या गोष्टी. हे लिंग बोधमात्र आहे. म्हणजे चैतन्याशी एकरूप आहे व दुसरी त्याला स्वत:चाच आधार आहे. Spinoza च्या Substance मूलतत्त्वाशी हे पूर्णपणे जुळते.

दुसरे प्राण लिंग. हे अध्यात्म स्वरूपाचे आहे. हे श्रेष्ठ अनाहत नादच आहे. हे देहाच्या किल्यातून आपले तेज बाहेर फेकीत असते. हे सर्व देहास व्यापून राहते व हे लिंग अनेक भिन्न रंग बाहेर फेकते.

भाव लिंग हे तिसरे तत्त्वज्ञान प्रधान आहे. हे मूळ कारण आहे. हे साक्षी आहे. हे शुद्ध, निरुपमेव, अद्वितीय व आनंद रूप आहे. हे पाश्चिमात्यांचे परब्रह्माच्या वर्णनाशी मिळते जुळते आहे.

२) दुसरे पद सर्प भूषणाचे आहे.

''श्रीगिरिय सुक्षैत्र किदुहोगी यात्रेय माडी बंदे.''

ह्यात त्यांना अत्यंत देदीप्यमान असे लिंग नजरेस पडते. सात प्रकारच्या रंगांनी, प्रकाशमान होते. मग ते त्यांच्या तळहातावर येऊन सुप्रतिष्ठित झाले. ''हे ज्योतीरूप लिंग होते.'' हे लिंग स्वतःच आले. ज्योर्तिलिंगवु करदी कीणीसितो ही खरी लिंग पूजा. पुढे गेल्यावर कवीस अडकेश्वर दिसला. जणू काही ह्या लिंगाची छोटी प्रतिमाच. ह्यावरचे गुरुदेवांचे भाष्य पहा.

It is exactly like the pituitary body in the central part of the brain. Behind this pituitary body, five streams of sweet and mellifluous juice flow. These are the five kinds of super sensuous experiences and any man who partakes of the waters of the mellifluous streams, namely vision, audition, smell, touch and taste in full consciousness, will be beyond all travails of death.

''हे मेंदूच्या मध्यभागी असलेल्या पिट्यूटरी' ग्रंथी प्रमाणे हुबेहूब आहे. ह्या ग्रंथाचे मागे स्वच्छ व गोड रसाचे पाच प्रवाह वाहतात. हे पाच प्रकारचे अतिंद्रिय आध्यात्मिक अनुभव होत. दर्शन, नाद, गंध, स्पर्श व रुची या पाच प्रकारच्या निर्मल अमृतरसांचा स्वाद पूर्ण जागृतीत घेणाऱ्या साधकाला मृत्यूच्या यातना मुळीच बाधणार नाहीत.''

श्री गुरुदेवांनी Pituitary Gland मध्ये Soul चे वास्तव्य असते व मेंदूला seat of the soul असे म्हटले आहे. (Silver Jubilee Souvenir Vol. I P. 240 & 275) ही ग्रंथी १/२'' व्यासाची आहे. ही hypothalamus ला एका फनेलच्या आकाराच्या stalk देठाने infundibulum ने जोडली आहे. तिचे दोन विभाग आहेत त्यातून ९ प्रकारच्या रसांची उत्पत्ती होते. जे शरीरातील विविध महत्त्वाच्या कार्याचे पोषण व नियंत्रण करतात. शरीराची वाढ, थायराईडची क्रिया, जननेंद्रिय

मातेमध्ये दुध निर्मिती, शरीराचा रंग इत्यादी Pituitary Gland.

३) ह्या व्यतिरिक्त सर्पभूषणाची आणखीन दोन पदे श्री गुरुदेवांनी चर्चेसाठी घेतली आहेत. ती म्हणजे ''लिंगपुजे आगुतदण्णा'' व ''लिंगपुजेयु माडीरो'' ही होत.

पहिल्या पदात कवी सांगताहेत आत्मलिंग तुमच्या सदैव दृष्टीसमोर राहिले पाहिजे. सदैव दृष्टिगोचर होणारे हे एकच लिंग म्हणजे अंतिम परम तत्त्व होय. दुसऱ्या पदात कवी सांगताहेत की आपल्या अंत:करणाच्या गाभाऱ्यात असलेला प्रत्यक्ष देव म्हणजे प्राणलिंग. त्यावर चित्त एकाग्र केले पाहिजे.

तर लिंग संग जप होता है त्यातले लिंग म्हणजे साधकाचा आत्मा. त्याचे अंत:करण कूटस्थ होय. तर अंतरंग से मार्ग जाणिल्यानंतर म्हणजेच अंतरंगात, अंत:करणात खोलवर नामाचे रोपण झाल्यावर, साधकाचा आत्म्याबरोबर, जाणीवेत कायम नामाचा जपच होत राहतो. ह्यासच श्री भाऊसाहेब ''अंत:करणास मूळ मन'' हे सूत्र सांगत. मनात दीर्घकाल नामाचे स्मरण केले म्हणजे ते अंत:करणात खोलवर उतरते आणि स्थिरावते. प्रत्येक उर्मी बरोबर विचार तरंगांबरोबरच नामच स्फुरते.

हे सर्व साध्य आहे त्याकडे वाटचाल कशी करावयाची, ती सुगम कशी होईल, ज्या योगे साध्याकडे हळूहळू प्रगती घडेल हे सर्व सुकर करण्याचा हा विचार एवढेच.

नाम मनात दीर्घकाळ स्मरणे, ही साधन पथावर बराच मार्ग क्रमिल्यानंतर येणारी अवस्था आहे. म्हणून मानशास्त्रीय सिद्धांत auto suggestion स्वयंप्रेरणा हिचा उपयोग करून हे झोपेच्या कालखंडात साधावयाचे आहे. म्हणजे जागृतीमध्ये नामाची आठवण सहज घडावी.

डोळस नामसाधन भाग २ मध्ये श्री. काकासाहेब Auto suggestion स्वयं सूचनेबद्दल लिहितात, ''स्वयं सूचनेनेच सद्‌गुरुंबद्दल प्रेमादार वाढविणे शक्य व अवश्य आहे. अर्थात सद्‌गुरुवरील प्रेम

नामावरच्या प्रेमाप्रमाणे वाढत जाते.''

Auto Suggestion म्हणजे स्वयं सूचना. मनाच्या ज्या भागात जागृतीमध्ये विचार होत असतो त्या भागाला व मनाचा तो भाग जो जागृतीमध्ये दृगोचर होत नसतो, ज्याला आपण sub conscious, अर्ध ज्ञात प्रदेश म्हणतो, ह्या मध्ये दळणवळण करणारे माध्यम होय.

मनात ज्या विचारांचा जास्त प्रभाव असतो व तो प्रभाव आपण टिकवून ठेवतो, ते विचार स्वयंसूचनाच्या माध्यमातून अंतरमनात अर्ध ज्ञात प्रदेशात उतरतात. अंतरमनात शिरणाऱ्या विचारांवर मनुष्यास ताबा ठेवता येतो. म्हणून अंतरमनामध्ये भक्तीपूर्ण विचारांनी किंवा शब्दाने, नामाने पोहोचण्याचा अभ्यास केला पाहिजे.

स्वयंसूचनेने दिलेली कोणतीही आज्ञा अंतरमन घेते. ती फक्त पूर्ण श्रद्धेतून दिलेली पाहिजे आणि त्यावर योग्य ते कार्य अंतरमन करते. पण ही आज्ञा वारंवार देत राहिली पाहिजे. तद्नंतरच सवयीने त्याची उकल अंतरमन करते. मग जागृतीच्या क्षणी अंतरमनाकडून त्या सूचनेवर हुकुम कार्य होऊन जागृत मनात ती आज्ञा/ कल्पना परत केली जाते. म्हणजेच जे नाम स्मरत आपण झोपेच्या आधीन होतो, त्यावेळेस ते स्मरण अंतरमनास पुढील कार्यास म्हणजे स्मरणास दिले जाते व जागे होताना परत ते नाम अंतरमनाकडून जागृत मनास दिले जाते. गुरुकृपा झाल्यास सपनों मे देखू आत्माराम असा अनुभवपण येतो. ह्यास सवय व श्रद्धा पाहिजे.

श्रद्धा देखील मनाची एक अशी अवस्था आहे जी अंतरमनास वारंवार दिलेल्या स्वयं सूचनेतून निर्माण होते, तयार होते.

श्रद्धा एक अशी धातु आहे, जी प्रार्थनेमध्ये मिसळली असता अनंत तत्त्वाबरोबर प्रत्यक्ष संबंध जोडते. श्रद्धा पराभवाने येणाऱ्या नैराश्यावरचा एकमेव उतारा आहे. सर्व दैवी चमत्कार श्रद्धेतून उपजतात. श्रद्धा हे अमर संजीवन आहे. ज्यातून यश किर्ती, प्रताप, बल व आयुष्य मिळते

व ही श्रद्धा अंतरमनास दिलेल्या स्वयं सूचनेतूनच निर्माण होऊ शकते. श्रद्धा आधी म्हटल्याप्रमाणे मनाची स्थिती दर्शविते. जिच्या मागे अंतरमनाचा भक्कम आधार असतो. साधकाच्या बाबतीत मनाची आणखीन एक शक्ती कार्यरत होत असते. ती सद्गुरुंनी नाम देताना कार्यरत केलेली असते. ती म्हणजे त्याची Intuition प्रतिभ शक्ती. हिच्या उत्थानामुळे स्वयंसूचना प्रभावी बनते. तसेच शीलवर्धन, शील म्हणजे सवय. ॲरिस्टॉटलने म्हंटल्याप्रमाणे Character is habit, साधकाच्या बाबतीत दुर्गुण, त्याग, सद्गुण संपादन. सर्वात श्रेष्ठ सद्गुण म्हणजे भक्ती. हे सर्व स्वयंसूचनेद्वारा घडते. मनाला विवेकाने जेव्हा सावरले जाते, तेव्हा याचे पडसाद अंतरमनात जातात. परत पुन्हा जेव्हा तसा प्रसंग येतो तेव्हा विवेक जागृत होऊन कार्य करण्यास जास्त प्रयास पडत नाहीत.

हयासाठी आपल्या षट्विकारांचा सुंदर उपयोग श्री भाऊसाहेबांनी कसा सांगितला आहे तो पहा. पत्र क्रमांक २५७.

| | विकार | असावा | नसावा |
|---|---|---|---|
| १) | काम | ईश्वर भजनी | परस्त्रियेचा |
| २) | क्रोध | इंद्रिय दमनी | सत्पुरुषाचा |
| ३) | लोभ | तीर्थप्रसाद शेष ग्रहणी | शरीराचा |
| ४) | मोह | सज्जनासी | पुत्राचा |
| ५) | मद | दुर्जनासी | सुन्हद जाती |
| ६) | मत्सर | संसारासी | सर्वाभूती |

हेच वेगळ्या भाषेत सर्पभूषणानी त्यांच्या पदात ''लिंग पूजेय माडिरी'' ह्यात सांगितले आहे.

पूजेचे आठ भाग पडतात. मज्जन, गंध, अक्षता, पुष्प, हर्ष, धूप, दीप व नैवेद्य हे होत.

मज्जन श्रद्धेच्या पाण्यानी करावयाचे श्रेष्ठतम श्रद्धेच्या पाण्यानी

विरक्तीचे भस्म नंतर लावायचे.

अक्षता म्हणजे आपली ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिय होत. ह्यांच्या अक्षता वाहावयाच्या आहेत.

पुष्प म्हणजे आपली सजगता, जाणीव. जाणीवेच्या सुंदर पुष्पानी मग अलंकृत करावयाचे.

आपला हर्ष (नाम घेताना अंत:करणात हरुष असावा.) असे भाऊसाहेब म्हणतात,

गुरुदेव यापुढे सांगतात,

"We should offer our joy as incense. As the incense rises to heaven, so let our joy also rise to heaven. When we put some Dhupa on fire, the smoke rises up. It is what we might call anatropism. Our devotion must rise like smoke towards God. (उर्ध्वगामी क्रिया) This is real Dhupa (चढती वाढती भक्ती.)

दीप म्हणजे परबिंदू. हा कायम चमकत ठेवला पाहिजे.

* **नैवद्य** - येथे संपूर्ण शरणागती शेवटी समर्थांच्या म्हणण्यानुसार अर्पावे मस्तक होय.

मग श्री. गुरुदेव म्हणतात ह्यानंतर विडा पण दिलाच पाहिजें ना. आपल्या तीन गुणांच्या मसाल्याच्या मिश्रणामुळे सुंदर रंग चढेल.

आता उरलेल्या १४-१८ तासांचा विचार. जेव्हा प्राणी व्यवसायात व आपल्या संसारात दंग असतो, त्याबद्दलचा करावयाचा आहे.

येकवीस, सहस्र साहशे जपा । नेमून गेली ते अजपा।
विचार पाहता सोपा । सकल काही ।।१।।
मुखी नासिकी असिजे प्राणें । तयास अखंड येणे जाणे।
यांचा विचार पाहणे । सूक्ष्मादृष्टी।।२।।
एकांती उगेच बैसावे । तेथे हे समजोन पाहावे।

अखंड घ्यावे सांडावें । प्रभंजनासी ।।६

दा. बोध द. १७.५

अजपाचा सरळ अर्थ सहज व सतत चाललेला जप. आपणास न कळत श्वासोच्छवासातून सारखा होत असतो तो जप. श्वासाबरोबरचे जपाचे मानसिक अनुसंधान.

| | |
|---|---|
| २१,६०० संख्या | मिनिटात १५ श्वासोच्छवास |
| ६० मिनिटांचे | ९०० |
| २४ तासांचे | २१६०० होय |

शरीफसाहेब (एक कानडी संत) पण असेच सांगतात.

**इप्पत्तोंदु साविर मेले । आरतूस प्रेळगळ होय्दु ।**

**तय्पदे एणिकेय माडिनीनु । जप्पिसी पट्टी सुत्तव्वा।।**

(२१६०० धागे न चुकता तू मोजून जागरूकतेने पट्टी गुंडाळ ग बाई) किंवा

**श्वासश्वास पर हर भजो । वृथा न जाये कोइ।**

**श्वास विराना पाहुना । आना होय न होय ।।**

२१६०० श्वासोश्वासात गुरुने सांगितलेले नाम स्मरणाचा नेम धरावा. तो नेम चालला म्हणजे तोच जप. श्वास जर व्यर्थ गेला तर तो 'अजपा' होय असे महाराज सांगत असत. (दा. बो. सुधा पान २६५)

कसे ही पहा. २१६०० चुकत नाहीत. तर उरलेले १४४०० (१६ तासांचे) चे कसे सार्थक करता येतील ते पाहू.

पुन्हा सांगावेसे वाटते हे सर्व साध्य करावयाचे आहे. श्रेष्ठ ध्येय आहे. ही केवळ आपल्या सद्गुरुंनी सांगितलेली वाट जी मला उमगली, त्यावर हा एक प्रकट विचार आहे.

दासबोध दशक ४, समास ३ – तीन वेळचा नेम सोडून इतर कोणत्या समयी ह्या दशकात नामस्मरण सांगितले आहे ते पाहू.

१) सुख, दु:ख, उद्वेग, चिंता.

२) आनंदात, हर्षकाल, विषम काल

३) पर्वकाल, प्रस्ताव काल.

४) विश्रांती काल, निद्राकाल.

५) कोडे पडले असता, संकट आले असता.

६) रोजच्या संसार खटपटीमध्ये.

७) चालता बोलता धंदा करीता.

८) खाता जेविता सुखी होता.

९) नाना उपभोग भोगता.

तसेच मातु मातिगे शंकरा ह्या पदात कवि सांगताहेत

१) स्नान करताना

२) खाताना, पिताना

३) डोंगर चढताना, पाऊल घसरून पडताना

४) थंडी, ताप, खोकला झाला असताना, श्वास लागला असताना.

५) वाऱ्यात, पावसात, विजेच्या कडकडात.

६) पत्नी बरोबर संसारिक गोष्टी करताना.

७) सुख भोगताना, दारिद्र्याने गांजलेला असतानाही.

Alvarez de Paz ह्या बाबतीत काय म्हणतात ते पाहू.

"It is the recollection of God, the thought of God, which in all places and circumstances makes us see him present, lets us commune respectfully and lovingly with him, and fills us with desire and affection for him. ... Would you escape from every ill? Never lose this recollection of God, neither in prosperity nor in adversity, nor on any occasion whichsoever it be. Invoke not, to excuse yourself from this duty, either the difficulty or the

importance of your business, for you can always remember that God sees you, that you are under his eye. If a thousand times an hour you forget him, reanimate a thousand times the recollection. If you cannot practice this exercise continuously, at least make yourself as familiar with it as possible; and, like unto those who in a rigorous winter draw near the fire as often as they can, go as often as you can to that ardent fire which will warm your soul."

(V. R. E. James, P. 113)

**अर्थ :**

देवाचे स्मरण, त्याचा विचार, सर्व ठिकाणी व सर्व परिस्थितीमध्ये त्याचे अस्तित्व आपल्याला भासवितो. म्हणून त्याच्याशी आदराने व प्रेमाने आपण हितगुज करू या. संपत्ती अथवा विपत्तीमध्ये किंवा कोठलाही प्रसंग, जो असेल तो, त्यात त्याचे विस्मरण पडू देऊ नका. ह्या कर्तव्यापासून स्वत:ची सबब सांगून सुटका करून घेऊ नका. कठीणप्रसंगी किंवा महत्त्वाच्या उद्योगांच्या वेळेस जर एक तासात हजार वेळा त्याचा तुम्हास विसर पडेल तर पुन्हा हजार वेळेस नव्या चैतन्याने स्मरण करा. जर हा खेळ अखंडपणे तुम्ही खेळू शकत नसाल तर निदान त्याच्याकडे जास्तीजास्त परिचित व्हा. जसे कडाक्याच्या थंडीत मनुष्य शेकोटीच्या उबेजवळ जास्तीत जास्त जाण्याचा प्रयत्न करतो त्या प्रमाणे जो तुमच्यातील जीवनज्योतीचा अग्नी कळकळीने प्रज्वलित ठेवतो, त्याच्या कुशीत शिरण्याचा प्रयत्न करा.

हे झाले इतर वेळेबद्दल. त्यानंतर श्री भाऊसाहेब महाराजांच्या काही बोलक्या आठवणी बघू. मग Alvarez de Paz ने देवाशी Commune करणे म्हणजे हितगुज करणे ह्या सख्य भक्तीच्या मर्माकडे वळू व तसेच श्री भाऊसाहेब महाराजांनी सांगितलेल्या सगुण, निर्गुण, भक्तीच्या

विचारांचा आढावा पण घेऊ.

१) महाराजांच्या व बाबांच्या वेळेस सकाळचा नेम ६ वाजता सुरू होत असे व तो सतत अखंड ९ तास/६ तास चालत असे. सकाळच्या नेमाला उशीर होऊ नये म्हणून साधक महिनाभर क्षौर कर्म करीत नसत.

दासबोध सुधा पान २०५

२) सुख प्राप्त झाले असता देवाची आठवण ठेवली पाहिजे. विवाहासारख्या अत्यंत आनंदाच्या प्रसंगी नामस्मरण सोडू नये.

(ibid 206)

बाबांनी एकदा ज्यांच्या घरी अनेक वर्षानंतर नातू झाला होता, तेव्हा सांगितले. मुलास खेळवताना त्यांच्या मुखावर आपली वस्तू बघावी.

३) दासबोध दशक १२:९:११ दिशेकडे दुरी जावे । .... येता काही तरी आणावे.'' असे आहे. ''गावाबाहेर बहिर्दिशेस जाऊन येईपर्यंत चारशे नामे होतात बघ.''

तसेच पत्रावळी लावताना, जीना चढताना चोयट्याच्या संख्येबरोबर पायऱ्यांच्या संख्येबरोबर महाराजांचे स्मरण होत असे व ते संख्या पण सांगत असत.

४) कन्नुरचे हणंमतराव लहान असताना ''शाळेत जाताना तू काय करतोस?'' असे महाराजांनी विचारले. त्यावर ''वाटेत पडलेल्या वस्तू आणि करवंट्याला लाथ मारत जातो. रस्त्यात झोपलेल्या कुत्र्यावर मित्रांना ढकलून देतो. गटारात दगड फेकून रस्त्याने जाणाऱ्यावर चिखल उडेल असे करतो.'' हणमंतरावांने खरेखरे सांगितले.

''असे केल्याने लोक तुला चांगला मुलगा म्हणतात का?'' महाराज. ''नाही'' हणमंतरावांने उत्तर दिले.

''असे करण्यापेक्षा घरातून बाहेर पडताना काकड आरती म्हणत जा. म्हणजे शाळेत पोहोचेपर्यंत काकड आरती संपेल व वाटेवर पोरकट चेष्टा करण्याचे थांबेल.''

हणमंतराव त्याप्रमाणे वागले व लोकांकडून चांगला मुलगा म्हणवून घेतले.

५) भजनाच्या वेळी सर्व शिष्य समोरासमोर दोन ओळी करून भजन करीत असत. एकदा हणमंतरावांना विचारले, ''समोरच्या ओळीतले लोक भजन करीत असताना तू काय करतोस?'' तेव्हा ''ते आपल्यापेक्षा चांगले भजन करतात ते पाहत असतो.'' असे उत्तर दिले. ''ते भजन करीत असताना तू नामस्मरण केले पाहिजेस. तू नामस्मरणात बरोबर उजव्या टाचेने ठेका धरीत जा. म्हणजे तू नामस्मरण करतोस की नाही ते मला कळेल.''

दासबोध सुधा पान २०७

६) महाराज सांगत असत, ''दोन तास नेमाला बसावे असा निश्चय करता, तुमची पत्नी तुमचे ऐकत असल्यास आता मी नेमाला बसतो, दोन तासानंतर जेवायला उठतो.'' असे सांगा. जर तुम्ही पत्नीच्या अधीन असाल तर ती स्वयंपाक सुरू करतानाच नेमाला बसा, स्वयंपाक होईपर्यंत दोन तास नेम होतो.

दासबोध सुधा पान २४६

७) श्री. शारक्का महाराज सांगत,

अ) प्रत्येक फूल तोडाना नाम घ्यावे व वाहताना पण नामस्मरण करावे.

ब) स्त्रियांना त्या सांगत, घासलेले डबे परत घासत बसता व नेमास वेळ मिळत नाही म्हणता.

क) पत्नीस सर्व सोई करून द्याव्यात पण मन गुंतवू नये. कर्तव्य करावे व परमेश्वराकडे वळावे.

ड) पोळ्या करताना नाम घ्यावे. स्वयंपाक करून पतीची वाट पहात बसतेवेळी नाम घेत बसावे.

हे सर्व संताचे बोल, आठवणी आपणास वाटाड्या, मार्गदर्शक आहेत.

ह्यावरून बोध घेऊन जेथे रिकामी जागा (slot) मिळते तेथे नाम भरावयाचे करसे काम करून. हरिचे ध्यान धरण्याची २१,६०० फुकट न जाऊ देण्याची ही उत्तर मंजुषा आहे.

८) श्री तात्यासाहेब दामले नेहमी जनाबाईचा हा अभंग आठवून ''नाम विठोबाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे।।'' सांगत. पाऊल टाकणे म्हणजे नवीन कामाची सुरुवात मग ते कोठलेही असो, खुर्चीवरून उठून पाणी पिण्याचे असे आरंभ. नाम घेऊन खुर्चीवरून उठावयाचे, पाऊल टाकता टाकता पाणी ओतून पेल्यात घेताना, पिताना पेला ठेवताना, पुन्हा खुर्चीकडे वळताना,चालताना, बसताना नाम घ्यायचे.

**सगुण भक्ती**

महाराज सांगत, साक्षात परमेश्वर हरी मायेत अवतरून, आपले खेळ खेळतो. लीला दाखवितो असे असताना मायेपासून आपली सुटका कशी होईल? हरीप्रमाणे आपण हरिमायेत हरिखेळ करण्यास शिकावे. मायेपासून अलिप्त राहून.

(जी. गं. पान ९२)

**हा हरीखेळ कसा?**

**निर्गुण :** ठरलेला नेम.

**सगुणः** प्रतिदिन नेमानंतर दास बोधातील एक समास अगर काही ओव्या वाचून नंतर मनोबोधातील १० श्लोक वाचावेत. मग त्या त्या वेळचे भजन म्हणून कापूर लावावा.

सर्व प्रसंगी स्मरणात राहून करसे काम करीत राहावयाचे. स्वतः श्री महाराज ज्ञानेश्वरीतल्या १०० ओव्यांचे पारायण रोज करीत. निंबरगी महाराजांनी त्यांना तसे सांगितले होते. एकूण ९०३३ ओव्यांपैकी त्यांनी ३८८६ ओव्या निवडल्या होत्या व हा नियम शेवटपर्यंत चालला होता. त्यातले मर्म म्हणजे संतांची प्रत्यक्ष संगती नसताना त्यांचे ग्रंथच साह्यभूत होतात.

(भ. क. पान ४८)

पारमार्थिक ग्रंथातील थोडा थोडा भाग एकाग्रतेने वाचून नेमाला बसावे. म्हणजे नेम चांगला होईल, असे गुरुदेव सांगत असत.

(दा. बो. सुधा. पान १९७)

**हितगुज**

देवाशी भक्ती करण्याचे जे एकमेव साधन आहे ते म्हणजे हितगुज. अर्थात पहिल्यांदा देव आपल्यासमोर उभा पाहिजे. नंतर सख्य मग हितगुज.

''देवासी परम सख्य करावे । प्रेमप्रीतीने बांधावे ।।''

"A famous saint in South India, the saint of Umadi used to explain this famous line in this manner. Our breath, he used to say should be tied to our devotion to God. The two must go together"

(PGHL P. 166)

परवस्तूबद्दल प्रेम उत्पन्न होऊन तिच्याशी सख्य जोडण्यासाठी दृष्टी व भक्तिभाव या दोहोनी देवास बांधावे. सदोदित देवाचे स्मरण असणे हेच भक्तीचे लक्षण होय.

(दासबोध सुधा पान. २१८)

जी वस्तू ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणे त्यास दिसते तिच्याशीच हे हितगुज करावयाचे आहे.

रामदास म्हणतात :

**''सख्य देवासी करावे । हितगुज तयासी सांगावे।**
**आठवे भक्तीचे जाणावे । लक्षण ऐसे ।।३।।**
**जैसा देव तैसा गुरु । शास्त्री बोलला हा विचारू।**
**म्हणोनी तो सख्यत्वाचा प्रकारू। सद्गुरुसी असावा ।।३२।।''**

हितगुज हा शब्द संस्कृत हित व गुह्य पासून झाला आहे. हित म्हणजे

स्वत:चे ज्यात चांगले, फायद्याचे, कल्याणकारी असे आहे ते.

गुज म्हणजे गुप्त ठेवलेले, खाजगी, झाकलेले ई हितगुजचा अर्थ – स्वत:च्या फायद्याची, कल्याणाची खासगी गोष्ट.

तेव्हा म्हणजे तुमची वस्तू तुमच्या समोर असताना (सद्‌गुरु समाधी/तसबीर सान्निध्य असताना) तुम्ही त्याच्यापुढे तुमचे हृदय उघडे करा. (दासबोध सुधा पान २२४)

"... We should be friends of God and communicate to him our innermost desires... (MN P. 406) असे गुरुदेव म्हणतात.''

१९ जून १९१८ सालच्या पत्रात श्रीगुरुदेवांनी श्री. बापटांना लिहिले आहे,

''आपण इकडे एकवार येऊन पुनीत करावे अशी इच्छा दृढतर जागृत आहेच. या कारणाने या वर्षीचे एका महिन्याचे पगाराचे पैसे १२५ रुपये त्या कामाबद्दल काढून स्वतंत्र ठेवले आहे. आपल्या पुढील येण्यापर्यंत त्यात आणखी काही तरी भरती होईलच. हितगुज तयासीच सांगावे.'' या नात्याने आपल्याजवळ सर्व गोष्टी सांगितल्या आहेत. त्या क्षमा करालच...''

माझा असा भाव आहे की, भाऊसाहेब महाराजांची पत्रे व श्री गुरुदेवांच्या सिटिंग्स हे सर्व हितगुजच होय. तसेच साधकास वैयक्तिकरीत्या कापूर लावण्याची उर्मी देखील हिजगुत करण्याची निकड दर्शविते. कारण सद्‌गुरु देव व भक्त हे नाते direct one to one असे आहे. प्रत्येकाने ह्याचा फायदा कसा करून घ्यावयाचा हे ठरवायचे आहे.

**नामाने नराचा नारायण**

नाम God in posse दिल्यानंतर नामस्मरणाची प्रक्रिया सुरू होते व तिला श्री गुरुदेव नामस्मरण is a process of identification with God असे म्हटले आहे. Identification म्हणजे साम्यता

प्रस्थापित करणे होय. तोच हा म्हणून ओळखणे.

In posse ला एक विरुद्ध अर्थी शब्द आहे. In esse म्हणजे in actuality प्रत्यक्ष होय. नाम देताना सद्गुरु शिष्याचा आत्मा त्याच्या शरीरापासून वेगळा करून ठेवतात. matter from spirit सोडवतात. त्याचा बोध त्याला यथाकाल कृपेनुसार होतो. मग पुढच्या प्रत्येक आठवलेल्या नामाबरोबर साधकाचे साम्य प्रस्थापित होते. ह्याची गमक म्हणजे होणाऱ्या अनुभवातील वाढ. येथे नामाचा वाढत्या क्रम संख्येप्रमाणे अनुभव वाढेल असे नाही. केव्हा व किती वाढ करावयाची हे सद्गुरु ठरवितात.

गुरुदेवांनी म्हटले आहे ..."What a mystic sees is really what he is, and that his spiritual status is to be measured by what he is able to see." PGHL P. 296.

तर आपण निंबरगी महाराजांनी सांगितल्या प्रमाणे ''हीगे ई जन्म इरूवद रोळगे आत्मनन्मु कडेगे तेगेदु कोंडुनोडिदरे आमनुष्यनु पुना जन्मक्के बरुदिल्ल.''

आपण प्रत्येकाने एक लक्षात ठेवायचे आहे, सद्गुरुंनी दिलेल्या नामाचे एक स्मरण देखील फुकट जात नाही. ती जमेची बाजू आहे. प्रत्येक नामाबरोबर जीवाभावाचे शिवाभावाशी ऐक्य साधले जाते. मग ते नाम हर्षभरीत अंत:करणाने किंवा खेदाने, श्रद्धेने किंवा चुकीच्या जागी ठेवलेल्या श्रद्धेने, कंटाळा किंवा तिरस्काराने घेतलेले असले तरी चालेल. (PGHL P. 359)

मग अशा तऱ्हेने श्वासात नामाची सवय जडून घेतल्यानंतर नेम चढत्या वाढत्या भक्तीने होईल व त्याचा काल पण वाढविण्याची इच्छा होऊन साधक आपले वेळापत्रकात योग्य तो बदल करीत राहील.

● ● ●

# नाम-नेम-कल्पना

## तात्त्विक नाम-नेम-कल्पना विचार

### १. नाम

शाश्वत व स्थिर अशी परवस्तू व नाम दोन्ही एकच, त्यात भेद नाही हे पारमार्थिक सत्य Mystical Fact आहे.

**''नाम तेची रूप, रूप तेची नाम ।**
**नाम रूपा भिन्न नाही नाही ।।''** नामदेव

साधकास त्याचे नाम ही एक शुद्ध कल्पना आहे. एक शब्द समूह आहे. नाम घ्यावयाचे म्हणजे नामाच्या एक एक अक्षरांचा मनात उच्चार करावयाचा त्या अक्षराची कल्पना प्रथम मनात स्फुरली पाहिजे. असे प्रत्येक अक्षर स्फुरून नाम पूर्ण होते व त्या बरोबरच मनात त्याचे स्मरण घडते.

म्हणजेच श्वासाबरोबर नाम स्मरत असताना मनातच नामाच्या अक्षरांचा उच्चार स्पष्ट होत असावा.

श्वास ही मनाला बंधन दोरी आहे. नाम, रूप व नादही ही दोरीच. नाम चालू पाहिजे. नामस्मरण हा मनोमार्ग आहे.

### २. मन

चित्त, जाणीव किंवा संवित (consciousness) जीवाची शक्ती आहे. ती मनाच्या रूपाने व्यवहारात स्थित असते. पण मन रूपातीत स्थिर नसते. चंचल असते. सारखे वाहत राहते. म्हणजेच आपल्या

वृत्तीमध्ये प्रत्येक क्षणाला ती विचार किंवा कल्पनेच्या स्वरूपात प्रकट होत राहते. कोठलीही कल्पना कायम घर करून राहात नाही. प्रथम उदय पावते. काही क्षण प्रबळ वास्तव्य करते, मग क्षीण होऊन लोप पावते. पाठोपाठ दुसरी जन्मास येते. ही साखळी आयुष्यभर चालू राहते. हाच जाणीवेचा प्रवाह. James यास The stream of thought म्हणतो

**३. कल्पना**

कल्पना दोन प्रकारच्या. एक शुद्ध व दुसरी अशुद्ध. अशुद्ध कल्पनेलाच शबल कल्पना म्हणतात. शुद्ध कल्पनेची खूण म्हणजे ती स्वत: निर्गुण स्वरूपात स्थिर असते. स्वरूपाचे विस्मरण ती केव्हांही होऊ देत नाही. स्वस्वरूपाचे अखंड अतूट अनुस्युत अनुसंधान किंवा स्मरण हीच गुरु कल्पनेची खूण समजावी.

**शुद्ध कल्पनेची खूण । स्वंये कल्पिजे निर्गुण ।**
**स्वस्वरूपी विस्मरण । पडोच नेदी ।।** दा. बो. ७.४.३३

ब्रह्म म्हणजे निर्गुण. त्याचे विस्मरणरहीत म्हणजेच अखंड अनुसंधान किंवा स्मरण ज्या कल्पनेयोगे (कल्पनेची प्रकटीकरण शब्दामध्ये करावे लागते) करता येते ते म्हणजे नाम. (अक्षर समूह) होय. तर नाम हीच शुद्ध कल्पना जी ब्रह्मात रमते.

जी कल्पना द्वैतासतरमते ती अशुद्ध अथवा शबल होय. अद्वैत म्हणजे सर्व दृश्य सृष्टी व त्यामधील असंख्य गोष्टी, नामा व्यतिरिक्त इतर विचार पण, शबल कल्पनेची रूप अवतरतात.

**म्हणूनच आठव तो ब्रह्म नाठव तो भवभ्रम.**

**४. ओम नाम कायुवदू** – नामच सर्व प्रकाराने रक्षण करतो.

५. नामाच्या चिंतनाने बारा वाटा पळती विघ्ने.

**प्रायोगिक (Practical) विचार**

**नेमाचा काल :–**

बोधसुधा वचन क्रमांक ५३ प्रमाणे प्रतिदिन एकेक तासाप्रमाणे तीन

वेळा अगर दिवसा दोन तास व रात्री दोन तास याप्रमाणे नामस्मरण करीत बसावे.

हा काल वैयक्तिक नेमासाठी दिला आहे. सत्संगामध्ये केलेल्या नेमाबद्दल नाही. हा काल Ideal म्हणून सांगितला आहे.

साधकाने आपला व्यवसाय ई. संभाळून आपल्या वैयक्तिक नेमाच्या वेळा ठरवून त्या साधाव्यात. एखाद्या वेळेस जमले नाही तर इतर वेळेस भरून काढाव्यात.

**नाम व नेम**

साधकाने सद्‌गुरुला स्मरून प्रार्थना करून नेमास बसावे व मनामध्ये श्वासाबरोबर नामाच्या एकेक अक्षराचे स्मरण म्हणजेच कल्पना करीत नाम पूर्ण करावे. असे करताना ते साधकास आपोआप ऐकू येते. मग श्वासात (श्वास आत घेताना) जितकी नामे मावतील तेवढी स्मरावी / आठवावी. नंतर श्वास सोडताना तेवढीच नामे घ्यावीत.

**कल्पनांचा उदय**

मनाचा धर्म कल्पना करण्याचा नाम विसरून दुसरी कल्पना मनात येणे ही अत्यंत नैसर्गिक गोष्ट आहे. त्याची खंत करू नये. आपण कशासाठी बसलो आहोत हे आठवताच मन परत नामावर येईल. हा पाठशिवणीचा खेळ चालू ठेवावा.

**कल्पना निर्मूलन पद्धती**

सुरुवातीस जर नामस्मरण जमत नसेल तर माळेचा – स्मरणिकेचा उपयोग करावा. एका श्वासामध्ये नाम स्मरल्यानंतरच दुसरा मणी ओढावा. नामाचा विस्मरण पडून इतर कल्पना मनामध्ये आल्यास मणी ओढणे आपोआप थांबते. मग मण्याचे अस्तित्व बोटास जाणवते. असे झाल्यानंतर श्वासात परत नाम घ्यावे व दुसरा मणी खेचावा.

या रीतीने माळ पूर्ण करावी. एक माळ पूर्ण करण्यास किती वेळ लागला हे पाहावे. माळ पूर्ण होण्याचा काळ कमी कमी होत गेला, तर

नाम जास्त वेळ व इतर कल्पना कमी वेळ आल्या हे लक्षात येईल. सवय झाल्यावर माळेचा उपयोग सोडावा.

**२) निर्विकल्पासी कल्पावे । कल्पना मोडे स्वभावे**

नेमाच्या वेळी कल्पना आल्या तर निर्विकल्पास म्हणजे नाम त्याची कल्पना करावी म्हणजे इतर कल्पना आपोआप नष्ट होतील.

पण निर्विकल्पच नामच कल्पिता येत नसेल तर काय?

गुरुदेवांनी निर्विकल्पाची व्यापक रीतीने मांडलेली कल्पना साधकाने आपल्या मनात कोरून ठेवावी ती अशी.

''निर्विकल्प म्हणजे देवाशी संबंधित असलेली कोणतीही गोष्ट. उदा. देवाचे गुण, देवाची लक्षणे, देवाचे भक्त, देवाची स्थाने काय वाटेल ते.''

३) गुरुदेवांची 'निर्विकल्पाची व्याप्ती' मनात कशी दृढ करावयाची?

अ) थोडेच वाचावे.

ब) वाचलेला विषय नेमाला बसले असताना मनात आणावा व त्यावर चिंतन करीत नेम करावा. म्हणजे इतर विचार त्रास देणार नाहीत.

क) वाचनासाठी आवडतील असे उतारे लिहून ठेवावे.

ड) आवडणारी पदेच म्हणावी.

फ) रोज काही वेळ तरी परमार्थ चर्चा करावी. चर्चेस कोणी उपलब्ध नसल्यास प्रवचने ऐकावी.

४) निर्विकल्पाचे अधिक स्पष्टीकरण

गुरुदेवांनी सांगितलेली निर्विकल्पाची व्याप्ती स्पष्ट होण्यासाठी काय वाचावे (वाचन,मनन, चिंतनाशिवाय हे शक्य नाही.) ह्याचा एक मार्गदर्शक तपशील (साधकाने आपल्या आवडीनुसार योग्य तो बदल करावा).

अ) ईश्वराच्या गुणांचे चिंतन – ध्यानगीता प्रकरण १

आ) ब्रह्माचे गुण – ध्यानगीता प्रकरण २

इ) देवाचे भक्त इ. – गुरुदेवांचे भागवत पुराणातील वेचे.

ई) पदे – परमार्थ मंदिर

ड) भक्तिभावासाठी – ५ वचनामृते

ऊ) साधकांनी वेचे कोठून काढावे – गुरुदेवांच्या पुस्तकातून.

महत्त्वाचे :- गुरुदेवांनी 'Study of Philosophy' ची गणना आध्यात्मिक सद्गुणात केली आहे व याचा सरळ अर्थ त्यांची पुस्तके होय.

**५) शेवटचा उपाय**

गुरुदेवांनी सांगितले आहे 'नाम काय घेऊन बसलात? सद्गुरु । सद्गुरु। असे म्हटले तरी तरुन जाल.' तसेच बाबांनी पण म्हटले आहे, ''महाराज! महाराज!'' म्हटले तरी तरून जाल.

सर्व उपाय करून नेम होतच नसला तर 'गुरुदेवा! म्हणून आर्ततेने टाहो फोडावा. करुणाकार सद्गुरु माऊली निश्चितपणे धावून येईल.'

# सत्कार

**''साधु संतचरण दर्शन नित्य व्हावे**
**साधु संतांच्या घरास । अनुभवाचा आरास ।**
**जाई जुईच सुवास । आनंदाचा हव्यास ।।''**

हा १९२५ सालच्या चैत्रवद्य प्रतिपदेपासून तृतीयेपर्यंत निंबाळच्या नवीन घराचा (आताचे जुने घर) वास्तुशांतीबद्दल झालेल्या सप्ताहाच्या निमित्ताने शिवलिंगव्वानी लिहून ठेवलेला उतारा आहे.

पुढे त्या लिहितात, ''असे सात दिवस, सप्ताह, श्री रामराव देवांच्या आश्रमात झाला की, ते आनंद गहिंवर मावेना ऐसे झाले.'' त्या सप्ताहास अंबुराव, शेट्यप्पा, भाऊसाहेबांचे चिरंजीव भीमराव, कन्नूरस्वामी, नरसाप्पा व अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ साधक मंडळी जमली होती. (गुरुदेवांनी, शिवलिंगव्वाना ९।४।२५ रोजी लिहिलेल्या पत्रात ३ दिवसातल्या सप्ताहाचा मानस कळविला आहे.)

संत श्रेष्ठ, साक्षात्कारी तत्त्ववेत्ते श्री. रा. द. आपले गुरुदेव रानडे, ज्यांनी मानवाचे श्रेष्ठत्तम जीवनमूल्य म्हणजे ईश्वराचा साक्षात्कार स्वत:साठी व इतरांसाठी करून घेणे असे प्रतिपादले व आपले सर्व आयुष्य त्यांच्याच शब्दात every action of the aspirant should be intended to propitiate the Lord, म्हणजे साधकाची प्रत्येक कृती हे देवास प्रसन्न करण्यासाठी असावी अशी होती, अशा सद्गुरुंच्या निवासात झालेल्या नाम सप्ताहाचे, आनंद डोही उठलेल्या आनंद कल्लोळांचे हे आनंदमय शब्दचित्र आहे. जे एका श्रेष्ठ साक्षात्कारी स्त्री संतांनी रेखाटले आहे.

पातंजल योगसूत्र १४ समाधिपाद म्हणते.

स तु दीर्घकाल नैरन्तर्य सत्कारा सेवितो दृढभूमि: प्रमाणे दीर्घकाल, नैरन्तर्य व सत्कार पूर्वक केलेल्या नाम:स्मरणाचे हे फल होय.

ह्यामधील सत्कार पूर्वक नामस्मरण कसे करावयाचे ते पाहू या.

Pathway to God in Hindi Liturature मध्ये पद विभागातील चौथ्या प्रकरणामध्ये Piligrimage मध्ये नेम करण्याच्या पद्धतीमधील पाच मुद्यांचे विवरण करताना सत्कार हा पाचवा मुद्दा गुरुदेवांनी घेतला आहे.

पहिला मुद्या नामस्मरण. आंत, मनात श्वासाबरोबर करणे हा आहे. दुसरा एकाग्रतेने करणेबाबत आहे. उरलेले तीन मुद्ये पातंजलीच्या वरील प्रसिद्ध सूत्राप्रमाणे प्रतिपादले आहेत. देवाचे स्मरण आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत करावयाचे आहे. तसे करताना एक क्षण देखील वाया जाऊन देणेचा नाही व तो भावभक्तीयुक्त असले पाहिजे.

'सत्कार'बद्दलची चर्चा गुरुदेवांनी विणकर संतांच्या पदाद्वारे केली आहे. त्यामध्ये चरखा चालविण्याचे, सूत कातण्यासाठी, चादर शिवण्यासाठीचे रूपक आहे. Shakespeare म्हणतो, आमचा खरा उद्देश हा आपणास रिझविण्याचा आहे. त्याचप्रमाणे पारमार्थिक चरखा चालविण्याचा खरा उद्देश is all for the propitiation of the Lord देवास प्रसन्न करण्याचा आहे. साई को मन भावै.

तीन प्रसिद्ध पदांच्या द्वारे पारमार्थिक चरखा चालविण्याची क्रिया अर्थात ह्या शरीररुपी चरख्यातून भावभक्तीने नामस्मरणाचे सूत कातून त्यातून सुंदर रंगीत वस्त्र तयार करून देवास अर्पण करण्याची क्रिया गुरुदेवांनी वर्णन केली आहे.

ती पदे अशी –

१) दादूंचे कोरीसाल न छांडै रे

२) कबिरांचे झीनी झीनी बीनी चदरिया

३) शरीफ साहेबांचे आर गोडविन्नेनु मगळे

प्रथम तिनही पदे व त्याचा अर्थ पाहून नंतर गुरुदेवांचे विचार साधकाच्या स्तरावर पाहू या. मग ही विणकारी देवाला, साईला कशी मन भावली ते पाहू या.

दादू म्हणतात,

**कोरी साल न छाँड रे, सब घावर कौ काढै रे**

कोरी म्हणजे हिंदू जुलाहा विणकर. त्यास उद्देशून दादू म्हणतात, साल म्हणजे छिद्र राहू देऊ नकोस. सर्व घावर म्हणजे गाठी, सुरकुत्या इत्यादी काढ.

**प्रेम प्राण लगाई धागै, तत्त तेल निज दीआ।**
**एक मना इस आरम्भ लागा,**
**ज्ञान राछ भर लीया ।।१।।**

आत्मतत्त्व रुपी तेलाच्या दिव्याच्या प्रकाशामध्ये, एक चित्ताने, प्रेम व प्राणाच्या धाग्याने त्याने (विणकराने) विणण्यास प्रारंभ केला आहे.

**नाम नली भरि बुण कर लागा,**
**अंतर गती रंगराता ।**
**ताणै बाणै जीव जुलाहा,**
**परम तत्त्व सो माता ।।२।।**

ताना म्हणजे कापड्यामधील लांबीचे धागे व बाना म्हणजे आडवे धागे. म्हणजे कपडा विणावयाचे यंत्र, ज्यामध्ये तानाचा धागा वर खाली पडतो व उचलला जातो. तर आपल्या विणकराने ज्ञानाचे यंत्र तानाने भरून घेतले व त्यामध्ये नामरूपी बाना भरून घेऊन ताना, बानाने वस्त्र विणू लागला. अंतरगतिचा अर्थ करताना गुरुदेव म्हणतात ''There is अंतरगति when you inhale the love of God and exhale it." जेव्हा देवाबद्दलची प्रिती प्रत्येक श्वासागणिक आत जाते व बाहेर येते तेव्हा अंतरगति तयार होते.

अशा अंतरगतिरूपी लाल रंगाने (लाल रंग हा भक्तीचा द्योतक आहे) नाहून जीवरूपी विणकर परम तत्त्वाबरोबर विणण्यात मशगुल झाला.

**सकल शिरोमणि बुनै विचारा,**
**सान्हा सूत न तोडै ।**
**सदा सचेत रहै जौ लागा,**
**ज्यों टूटे त्यौ जोडै ।।३।।**

आपला विणकर विणण्यामध्ये सर्वांचा शिरोमणी झाला. तरी पण अत्यंत नम्रतेने त्याचे विणण्याचे काम चालू होते. जुळलेले धागे तुटणार नाही, असे लक्ष देऊन सजग राहून तो विणत होता. जरी एखादा धागा तुटल्यास तो त्यास तत्काळ जोडत होता.

**ऐसे तनि बुनी गहर गजीना,**
**साई के मन भावै ।**
**दादू कोरी कर्ता केसंगि,**
**बहुरि न इहि जग आवे ।।४।।**

अशा प्रकारे दाट व जाड वस्त्र ज्यामध्ये कोठल्या प्रकारचा गुंताई राहिले नाही, विणून साईच्या चित्तास परम संतोष दिला. दादू म्हणतात, असा विणकर ज्यास साईची संगती जडली आहे तो ह्या युगात परत जन्मास येणार नाही.

आता कबिराचे पद बघू या. ह्या पदावर डॉ. हरिभाऊ पाटणकरांनी स्वतंत्र प्रवचन केले आहे. ते त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या पुस्तकामध्ये. 'श्री गुरुदेव रानडे लिखित हिंदी परमार्थ सोपान ग्रंथातील निवडक पदांवरील प्रवचने' भाग १. प्रवचन क्रमांक ८ चे आहे. जिज्ञासूंनी मुळातूनच वाचावे.

कबिरांच्या पदाकडे वळू या.

**झीनी झीनी बीनी चदरिया ।।**
**काहे कै ताना काहे कै भरनी**
**कौन तारसे बीनी चदरिया ।।१।।**

कबिरांनी शरीरास चादरीची उपमा दिली आहे. ते विचारताहेत ही कुशलतेने विणलेली चादर कुठल्या ताना उभे धागे व भरनी किंवा बाना म्हणजे आडवे धागे ह्यापासून तयार केली आहे? कोणती तार वापरून ही चादर विणली आहे?

**इडा पिंगळा ताना भरनी,**

**सुखमन तार से बीनी चदरिया ।।२।।**

कबीर स्वतःच त्याचे उत्तर देतात. ते म्हणतात इडा व पिंगळा ह्या ताना व बाना आहेत. (गुरुदेवांनी ह्यावर इडा व पिंगळा दोन्ही शरीरामध्ये एकमेकांस समांतरपणे असतात. उभ्या व अडव्या रीतीने एकमेकांस ओलांडत नाहीत असे स्पष्ट केले आहे.) आणि सुषुम्नाच्या तारेने ही चादर विणली आहे.

**आठ कँवल दल चरखा डोलै,**

**पाँच तत्त्व गज बीनी चदरिया ।।३।।**

कबीर म्हणतात, शरीरातील असणारी आठ चक्रे, मुलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनुहत, विशुद्धी, आज्ञा, ललाट व सहस्रार ही आठही चक्रे एकदम फिरली पाहिजेत. चक्रांची नावे गुरुदेवांनी मांडली आहेत.

गोरक्ष संहितेप्रमाणे षट्चक्रे धरतात. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्धी व आज्ञा चक्र यांच्यावरती सहस्रदलाचे कमळ बह्मरंध्राच्या महामार्गात आवस्थित असते.

अष्ट कमलदल चरखा याचा अर्थ काय ह्या बद्दल मतभेद आहेत. हा चरखा म्हणजे आठ दलांचे कमळ असे काहींचे मत आहे. पण कमळास आठ दल नसतात. कारण कमळास २, ४, ६, १०, १२ व १६ दल असतात. (दल Petals) आठ दल निसर्गतः कमळास नसतात. दल शब्दाचा अर्थ समूह असा पण आहे. आठ चक्रांचा समूह एकदम फिरू लागला पाहिजे व ते एकाग्र ध्यानाने शक्य आहे. ही आठ चक्रे एकदम

हलू लागली म्हणजे आश्चर्यजनक परिणाम होतो.

थोडे मुक्त चिंतन करू या. चक्र फिरणे, म्हणजे त्यांना गती येणे, ऊर्जा निर्माण होणे, उद्दिपित होणे इत्यादी घेता येईल.

आता योगामध्ये चक्रावर ध्यान धारणा केल्यावर कोणत्या प्रकराच्या साक्षात्कारामध्ये परिणती होते ते पाहू.

मूलाधार – आरक्त वर्ण.

स्वाधिष्ठान – पीत वर्ण.

मणिपूर – येथे कुंडलिनी वास करते. हिच्या उदयाने आत्म रवीचा प्रकाश सर्वत्र पडतो.

अनाहत – त्वचेमधून दिव्य स्पर्शाचा अनुभव.

विशुद्ध – मधुर ध्वनी येतात.

आज्ञाचक्र – प्रकाश व नाद यांचे एकत्रित अनुभव अंगुष्ठ मात्र आत्म्याचा साक्षात्कार होतो.

साधकांनी आपल्याला येणाऱ्या एकत्रित अनुभवावरून चक्रगतीचा निष्कर्ष काढावा. आपला स्वरूप सांप्रदाय कळसाकडून सुरू हातो हे लक्षात ठेवावे.

**पाँच तत्त्व गुण बीनी चदरिया ।**

पदावरील टिप्पणीमध्ये गुरुदेव म्हणतात, कबिरांच्या सनातनी परंपरेनुसार मनुष्याच्या देहामध्ये पृथ्वी, आप, तेज वायू, आकाश ही पांच तत्त्वे व तम, रज, सत्व हे त्रिगुण स्थित असतात. ह्यांची बेरीज पण आठच होते.

**साँइ को सियत मास दसलागे,**
**ठोंक ठोंक कै बीनी चदरिया ।।४।।**

देवासाठी ही चादर विणण्यास दहा महिने लागले. तिचा प्रत्येक धागा व्यवस्थित ठोकून ठोकून बसविला आहे.

**सो चादर सुर नर मुनी ओढी ।**

**ओढीकै मैली कीनि चदरिया ।।५।।**

ही चादर देव, मनुष्य व मुनी यांनी वापरून मलीन करून टाकली आहे.

**दास कबीर जतन करि ओढी ।**

**ज्यों की त्यो धर दीनी चदरिया ।।६।।**

कबिरांनी प्रयत्नपूर्वक सांभाळून वापरली व जशी होती तशी देवास शेवटी अर्पण केली.

या नंतर शरीफ साहेबांच्या पदाकडे वळू या.

**आर गोडविन्नेनु मगळे मुन्नोडि हंजी नूलम्मा ।।५।।**

हे विणकरी कन्ये कोणाचा काय संबंध आहे? तू समोर बघून कापसाच्या वेळूमधून सूत कताई कर.

**दारिकाररु निन्नमारिय नोडलु । मारि एत्ति नोडबेडम्मा ।।अ. पा.१**

जाणारे येणारे तुझा चेहरा न्याहाळतील. तू तोंड उचलून बघू नकोस.

**आसनदोड्डु मणिगळ माडि । आ शरीरविगळ कंवगळ हूडी ।।**

**सुसूव चक्रद एलिगळ मेले । दशवायु गळेंव नुलिगळ बिशिदु ।।**

चरख्याचे आसन म्हणजे आपण ज्या आसनामध्ये नेमास बसतो ते. मूलाधार चक्र असा पण त्याचा अर्थ होतो. चरखाचे दोन खांब म्हणजे इडा, पिंगळा. (रवि, शशि नाडी) चरख्याचे आरे म्हणजे दहा वायू.

१) प्राण – स्थान हृदयात श्वास बाहेर व आत करतो व अन्नपानाचा परिपाक करतो.

२) अपान – गुह्य देश ह्याचे स्थान. मल–मूत्र त्यागण्याचे काम करतो.

३) समान – नाभीमध्ये राहून शरीराला यथावत् भाविक अवस्थेत राखण्याचे कार्य करतो.

४) उदान – कंठामध्ये राहतो. शरीराची वृद्धी करतो.

५) व्यान – संपूर्ण शरीरामध्ये राहतो. ग्रहण करणे इ. कार्य करतो.

६) नाग –उकार उत्पन्न करतो. (सहस्र दलात)

७) कूर्म – नेत्रोन्मीलन करतो. (विशुद्ध चक्रात)

८) कृकल – शिंक उत्पन्न होते. (मणिपूर चक्रांत)

९) देवदत्त – जांभई उत्पन्न होते. (अनाहत व आज्ञा चक्रात)

१०) धनंजय –शब्द उत्पत्ति करतो. मृत्यूनंतर काही काल असतो.

ह्या दहा वायूने चक्राचे आरे घट्ट बांधावे. हे वारे उसंडून वाहणारे असतात.

**कसरनेकळेदु कळेगळतगेदु ।**
**सुख दुःखें बो कळेगळतेगेदु ।।**
**भुकुतियं बो कोळविय हिडिदु ।**
**कुंकडि सुम्मने नुल्लम्मा ।।६।।**

सर्व पापवासना व दुष्ट विकार काढून, सुख दुःखाचा पण कचरा काढ. (सुख दुःख उद्वेग चिंता –समर्थ ) व भक्तीची कास धरून (फुंकर घालत) मुकाट्याने सुताची गुंडी कातण्यास लाग.

**इप्पत्तोंदुसाविर मेले ।**
**आरु नूरु ऐलगळ होय्दु ।**
**तप्पदे एणिकेय माडि नीनु ।**
**जाप्पिसि पट्टि सुत्तम्मा ।।३।।**

न चुकता मोजून २१६०० धागे ओढून, जपून तू वस्त्र वीण.

**प्रत्यक्ष परमात्मनेंबुव ।**
**उत्तम पीतांबर नेय्दु।।**
**कृतीवास शिशुनाळ धीशनिगे ।**
**मुट्टिसि मुक्ति पडेयम्मा ।।४।।**

प्रत्यक्ष परमेश्वर स्वरूप, चर्म नेसलेल्या शिशिनालधीशास हा उत्तम विणलेला पितांबर नेसवून मुक्त हो.

**साधकाचा दृष्टिकोन, नामस्मरणाचे इंगित व पार्श्वभूमी :**

बृहदारण्यक उपनिषदात म्हटले आहे. आत्मा अदृश्य राहून सर्वांस पाहतो, आपण श्रवणाचा विषय न होता सर्व ऐकतो; आपण विचारातीत असून सर्व विषयी विचार करतो, आपण अज्ञात राहून सर्व जाणतो; त्याच्याशिवाय दुसरा कोणीही पाहणारा, ऐकणारा, विचार करणारा किंवा जाणणारा नाही.

आपण जेव्हा नामस्मरण करतो, तेव्हा नामाचे स्मरण आपला आत्मा करतो व त्या नामाचा मनातील स्पष्ट उच्चार (जो आत्माच करतो) तो पण आत्माच ऐकतो.

निवृत्तीनाथ सांगतात, जसे जसे नाम श्वासाच्या तंत आणि वितंतात गुंफले जाते तसे अनाहत नाद उमटतो. जणू काही भक्ताचा देव सत्कार करतो आहे. ज्ञानेश्वर म्हणतात –

**नामजपयज्ञु तो परम ।**
**समस्तांही यज्ञांच्या पैकी ।**
**जपयज्ञु मी ये लोकी ।**

**ज्ञा.१०.२३२/२३३**

गुरुदेवांनी म्हटले आहे

"... God is identified not merely with the object of audition, but with the process of audition itself."

देव म्हणजे देवाचे नाम हे ऐकण्याचे उद्दिष्ट तर आहेच, पण ऐकण्याची क्रिया म्हणजे पण देवच आहे.

ह्या भूमिकेवरून पुढील विचार करू या.

**नेमास आवश्यक अशा बाह्य गोष्टी :**

ह्या मध्ये नेमाचा काल, आसन, नेमाच्या जागेमधील वातावरण, जपमाळ इत्यादीचा समावेश होतो. ह्या गोष्टी ज्याच्या त्याच्या सवडीप्रमाणे प्रत्येकाने ठरवायचा असतात. महत्त्वाचे म्हणजे नेमाची ठरलेली वेळ व नेमाचा एकूण काल रोज साधावा. त्यामध्ये मन गया तो जाने दो, मत

जाने दो शरीर ही वृत्ती असावी.

**नेमास आवश्यक अशा मानसिक गोष्टी :**

दुर्गण त्याग व सद्गुण सेवन हे तर साधकाचे जीवनच बनले पाहिजे. पण नेमास बसण्याआधी काही पारमार्थिक वाचन, ध्यान, गीता इत्यादीचा आवश्य उपयोग करावा.

दादूंच्या म्हणण्याप्रमाणे, प्रेम प्राण लगाइ धागै. प्रेम म्हणजे भक्ती, प्राण म्हणजे श्वास. श्वासास देवाच्या प्रेमाचे वाहन केले पाहिजे. समर्थाच्या प्रेम प्रीतीने बांधावे ह्या ओवीबद्दल भाऊसाहेब महाराज म्हणत असत श्वासाने देवाच्या भक्तीस बांधले पाहिजे. दोन्ही गोष्टी एकत्र केल्या गेल्या पाहिजेत. हे करताना दादूंच्या म्हणण्याप्रमाणे 'अंतरगती रंगा राता', नेमामध्ये आतील पारमार्थिक भाव उत्पन्न होतात. ह्या जांभळ्या किंवा बहुविध रंगीत भावना वस्त्रामधील रंगीत धागे होत.

मन विविध भावाने उचंबळून येण्यासाठी आपल्या सद्गुरुंचा महिमा, त्यांनी वेळोवेळी आपल्यावर केलेली कृपा ह्या व इतर अनेक पूरक गोष्टींची सजग जाणीव आवश्यक आहे. भक्ती रसायन करण्यासाठी विविध वस्तू आपण मनात गोळा करावयाच्या असतात. ज्यास मग कृपेची जोड मिळून रसायन तयार होईल.

माझे एक गुरुबंधु पारमार्थिक प्रवचनाचा, पदांचा अत्यंत मार्मिक उपयोग आपल्या सकाळच्या ३ तासांच्या बैठकीसाठी करतात.

**नेमाची वृत्ती :-**

निंबरगी महाराजांनी परमार्थ सदैव उल्हासाने चालवावा असे म्हटले आहे. व इतरत्र मध्ये म्हणतात मजुरीने दळणारे लोक न चुकणारे काम म्हणून जुलुमाने पहाटे उठतात. तसेच समजून आपण उठून साधन करावे.

भाऊसाहेब म्हणत अंत:करणात हरुष (हर्ष) असावा.

पातंजल योग सूत्र १.३० मध्ये नेमामध्ये येणाऱ्या विघ्नांचा आढावा

घेतला आहे. सूत्राप्रमाणे शारीरिक व्याधी, मनातील आळस, कंटाळा, संशय, उल्हासाचा आभाव, सुस्ती, इंद्रिय सुखास चिकटून राहण्याची वृत्ती, भ्रम, एकाग्रताने साधणे व एकाग्रतेपासून शिघ्रतेने ढळणे हे दोष सांगितले आहेत.

प्रत्येकाने स्वत:साठी युक्ताहार, विहार, झोप इत्यादी ठरवायचे असते.

शारीरिक व मानसिक कंटाळ्याबद्दल निंबरगी महाराजांनी आधीच लिहून ठेवले आहे.

एकाग्रतेबद्दल बोलावयाचे झाल्यास प्रत्येक नामाची सर्व अक्षरे स्पष्टपणे ऐकू आली म्हणजे नाम पदरात पडले. तेवढे देवाबरोबर साम्य प्रस्थापित झाले. सजगपणे प्रत्येक नामाची सर्व अक्षरे ऐकण्याची सवय केली म्हणजे एकाग्रता साध्य होऊ शकते.

**भाव कुंभाव अनख अलस हूँ ।**
**नामजपत मंगळ दिसि दस हूँ।**

असे तुलसीदासांनी म्हटले आहे.

**अनुभवे भावे, रुपटे प्रपंचे । परि हरिचे नाम येऊँ दे वाचे ।**

असे नामदेव म्हणतात.

आपले चित्त, रज, तम, सत्त्वाचे बनलेले आहे.

ज्या एका गुणाचा उद्रेक होतो, तो इतर दोषांस क्षीण करतो.

रजोगुणाचा उद्रेक कर्माकडे ओढतो

तमोगुणाचा उद्रेक चित्तात मूढता, जडत्त्व, भ्रम, प्रमाद इत्यादी उत्पन्न करतो.

सत्त्वगुणाच्या उद्रेकाने चित्त प्रसन्न व उल्हासित होते.

साधकाने आपल्या चित्ताची स्थिती सत्त्वगुणाच्या उद्रेकात ठेवावी. ह्यास पारमार्थिक वाचन, चिंतन, मनन हेच उपाय ज्ञानास मूळ अग्रि.

तसेच जमेची बाजू ही की प्रत्येक नाम म्हणजे देवाचा साधकाच्या

अंतःकरणात तेवढा प्रवेश, जितका जास्त प्रवेश तितका पुढील मार्ग आपोआप निर्विघ्न होतो.

**ध्यानास आवश्यक अशा पारमार्थिक गोष्टी :-**

गुरुदेवांच्या कृपेने जो काही अनुभव असेल त्याकडे वरचेवर प्रेमाने बघत जावे. सख्य भक्तीची सुरुवात सहवासातून होते. आपल्या वस्तूचे दर्शन शक्य तितक्या वेळेस प्रेमाने घेणे कर्तव्य ठरते.

दुसरी गोष्ट दिसणारी वस्तू देव आहे हे अनुभवाने जेव्हा कळावयाचे असेल तेव्हा कळेल. पण तो पर्यंत तो देवच आहे अशी निदान दृढ बुद्धी असावी.

ह्या करता पारमार्थिक अनुभवाचे गुरुदेवांनी मांडलेले निकष आपल्या वस्तूस लागू पडतात का हे पाहावे. सर्वात महत्त्वाचा निकष आनंदाचा. वस्तूकडे पाहिल्यामुळे आपणास परत परत पाहण्याची इच्छा झाली म्हणजे तो आनंदाचे लक्षण समजावे. हा आनंद अल्प असला तरी, तो देवाच्या दर्शनाचा आहे, हे लक्षात घ्यावे.

समर्थांच्या खालील ओव्या पण वस्तूबद्दल उत्तम निकष ठरतात. त्या अशा -

**जो जो पदार्थ दृष्टीस पडे । ते त्या पदार्था पैलीकडे ।**
**अनुभवे हेकुवाडे । उकलावे ।।३७।।**
**पोथी वाचूं जातां पाहे । मातृकामध्ये भरले आहे ।**
**नेत्री निघोनि राहे । मृदपणे ।।४२।।**
**चरणी चालतां मार्गी । जे आडळे सर्वांगी ।**
**करं घेतां वस्तू लागीं । आडवें ब्रह्म ।।४४।। दा. बो. ७.४**
**आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यास नाही मर्यादा ।**
**दुष्ट पातकाची बाधा । निरसोन गेली ।।६५।। दा. बो. १०.१०**

गुरुदेवांनी वस्तूबद्दल दिलेला सावधानतेचा इशारा पण लक्षात ठेवला पाहिजे.

''भक्तिभावाने बरेच दिवस नामस्मरण केल्यानंतर जी वस्तू दिसू लागते, ती पाहून जी भावना (भीति, आदर, प्रेम) अंत:करणात उत्पन्न होईल. तिच त्या वस्तुला अर्पण करावी. इतर काल्पनिक भावना तिच्यावर लादू नयेत. We will be offending it by offering anything unworthy of it. (स्वाभाविकपणे 'वस्तू'बद्दल आपल्या अंत:करणात उद्भवणाऱ्या भावनेव्यतिरिक्त इतर भावना मनाने निर्माण करून त्या वस्तूला अर्पण करू गेल्यास त्याचा अवमान केल्याप्रमाणे होणार आहे.) 'वस्तू'ची शक्ती (Power) कळत नाही. म्हणून त्या विषयी वाटेल त्या कल्पना करू नयेत.

गुरुदेवांनी स्वत:पुरता परमार्थ १९२० साली साधला. देवास, सद्गुरुस प्रसन्न करून घेतले. त्याबद्दलच्या काही गोष्टी आपण पाहू या.

१९०९ सालच्या सुमारास भाऊसाहेब महाराज गुरुदेवांच्या स्वप्नात आले व त्यांनी गुरुदेवांना भागवत वाचण्यास सांगितले. त्याप्रमाणे गुरुदेवांनी केले. पुढे काही दिवसांनी समक्ष महाराजांची भेट झाल्यावेळी स्वप्नांची हकीकत सांगितली. महाराज म्हणाले त्या वेळी वैराग्याचा प्रसंग होता.

१९१० साली चिम्मड प्रसंगानंतर, संप्रदायासाठी भजन संग्रह नेमावली तयार करून त्यास एक विस्तृत प्रस्तावनाही लिहिली. निंबरगी महाराजांच्या परमगुरुपासून आलेल्या परमार्थ मार्गाचे यथार्थ दिग्दर्शन त्यामध्ये थोडक्यात पण हृदयंगम रीतीने आपले नाव कोठेच न येऊ देता केले. त्याबद्दल आपल्या सद्गुरुंची शाबासकी मिळवून प्रशंसेस प्राप्त झाले.

१९१० सालापासून गुरुदेवांची झेप जगाच्या कल्याणाकडे होती. खरा परमार्थ मार्ग लोकांना कळावा म्हणून कळकळ होती. भाऊसाहेबांना त्यांनी १२।७।१९१० साली लिहिलेल्या पत्रात त्यांनी खरा मार्ग जिकडे तिकडे पसरण्यासाठी खऱ्या मात्रा व खरे वैद्य जिकडे तिकडे उत्पन्न झाले

पाहिजेत असे म्हटले आहे. व स्वत: अपार कष्ट सोसून खरे वैद्य झाले. जगाच्या कल्याणासाठी जे आजही निंबाळ क्षेत्री चालू आहे.

एकदा गुरुदेव साधनास बसलेले असताना भाऊसाहेब प्रत्यक्ष पुढे बसलेले दिसले. त्यांनी आपल्या डोक्यावरील रूमाल गुरुदेवांच्या डोक्यावर ठेवला. थोड्या वेळाने महाराज म्हणाले 'इन तारप्पा' (आता दे बाबा) मनात काही विकल्प न येता तो त्यांनी परत केला.

तसेच १९२३ साली सांगलीस शिवणगीच्या बंगल्यात राहात असताना श्री निंबरगी महाराज नेमात समोर बसलेले दिसले. आपल्या डोक्यावरील बांधलेला रूमाल जशाच्या तसा काढून त्यांनी तो गुरुदेवांच्या डोक्यावर घातला. त्यांच्याकडे पाहून 'धलो काणसतद' (छान दिसते) म्हणून 'ताइन्न' (आता दे) असे म्हणाले. 'तगोरी महाराजर' असे म्हणून आपल्या डोक्यावरील घातलेला रूमाल जशाचा तसा गुरुदेवांनी त्यांना परत दिला. शिवणगीच्या बंगल्यामध्ये Constructive survey ह्या ग्रंथाचे काम पूर्ण झाले होते. त्या ग्रंथाने निंबरगी संप्रदायाची किर्ती १९०७ साली महाराजांनी केलेल्या भाकिताप्रमाणे सातासमुद्रा पलीकडे नेली.

**सत्कारांचा परमोच्च दृष्टांत**

१९५० साली महाराजांच्या त्या सालाच्या पुण्यतिथीच्या आदल्या दिवशी गुरुदेवांना स्वप्न दृष्टांत झाला. एका तळघरात महाराज स्वत: एकटेच बसले आहेत. त्यांचा अंगरक्षक पुंडप्पा दारात राखण करतो आहे. महाराजांचे संपूर्ण मन व भावना शब्दाभोवती केंद्रीत झाल्या होत्या. ... his entire mind and affection centered in Shabda (सबद सनेही)

ह्या दृष्टांताचा अर्थ त्यावेळी गुरुदेवांना कळला नाही. दोन एक तासात अलाहाबाद Cantonment मधील दोघे गृहस्थ त्यांना भेटावयास आले. त्यांनी पुढील दोहा दिला.

**घर का भया तो क्या भया, तखत तरे का होय ।**
**तरलत तरे का सूरमा, सबद सनेही सोय ।।**

त्या दोह्याच्या अर्थाबद्दल चर्चा करताना आपणास झालेल्या दृष्टांताचे हे काव्यमय साहित्यिक वर्णन असल्याचे त्यांना समजले. देवाशी तादात्म्य होण्यास कीर्तन, गायन व ध्यान या साखळीची तिसरी एक कडी आहे, याची खात्री पटली.

ह्या सर्व गोष्टीचा (दृष्टांताचा) निष्कर्ष काय? गुरुदेव म्हणतात, ''आमचे प्रेम देवाशी निगडीत झाल्याखेरीज, कीर्तन, गायन व ध्यान या तिन्ही साधनाने अंतर्गत ध्यान केल्याखेरीज, आत्मिक अनुभवाच्या शिखरावर पोहोचू शकणार नाही.''

ह्या दृष्टांतास अजून एक भाग आहे. शिष्याने आपल्या सद्गुरुबरोबर कसे वागावे हे त्यामधून स्पष्ट होते. शिष्यांनी आपल्या सद्गुरुंच्या चरणापाशी सदैव नम्रतेने, सजगपणे व तत्परतेने असावे. त्याने सदैव आज्ञाधारकपणे सद्गुरु वचनाचे / आज्ञेचे (नडी नुडी ... बो. सु.) पालन अत्यंत तत्परतेने केले पाहिजे. असा शिष्य गुरुकृपेस व साक्षात्कारास प्राप्त ठरतो

ह्या सत्काराला अजून एक महत्त्वाचा पैलू आहे. त्याचा निर्देश गुरुदेवांनी Pathway to God in Hindi Literature पद विभाग Incentives मध्ये कृष्णानंदाच्या पदाच्या अनुषंगाने केला आहे. पदाचे शेवटचे कडवे असे आहे

**कृष्णानंद जान लो हरिको, जाना है जो अपने घरकों**
**प्रभू पद कर संतोष**

कृष्णानंद म्हणतात हे मुसाफिरा तुला आपल्या निजधामास जावयाचे आहे. त्यासाठी तुला देवास जाणून घ्यावयाचे आहे व ज्या योगे देव प्रसन्न होईल.

गुरुदेव म्हणतात, '.... Finally, Krishnanand tells us that

our proper business here below is to go back to our Maker in the same pure condition in which we came.

शेवटी कृष्णानंद आपल्याला सांगताहेत की, इथे (पृथ्वीवर) आपला मुख्य उद्योग हाच आहे की ज्या पवित्र स्थितीमध्ये आपण आलो त्याच स्थितीमध्ये परत जावयाचे आहे. Same pure condition पवित्र स्थिती. जी कल्पना कृष्णानंदाच्या पदात स्पष्ट नाही. ती गुरुदेवांनी घातली आहे. परमार्थ प्रेरणेमध्ये पहिल्या गटातील तिसऱ्या पदावर भाष्य करताना परमार्थाची सांगता, कृतार्थता, पूर्तता कशात आहे अथवा कोणत्या तऱ्हेने झाली पाहिजे हे सांगितले आहे.

निंबरगी महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'अप्पा गुरुराय निंदू निनगे ओप्पितु' My master. I have only dedicated to you what was already yours.' गुरुराया जे काही तुझे होते तेच मी तुला समर्पित केले.

किंवा कबीरांनी म्हटल्याप्रमाणे

**दास कबीर जतन करि ओढी ।**
**ज्यों की त्यो धर दीनी चदरिया ।।**

'Now in my last hour" says Kabir. "I offer it to you in the same original condition in which you gave it to me"

कबीर म्हणतात ''ह्या शेवटच्या घटकेला ही मी जीवनभर जपून वापरलेली चादर ज्या स्थितीमध्ये देवा तू मला दिली होतीस, तशीच मी परत करत आहे.''

प्रा. शुक्ला यांना अलाहाबाद मधील काही मंडळींनी विचारले ''प्रा. रानडे यांनी आत्मचरित्र लिहिले नाही का?'' त्यावर Pathway to God in Hindi Literature (PGHL) हा ग्रंथ मंडळींसमोर टाकून प्रा. शुक्ला म्हणाले, ''हे पहा त्यांचे आत्मचरित्र...''

PGHL मध्ये आपला मानस Wordsworth कवीच्या वाक्यावर भाष्य करताना जे कृष्णानंदाच्या पदावरील चर्चेमध्ये आहे) व वरील पदांवरील चर्चेमध्ये गुरुदेवांनी आधीच सांगून ठेवला होता. Wordsworth म्हणतो,

'Trailing clouds of glory do we come from God, who is our Home'

देवाच्या प्रभेच्या पाठीमागे रेंगाळणाऱ्या ढंगाप्रमाणे आपण देवाकडून, जो आपले निजस्थान आहे, येतो.

गुरुदेव म्हणतात, Lets us similarly go back to our home as trailing clouds of glory. आपण त्याचप्रमाणे देवाच्या प्रभेच्या पाठीमागे रेंगाळणाऱ्या ढगाप्रमाणे आपल्या निजस्थानास परतु या.

जुलै ५६ पासून गुरुदेवांनी हा परतीचा प्रवास सुरू केला. डॉ. पी. डी. खानोलकर एम. डी. सिव्हील सर्जन, सोलापूर यांनी विश्वासार्ह माहितीने ह्यावर पूर्ण असा एक उत्तम लेख लिहिला आहे जीज्ञासुनी तो मुळातून पाहावा.

• • •

# कर्पूर आरती सोहळा

### १) आरती करणे – पद्धत व सांप्रदायिक महत्त्व

डॉ. मा. वि. पाटणकरांनी ह्याबद्दल आपल्या एका प्रवचनात मांडलेले विचार मुळात पाहू या –

''आपण आरती याबद्दल थोडासा विचार करणार आहोत. आरती करणे म्हणजे तबकात निरांजन, कापूर, उद्बत्ती इत्यादी एक किंवा सर्व वस्तू ठेवून देवाची स्तुतीपर किंवा प्रार्थना करणारी पदे सुरेल आवाजात, जमल्यास पेटी, तबला इत्यादी वाद्ये यांच्या साहाय्याने, सगुण मूर्तीची, फोटोची किंवा समाधीची पूजा करतो, त्याला आरती म्हणतात.

आरतीनंतर पूजेची सर्वसाधारणपणे समाप्ती होते आणि त्यानंतर प्रसाद वाटला जातो. महाराज म्हणत – भजन, आरती करताना देवापुढे वेगवेगळ्या प्रसादाची ताटे असावीत, म्हणजे भजन करणाऱ्यांचा उत्साह वाढतो आणि हा सर्वांचा अनुभव आहे.

आरती करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे आपला देवाबद्दलचा आदरभाव प्रकट करणे, भाव वाढविणे, देवामध्ये मन गुंतवून त्याच्याशी समरस होऊन, त्याचा आनंद लुटणे आणि मन प्रसन्न करणे इत्यादी अनेक गोष्टी असतात. एकांतातील किंवा लोकांतातील आरतीमध्ये अष्ट सात्त्विक भाव जागृत होतो. त्यामुळे ज्योतीवर किंवा त्यापासून येणाऱ्या किरणांच्या प्रकाशात, साधकाला आपली प्रचिती दिसते, अशा अनेकांचा अनुभव आहे.

या दृष्टीने आपल्या संप्रदायात अनेक वेळा आरती करण्याची पद्धत आहे. पण आरतीवर जी दृश्ये प्रचिती दिसते. तो आपला खरा गुरु, असे

मत गुरुदेवांनी एकदा व्यक्त केले होते आरतीच्या शेवटी जी निळी ज्योत दिसते, तिचा रंग आणि दृश्य प्रचितीतील आत्म्याचा रंग, हा सर्वसाधारणपणे सारखा असतो, असे काही ज्येष्ठ साधक सांगतात.

आरतीनंतर त्याच ठिकाणचा अंगारा घेणे, हे पण महत्त्वाचे आहे. कारण ज्या ठिकाणी आरती लावलेली असते, त्या ठिकाणी अनेक साधकांनी एकाच वेळी आपल्या दृश्य प्रचितीचा अनुभव घेतलेला असतो. या दृष्टीने तेथील अंगाऱ्याला अधिक महत्त्व आहे. खऱ्या साधकाला ज्योतीवर प्रचिती दिसते, असेही मत एकदा गुरुदेवांनी व्यक्त केले होते, त्यामुळे आरतीच्या वेळी अत्यंत एकाग्रतेने पाहावे व आरतीमध्ये अगदी जरूरी पुरताच कापूर घालावा, असे ते म्हणत.''

२) आरतीच्या ज्योतीचे पारमार्थिक महत्त्व (Spiritual Significance)

(अ) आत्मा ज्योतीरूपात प्रगट होतो. – मैत्रीय उपनिषद

**''परं ज्यतिरुपसंपद्यस्वेन रुपेणाभिनिषाद्यत इत्येष**
**आत्मेतिहोवाच !... '' मॅ. II १.३**

**अर्थ :–**

...श्रेष्ठ ज्योत होऊन आपल्या रूपाने प्रकट होतो तोच हा आत्मा.''

(आ) परमार्थ पथावर एकसारखे पुढे पाऊल पडत असलेल्या साधकास अग्नीच्या ज्योतीरूपात आत्मा दिसतो असे बृहदारण्य उपनिषदात म्हंटले आहे.

(इ) आत्म्याचे ज्योतीरूपात दिसण्याबाबत रामदास म्हणतात,

**''लऐ लक्षिता ते स्वरूपी सरावे**
**स्वयंज्योति पूर्ण प्रकाशे स्वभावे ।।''**

(मनाचे २१० श्लोकांपैकी हा १९४ वा श्लोक आहे.)

**(ई) बोधसुधा वचन ५९**

**''ध्यान करून पाहिलेला दिव्य प्रकाशच आत्मा होय.''**

'' – ज्योतिरूप पाहिल्यामुळे, ते या जन्मीच मुक्त होऊन आत्म्यात मिळून जातात...''

**(ऊ) निंबरगी महाराजांचे निर्याण**

''... इ. स. १८८५ च्या चैत्र शु. १३ च्या दिवशी निंबरगी महाराजांच्या पार्थिव शरीरातील आत्मज्योत त्या परमज्योतीत विरून गेल्याचे श्रीभाऊसाहेब महाराजांनी पाहिले...''

(भक्तीचा कळस – पान ६१)

(क) भाऊसाहेब महाराजांचे निर्याण

**''... कापुराची ज्योती निमाता देखोनि ।**
**टाळी वाजवूनी देह सोडी ।।**
**सोडी देह आमुचा धन्य गुरुनाथ ।**
**ज्योती मध्ये ज्योती गुप्त झाली ।।''**

(i) गीता अध्याय १६ श्लोक ३ – दैवी संपत्ती घेऊन जन्मलेल्या पुरुषास प्राप्त होणाऱ्या सद्‌गुणांबद्दल ज्ञानेश्वर एका ओवीत म्हणतात...

**''की सव्विसे गुणज्योती ।**
**इही उजळूनि आरती ।।**
**गीता आत्मया निजपती ।**
**नीरांजना आली ।।'' १६.२१०।।**

(ii) ज्ञानेश्वर म्हणतात

**तयां तत्वज्ञां चोखटां । दिवी पोतासाची सुभटा ।**
**मग मीचि होऊनि दिवटा । पुढां पुढां चाले ।। १०.१४२**

वीरार्जुना, अशा अतिशय गुप्त ज्ञानार्थी भक्तांसाठी मी कापराची मशाल पेटवून, मी स्वतःच मशालीसारखा त्यांच्यापुढे सतत धावत असतो. वो एक सिपाही.

(ग) मीराबाई

(i) साधु कि संगत गुरुजी की सेवा ।
बनत बनत आई रे ।।
मीरा के प्रभु गिरिधर नागर
जोत मे जोत मिलाई रे ।।
(ii) ''जोगी मत जा...
मीरा के प्रभु गिरीधर नागर ।
ज्योत मे ज्योत मिला जा ।।''

गुरुदेव म्हणतात मीराबाई आपल्या गुरुस विनवणी करून म्हणते आहे, "Let my light be merged in thine" (आत्मा परमात्म्यामध्ये मिसळू दे.)

**३) साधकांच्या जीवनातील आरतीचे अनन्य स्थान**

सर्व साधारणपणे नेमास बसताना, नेम झाल्यानंतर महत्त्वाच्या प्रसंगी, प्रस्तान करताना, दु:खाच्या प्रसंगी, वेळेला कापूर प्रज्वलित करून सद्‌गुरुंची आरती साधक वर्ग करीत असतो.

ह्या मागील अंतरीक उद्देश असा आहे की, त्या त्या वेळेस आपल्या सद्‌गुरुंकडून ती क्रिया करणेची अनुज्ञा घेणे, मनातील गोष्ट सांगणे, हितगुज करणे होय.

रामदासांनी म्हंटले आहे.

''जैसा देव तैसा गुरु ।
म्हणोनि सख्य देवासी करावे ।
हितगुज तयासी सांगावे ।।''

(हितगुज – आपल्या अगदी अंतरीच्या गोष्टी)

भाऊसाहेब महाराजांच्या निर्याणानंतर गुरुदेव, अंबुराव महाराजांना, भाऊसाहेब महाराजांच्या स्थानी मानू लागले व आपली व्यावहारिक दु:खे व पारमार्थिक अडचणी त्यांना सांगू लागले.

श्री अंबुराज महाराजांना लिहिलेल्या एका पत्रात गुरुदेव म्हणतात, ''हितगुज तयांसीच सांगावे'' या नात्याने आपल्याजवळ सर्व गोष्टी सांगितल्या आहेत...'' (पत्र क्रमांक ११२, दि. १९ जून १९१८ – श्री. गुरुदेव रानडे यांचा पारमार्थिक पत्रव्यवहार.)

तेव्हा, सदेह सद्‌गुरु आज नसताना, कापूराची ज्योतच सर्व साधकांना सद्‌गुरुंच्या रूपाने आहे व कापूर लावणेची, आरती करणेची क्रिया म्हणजे सद्‌गुरु बरोबर भेटणेची जागा, सांकेतिक स्थळ (Rendezvous) व हितगुज करणेचे क्षण होय हे पक्के ध्यानात ठेवावे.

पण हेही लक्षात असावे की खंडीभर कापूर जाळून देव भेटत नाही. साधुबुवा निंबरगीस महाराजांचे भेटीस जात असताना गावच्या वेशीपाशी आल्यावर 'राजाधिराज सद्‌गुरुनाथ महाराज की जय' अशी मोठ्याने गर्जना करीत व महाराजांच्या घराजवळ गेल्यावर तसाच जयजयकार पुन्हा करून बराच कापूर महाराजांच्या घराच्या आत कट्ट्यावर लावीत. तेव्हा महाराज त्यांना म्हणत, ''बाबा, इतका बडेजाव करू नये. जयजयकार हळू करावा व थोडा कापूर लावावा. तुझ्या कापराच्या जाळाने माझे गरिबाचे घर पेटेल. पुष्कळ कापूर लावून जर देव मिळत असता, तर श्रीमंत लोक खंडीवारी कापूर लावतील.''

●●●

# हेचि दान देगा देवा

## (पूर्वाध)

कापूर प्रज्वलित करतेवेळी सर्व साधक वरील अभंगाने आरतीची सुरुवात करतात. हा तुकाराम महाराजांचा पसायदानाचा अभंग आहे.

'पसाय' या शब्दाचा अर्थ 'प्रसाद' असा आहे व 'दान' म्हणजे 'देणे'. 'प्रसादस्तु प्रसन्नता.' ज्या दानाने दाता व ग्रहितता या दोघांना प्रसन्नता प्राप्त होते तोच खरा प्रसाद.

तुकारामांचे मागणे खालील प्रसिद्ध अभंगात स्पष्ट होते –

**'हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।।**
**गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।।२।।**
**न लगे मुक्ति धन संपदा । संत संग देई सदा ।।३।।**
**तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।४।।'**

गुरुदेवांनी (प्रा. रा. द. रानडे) आपल्या Mysticism in Maharashtra या ग्रंथामध्ये तुकारामांची अध्यात्मिक शिकवण या प्रकरणामध्ये 'Tukaram's Theism (तुकारामांचे सगुण विचार) या मथळ्याखाली घेतलेल्या अभंगांपैकी हा एक अभंग आहे. अभंग 'मुक्तीपेक्षा पुनर्जन्म श्रेष्ठ' या उपविभागामध्ये विराजमान आहे. अभंगावर टिप्पणी करताना गुरुदेव म्हणतात –

'देवा, तुम्ही आम्हास आनंदाने गर्भवासी घालावे' असे तुकाराम म्हणतात. 'जर मला आनंदाने तुझे गुण गाता आले व मला सदैव संत संगतीत राहावयास मिळाले तर मला पुनः पुन्हा जन्म घेण्यास आनंद वाटेल.'

अभंगावर केलेले हे मुक्तचिंतन –

### १) 'तुझा विसर न व्हावा'

तुकारामांनी देवापाशी मागितलेल्या दानातील पहिला भाग होय.

'विसर'या मानसिक क्रियेवर श्री. भाऊसाहेब महाराज उमदीकर, (गुरुदेवांचे पारमार्थिक सद्गुरु) यांनी केलेला (development) विस्तार पाहू.

आपल्या जावक पत्रामध्ये भाऊसाहेब महाराज लिहितात –

'आता प्रवृत्ती अथवा निवृत्तीचे ठिकाणी (प्रपंच व परमार्थ) 'मी माझे आठवण विसरले ज्याचे अंत:करण.' मी प्रपंचात अमूक व परमार्थात अमूक आहे हे, आठवण जे आहे ते, मी जीव माझे आठवण सिव सिव म्हणण्याचे आहे, असे अंत:करणात स्मरण ठासून गेले असता ''विसरले ज्यांना अंत:करण'' म्हणजे मी जीव प्रवृत्ती नव्हे व निवृत्ती नव्हे. फक्त स्मर्ण खरे आहे, असे अंत:करणात ठरून गेले... (पाहिजे.)

**टीप** : (जुने मराठीमध्ये पत्र आहे. कंसातील शब्द लेखकाचे.)

मी N. V. Kulkarni (लेखक) माझ्या अंत:करणात काय आहे, मी प्रपंचात इंजिनियर आहे. परमार्थात गुरुदेवांचा शिष्य आहे ही आठवण होय. पण हे खरे आहे का? अर्थातच नाही. मग खरे काय? तर मी एक जीव आहे. माझे आठवण सिव सिव (शिव शिव) म्हणायचे आहे. हेच फक्त 'स्मरण' अंत:करणाने ठसून गेले असता मग काय होते? तर अंत:करण 'मी अमूक' हे विसरून जाते.

पत्रामध्ये महाराज पुढे लिहितात –

''... अंत:करणात तोच (देव) आहे. स्मर्णात ठेवून आनंद वेळ काढीत असावा हेच आपलेकडे करणी (करण्याचे काम) आहे. त्याची करणी तो करीतच आहे. (भक्तांचा सांभाळ) आपणाकडे हुशारी व लक्षे म्हणजे हे खोटा (हुशारीने लक्षपूर्वक करतो असे आपणास वाटते ते खरे नव्हे.) कारण आपले हुशारी म्हणजे नेहमी आठव (नेहमी आठव म्हणजे

२१६०० श्वासामध्ये नामस्मरण ते होते का नाही यावर लक्ष असणे.)

आणखी एके ठिकाणी महाराज म्हणतात –

आता समर्थ वाक्य 'आठव तो ब्रह्म नाठव तो भवभ्रम.' आणखी समर्थ वाक्य 'ज्ञानास मूळ अग्नी व भक्तीस मूळ विरक्ती' हे दोन्ही गोष्टी निरंतर कूटस्थातील अंत:करणापासून ज्ञानचक्षूने ज्ञान कूटस्थापुढे निरंतर राहील. म्हणजे तो विदेही जाहला व अकर्तव्य जाहला. हा एकंदर भाव होण्यास निरंतर कंठी गुरुवाक्य व निरंतर समदृष्टी होऊन दृष्टीखालून गेला पाहिजे. भाव जडून गेला पाहिजे म्हणजे समर्थ वाक्य ''बुद्धीचा पालट नासते कूमती होईल सद्‌गती येणे पंथे।।'' आणखी समर्थ वाक्य २१,६०० नारायणाने क्लफ्त निर्माण केल्या आहेत त्या ठिकाणी सगुण हे ब्रह्म विठ्ठलची बोले, ऐक्य पावविले तुकाराम...''

मी देह हा भ्रम नष्ट झाला म्हणजे मनुष्य विदेही होतो. कर्तव्य देहाला लागलेले असते. म्हणून मी देह या भ्रमाच्या शेवटानंतर मनुष्य कर्तव्यातीतही होतो. साक्षात्कारी पुरुषाला जो आत्मरत, आत्मतृप्त आहे कर्तव्य उरत नाही.

विदेही व कर्तव्यातीत होण्याचा मार्ग म्हणजे सद्‌गुरु कृपेने मिळालेल्या नामाचे अखंड स्मरण करणे व ते इतके की, नाम अंत:करणाला जडून गेले पाहिजे. दृष्टी सदा नासिकाग्री वस्तुदर्शनात खिळून गेली पाहिजे. ह्याने बुद्धी पालटते व दुष्ट विचार ऱ्हास पावतात. विषयाकडे असणारे मन देवाकडे वळते व सद्‌गती मिळते. प्रत्येक मनुष्य हा सगुण ब्रह्मच आहे. त्याने आपल्या २१६०० श्वासापैकी प्रत्येक श्वासात नाम घ्यावे. मग तो विश्वरूप होईल, विदेही होईल.

आठव तो ब्रह्म नाठव तो भवभ्रम – नामाची आठवण असणे म्हणजे ब्रह्मरूप असणे. तसेच त्याचा विसर म्हणजे मायाभ्रमात असणे.

भक्तीस मूळ विरक्ती – काही विरक्ती असेल तरच मन नामाकडे वळेल. (Incentives to spiritual life – असे गुरुदेव या वृत्तीबद्दल

म्हणतात.

ज्ञानास मूळ अग्नी – वस्तू दर्शनाची तळमळ असेल तर ते होईल.

हे सिद्धांत आहेत. ते अंतःकरणात दृढमूल झाले व सतत स्मरणात राहिले म्हणजे अखंड नामस्मरण होईल. रूप सतत दृष्टीसमोर राहील.

तुकारामांची भक्ती ही वरील प्रकारची होती. जागृती, स्वप्न व निद्रा या तीनही अवस्थांत विठ्ठलाचे अखंड दर्शन होईल असा प्रेमभाव अंतःकरणात उत्पन्न व्हावा, हा एकच हव्यास धरावा, इतर काही मागू नये. राज्य. संपत्ती, धन कशाचीही इच्छा नसावी. प्रेमाने भरून गेल्याशिवाय सर्वांठायी त्याचे रूप दिसत नाही. म्हणून असे प्रेम देवाजवळ मागावे. ते मिळाले म्हणजे इंद्रिये विषयाकडे न वळता देवाचे कार्य करण्यात आनंदाने मग्न होऊन राहातात. मातेचे आपल्या बालकावर अत्यंत प्रेम असते. त्याच बळावर त्रास अगर कंटाळा न करता, झोप व भूक ह्यांची पर्वा न करता आपल्या बालकाचे संगोपन करीत असते.

**'प्रेम देवाचे ते देणे । देहभाव जाय जेणे।।'**

देहाच्या सुखदुःखाचा विसर पडून देवाच्या भक्तीत रंगून जाता येईल असे प्रेम एक देवच देऊ शकतो. वाचेला देवाच्या नामाचा छंद लागला की, जन्म–मरणाच्या बाधेचे मूळच तुटून जाते. ह्या प्रेमाने देवाचे साक्षात दर्शन होऊन भक्ताचा देह बदलून जातो. त्याचा स्वभाव पालटतो. सर्व ठिकाणी चैतन्य भरलेले दिसते जीव–शीव हा भेद नष्ट होतो. जीव ब्रह्मात मिळतो. तुकाराम म्हणतात –

**हेचि माझे चित्ती । आता राहो भवप्रीति ।।**
**विठ्ठल सुषुप्ति । जागृति स्वप्नीही ।।**
**आणिक नाही मागणे । राज्य चाड संपत्ति धन ।।**
**जिव्हे सुख तेणे । घेता देही नाम तुझे ।।**
**तुझे रुप सर्वांठायी । देखे ऐसे प्रेम देई ।।**
**ठेवावा हा पायी । अनुभव देहाचा ।।**

**जन्ममरणाचा बाध । समुळूनि तुटे बंद ।।**
**लागो हाचि छंद । हरि गोविंद वाचेसी ।।**
**काया पालट दरुषणे । अवघे कोंदाटे चैतन्य ।।**
**जीवशिवा खंडण । होय तरे चिंतिता ।।**
**तुका म्हणे याचि भावे । आम्ही घाले तुझ्या नावे ।।**
**सुखे होत जन्म । भलते याती भलतेसी ।।**

तुकाराम म्हणतात, ''देवाबद्दल वाटणाऱ्या अशा प्रेमयुक्त भावामुळेच त्याच्या नामाच्या स्मरणाने अत्यंत समाधान पावलो; कृतार्थ झालो. आता कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही जातीत आम्हाला जन्म आला तरी त्याची पर्वा नाही. कारण त्या स्थितीतदेखील आमचा प्रेमभाव पालटणार नाही.''

**तुका म्हणे याचि भावे । आम्ही घाले तुझ्या नरुवे ।।**
**सुखे होत जन्मे । भलते याती भलतेसी ।।**

तुकाराम म्हणतात, '' देवाबद्दल वाटणाऱ्या अशा प्रेमयुक्त भावामुळेच त्याच्या नामाच्या स्मरणाने अत्यंत समाधान पावलो, कृतार्थ झालो. आता कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही जातीत आम्हाला जन्म आला तरी त्याची पर्वा नाही. कारण त्या स्थितीत देखील आमचा प्रेमभाव पालटणार नाही.

हे झाले तुकारामांचे साधक म्हणून, माझे काय? पुढील जन्म कोणी पाहिला आहे? उत्तर महाराजांनी दिले आहे.

प्रवृत्ति मार्गाने आपला व्यवसाय करावा लागतोच. तो आपला प्रपंचातील धर्म आहे. पण एवढ्याने भागत नाही. ज्या ठिकाणी, ज्या परिस्थितीत राहण्याचा प्रसंग येतो, तेथे व्यवसायाबरोबरच अहोरात्र शक्य तितके भक्तिपूर्वक नामस्मरण झाले पाहिजे.

''यास उपाय एक. प्रवृत्ती मार्गाने देवाची भक्ती करण्याबद्दल आहेच. तद्वत.... व्यवसायात प्रवृत्ती मार्गाचे धर्माप्रमाणे वागावा लागतो ते अखेर

नव्हे. करीता निवृत्ती मार्गाने हरी माया होऊन ज्या ठिकाणी राहण्याचा प्रसंग आला आहे, त्या ठिकाणी... ज्या ठिकाणी काल काढण्याचा प्रसंग आला आहे, त्या ठिकाणी अहोरात्र पुरस्मरण होऊन नेम नेम नेम करून स्मरणाची संख्या होऊन पुण्याचा ठेवा करून वेळ काढावा.''

महाराजांनी 'अहोरात्र' हा शब्द सांगितला आहे. दिवसा नेम व इतर वेळी नामाचे अनुसंधान हे आपण करतोच, पण रात्री स्वप्न व सुषुप्तीमध्ये नामस्मरण कसे करावयाचे जे पाहू या.

**महाराजांच्या दोन आठवण :-**

(१) महाराजांचा मुंबईचा एक शिष्य होता. तो गिरणीत काम करीत असे. रात्रपाळी करावी लागे. श्रावणात इंचगिरीस येत असे. एकदा महाराजांना नमस्कार करून निरोप घेतेवेळी महाराजांनी विचारले, कसे चालले आहे? त्यांनी खरे उत्तर दिले. नेमास वेळ मिळत नाही. का म्हणून विचारल्यावर आपल्या नोकरीविषयी त्यांनी सांगितले. महाराज म्हणाले, ''घरात तुझी अशी किती जागा आहे?'' तो म्हणाला, ''एका खोलीमध्ये मी, बायको व मुलगा राहतो. माझी जागा म्हणजे माझी गादी तेवढी.'' महाराज म्हणाले, ''झोपण्यापूर्वी गादीवर बसून जमेल तेवढे नाम घे व उठल्यावर परत बसून नाम घे. मग कामाला लाग.'' त्याने असे केले. याची रात्रीपाळीची ड्युटी संपली. वरची जागा मिळून मोठ्ठे घर मिळाले.

(२) एकदा कन्नूर मुक्कामी असता रात्री अंथरूणावर पडून पाच मिनिटे झाल्यानंतर आपल्या शेजारी झोपलेल्या कन्नूरच्या हणमंतरावांना महाराजांनी विचारले, ''आता तू काय करीत आहेस?'' ''उगीच पडून राहिलो आहे'' असे हणमंतरावांनी उत्तर दिले. त्यावर महाराज म्हणाले, ''उगीच पडून राहणे ठीक नव्हे. नामस्मरण करीत पडावे. (व स्वतः पडल्या ठिकाणीच दीर्घ श्वासोच्छवासांबरोबर नामस्मरण कसे करावयाचे ते दाखवून दिले.) तसे केल्याने झोप लागेपर्यंत नामस्मरण चालू राहते

व जाग आल्याबरोबर तेच आठवते.''

कूटस्थामध्ये, अंतःकरणात नाम रुजविण्याचा हा अत्यंत सोपा उपाय महाराजांनी सांगितला आहे. मन विकाररहीत शांत असण्याची हीच वेळ असते. नामस्मरणाला मनाकडून फारसा विरोध होत नाही.

Studies in Indian Philosophy ह्या टिप्पणरूपी ग्रंथामध्ये योगसूत्रावर भाष्य करताना गुरुदेव Hypnagogic and Hypnopompic असे दोन शब्द वापरतात.

Hypnagogic जागृतीचा शेवटचा क्षण व झोपेच्या पहिल्या क्षणातील अवस्था.

Hypnopompic म्हणजे झोपेचा शेवटचा क्षण व जागृतीच्या पहिल्या क्षणातील अवस्था.

गुरुदेवांच्या मते हे दोन क्षण साधकाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. ह्या दोन्ही क्षणात जर नाम असेल तर नामस्मरणात खंड पडत नाही, हे निश्चित. William James नी पण हे मानसशास्त्रीय दृष्टीने स्पष्ट केले आहे.

**२) Genesis of गुण गाईन आवडी – उत्पत्ती – गुण आवडीने गाण्याची**

नामदेवांनी तुकारामांच्या स्वप्नामध्ये येऊन त्याला देवाचे गुण गाण्याची आज्ञा केली.

**नामदेवे केले स्वप्नामाजी जागे ।**
**सवे पांडुरंगे येऊनिया ।।**
**सांगितले काम करावे कवित्व ।**
**वाऊगे निमित्य बोलो नको ।।**
**माप टाकी साळ धरिली विठ्ठले ।**
**थापटोनि केले सावधान ।।**
**प्रमाणाची संख्यासांगे शतकोटी ।**

**उरले ते शेवटी लावी तुका ।।**

गुरुदेव म्हणतात "Tukarama's contribution to the psychology of Mysticism is very clever and profound." परमार्थाच्या मानसशास्त्रामध्ये तुकारामानी घातलेली भर विपुल तर आहेच, पण त्यांच्या बुद्धिमत्तेची झलकपण दर्शविते. देवाचे ध्यान करताना देहाचा व मनाचा पालट होतो. जेव्हा जीवाचे शिवात रूपांतर होते व मन तेजोमय होते तेव्हा

**दिसे हरिरुप अवघी सृष्टि ।**

याप्रमाणे तुकाराम सर्व संतांना केवळ देवाचीच स्तुती करा म्हणून सांगत आहेत.

**तुजविण वाणी आणिकांची थोरी ।**
**तरी माझी हरी जिव्हा झडो ।।**
**तुजविण चित्त आवडे आणीक ।**
**तरी माझी हरी जिव्हा झडो ।।**
**तुजविण चित्त आवडे आणीक ।**
**तरी हा मस्तक भंगो माझा ।।**
**नेत्री आणिकांसी पाहीन आवडी ।**
**जातु तेचि घडी चांडाळ हे ।।**
**कथामृतपान न करिती श्रवण । काय प्रयोजन मग यांचे ।**
**तुका म्हणे काय वाचून कारण । तुज एक क्षण विसंबता ।।**

गुरुदेव पुढे म्हणतात – My very life would have no raison d'etre (प्रयोजन) says Tuka if I were to be oblivious of Thy presence even for a moment.

तुकारामांच्या भक्तीचे अनेक पैलू आहेत. त्यांच्याकडे एक वेगळ्या प्रकारे पाहू या. तुलसीदासांची नवविधा भक्ती व अध्यात्म रामायणातील नवविधा भक्ती यांचा मिलाप करून गुरुदेवांनी भक्तीस आवश्यक

असणाऱ्या सद्गुणांचे एक अपूर्व रसायन केले आहे. त्याचे त्यांनी तीन गट पाडले आहेत.

**१) पहिला गट** : ईश्वर दर्शनास आवश्यक अशा अनेक सद्गुणांचा, जसे अमान, विरती संतोष वगैरे हे सद्गुण ईश्वरदर्शनास पोषक असतात.

**२) दुसरा गट** : यामध्ये त्रिविध भक्ती येते. (१) गुरुंची सेवा, (२) संतांची सेवा, (३) सद्गुरु सर्वात श्रेष्ठ मानणे. ईश्वर दर्शनास हे सद्गुण आवश्यक आहेत.

**३) तिसरा गट** : यामध्ये पाच प्रकारची भक्ती येते व ईश्वराचा मागोवा घेण्यासाठी परिणामी (effective) ठरते. यामध्ये

| | |
|---|---|
| (१) मम गुणगान | देवाच्या गुणांचे गायन, |
| (२) रति मम कथा प्रसंगा | पराक्रमाचे वर्णन, त्याचे वक्तव्य व संदेश सांगणे इ. |
| ३) मंत्र जाप – | नाम:स्मरण. |
| ४) मोहिमय जग देखा | देवास सर्वत्र पाहाणे. |
| ५) मम भरोसा – | देव कल्याण करणारा व समर्थ आहे असा पूर्ण विश्वास. |

वरील पंचविध भक्तिरसांचे काही अभंग पाहू या –

**१) देवांच्या गुणांचे गायन**

**पक्षीयाचे घरी नाही सामुगरी ।**
**त्याची चिंता करी नारायण ।।**
**अजगर जनावर वारूळात राहे ।**
**त्याजकडे पाहे पांडुरंग ।।**
**चातक पक्षी नेघे भूमिजल ।**
**त्यासाठी घननीळ नित्य वर्षे ।।**
**तुका म्हणे आम्ही पिप्पलिकांची जात ।**
**पुरवी मनोरथ पांडुरंगा ।।**

२) त्यांचा संदेश :

निमित्त मापासी बैसविलो आहे ।
मी तो काही नव्हे स्वामी सत्ता ।।
तुका म्हणे पाईकचि खरा ।
वागवितो मुद्रा नामाची हे ।।
उजळवया आलो वाटा । खरा खोटा निवाड । (पा. ६९)
एकंदर शिक्का । पाठविला येही लोका ।
आलो म्हणे तुका । मी नामाचा धारक ।। (पा. ७२)

३) नाम:स्मरण :

कुमुदिनी काय जाणे तो परिमल ।
भ्रमर सकळ भोगितसे ।।
तैसे तुज ठावे नाही तुझे नाम ।
आम्हीच ते प्रेमसुख जाणो ।। (पा. ९६)

किंवा

पथ्य नाम विठोबाचे । आणिक वाचे न सेवी ।।
भव रोगा ऐसे जाय । आणिक काय क्षुल्लके ।।

४) मोहिमय जग देखा

अ) जेथे देखे तेथे तुझीच पाऊले । विश्व अवघे कोंदाटले ।।
वाचा बोले ते तुझेचि गुणवाद । मंत्र जप कथा स्तुति ।।
झाल्या तीर्थरूप बाती नदी कूप । अवघे गंगाजल झाले ।।
महाल मंदिरे माझ्या तनघरे । झोपड्या अवघी देव देवाइले ।।
ऐसे कानी त्या हरिनाम ध्वनी । नाना शब्द होते झाले ।।
तुका म्हणे आम्ही या विठोबाचे दास । सदा प्रेमसुखे घालोरे ।।
(पा. ६०)

ब) जन विजन झाले आम्हा । विठ्ठल नामाप्रमाणे ।।
पाहे तिकडे मायबाप । विठ्ठल आहे रखुमाई ।। (पा. १५२)

५) मम भरोसा :

**जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ।**
**चालविसी हाती धरूनिया ।।**
**चालो वाटे आम्ही तुझाचि आधार ।**
**चालविसी भार सवे माझा ।**
**तुका म्हणे आता खेळतो कौतुके ।**
**जाले तुझे सुख अंतर्बाही ।।**

महत्त्वाची एक गोष्ट हे सर्व गुणगान करताना हे बोल देवाचेच आहेत, भावारूढ तुका ही विठोबाचीच मुद्रा आहे. माझी वाणी ही देवाचीच प्रासादिक वाणी आहे. स्वत:च्या बळाने मी बोलत नसून देवाच्याच बळाने बोलत आहे. हे विश्वंभराचे कवित्व होय व माझी वाणी नारायणाने मिश्रित असते हा पण भरोसा आहे.

**हेचि माझी सर्व जोडी (Consummation) ध्येयप्राप्ती**

जोडी म्हणजे संपादणी. (कमाई, लाभ ई.) संपादणी संपादन केल्याशिवाय होत नाही. म्हणजे संपादनासाठी क्रिया आली. निरंतर, अहर्निश, दिवसामागून दिवस अशी क्रिया झाली. सवय झाली. त्याचे शील झाले.

**आणिक दुसरे मज नाही आता ।**
**नेमिले या चित्ता पासुनीया ।।**
**पांडुरंग ध्यानी पांडुरंग मनी ।**
**जागृती स्वप्नी पांडुरंग ।।**
**पहिले वळण इंद्रिया सकळा ।**
**भाव तो निराळा नाही दुजा ।**

अथवा

**सर्वविशी आम्ही हेचि जोडी केली ।**
**स्वामिची साधली चरण सेवा ।।**

पाहिलेचि नाही मागे परतोनि ।
जिंकिला तो क्षणोक्षणो काळ ।।
नाही पडो दिला विचाराचा गोळा ।
नाही पोटी हेवा येऊ दिला ।।
तुका म्हणे लाभ घेतला पालवी । (पदरी)
आता नाह गोळी कासायाची ।।

असे घडण्याचे कारण तुकारामांच्या भाषेत –

धन्य मी मानीन आपुले संचित ।
राहिलीसे प्रीत तुझे नामी ।।
धन्य जालो आता यासी संदेह नाही ।
न पडो या वाही (मार्ग) काळा हाती ।।
ब्रह्मरस करू भोजन पंगती ।
संतांच्या संगती सर्वकाळ ।।
तुका म्हणे पोट घालेचि कि न धाये ।। (पा. ५४)
खादलेचि खाये आवडीने ।।

ह्या जोडीचे दुसरे रूप पाहा –

**सद्‌गदित कंठ दाटो । येणे फुटो हृदय ।।**
**चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो विठ्ठला ।।**
**नेत्री जल वाहो सदा । आनंदाचे रोमांच ।।**
**तुका म्हणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ।। (पा. १६४)**

अष्टसात्विक भावांची जोडी तुकाराम मागताहेत.

**४) संत संग देई सदा :**

संत संग हा तुकारामांच्या आवडीचा विषय आहे. ज्यास हरी अंतरायापासून आवडतो असा कोण 'माझिया जातीचा मज' भेटेल काय अशी आर्त मनी धरून ते कासावीस होतात. जगाच्या कल्याणासाठी परोपकार बुद्धीने देह कष्टविणाऱ्या संतांचे एकेक उपकार आठवून त्यांची

वाणी अपुरी पडते. म्हणून त्यांच्या चरणी मस्तक ठेवण्यास त्यांना धन्यता वाटते. परसुखाने जे सुखी होतात त्या संतांची वाणी अमृताचा वर्षाव करते. त्यांच्यावर आपल्या जीवप्राणांची कुरवंडी करण्यास ते मागेपुढे पाहात नाहीत. संत बुडणाऱ्यास आधार देतात. जगाचे ओझे साहतात. स्वत: सेवन करणारा जो ब्रह्मरस इतरांस वाटतात. त्यांच्या गावी प्रेमाचा सुकाळ असतो. ही 'उपदेशाची पेठ' सुखाच्या देवघेवीने सदा जागती असते. संत आपला देश पावन करतात. कुळे पवित्र करतात. त्यांची वाणी अखंड नामस्मरणाने पुण्यवंत झालेली असते व देह पवित्र झालेला असतो. ज्यांच्या कंठी वैकुंठनायक आहे असे हे संत व देव एकच होऊन जातात. अंगी गुरत्व न धरता मेघवृष्टीने उपदेश करून देवाचा निरोप सर्व जगास सांगणारे हे संत म्हणजे प्रत्यक्ष अमृतीचे झरे असून, त्यांच्या संगतीने देवाच्या पंगतीचा लाभ होतो. तरी संतसंग धरा असा तुकारामांचा उपदेश आहे. संतसंग महिमाच्या वरील वर्णनावरून तुकारामांना कोणाचा संतसंग मिळाला त्याचा थोडा विचार करावा असे वाटते.

(१) घरात पंढरीची वारी होती. ''आमच्या घरी पंढरीची वारी आहे. इतर तीर्थे व व्रते मी ओळखत नाही'' असे तुकाराम ठामपणे सांगतात.

**पंढरीची वारी आहे माझे घरी ।**

**आणिक न करी तीर्थव्रत ।। (पा. ४)**

कुळाचार वारीचा असल्याने विठ्ठलभक्तांचा सहवास हे आपोआप चालत आलेले आंदण होते.

कदाचित वारकरी मंडळींना ते घरी बोलावीत असावेत. पण ते त्यांच्या पत्नीला – आवलीला पसंत नव्हते.

तुकाराम म्हणतात,

**कोण घरा येते आमुच्या कशाला ।**

**कांतेलेसे श्वान लागे पाठी ।।**

**किंवा**

न करणे धंदा ।

उठिते ते कुटिते टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ ।

(२) सद्‌गुरुंनी नाम स्वप्नात दिले असल्यामुळे सद्‌गुरुंचा संग किंवा गुरुबंधुंचा संग ह्या दोन गोष्टींचा प्रश्नच उरत नाही.

(३) देहू गावामध्ये त्यांना त्रास देणारी, कुचेष्टा करणारी, देहदुःख देणारी अशी सर्व टोळभैरव मंडळी होती.

तर तुकारामांच्या मनात संतसंगाची ओढ कशी निर्माण झाली ते पाहू.

**तीव्र गरज कशी झाली ?**

त्यांचे आई-वडील त्यांच्या वयाच्या सतराव्या वर्षी निवर्तले. पाठोपाठ वडीलबंधू सावजी विरक्त होऊन तीर्थयात्रेस गेले. २१ व्या वर्षी विपरित काळ आला. त्यांचे दिवाळे वाजले. भीषण दुष्काळ पडला. (हा शिवरायांच्या जन्माच्या वेळेचा असावा. १६२९ ते १६३४, तुकारामांचा जन्मकाळ १५९८ ते १६१३ च्या मध्ये धरला जातो.) पहिली पत्नी रखमाबाई आणि लाडका लेक संतू ही दोघे अन्न अन्न करीत देवाघरी गेली. दुसरी पत्नी आवली दोन वेळा हाता-तोंडाची मिळवणी करता करता जेरीस आली. तुकारामांकडून काही उद्योगधंदा करवून घेण्याच्या तिच्या प्रयत्नास तुकारामांच्या सरळ स्वभावामुळे यश तर आले नाहीच, पण नुकसान मात्र होत राहिले. त्यामुळे रोज भांडणाचा प्रसंग. यामुळे तिला कजाग पत्नी मानण्यात येते. स्वतः तुकारामांनी कर्कशा म्हणून उल्लेख केला आहे. गुरुदेव तिला Xanthippe म्हणतात. (सॉक्रेटिस पत्नी)

ह्या सर्व गोष्टींमुळे तुकारामांची दुर्दशा, लोकांत फजिती झाली. त्यांना प्रपंचाचा उबग आला. बाहेर पडण्यासाठी चित्तवृत्ती देवापाशी वाहून ते देहूजवळ भावनाथ, भंडारा किंवा गोरोडा यापैकी एखाद्या डोंगरात जाऊन विठोबाचे ध्यान करावे, ह्या बरोबर ज्ञानेश्वरी आणि एकनाथी भागवत या

दोन ग्रंथांचे चिंतन, मनन त्यांनी आरंभिले.

संतांची उत्तरे विश्वासे व आदरे पाठ करू लागले. हा सत्संग घडू लागला.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व कबीरदास या चौघांची घरी सोय रे असे तुकाराम आपल्या टिपरीच्या अभंगात सांगतात.

आपल्या दु:खात त्यांना संत हा एकमेव आधार वाटला व त्याप्रमाणे त्यांचा सहवास ते शोधू लागले. हे संत निश्चितपणे कोण व्यक्ती होत्या ह्याचा उलगडा होत नाही. देहूमध्ये त्यांना छळणारी रामेश्वर भट्ट व मंबाजी इत्यादी मंडळींचा सुकाळ होता.

संतवचने हाच त्यांचा खरा सत्संग असावा. त्यायोगे साधन मार्ग थोडा फार दिसू लागला. सद्‌गुरुंची आवश्यकता भासू लागली.

**कळो आले बरे उघडले डोळे । कर्णधार मिळे तरी बरे ।**

व स्वप्नात सद्‌गुरु दर्शन घडून नाम मिळाल्यानंतर...

**मानियेला स्वप्नी गुरुचा उपदेश । धरिला विश्वास दृढनामी ।।**

त्याप्रमाणे अहर्निशी परमार्थ, फुटो हे मस्तक तुटो हे शरीर, परी नामाचा गजर सोडू नये। म्हणा रात्रंदिवस रामनाम जिंकिला तो क्षणोक्षणी काळ । तुका म्हणे आहार झाला । हा विठ्ठल आम्हासी । व साक्षात्कारानंतर...

**तुका म्हणे उभा आहे । कान्हो पाहे मजकडे ।। (पान ५१)**

**तुका म्हणजे दृष्टी धाये । परतोनि माघारी ते नये ।। (पा. ५३)**

**न कळे दिवसा राती । अखंड जागलीसे ज्योती ।**

**आनंद लहरीची गती । वर्णू किती तया सुखा । (पा. ५४)**

**धावे मागे मागे । जाय तिकडे चालत लागे ।**

**तुका म्हणे नेले । माझे सर्वस्व विठ्ठले ।। (पा. ५५)**

**जो मी तुज आहे पांडुरंगा ।। (पा. ५५)**

थोडक्यात बोधसुधेप्रमाणे तुकारामाचा सत्संग हा Phychological

मानसिक सत्संग – सद्गुरुंनी दिलेल्या नामाचे स्मरणही सत्संगच. ते नाम निरंतर श्वासात आणणे हाही सत्संगच व Mystical पारमार्थिक सत्संग सद्वस्तूचे अनुसंधान – सतत प्रचिती हाही सत्संगच होय– अशा प्रकारचा होता. विठोबाचे नाम व विठ्ठल.

Physiological सत्संग म्हणजे सज्जनांचा संग, आपल्यापेक्षा श्रेष्ठ सद्गुणी लोकांचा संग हा त्यांना किती लाभेल हे स्पष्ट होत नाही.

**५) हेचि दान देगा देवा**

तुकारामांनी कोणते कोणते दान देवापाशी मागितले आहे? १) तुझा विसर न व्हावा. २) संत संग देई सदा. ३) गर्भवासी सुखे घालावे. तुकारामांना हे निश्चितपणे माहीत होते की, साक्षात्कार झाल्यानंतर जन्म-मरणाचा फेरा संपतो. हे अनेक अभंगांत म्हणतात –

**तुमचे झालिया दरुषण । जन्ममरण नाही आता ।। (पा. ४९)**

**तुका म्हणे नाही जन्म मरणाचा धाक ।। (पा. ५२)**

**आम्हा भय चिंता नाही धाक । जन्ममरण काही हाय ।। (पा. ३४)**

**विष्णुदास आम्ही न भयो कळिकाळा । (पा. ६१)**

**स्वामिचिया सत्ता ठेंगणे सकळ ।**
**आला कळिवला हाताखाली ।। (पा. ६२)**

मग तुकाराम गर्भवास का मागतात? शरीर धारण करून, नामस्मरण करून साक्षात्काराचा आनंद उपभोगणे एवढेच का त्यात स्वहित आहे? हे दान मागताना तुकारामांना निश्चितपणे त्याची पण जाण होती.

ही जाण म्हणजे तुकारामांचे असणे आहे. त्यांचे अनेक सार आहेत. ते म्हणजे...

१) माणूस असणे.

२) भक्त असणे.

३) तळमळत असणे.

४) ज्ञानी असणे.

५) संत असणे.

६) ब्रह्मानंदी असणे.

७) अणुरेणु ते आकाशाएवढा असणे.

८) केवळ असणे.

ह्या प्रत्येक स्तरावर त्यांची तरल जाणीव पसरलेली आहे. पश्चाताप न पावलेल्या पापी माणसांबद्दल गुरुदेवांना ओलाव्याचा ठसा आहे.

**तुकारामांची जाण**

**१) माणूस असणे :**

**लावूनि कोलित । माझाकरितील घात ।।१।।**
**ऐसे बहुतांचे संधी । सांपडले खोळे मधी ।।२।।**
**पाहातील उणे । तेथे देती अनुमोदने ।।३।।**
**तुका म्हणे रिघ ।पुढे नाही झाले धींद ।।४।।**

**अर्थ :-** हे दुष्ट लोक माझ्या अंगाला कोलित घालून माझा घात करतील. अशा पुष्कळ दुष्टांच्या तावडीत व घातपाताच्या जाळ्यात मी सापडलो आहे. माझ्यात उणे कोठे आहे ते नेमके पाहतील आणि माझा घात करणाऱ्यास अनुमोदन देतील. तुकाराम महाराज म्हणतात, या पुढे माझे आयुष्य सुखाने जाईल, असा अवसर राहिला नाही. कारण, लोकांकडून माझे फारच धिंडवडे झाले आहेत.

**२) भक्त असणे**

**हेचि सुख पुढती मागतो आगळे । आनंदाची फळे सेवादान ।**
**जन्मजन्मांतरी तुझाचि अंकिला । करूनि विठ्ठला दास ठेवि ।।**
**दुजा भाव आड येऊ नेदी चित्ता । करावा नारा अनंता त्याचा ।।**
**अभय देऊनि करावे सादर । क्षण तो विसर पडो नेदी ।।**
**तुका म्हणे आम्ही जे जे इच्छा करू । ते कल्पतरू पुरविसि ।।**

**अर्थ :-** देवा मी तुला सर्वात श्रेष्ठ असलेली दास्य भक्ती (सेवासुख) पुन: पुन्हा मागत आहे. कारण त्याला (सेवेला आनंदाची फळे येतात.

या करीता सेवेचेच दान मला दे. विठ्ठला, प्रत्येक जन्मात मला तुझा आज्ञाधारक सेवक करून ठेव. अनंता माझ्या चित्तात तुझ्या सेवेला आड येणारा दुसरा विषय येऊ देऊ नकोस. त्याचा नाश कर. तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही जे जे मागतो ते ते तू कल्पतरूप्रमाणे देतोस.

**३) तळमळत असणे :-**

**कळले माझा तुज नव्हे रे आठव । काय आज जीव ठेवू आता ।**
**तू काय करिसी माझिया संचिता । धिण हे अनंता झाले जीणे ।**
**पतीत पावन राहिलो ये आशा । आइकोनि ठसा कीर्ति तुझी ।**
**आता कोण करील माझा अंगीकार । कळले निष्ठुर झालासी ।**
**तुका म्हणे माझी मांडिली निरास । करितो जीवा नास तुजसाठी ।**

**अर्थ :-** तुला माझी आठवण होत नाही हे कळले. आता जीव ठेवून काय उपयोग? माझ्या संचितास हे अनंत, तू काय करणार? माझे जिणे तिरस्कारणीय झाले. या पतिताला तू पावन करशील या आशेने राहिलो. तू निष्ठुर झाल्यावर आता माझा कोण अंगीकार करील? तुकाराम महाराज म्हणतात, तेव्हा माझी पूर्ण निराशा झाल्यामुळे मी आता तुझ्यासाठी माझ्या जीवाचा नाश करितो.

**४) ज्ञानी असणे**

**बीज जाळुनी केली लाही । आम्हा जन्ममरण नाही ।।**
**आकारासी कैचा ठाव । देह प्रत्यक्ष झाला देव ।।**
**साखरेचा नोहे उस । आम्हा कैचा गर्भवास ।**
**तुका म्हणे अवघा जोग । सर्व घरी पांडुरंग ।।**

**अर्थ :-** बीज भाजून लाही केल्यावर त्यातून जसा अंकुर फुटत नाही, त्याप्रमाणे ज्ञानाग्नीने कर्मे जाळून टाकल्यामुळे आता जन्म मरणे नाहीत. अविद्या नष्ट झाल्यामुळे, अविद्या असलेल्या जगदाकाराला (Phenonment world) कोठे स्थान राहिले आहे? कल्पित पदार्थ अधिष्ठानाहून भिन्न नसतो, त्यामुळे देहसुद्धा प्रत्यक्ष देव झाला आहे.

साखरेचा परत उस होत नाही. आम्ही मुक्त झालो आहोत. मग गर्भवास कसा प्राप्त होईल. तुकाराम महाराज म्हणतात, ''आम्हाला आमच्या अनुभवाप्रमाणे सर्वत्र पांडुरंगाची प्रचिती येत आहे.''

**५) संत असणे :**

**नाही आम्ही विष्णुदास । करीत आस कोणाची ।**
**का हे नष्ट करीती निंदा । नेणो सदा आमुची ।।**
**असो भलते ठायी मन । समाधाने आपुल्या ।।**
**तुका म्हणे करू देवा । तुझी सेवा धंदा तो ।।**

**अर्थ :-** आम्ही विष्णुदास होण्याची अपेक्षा करीत नाही किंवा कोणाला काही मागत नाही. तरीपण हे दुष्ट लोक आमची निंदा का करितात? ते कळत नाही. आम्ही कोठेही आमच्या इच्छेप्रमाणे, समाधानाने राहतो. तुकाराम महाराज म्हणतात देवा, आता तुझ्या सेवेचा धंदा करू.

''या सेवेचा धंदा'' म्हणजे संत देवाची जी सेवा करतात त्याचा सूक्ष्म विचार थोड्या वेळात पाहणार आहोत.

**६) ब्रह्मानंदी असणे**

**रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न । चिन्मय अंजन सुदले डोळा ।**
**तेणे अंजनगुणे दिव्यदृष्टी झाली । कल्पना निमाली द्वैता द्वैत ।**
**देशकाल वस्तुभेद मावळला । आत्मा निर्वाळला विश्वाकार ।।**
**न झाला प्रपंच आहे परब्रह्म । अहं सोहं ब्रह्म आकळले ।**
**तत्त्वमासि विद्या ब्रह्मानंदी सांग । तेचि झाला अंगे तुका ।**

**अर्थ :** रक्त श्वेत कृष्ण पीत या रूपात मला ब्रह्म भासत नाही. कारण मला निरुप ब्रह्माचा आत्मत्वाने साक्षात्कार झाला आहे. माझ्या गुरुने बुद्धीच्या डोळ्यात घातलेल्या ज्ञानांजनामुळे हे घडले आहे. त्यामुळे दिव्यदृष्टी Intuitive vision प्राप्त होऊन द्वैत व अविद्या नष्ट झाली. त्रिपुरी नष्ट झाली व रक्त, श्वेत, भेद भिन्न प्रकार राहिले नाही. Space

time, subject, object सर्व relations लोपल्या आहेत. कारण आत्माच विश्वाच्या रुपाने प्रकटला आहे. हा दुष्ट प्रपंच झालाच नाही. ज्ञान झाल्यावर तो परब्रह्मच झाला. मी ब्रह्म आहे या प्रचिती बरोबर जे प्रपंचाचे अधिष्ठान आहे ते ब्रह्म मीच आहे. असा मला अनुभव आला. तुकाराम महाराज म्हणतात मला तत्त्वमासि या महावाक्याच्या द्वारा ब्रह्म साक्षात्कार झाला. मी ब्रह्मानंदात पूर्ण निमग्न झालो नाही. मी ब्रह्मानंदच झालो.

**७) अणु रेणु ते आकाशाऐवढा असणे**

**हा आपणास माहीत आहेच.**

**८) केवळ असणे**

**निरंजनी आम्ही बांधियेले घर । निराकारी निरंतर राहिलोसे ।।**
**निराभासी पूर्ण झालो समरस । अखंड ऐक्यास पावलो आम्ही ।।**
**तुका म्हणे आता नाही अहंकार । झालो तदाकार नित्य शुद्ध ।।**

ब्रह्माच्या अधिष्ठानावर आम्ही घर बांधले आहे व त्यात अखंड निराकार होऊन राहिलो आहोत. शुद्ध ब्रह्मामध्ये मिळून गेल्यामुळे पूर्ण ऐक्य लाभले आहे. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या स्वरूपाशी अहंकारादी उपाधीचा वास्तव संबंध राहिला नाही. त्यामुळे आम्ही नित्य शुद्ध झालो आहोत.

मगाशी पाहिल्याप्रमाणे संत असणे ही जाण अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामध्ये अंबुराव महाराज म्हणत की, आम्ही इथले नव्हे आम्ही तिथले तो म्हणाला जा. आत्मज्ञान जीर्ण झाले आहे. आम्ही आलो हा जगदोद्धाराचा अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे.

याची अभिव्यक्ती तुकाराम महाराजांच्या अनेक अभंगातून होते. आपण देवाचे जुने संवगडी आहोत असे ते म्हणतात.

**आम्ही हरीचे संवगडे । जनु ठायीचे वेडे बागडे ।**
**... भिन्न भेद नाही । देवा आम्ही एक देही ।**

**निद्रा करीत होतो पायी । सवेचि लंका घेतली तई ।**
**वानर, गोपाळ गाई । सवे चारित फिरतसो ।**

नंतर भूतलावर येण्याचा खुलासा करताना ते म्हणतात,

**अ) एक भावाचा एकांत । पीक पीकला अनंत ।।**
**तुका म्हणे दानी । करी बैसोनि वाटणी ।।**

**ब) धर्माचे पाळण । करणे पाषाण खंडण ।**
**हेचि आम्हा करणे काम । बीज वाढवावे नाम ।**

**क) मागे बहुत जन्मी । हेचि करित आलो आम्ही ।**
**भवताप श्रमी । दु:खे पीडिले निवळू त्या ।**

तर हे तुकारामांनी मागितलेले दान केवळ दान नाही. ते संसार सागरात बुडणाऱ्या जनांसाठी कळवळा येऊन, गर्भवासाच्या यातना भोगण्याची तयारी ठेवून मागितलेले पसायदान आहे, असे मला वाटते.

● ● ●

# सुख सहिता दुःखरहिता

(उत्तरार्ध)

## संत रामदास स्वामी

ब्रह्मादिकांना अंत न लागलेले, भक्तांना सुलभ साध्य असलेल्या सद्गुरुंचा जयजयकार या पदात केला आहे.

**सुखसहिता, दुःखरहिता निर्मळ एकांता ।**
**कलिमल दहना गहना स्वामी समर्था ।।**
**नकळे ब्रह्मादिका अंत अनंता ।**
**तो तू आम्हा सुलभ जय कृपावंता ।।१।।**
**जयदेव जयदेव जय करुणाकरा ।।**
**आरति ओवाळु सद्गुरु माहेरा ।। धृ।।**
**मायेविण माहेर विश्रांती ठाव ।**
**शब्दी अर्थ लाभ बोलणे वाव ।**
**सद्गुरु प्रसाद सुलभ उपाव ।**
**रामीरामदासा फळला सद्भाव ।।२।।**

**सुखसहिता**

सद्गुरु स्वरूप होऊन राहतात. स्वरूप म्हणजे ब्रह्मस्वरूप. म्हणजेच आनंद स्वरूप होय. त्यांच्याजवळ सुख असते, नव्हे ते सुखाचा सागरच असतात. गुरुंनी शिष्यांना दिलेल्या प्रत्येक नामात एकाच प्रकारचा ब्रह्मानंद भरलेला असतो. (तो साधकांनी आपल्या प्रयत्नाने व गुरुकृपेने मिळवायचा असतो.) गुरुदेवांनी आपला ब्रह्मानंद हजारो शिष्यांना दिला, तरी त्यांचा आनंदाचा सागर भरलेलाच होता.

**दुःखरहिता**

साधु स्वरूप निर्विकार असतात. त्यांची वासना शुद्ध स्वरूपामध्ये – आत्मस्वरूपात समरस होऊन नांदत असते. जिकडे तिकडे माझा मीच पसरलेला आहे, असा साक्षात अनुभव त्यास असतो. त्यामुळे कोणाचा स्वार्थ करावा हा प्रश्नच उरत नाही. म्हणून तो शोकरहित – दुःख रहित असतो.

**कलिमल दहना गहना**

शिष्याला लागलेला कळीचा, मी देह ह्या दृढ भावनेचा मळ, घाण आपल्या नामाने स्वच्छ करतात.

येथे कबिराचा दोहा व त्यावरील गुरुदेवांचे विचार पाहू या.

**गुरु कुम्हार सिख कुंभ है, गढ गढ काढै खोट ।**
**अन्तर हाथ सहार दै, बाहर बाहै चोट ।।**

कुंभार मातीच्या भांड्याच्या बाबतीत जें कार्य करतो, तेच सद्‌गुरु शिष्यासाठी करतात. मातीच्या भांड्यास घडवितांना आलेले पोचे, खाचखळगे इत्यादी कुंभार प्रथम काढून टाकतो व त्यांत असलेला वाकडे–तिकडेपणा काढून ते सरळ व साफ करतो. त्या भांड्याची संभवनीय पोकळी तो वाढवितो व त्यास आपल्यास हवा असलेला आकार व प्रमाण देतो. याचप्रमाणे सद्‌गुरु शिष्याच्या मनातील सर्व दोष व उणेपणा काढून टाकतात; त्याची ग्राहक शक्ती वाढवितात; व तो सद्‌गुरुंच्या इच्छेप्रमाणे वागेल व कार्य करील अशी योग्यता व सामर्थ्य त्याला देतात. कुंभार बाहेरून ओल्या मातीच्या भांड्यास थापटतो; परंतु आतून सतत व अचूक असा आपल्या हाताचा आधार देतो. त्याचप्रमाणे शिष्यावर अनेक आपत्ति व संकटे कोसळली, तरी सद्‌गुरु त्यास आतून सतत धैर्य देऊन त्याचे संरक्षण करितो; व आलेल्या आपत्तींस धैर्याने तोंड देण्यास सामर्थ्य देतो. प्रत्येक आपत्तींत व संकटांत आपल्यास

ईश्वराचा आधार असल्याचे त्यास स्पष्ट दिसते. त्याच्या आपत्ति व संकटरूपी ढगांच्या कडांमधून सद्‌गुरुंचा सूर्यप्रकाश तळपत राहतो. या आपत्तीमुळे कदाचित थोडा वेळ त्याचा आध्यात्मिक प्रकाश मंदावेल, हे खरे आहे.

कुंभकार व कुंभ या रूपकात कुंभार सतत बाहेरून थाप्याने मातीचें भांडे थोपटत असला, तरी आतून त्यास आपल्या हाताचा आधार देत त्याच्यावरील सर्व खाचखळगे, ओबडधोबडपणा व वाकडेपणा काढून त्यास साफ बनवितो.

**स्वामी समर्था**

असे सद्‌गुरु स्वामी समर्थ आहेत. देवाच्या सर्व शक्ती निर्मितीची पण, त्यांच्यात नांदतात, असे सद्‌गुरुच समर्थ म्हणवतात. आपल्या शिष्यांच्या बाबतीत हे कार्य करुणेने करतात. अशा करुणाकर सद्‌गुरुंचा जय जय कार त्यांची आरती करून करू या.

**निर्मळ**

सद्‌गुरुंच्या चित्ताचे वर्णन तुकाराम करतात ते असे,

**''तिळभरी नाही चित्तासी तो मळ । तुका म्हणे जल गंगेचे ते ।।**

**जैसी गंगा वाहे तैसे त्याचे मन ।...''**

**स्वरूपी न सहे मळ । म्हणोनी साधु तो निर्मळ ।**

**साधु स्वरूपची केवळ । म्हणोनिया ।।'' दा. बो. ८.९.५३**

**एकांता**

साधु स्वरूप निर्विकार, साधु वस्तु अनायसे, साधु स्वरूप स्वयंभ असल्यामुळे तो आपण येकल ठाईच्या, आपला आपण अभेद. आपणाचि येक असतो असे रामदास म्हणतात.

**नकळे ब्रह्मादिका अंत अनंता :**

म्हणजे आत्म्याचे अज्ञेयत्व (सद्‌गुरु शुद्ध आत्मस्वरूप झालेले असतात.) या अज्ञेयत्वाबद्दल उपनिषदे काय म्हणतात ते पाहू.

वस्तुत: आत्म्याचे खरे स्वरूप अज्ञेयच आहे, असे उपनिषदकारांचे म्हणणे. ज्याचे पूर्ण आकलन न झाल्यामुळे मनासह वाचा परतते तेच परम सत्य होय, असे तैत्तिरीय उपनिषदांत सांगितले आहे. 'जे चक्षु, वाक् व मन यांस अगम्य आहे ते ज्ञेय व अज्ञेयातील आहे; याखेरीज त्याविषयी आम्हास आणखी निराळी कल्पना काय असणार?' असे केनोपनिषदकारांचे म्हणणे आहे. सुप्रसिद्ध रोमन तत्त्ववेत्ता ऑगस्टस म्हणतो त्याप्रमाणे 'मला ब्रह्माचे ज्ञान आहे असे म्हणणाऱ्यास त्याचे ज्ञान नाही व मला त्याचे ज्ञान नाही असे म्हणणाऱ्यास त्याचे खरे ज्ञान आहे' असे या उपनिषदकारांनी प्रतिपादिले आहे. याच अर्थाने कठोपनिषदांत 'आत्मज्ञान' हे प्रथम लोकांस ऐकावयास मिळत नाही, पण सुदैवाने ते मिळालेच तर पुष्कळांना ते कळत नाही. आत्मज्ञानाविषयी बोलणारा मनुष्य मिळणेच मोठे दुर्लभ. गुरुने सांगितलेले ग्रहण करून आत्म्याचे ज्ञान मिळविणारा तर त्याहूनही अत्यंत दुर्लभ होय असे म्हंटले आहे. आत्म्याचे अंत:स्वरूप वस्तुत: अज्ञेय आहे असे वरील सर्व उपनिषदांत प्रतिपादिले आहे.

आत्म्याच्या या अज्ञेयत्वाविषयी उपनिषदकारांनी दुसऱ्या दृष्टीनेही विचार केला आहे. आत्मा अनादि ज्ञाता असल्यामुळे तो अज्ञेय आहे. आत्मा स्वत:च अनंत ज्ञाता असल्यावर तो ज्ञानाचा विषय कसा होईल? असा प्रश्न उपनिषदांत अनेक ठिकाणी केला आहे. श्वेताश्वेत उपनिषदात म्हटले आहे की, आत्मा अनादि महापुरुष असून सर्व ज्ञेय वस्तूंचे त्यास ज्ञान आहे.

**तो आम्हा सुलुभ जय कृपावंता**

सद्गुरु शिष्यांवर कृपावंत होऊन त्याला नाम देतात. नाम देताना त्याच्या शरीरातील आत्म्यास बाहेर काढून पाहिल्यानंतरच नाम देतात. तीच सद्गती – सध्या मिळणारा मोक्ष होय. हे किती सोप्या रीतीने सुलभपणे घडते.

**मायेविण माहेर विश्रांती ठाव**

शिष्यास नामस्मरण करीत करीत देहभावाचा विसर पडतो म्हणजेच मायेचा (मी देह नाही एवढे करून घ्या असे बाबा म्हणत) विसर पडतो. तो मायेविण झाला म्हणजे त्याला माहेरची – स्वगृहाची (स्वगृह म्हणजे जीवाचे मूळ ठिकाण ते म्हणजे स्वरूप) विश्रांती मिळते. जीवन मरणाच्या फेऱ्या चुकतात. पुन्हा नाही येणे संसारासी असे होते.

**शब्दी अर्थ लाभ**

एकदा काकासाहेब तुळपुळे प्रस्तुत लेखकाच्या खांद्यावर हात ठेवून आरतीला उभे होते. लेखकाने आरतीमधील वरील रचना म्हटली. काकासाहेबांनी त्याला तत्काळ कानात सांगितले, शब्दी न म्हणता शब्द म्हण. शब्द नामाचा लाभ आधी झाला आहे व त्याच्या स्मरणाने अर्थ लाभ म्हणजे ईश्वर दर्शन होणार आहे.

**बोलणे वाव**

नाम बोलण्याची – नाम स्मरणाची ही संधी तुला (शिष्याला) मिळाली आहे.

**सद्‌गुरु प्रसाद... सद्‌भाव**

मोक्ष प्राप्तीचा हा सुलभ मार्ग (नामस्मरणाचा) तुला सद्‌गुरुचा प्रसाद म्हणून मिळाला आहे.

रामदास म्हणतात म्हणून मला माझा श्रद्धाभाव फळास आला मुक्ती मिळाली.

काही ठिकाणी फळला ऐवजी कळला असा पाठभेद सापडतो. त्यामुळे अर्थात फार फरक पडत नाही.

● ● ●

# सत्संग

Simone Weil ही एक बुद्धिवान आणि नवनिर्मिती करणारी २० व्या शतकातील फ्रान्स मधील साक्षात्कारी स्त्री सत्संगाबद्दल काय म्हणते, ते पाहण्यासारखे आहे. श्री. निंबरगी महाराजांचा जन्म फ्रेंच क्रांतीच्या सालातील आहे.

For nothing among human things has such power to keep our gaze fixed ever more intensely upon God, than friendship for the friends of God."

From "Waiting on God."

**अर्थ :**

''अशा कोणत्या मानवी वस्तुमध्ये शक्ती आहे जी देवाच्या मित्राच्या मैत्रीत आहे व ती शक्ती आपल्या देवावरील भक्तीस सतत जास्त तीव्रतेने बांधून ठेवू शकते.''

बस! ही बाई सर्व काही सांगून गेली ह्या एका छोट्या वाक्यात. देवांचे मित्र म्हणजे संत आपले सद्‌गुरु. त्यांची मैत्री म्हणजे श्री. भाऊसाहेब महाराजांच्या शब्दात ''कृपा करून दृष्टि ठेवा मग कृपा आहेच'' एवढे झाल्यावर एकांतिक भक्तीच नव्हे का?

सत्संगाचे महत्त्व आधुनिक काळातील फ्रेंच स्त्रीस किती अंत:करणात जाऊन भिडले आहे हे ह्यावरून स्पष्ट होते.

तेव्हा आज सद्य परिस्थितीत सत्संगाचा विचार बदललेल्या संदर्भात, नव्या युगात करू या.

**''जया जैशी गति तया तैसी संगति।।**
**समागमें रिती सर्व काही ।।१।।**

**सर्व काही घडे संगतीच्या गुणे ।**
**साधुंची लक्षणे साधुसंगे ।।२।।**
**साधुसंगे साधु होई जे आपण ।**
**रामदास खूण सांगतसे ।।३।।''**

म्हणून सर्वदा सज्जनाचा संग धरावा. एवढ्या गद्यातील उल्लेखाशिवाय सत्संगाबद्दल 'महाराजावर वचन या पोथीमध्ये आहे.' श्री भाऊसाहेब महाराजांच्या उमदी येथील घरात रोज वाचावयाच्या चौदा पोथ्यांच्या यादीत या पोथीचा समावेश आहे. त्यात दुसरा कुठलाही मजकूर सापडत नाही. तसेच चडचाण येथील कानडी लिपीतील प्रतीत अच्युताचे ध्यान केले असता मनुष्यही अच्युतच होतो हा जास्तीचा मजकुर आहे.

हे सर्व सांगण्याचे प्रयोजन म्हणजे बोध सुधेतील सत्संगावरती जे वचन आहे ते श्री गुरुदेवांचे असावे व त्याच्या (structure) अभिव्यक्तीची मांडणी त्यांच्या संमतीने झाली असली पाहिजे.

बोधसुधेमध्ये सत्संगाबद्दल कोणकोणते उल्लेख व मजकूर आहे तो बघू या.

**बोधसुधेतील वचनांचा संदर्भ व सारांश**

ह्यात ''परमार्थांच्या वाढीसाठी सत्संगाची अत्यंत आवश्यकता आहे. साधूच्या संगतीप्रमाणेच नामाची व सद्वस्तूची संगती ही सत्संगतीच होय.''

**सत्संग म्हणजे**

१) सज्जनांचा श्रेष्ठ जनांचा संग.

२) सद्गुरुंनी दिलेल्या नामाचे स्मरण म्हणजे सत्संगच.

३) नाम निरंतर श्वासात ओवणे हाही सत्संगच आणि

४) सद्वस्तूचे सतत अनुसंधान अगर साक्षात्कार हाही सत्संगच. अच्युताची संगती धरली म्हणजे आपणही अच्युतच होतो. ईश्वराच्या ज्या गुणांचे ध्यान करावे तो गुण आपल्यात उतरतो.

## परमार्थ मार्ग

### सत्संगाची व्याख्या

सत्संग म्हणजे सज्जनांचा संग, आपल्यापेक्षा श्रेष्ठ, उत्तम गुणांच्या लोकांचा संग होय. सद्गुरुंनी दिलेल्या नामाचे स्मरणही सत्संगच. ते नाम निरंतर श्वासात ओवणे हाही सत्संगच. सद्वस्तूचे अनुसंधान सतत प्रचिती हाही सत्संगच होय.

सदैव निर्गुणाची संगत असावी. म्हणजे तो 'अच्युत' होऊन पार होतो. आपण अच्युताची संगती धरली तर आपणाला अच्युतपणा प्राप्त होतो.

बोधसुधा दुसरी आवृत्ती. प्रकाशक – कृ. दा. संगोराम ह्या प्रतीमध्ये पान नंबर ५३, ७१ व बोधसुधेचे पान नं. ४९ ह्या तीन ठिकाणी वरील अवतरणे आढळतात. पुनरोक्ती करण्याचा मानस नव्हे.

आता ह्या अवतरणातील तपशील पाहिल्यावर प्रत्येक परिच्छेदामध्ये नवीन मुद्दा दिसून येतो. हे श्री गुरुदेवांचे वैशिष्ट्य.

१) परमार्थ वाढीसाठी सत्संगाची आवश्यकता आहे.

२) (अ) अनुसंधान सद्वस्तूचे म्हणजे साक्षात्कार.

(ब) ईश्वराच्या ज्या गुणाचे ध्यान करावे तो गुण आपल्यात उतरतो.

ह्याचाच विस्तार पुढे श्री गुरुदेवांनी गीतेच्या पुस्तकात Methods of meditation : The Ideological Method ध्यानाच्या पद्धतीत ईश्वराबद्दलच्या पायाभूत संकल्पनेवर ध्यान धरणे या मध्ये केला आहे.

श्री भाऊसाहेब महाराज म्हणत असत, ''देव श्रीमंत आहे, असे म्हंटल्यास तू श्रीमंत होतोस, देव शक्तिवान आहे असे म्हंटल्यास तू शक्तिवान होतोस.'' असे म्हणण्यासाठी भक्तास देवाचे गुण अनुभवाच्या योगाने कळले असले पाहिजेत. भक्त व देव एकरूप झाल्यावर ते गुण भक्ताच्या अंगी आपोआप येतात.

३) ज्याला ज्याला सत्संग म्हटले आहे त्याची संगती सतत, सदैव हवी.

निर्गुणाची संगत म्हणजे साधकास अनुभवास येणाऱ्या देवाच्या खुणेची.

वरील अवतरणातील वैशिष्टे पाहिल्यानंतर वचन ५२ सत्संगाच्या व्याख्येवर थोडा विचार करू.

ह्यात नमूद केलेल्या सत्संगाच्या गमकाचे वर्गीकरण केल्यास ते असे होईल.

| | |
|---|---|
| (१) Physiological सत्संग | (अ) सज्जनांचा संग |
| शारीरिक | (ब) आपल्यापेक्षा श्रेष्ठ, उत्तम गुणांच्या लोकांचा संग. |

येथे सद्गुरुंच्या संगाचा उल्लेख नाही. ह्यापुढे देहधारी सद्गुरुंच्या सहवासाची अपेक्षा करू नये. असेच श्री गुरुदेवांनी सूचित केले नसेल ना?

| | |
|---|---|
| (२) Psychological सत्संग | (अ) नामाचे स्मरण |
| मानसिक | (ब) निरंतर श्वासात ओवणे |
| (३) Mystical सत्संग | (अ) सद्वस्तूचे अनुसंधान |
| | (ब) सतत प्रचिती |

ह्या सर्व जमेच्या बाजूचा Positive सत्संग आहे. आपले सद्गुरू परम दयाळू. त्यांनी अभावात्मक सत्संगाची व्याख्या दिली आहे. तिला आपण Negative सत्संग म्हणू या. ती अशी :-

(१) अंतःकरणात, माझा नेम होत नाही, असे दुखः वाटून डोळ्याला पाझर फुटणे.

(२) नेम होत नाही म्हणून अंतःकरणात, जेवताना, खाताना हुरहर लागून पोटात हळहळ वाटणे.

ह्या प्रत्येक प्रकारच्या सत्संगाला जर ३३% मार्क दिले तर

आपल्याला स्वतःच्या नेमाची गुणवत्ता ठरविण्यास ही गुणप्रणाली निश्चित उपयोगी ठरेल. आपला नेम ३३ टक्के का ६६ टक्के का १०० टक्के होत आहे ह्याचे परिक्षण आपणास करता येईल व वरच्या क्लासमध्ये जाण्यासाठी कोणते उपाय करावयाचे ते पण स्पष्ट होईल.

अर्थात निंबाळमधला नेम १००% गुणवत्तेचा होय.

ह्याही पेक्षा पुढे जाऊन श्री गुरुदेव PGHL मध्ये म्हणतात,

"To summarise our discussion of the moral virtues essential for spiritual realisation, we might say that the spiritual seeker must have the following virtues: he should utter the name of God with pleasure or displeasure, faith or misfaith, sloth or even malignity."

**अर्थ :**

ईश्वर साक्षात्कारासाठी आवश्यक असणाऱ्या नैतिक सद्गुणांच्या उहापोहाचा सारांश काढायचा झाल्यास असे म्हणता येईल की, साधकाच्या अंगी खालील सद्गुणांची जरूरी आहे. त्याने देवाचे नामस्मरण श्रद्धेने अगर चुकीच्या ठिकाणी ठेवलेल्या श्रद्धेने, आनंदाने अथवा नाराजीने, सुस्तपणे अथवा तीव्र मत्सराने केले पाहिजे.

श्री गुरुदेव कोणत्याही गोष्टीचा परामर्ष तीन पद्धतीने घेत असत. सत्संगाचे Postive व Negative बाजू पाहिली. एक Constructive विधायक (रचनात्मक) बाजू, पण त्यांनी सांगितले आहे ती पुढे पाहू.

ही चर्चा श्री निंबरगी महाराजांच्या वचनाप्रमाणे म्हणजे त्यांनी दासबोधावरील निरुपणात वेळोवेळी केलेल्या उद्बोधक वचनांचा संग्रह बोधसुधा ह्यावर झाली.

पण फक्त एवढेच सांगायचे होते की श्री निंबरगी महाराजांचे? नाही कसे ते पाहू.

त्यांचे पद ''नेल्लु कुट्टुणु बारम्मा'' बघू.

त्याचा अर्थ पहिल्यांदा बघुया.

''आपण दोघी मिळून भात कांडू या. न थांबता, कामाच्या मागे लागून बारा-सोळाजणी भात कांडू या. देहाचे उखळ करून प्राण्यांच्या मुसळाने घाव घाल. विवेक दृष्टीने तांदूळ निवडून ज्ञानदृष्टीने त्यातले खडे काढ।।१।। तीन वासनांचे दगड मांडून चूल कर व वर प्रारब्धाचे गाडगे ठेव. कामक्रोधरूपी लाकडांचा विस्तव करून आत बाहेर म्हणजे परमार्थ व प्रपंच दोन्हीकडे पाहा।।२।। खीर शिजू लागल्यावर अंहकाराचा कड उतू जायला लागेल. तो सत्वरूपी पळी घेऊन धैर्याने आत जिरव व काळजीपूर्वक खीर कर ।।३।। प्रारब्धाने उत्तम खीर तयार झाली म्हणजे ह्या स्वानंदरूपी खिरीचा नैवेद्य दाखवून गुरुलिंग जंगमांच्या समवेत तिचा अस्वाद घे. ।।४।।

श्री. गुरुदेव म्हणतात This a wonderful song. From this song you can see what a great spiritual experience he had.

हे एक अलौकिक पद आहे. ह्या पदावरून श्री निंबरगी महाराजांच्या ारमार्थिक योग्यतेची जाणीव होते. पदातील सत्संगाबद्दलचा भाग फक्त घेत आहे.

गुरुदेव म्हणतात, "The saint of Nimbargi tells us that the paddy is to be thrashed by twelve or sixteen ladies having got together. There ought to be a collective or cummulative Sadhana. One man cannot alone hold the pestle and the mortar, two, four or eight persons are required."

Sadhana is a word which the Bengalis use. We should rather speak of Sadhana. But Ravindranath Tagore has made this word Sadhana rather famous and

I have no objection in using it in that form. So community Sadhana is the first thing that we have to undertake.

पुढे म्हणतात, The husk too should be removed. This can be done easily by cummulative Sadhana. आणि शेवटी When you have thus prepared the sweet porridge enjoy it to your hearts content in the company of your spiritual teacher and tour spiritual brethren. This constitutes the apex of spiritual experience.

**अर्थ :**

श्री निंबरगी महाराज सांगतात भात कांडण्यासाठी बारा किंवा सोळाजणी मिळून एकत्र येऊन ते काम केले पाहिजे. एकत्रित अथवा, एक गोष्टीस दुसरी येऊन मिळाल्यानंतर व अशा तऱ्हेने वाढत जाणारी साधना आवश्यक आहे. एकाच बाईला मुसळ व उखळ सांभाळता येणार नाही. त्यास दोन, चार किंवा आठजणी लागतात. साधन हे व्याकरणदृष्ट्या बरोबर आहे. साधना हा शब्द बंगाली लोकांनी रूढ केला आहे व तो रविंद्रनाथ टागोरांनी लोकप्रिय केला. म्हणून तो शब्द वापरण्यास माझी हरकत नाही. म्हणून सामुदायिक साधना अंगिकृत करणे ही पहिली आवश्यक बाब आहे.

पुढे

धान्यावरचा भुसाही काढून टाकावा. हे Cummulative साधनेत सहज शक्य होते.

व शेवटी ही गोड खीर अशा प्रकारे बनविल्यावर आपल्या सद्गुरुंना व साधक बंधूंना बरोबर घेऊन ती मनसोक्त खावी.''

पदांत मुख्य भर सामुदायिक साधनावर आहे.

शेवटी खिरीचा उपभोग सद्गुरु व साधक बंधू सगळ्यांबरोबर

घ्यावयाचा आहे. आज सदेह स्‌द्‌गुरु नाहीत्‌. तेव्हा आधी सामुदायिक साधनेचा विचार करून मग सदेह सद्‌गुरुंच्या अस्तित्वाचा तात्विक विचार करू.

श्री गुरुदेवांनी ह्याबद्दलचे आपले स्पष्ट विचार १२ जुलै १९१० सालच्या श्री भाऊसाहेब महाराजांना लिहिलेल्या पत्रात मांडल्याचे दिसते.

''तसेच आज कालच्या एकंदर परिस्थितीवरून असे वाटते, की सर्व लोकांत ईश्वराची थोडी तरी भक्ती करावी याबद्दल इच्छा उत्पन्न झाली आहे त्याप्रमाणे निरनिराळे लोक आपआपल्या समजुतीप्रमाणे भक्ती करीतही आहेत. पण वरवर बघणाऱ्यास सुद्धा असे दिसून येते की ती भक्ती फलद्रूप होत नाही. याचे कारण अनुभव किंवा प्रचिती काहीच येत नाही; आणि अनुभव नसल्याने भक्ती वाढतही नाही किंवा वाढविताही येत नाही. अशा स्थितीत साधनाचे स्तंभ जेथे तेथे उभारणे जरूर आहे. हे समर्थांस कळविले पाहिजे असे नाही. पण मूढबुद्धीने कळवावे असे वाटते, म्हणून लिहिण्याचे धाडस करीत आहे. खरा मार्ग जिकडे तिकडे पसरला पाहिजे. खऱ्या मात्रा व खरे वैद्य उत्पन्न झाले पाहिजेत. म्हणजे असंख्य लोकांस अनुभव मिळून खरी भक्ती वाढेल व सर्व लोकांचे कल्याण होईल. ईश्वराची सर्व सूत्रे चाललीच आहेत. ही गोष्ट खरी आहे, पण खऱ्या मार्गाची प्रसिद्धी होण्यास सर्व लोकांस बुद्धी व शक्ती मिळावी, अशी नम्र विनंती आहे...''

हाच संदेश २८।४।१९५७ रोजी श्री. तात्यासाहेबांच्या घरी जमलेल्या शिष्य मंडळींना सिटिंगमध्ये दिला.

''अलाहाबादचा निसर्ग या वेळी भयानक वाटला. प्रचिती अंधुक झाली आहे. काय असेल बरे याचा अर्थ? आता यापुढे नाम देणे बंद करणार. आता तुम्हीच हिमालयाप्रमाणे उंच उंच झाले पाहिजे. समोर प्रचिती नसली तरी आपल्या आत भाव व प्रेम वाढले पाहिजे.'' नंतर बाळासाहेब ताम्हणकरांना ''सत्तर बरसका घर बनाया'' पद म्हणावयास

सांगितले. पदात ''मौतका डंगा बजा'' असे आहे. आपल्या अवतार समाप्तीची पूर्वसूचना देताना गुरुदेवांनी काय सांगितले.

१) साधनाचे स्तंभ जेथे तेथे उभारणे जरूर आहे.

२) तुम्हीच हिमालयाप्रमाणे उंच उंच झाले पाहिजे.

३) समोर प्रचिती नसली तरी आपल्या आतच भाव व प्रेम वाढले पाहिजे.

१) श्री निंबरगी महाराजांना वयाच्या २५ वर्षी नाम मिळाले. पुढे ६ वर्षे अशीच गेली. तद्नंतर ३६ वर्षे साधन व पुढील २८ वर्षे जगदोद्धार.

सद्गुरुंची भेट फक्त तीनदाच.

१) नाम घेते वेळी.

२) पुढे ६ वर्षानंतर नामाच्या आठवण देणेस आले वेळी.

३) जगदोद्धाराचे परवानगी घेताना.

निंबरगी मध्ये एकटेच नामधारक, साधक, सत्संग तसा नाही. कोणाचे मार्गदर्शन पण नाही. म्हणूनच की काय त्यांच्या गुरुचरण कमलदल्ली पदात ते म्हणतात,

परतत्त्व तिळिदू साधुर संगियागो नी''

ह्या विधानाचा विचार करण्याआधी सत्संगाचे आणखीन दोन पैलू पाहू.

१) अद्वैत सिद्धी मिळविल्यानंतर सत्संगात राहणे.

२) साधकाच्या भावपूर्ण पद गायनाने श्रेष्ठ सद्गुरुस देखील उच्च गुणवत्तेचा सत्संग लाभतो व त्यास अलौकिक अनुभव येऊ शकतात.

(२) शिष्याच्या संगतीने सद्गुरुंचा भाव आत्यंतिक होऊन सद्गुरुस उत्तम अनुभव आल्याचे उदाहरण श्री. गुरुदेवांच्या बाबतीतले पाहू.

श्री गुरुदेव लिहितात...

"... having realised theTruth, be an associate of the saints." That is also a very important point when you

have attained to Reality. Then be one with the saints. Ofcourse this is a reversal of the ordinary position which is that we should keep ourselves in the company of the saints and thereby attain to Reality But the saint of Nimbargi says,

पर तत्त्व तिळिदु, साधुर संगि आगोनी

first reach reality and then associate with the saints for two reasons.

(i) to deepen on your experience for yourselves and

(ii) to disseminate your experience among the people.

That is what is meant by keeping company of the saints after realisation.

**अर्थ :**

''सत्य जाणून घेतल्यानंतर संतांचा मित्र, सहकारी, सोबती बन.'' हा देखील एक फार महत्त्वाचा मुद्दा आहे. जेव्हा परमेश्वराबरोबर ऐक्य पावशील तेव्हा संताबरोबर त्यांच्यासारखा एक बनून राहा. नक्कीच हा क्रम नेहमीपेक्षा उलटा आहे. आधी संताच्या संगतीमध्ये राहिल्यास ईश्वरप्राप्तीचा योग येऊ शकतो. पण श्री निंबरगी महाराज बरोबर ह्या उलट विधान करतात. आधी सत्य जाणून घे मग संत संगती धर त्यास दोन कारणे.

(अ) स्वतःच पारमार्थिक अनुभवाची खोली वाढते.

(ब) आपल्या अनुभवांचा प्रसार, फैलाव इतर जनामध्ये करण्यास हा एक प्रकारचा constructive सत्संग होय.

श्री गुरुदेव म्हणतात....

"The author of the next song ह्यांगेमरेयली गुरुविना how

shall I forget my Master?" was a poor Brahmin and devout disciple of the saint of Umadi. He was called Bhagavantappa and lived with me for fourteen years from 1932 to 1946. His one business was to meditate and to serve all the people who visited Nimbal. There must be many people who have seen him and known how very sincerly he used to offer his services to everybody that came to Nimbal. He was also a good poet. I have taken his song in order to awaken my memory of him. He had adopted Chidananda as his mudrika."

पुढे पदाचा विचार करून श्री गुरुदेव म्हणतात,

"I have deliberately selected this poem in order to fully appreciate what he did both at Nimbal and at Allahabad when he was with me during the last war. In my spiritual life I got a very great impetus from him for four years. when the Germans, Russians, Americans and Englishman were fighting and when Allahabad was expecting any time a bomb fall as it did happen at Calcutta and Vizagpatam. He used to sing every day spiritual songs from about 2 pm to 3 pm. His devotion was such that we could experience something which we had not experienced till that time."

It was due to his devotion that, that experience dawned upon us. We must therefore, thank him for having been instrumental for that kind of impelling

spiritual experience."

**अर्थ** :

श्री गुरुदेव म्हणतात,

पुढील पदाचा ''मी माझ्या सद्गुरुस कसा विसरेन'' कर्ता एक गरीब ब्राह्मण व उमदीकर महाराजांचा एक निष्ठावंत शिष्य होता. त्यास भगवंतअप्पा म्हणत व माझ्याजवळ तो १९३२ ते ४६ पर्यंत चौदा वर्षे राहात होता. त्याचे काम म्हणजे नेम करणे व निंबाळला आलेल्यांची सेवा करणे. त्याला पाहिलेले आणि ओळखणारे अनेक जण असू शकतील. कारण निंबाळला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची तो मन:पूर्वक आपली मदत देत असे. हे पद त्याच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी मी घेतले आहे. तो चिदानंद मुद्रिका वापरत असे.

पदाची चर्चा करून श्री गुरुदेव पुढे म्हणतात,

''हे पद मी मुद्दाम घेतले आहे. त्यामुळे त्यांनी माझ्यासाठी निंबाळ व अलाहाबाद मध्ये गेल्या युद्धात जे काही केले त्याचा उचित गौरव करावा म्हणून. माझ्या पारमार्थिक जीवनामध्ये चार वर्षासाठी भगवंतअप्पांमुळे मला मोठी प्रेरणा मिळत होती. ज्या वेळेला जर्मन, रशियन, अमेरिकन व इंग्रज युद्ध खेळत होते व ज्या काळात अलाहाबाद वर बॉंब पडण्याची शक्यता निर्माण झाली होती. कारण कलकत्यावर व विशाखापट्टणमवर बॉंब हल्ले झाले होते. त्यावेळेस तो रोज दुपारी साधारण २ ते ३ वाजता पारमार्थिक पदे म्हणत असे.''

त्याचा भाव अशा कोटीतला असे की आतापर्यंत न आलेले अनुभव मला अनुभवास येत असत. त्याच्या भावभक्ती मुळेच ते अनुभव येऊ शकले. म्हणून जो असा अनुभव येण्यास निमित्तमात्र झाला, त्याचे आभार मानणे अगत्याचे आहे.

निंबाळचे महत्त्व व सामुदायिक साधना व साधनेची विश्वात्मक प्रेरणा ह्याचा विचार करू या.

डोळस नामसाधना भाग १ संतसंगती मध्ये श्री. काकासाहेब तुळपुळे लिहितात,

निंबाळचे महत्त्व आगळेच आहे. संख्येलाही भावनोत्कटतेच्या दृष्टीने महत्त्व आहे. ते वातावरण गुरुदेवांशी संबंध असलेल्यांना पुण्यपावन व स्फूर्तिदायक आहे. पूर्वीच्या भावनापूर्ण स्मृती येथे सहज जागृत होतात. सत्संग आहेच. प्रत्येकाच्या अंत:करणातील उत्तम भक्तीभाव व भक्तीपोषक सद्गुण येथे जागृत राहतात व जागृत राहिल्याने दृढमूल होतात. स्वहिताचा धंदा म्हणून येथे येण्याची जरूरी वाटते. समर्थांच्या 'पांगुळावर' प्रवचन करताना अयोध्येला धर्माचे नगर व तेथे रामाचे राज्य याचा हाच आशय मी सांगितला. ''प्रत्येकाचे गुरुगृह हेच त्याचे धर्माचे नगर व तेथेच रामाचे राज्य आहे. समर्थांचे गुरु राम त्यांना अयोध्या, आम्हाला निंबाळ, साधन जेथे शिकविले जाते, करून घेतले जाते, ते धर्माचे नगर, तेच रामाचे राज्य. ब्रह्मत्व, सामुज्य, मुक्ति हेच स्वराज्य.'' ज्यांच्या संगतीत देवावाचून अन्य गोष्टीचे स्मरण होत नाही, आपोआप देवाचे स्मरण होते व टिकते, ते संत एवढेच त्या शब्दाची मर्यादित व्याख्या केली पाहिजे. गुरुदेवांच्या सारख्यांचा सत्संग कसा लाभणार? What is lost in depth must be gained in breadth खोली कमी असेल तर ती उणीव लांबी-रूंदी वाढवून भरून काढली पाहिजे. परमार्थात हे किती खरे आहे!

या न्यायाने आपण साधक, एकमेकांना सावध करून, साहाय्य करून, सुपंथ घट्ट धरण्याचा प्रयत्न करू या. थोर विभूती गेल्या, ती वाण, तोवरच सामान्य साधक एकत्र आणून भरून काढण्याचा प्रयत्न करू या.

Spiritual Depth बद्दल श्री. काकासाहेब तुळपुळे म्हणतात, (डोळस नामसाधना भाग दुसरा 26)

Spiritual Depth ला (आध्यात्मिक खोली, गाढतेला) अनेक

गुण लागतात. बौद्धिक विवेक व अभ्यास त्याचे चिंतन, उत्कट भावना, ध्येयवाद या बरोबर दीर्घकाळ साधन व सर्वात महत्त्वाचे अंग म्हणजे सद्गुरुंचा व ज्येष्ठ गुरुबंधुचा पुष्कळ सहवास. या सर्व गोष्टी आवश्यक आहेत. इतके असल्यावर थोडीफार Depth (गाढता) येते. अशी Depth असलेल्या काही साधक मंडळींनी सप्ताहात भाग घेतला म्हणजे सप्ताहाला Depth येते.

इतर साधकांनाही नवी दृष्टी मिळू शकते. पण अशी बरीच मंडळी असणे, किती कठीण आहे, हे सांगणे नकोच. तेव्हा जेवढे ते करतात, त्यातूनच अधिक काही निर्माण होईल – व्हावे – अशी अपेक्षा व इच्छा करणे हेच शक्य आहे.

म्हणून What is lost in depth should be gained in breadth.

**विश्वात्मक प्रेरणा :**

श्री गुरुदेवांनी एक सिद्धांत सांगितला आहे, की इतरांच्या नैतिक प्रगतीला आपली मदत झाल्यावाचून, आपली त्या क्षेत्रात प्रगति होत नाही. म्हणूनच तर सत्संगतीला अर्थ येतो.

तुकाराम हेच वेगळ्या शब्दांत सांगतात...

**''देव होसी तरी आणिकांते वरिसो ।**
**संदेह ये विषी करणे नलगे ।।**
**दुष्ट होसीतसे अधिकांते करिसो ।**
**संदेह ये विषी करणें न लगे ।।''**

श्री गुरुदेव एकदा म्हणाले ''आपण नेम करावा त्याचा कोणाला तरी फायदा होतोच. हा देवाचा नियम आहे. फायदा कोठे, कोणाला होतो, हे आपल्याला कळत नाही, हे आपले भाग्य. नाही तर अभिमान वाढला असता.''

हे नेमास केवढे मोठे प्रोत्साहन आहे.

तर आपण सर्व साधक बंधु भगिनी येथे जो नेम करता त्यामुळे जगात कोठे तरी कल्याण होतेच. जसे देव चमत्कार संताकरवी घडवून आणतो, त्याप्रमाणेच ही जी God Loving Community राम–प्रेमपुरातील नागरिक मंडळी आहेत. तसेच जगात इतरत्र असलेल्या भक्तांच्या करवी देव सृष्टीतील समतोल साधतो. हा समतोल साधण्यासाठी तर त्याचे आश्वासन आहे.

**योग क्षेम वहाम्यहम**

तर ह्या राम–प्रेमपुरात, श्रीक्षेत्र निंबाळमध्ये, सामुदायिक साधनेने पुण्याचा गल्ला वाढत चालला आहे. तो वाढविण्याचे आपले प्रत्येकाचे परम कर्तव्य आहे.

कारण श्री गुरुदेवांच्या भाषेत ''One God, one world, one humanity." सत्य करण्याचे उत्तरदायित्व आपले नव्हे का?

**सत्संग**

सत्संगाचे अनन्य साधारण महत्त्व अधोरेखित करण्याची आवश्यकता नाही, तरी पण संप्रदायातील सत्संगाबद्दलच्या विचारांचे वर्गीकरण साधकास उपयुक्त ठरेल यात शंका नाही.

**ईश्वर साक्षात्काराचे सामाजिक परिणाम–अर्थात संतांचा Constructive विधायक सत्संग :**

श्री गुरुदेवांच्या निर्याणानंतर, १९५७ सालापासून ते १९८६ सालापर्यंत जवळजवळ ३० वर्षे प. पू. शारक्कांचा मंगल सहवास निंबरगी संप्रदायास लाभला व त्यांनी संप्रदायाची १९५७ नंतरची वाटचाल पुनीत केली व येणाऱ्या काळात गुरुदेवांची भक्ती वाढवून त्यांनी किर्ती दिगंत करावी हा धडा घालून दिला. त्यांचे कार्य Spiritual Renaissance पारमार्थिक पुनरुज्जीवनाचे होते.

त्यांच्या कार्याचे काही प्रमुख भाग पाहू या.

१) निंबरगीचे, गुरुमूळ पीठाचे महत्त्व सर्वांच्या मनावर ठसविले.

२) थोर साधक, गुरुदेवांचे गुरुबंधू इत्यादींना पारमार्थिक मार्गदर्शन केले. हे मार्गदर्शन स्वत:च्या अनुभवावर अधिष्ठित होते, हे सांगण्याची जरूरी नाही.

३) संप्रदायाचे Binding भक्तीची विविध केंद्रे स्थापन करून सप्ताह सुरू करून केले.

४) निंबाळ ट्रस्टची जपवणूक केली.

संतांच्या जीवनाच्या वाटचालीत ते ज्या पारमार्थिक शिखरावर पोहोचलेले असतात, त्या नैतिक शुद्धतेमुळे त्यांचे मन गंगाजलाप्रमाणे शुद्ध झालेले असते. ईश्वराशी ऐक्य पावल्यामुळे मानवतेबद्दल परम करूणा, सदैव त्यांच्या अंत:करणात नांदत असते. ह्या सर्व गोष्टींमुळे मानवतेला घडणाऱ्या त्यांच्या सत्संगामुळे जो विधायक Constructive असतो. काही सामाजिक परिणाम होत राहतात.

गुरुदेव ह्यास ''Social Effects of God Realisation'' म्हणतात. त्यांनी ह्या सामाजिक परिणामाचे अनेक पैलू मांडले आहेत. ते आपण आधी पाहणार आहोत.

**१) सद्गुरुंकडून त्यांच्या शिष्यांची पारमार्थिक उन्नती.**

कबिरांचे ''साधो सो सद्गुरु मोहि भावे'' व ''वोई सतगुरु संत कहावे'' ह्या पदाच्या चर्चेमध्ये गुरुदेव वरील मुद्दा मांडतात.

सद्गुरुंच्या श्रेष्ठतेचे स्तवन, गुणगान कबीर वरील पदांमध्ये करतात व ह्या पदाच्या गुणवत्तेस तोड नाही.

ह्या पदामध्ये अनेक सौंदर्यस्थळे आहेत. व कबिरांना सद्गुरुंच्या अंगी असलेल्या वेगवेगळ्या सद्गुणाबद्दल निश्चितरूपाने जी विधाने करावयाची आहेत ती ह्या सौंदर्यस्थळामध्ये सूत्रमय रीतीने मांडली आहेत. सद्गुरुमध्ये असणाऱ्या सद्गुणांची चार विभागात मांडणी करता येईल : नैतिक चिन्हे किंवा गुण, शारीरिक लक्षणे, आध्यात्मिक लक्षणे व सामाजिक लक्षणे.

येथे फक्त सामाजिक लक्षणांचा विचार करावयाचा आहे :-

सामाजिक लक्षण म्हणजे सद्‌गुरु मानवतेची उन्नती करतात. मानवतेच्या पारमार्थिक उन्नती साधण्यातील त्याचे यश खऱ्या सद्‌गुरुतील व इतर गुरु म्हणविणाऱ्यांच्या मधील फरक स्पष्ट करतात. येथे मानवता म्हणजे त्याचे शिष्य होय.

ही पारमार्थिक उन्नती कशी साध्य होते?

१) ज्या प्रमाणे उंच पातळीवर असणारे पाणी खालच्या पातळीवर आपोआप वाहते, तद्वत, सद्‌गुरुंचे आध्यात्मिक अनुभव, जे साधक सद्‌गुरुंनी चोखाळलेल्या मार्गावरून चालले आहे, त्यांना आपोआप येतात. गुरुदेवांनी ह्यास पारमार्थिक गुरुत्वाकर्षणाचा नियम म्हणले आहे. ह्या नियमामुळे शिष्याची पारमार्थिक उन्नती घडते. श्रेष्ठ सद्‌गुरुचे अनुभव त्यांच्या शिष्यांना आपोआप आलेच पाहिजेत.

प. पू. शारक्कांना गुरुदेवांनी स्पष्ट शब्दांमध्ये हेच सांगितले,

''कोणताही अनुभव मला आला की तो तुम्हाला आलाच पाहिजे.''

२) नंतर गुरुदेव म्हणतात, असा सद्‌गुरु स्वत: नामामृत प्राशन तर करतोच पण इतरांनाही पाजतो. ''आप पिए मोहि प्यावै.'' अमृत पानाचा अनुभव सद्‌गुरुंकडून आपोआप शिष्याकडे पाठविला जातो.

३) अशा सद्‌गुरुचे लक्ष अलक्षावर स्थिर झालेल्या कारणाने शिष्यांनाही ईश्वराचे अदृष्ट रुप दिसते. ''नैनन अलख लखावै।'' अंधाराच्या, मायेच्या पडद्याचे निर्मूलन करून सद्‌गुरु शिष्यास देव दाखवितात.

४) जर असा सद्‌गुरु स्वत:स अनाहत नादाबरोबर एकरूप करण्यास समर्थ असेल तर त्याच्या शिष्यांनाही आपोआप हा अनुभव येईल व त्याच्याशी एकरूप होतील.

**२) शील व ध्येय सुधारणा :**

सद्‌गुरुंच्या पवित्र व परामार्थिक जीवनामुळे म्हणजे त्याच्या संगतीत

राहणाऱ्या सर्व लोकांची शील व ध्येये सुधारतात.

कबीर आपल्या ''दरस दिवाना बावला, अलमस्त फकीरा'' ह्या पदामध्ये म्हणतात,

**''पियत पियाला प्रेम का, सुधरे सब साथी।''**

सद्गुरुंच्या अमृतपानामुळे त्याचे निकटवर्ती सुधारतात. गुरुदेव ह्यास असंगती अलंकार म्हणतात. जरी सकृतदृष्ट्या दोन्ही गोष्टींचा अर्थाअर्थी काही संबंध दिसत नसला तरी एकामुळे दुसरी होते.

जेव्हा प. पू. शारक्का हॉस्पिटलमध्ये होत्या तेव्हा तेथील नर्सेस व आया त्यांना आपली आई मानू लागल्या. एका ख्रिश्चन मेट्रन त्यांच्या दर्शनाने त्यांचे देवत्व ओळखून मनोभावे प्रार्थना केली व तिचे संकटातून रक्षण झाले.

डेक्कन कॉलेजमध्ये काकासाहेब तुळपुळेंचा गुरुदेवांशी संबंध आला व त्यांची गुरुदेवांवर श्रद्धा बसली व वाढत गेली. १९०९ पर्यंत ती चांगली दृढ झाली. ती का झाली हे सांगणे शक्य नाही, असे आपल्या आत्मकथेमध्ये त्यांनी लिहिले आहे.

**३) जगाचे पारमार्थिक पोषण Sustenance of the world.**

''बंधनो की शृंखला को तोडकर यह पर आया'' या पदावरील चर्चेमध्ये गुरुदेव म्हणतात, मूळ इंग्रजी फार अप्रतिम आहे, ते आधी पाहू.

We finally come to the Social aspect of Mystical experience. The Saint is surrounded not merely by a number of devotees, but also by those who are indifferent to his activities. Our, friend the frog, cannot appreciate the pervading fragrance, even though he is in the midst of a hundred full blown lotuses. Also the poem compares the Saint to a celestial tree, which over laden with ambrosial fruit, is reclining towards the earth and he who

has been blessed to come under its shade is partaking of the juice without ever having gone in search of it. Finally, we are told that the affection of this perfected saint has descended to the very gravel of the earth, while his luminosity has transcended, the limits of the earthly horizon. It may now look wonderful if the mystic says as the Upanishadic Passage has described it._

**''अहं विश्वं भुव नमभ्य भवाम । सुवर्ण ज्योतिः।।''**

शेवटी आपल्यास आत्मानुभूतीचे सामाजिक स्वरूप काय याचे विचार, कर्तव्य आहे. संताभोवती केवळ त्याचे अनुयायीच असतात असे नाही. काही बेफिकीर लोकही असतात. जसे आपला मित्र बेडूकराव यांना शेजारी फुललेल्या शेकडो कमळांच्या सुगंधाची जाणीव नसते.

तसेच संत एखाद्या कल्पवृक्षाप्रमाणे असतो. हा कल्पवृक्ष अमृतरसांच्या फळांनी लगडलेला असून त्यांच्या भाराने वाकला आहे. जमिनीकडे कलला आहे. अजाणतेपणे ह्याच्या छायेखाली आलेल्याला त्या अमृतरसांच्या फळांना चाखता येते.

शेवटी कवी असे म्हणतो, ह्या पूर्ण झालेल्या संतांचे प्रेम, ममत्त्व, करुणा जमिनीवरच्या प्रत्येक किंकारापर्यंत पोचली आहे व त्याची तेजे क्षितिजाच्या मर्यादा ओलांडून दिंगतात पसरले आहे.

उपनिषदात वर्णिल्याप्रमाणे उद्‌गार त्यांच्या तोंडून आल्यास आश्चर्य नाही.

गुरुदेवांचे चरित्रकार म्हणतात, ''हे गुरुदेवांच्या बाबतीत कसे सत्य होते पहा.''

''...लौकिकातील मोठेपणाला स्थल कालाच्या मर्यादा पडतात. या मर्यादा ज्यांच्या मोठेपणाला पडू शकत नाही, असे एक संतच. ते जगाचे नागरिक असतात. काळ त्यांचा ग्रास करू शकत नाही. गुरुदेव ह्या

कोटीतील महापुरुष होते. एखाद्या निर्जन शिवालयात कोणीतरी लावलेला नंदादीप रात्रंदिवस तेवत असावा, त्याप्रमाणे त्यांचे बरेचसे आयुष्य निंबाळसारख्या खेड्यात गेले. इंग्रजीत Nimbus म्हणजे प्रभा. निंबाळला राहून त्यांची आत्मज्ञानाची प्रभा सर्वत्र फाकली. ती इतक्या दूरवर पोहोचली की तिचा परिणाम होऊन प्रो. बर्च (अमेरिका) व प्रो. द. मार्के (फ्रान्स) यांच्यासारखे परदेशातील विद्वान निंबाळला येऊन आपापल्या पणत्या उजळून घेऊन परत गेले....''

**४) परिवार मुक्ती**

प्रेषिता प्राप्त झाल्यानंतर कबीर आपल्या पदात ''कहूँ रे जो कहीबे की होइ।।'' म्हणतात. जग संतांच्या अस्तित्वाबद्दल बेफिकीर असते, त्यांनी समाज सुधारण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांना फल न आल्यामुळे त्यांना आश्चर्य वाटते.

पदाच्या शेवटी, जगाच्या या परिस्थितीबद्दल अत्यंत करुणा येऊन कबीर आपले संतपण, प्रेषितता स्पष्टपणे जाहीर करतात. ते म्हणतात, ''देवाने माझ्यावर कृपा केली व मला पुढील संदेश देऊन ते अमलात आणण्याचे सामर्थ्य पण मला दिले. निदान काही लोकांना तरी मुक्त कर, त्यांचे जीवन प्रकाशमय कर. आता तुम्ही मुक्ती मिळविली नाही, तर स्वत:ला दोष द्या, मला नव्हे.''

तुकाराम पण असेच कबिरांप्रमाणे म्हणतात,

**''वचनाचा अनुभव हाती । बोलविता देव मज ।।**
**परी हेन कळे अभिविका । जडलोकां जीवांसी।।**
**अश्रुत हे प्रासादिका । कृपा भीक स्वामीची।**
**तुका म्हणे वरावरी । जालो तरी सांगत।।''**

शेवटी कबीर ''गुरुने मोहि दीन्ही अजब जडी'' ह्या पदामध्ये म्हणतात, ''कहत कबीर सुनो भई साधो ले परिवार तरी.''

आपण साधकांनी जर क्षणभर विचार केला तर असे दिसून येईल

की, प्रत्येकाच्या परिवारामध्ये किती जणांना गुरुदेवांकडून नाम मिळून उद्धार झाला.

**५) पश्चात्ताप न होणाऱ्या पापी जीवांबद्दल कळवळा**

**निंबरगी संप्रदायाचे वैशिष्ट्य :**

आपल्या गीतेच्या पुस्तकामध्ये गुरुदेव म्हणतात, ''ज्यांना पश्चात्ताप होत नाही, अशा पापी जीवाना गीता व डांटे शाश्वत नरकात ढकलतात. यांना उन्नतीची आशाच नाही. अशा लोकांमध्ये नैतिक प्रगती होणे शक्य नाही. पुढे गुरुदेव आपले मत मांडतात, ""I think we should be a little generous. Even they should be allowed to come up some what nearer to the life of spirit..."

अर्थ : ''आपण थोडे उदार असावे असे मला वाटते. अशा लोकांना पण पारमार्थिक जीवनाच्या जवळ येऊ द्यावे.''

प. पू. शारक्का पण म्हणत, ''... अशा पतित लोकांचा उद्धार करणे हे आमचे काम आहे. नाम घेतलेल्याचा उद्धार तर आम्ही करतोच. पण नाम न घेतलेल्यांचा उद्धार तरी कोण करणार? गटारात लोळणाऱ्यांचेही कल्याण करणे हे आमचेच काम आहे.''

**६) पारमार्थिक परोपकार**

रहिमचा दोहा

**''तरुवर फल नही खात है, सरवर पयहि न पान।**
**कह रहीम पर कजहित, संपत्ति सँचहि सुजान।।''**

दोह्याच्या चर्चेत गुरुदेव म्हणतात, आपली पारमार्थिक संपत्ती स्वत:साठी राखून न ठेवता जगदोद्धारासाठी वापरणे हे संतांचे कर्तव्य ठरते. ते शिष्यांच्या पापाची जबाबदारी घेऊन, त्यास नाम देऊन त्यांचा उद्धार करतात.

**७) अरिष्ठापासून समाजाचे रक्षण**

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी गुरुदेव अलाहाबादला होते तेव्हा तिथे बॉंबहल्ला

होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्याकाळात गुरुदेव पुरेसे नेम करून काही अघटित घडणार नाही, ह्याची खात्री झाल्यानंतरच कामावर जात. त्यांचे मूळ वाक्य असे – "It was only when I had meditated sufficiently that I could go to the University feeling absolutely sure that nothing untoward would happen."

नेमात अत्यंत हिडीस कुरूप स्वरूपात स्त्री रूपामध्ये साथीच्या आजारानी येऊन ''येऊ का'' म्हणून विचारले असता श्री निंबरगी महाराजांनी, श्री बाबांनी व श्री. गुरुदेवांनी त्यांना जा म्हणून सांगून संरक्षण केले.

१९२७ साली भूकंप झाला. बनहट्टी (१५।२०। किलोमीटर जमखंडीपासून) त्याचे केद्रस्थान. तेथे महाराजांचे शिष्य रामप्पांच्या घरी भजन चालले होते. हादरा बसला. महाराजांचा फोटो भिंतीवर होता. साधकांना फोटोमध्ये हालचाली दिसल्या. मांडीवरचा महाराजांचा हात वर गेला व नंतर खाली आला. खोली अंधुक प्रकाशाने भरली. आर. एन. आपटेनी ही गोष्ट गुरुदेवांना कळविली.

**८) तीर्थक्षेत्रे, नद्या व मंत्र ह्याना पावन करणे**

नारद भक्तीसूत्र म्हणते,

**''तीर्थीकुर्वन्ति तीर्थानि,**
**सुंकर्मी कुर्वन्ति कर्माणी,**
**सच्छास्त्री कुर्वन्ति शास्त्राणि।**
**व तन्मया:।''**

संत तीर्थक्षेत्राना पुण्यप्रदान करतात. त्यांना पावन करतात. कर्माचे सत्कर्मात रुपांतर करतात व शास्त्रे, मंत्र इत्यादींना पारमार्थिक अधिकार प्राप्त करून देतात.

श्री. भाऊसाहेब, श्री. बाबांनी नद्यांना पावन केल्याची उदाहरणे आपणास माहीतच आहेत. गुरुदेवांनी त्रिवेणी संगमात आपला अंगठा बुडविला होता. शंकराचार्यांनी शारक्कांना नेमात भेटीस बोलविले होते.

दृष्टांत देऊन.

**दुसऱ्या सूत्राचा अर्थ**

वरील सूत्रात उल्लेख केलेल्या सर्व गोष्टीमध्ये संतांचा आत्मा म्हणजेच देवाचा आत्मा भरलेला असतो.

**९) एक साक्षात्कारी संताने त्यांच्या कालात केलेले कार्य - दुसऱ्या साक्षात्कारी संत आपल्या हयातीत पूर्ण करतो.**

भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनास कुरुक्षेत्रावर गीता सांगितली. ज्यावर आजपर्यंत अनेक भाष्ये झाली, होतील.

केवळ गुरुदवांनी ह्या भाष्यांनी निर्माण केलेल्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे गीतेची शिकवण ही ईश्वर साक्षात्कारासाठीच आहे, हे प्रतिपादून दाखविला.

इतकेच नव्हे, तर गीताकारांनी केलेले अर्धवट काम म्हणजे स्वरूप साक्षात्काराबद्दलचे विवरण जे साहाव्या अध्यायात २० व्या श्लोकामध्ये केवळ आहे. ते विस्ताराने व तपशीलासह मांडण्याचे काम गीताकारातर्फे म्हणजेच भगवान श्रीकृष्णाच्या वतीने नव्हे, स्वत: गुरुदेवांनी, २० व्या शतकातील भगवान श्रीकृष्णाने येणाऱ्या काळासाठी केले. गुरुदेवांनी तसे स्पष्टपणे लिहून ठेवले आहे.

"Probably there was no occasion for the writer of the Bhagavatgita to expand or expatiate on this theme. The present writer has done the work of that expatition on behalf of the Bhagavat gita."

श्री गुरुदेवांनी सांगितलेले विधायक सत्संगाचे काही पैलू बघितले. ते असे...

१) सद्गुरुकडून होणारी शिष्यांची पारमार्थिक उन्नती. अर्थात Law of Spiritual Gravitation.

२) शिष्यांच्या शीलामध्ये व ध्येयात सुधारणा.

३) जगाचे पारमार्थिक पोषण.

४) सद्‌गुरुंमुळे शिष्यांची होणारी परिवार मुक्ती.

५) सद्‌गुरुंकडून पश्चात्ताप न झालेल्या, गटारात लोळणाऱ्यांचा होणारा उद्धार.

६) सद्‌गुरुंचे पारमार्थिक उपकार. त्यांच्या पारमार्थिक ऐवजाचे वाटप Spiritual communism.

७) अरिष्टापासून समाजाचे रक्षण

८) तीर्थक्षेत्रे, नद्या, शास्त्रे मंत्राना पावन करणे. Sanctity देणे.

९) एका साक्षात्कारी संताने त्याच्या काळात केलेले कार्य – दुसरा साक्षात्कारी संत त्याच्या हयातीत पूर्ण करतो.

**एकराट्**

मुक्तात्मा सर्वाधिपती होतो. नुसत्या संकल्पनाने तो आपल्या इच्छा पुऱ्या करून घेऊ शकतो. त्याच्या इच्छाशक्तीने त्याच्या पूर्वजांचा उद्धार होतो. बादरायणांच्या संकल्पनेनुसार एका सम्राटाच्या समान दर्जाचा आणखी कोणीच नसतो. तो अनन्याधिपती असतो. त्याच्या ठिकाणी सर्वज्ञता, सर्वशक्तीमत्त्व व आनंद एकवटलेले असतात. वेदातील एक मंत्रघोषणा करतो की तो एकराट् म्हणजे एकच एक राजा असतो. त्याची हुकुमत चराचरावर चालते आणि ती नित्य असते. श्रीनिंबरगी महाराज म्हणत असत तसे, त्याला खऱ्या स्वराज्याचा, म्हणजे अविनाशी आत्मानंदाचा लाभ होतो. मानवाच्या इतिहासाच्या सुप्रभाती ऋषिमुनींच्या दृष्टीस पडलेले आदर्श राज्य जनसामान्यकेंद्रीत तर नाहीच, पण विश्वकेंद्रितही नाहीत. ते एक अविनाशी स्थलकालातील राज्य आहे. त्याला अमृतापुरी म्हणले आहे.

• • •

# सत्संगाचे वर्गीकरण

| Sr. | type | Details +ve (जमेचा) | Details -ve (अभावात्मक) |
|---|---|---|---|
| १) | Physical/ Physiological जड विश्वातील | आपल्या पेक्षा श्रेष्ठ सद्गुणी लोकांचा संग | सदेह सद्गुरुच्या उणीवेबद्दल तीव्र खेद. (कारण विपाये जरी आठविला चित्ता । तरी दे आपुली योग्यता असे ज्ञानेश्वरांनी म्हणले आहे.) |
| २) | Intellectual/ Psychological मानसिक | नामाचे अनुसंधान नाम श्वासात ओवणे ई. | नाम नाही भाव नाही म्हणून हळहळ ई (पहा अमर संदेश सुधा नं. १९) |
| ३) | Intuitive Mystical अध्यात्मिक | सतत प्रचिती | Dark Night of the Soul आत्म्याची अंधकारमय रात्र. |

टीप :– १) नामानुग्रह मिळण्याआधी नाम केवळ शब्दसमूह असतो. नामानुग्रह झाल्यानंतर नाम एक पारमार्थिक सत्य Mystical fact बनते.

| सत्संगाचे वर्गीकरण | | | |
|---|---|---|---|
| Sr. | type | Details | Remarks. |
| | | constructive (विधायक) | विधायक |
| १) | Physical/ Physiological जड विश्वातील | सद्गुरुंच्या वास्तव्याने प्रचंड संकटाचे निरसन. | गुरुदेवांच्या अलाहाबादेतील वास्तव्यामुळे बॉम्बहल्ला झाला नाही. |
| २) | Intellectual/ Psychological मानसिक | सद्गुरुंच्या नामस्मरणाने जगाचे कल्याण (जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती-ज्ञा.) | ह्यास televoliation म्हणतात. अ) वेदांत सूत्र iv. 4.8 वरील गुरुदेवांचे भाष्य मुळात पाहावे. ब) उरलो उपकारापुरता - तुकाराम |
| ३) | Intuitive Mystical अध्यात्मिक | spiritual gravitation या पारमार्थिक गुरुत्वाकर्ष-णाच्या नियमाने सद्गुरुचे अनुभव शिष्यास येतात. | एकराट् (पान नं. १३० पाहा) |

२) कारण 'विपासे जरी आठविला कित्ता तरी रे आपुली योग्यता' असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.

# श्री गुरुदेव रा. द. रानडे यांचे साक्षात्कारशास्त्र

## प्रास्ताविक

### १. साक्षात्कार केव्हा झाला असे समजावयाचे?

एकदा श्री. ग. वि. तुळपुळे यांनी गुरुदेवांना विचारले, साक्षात्कार झाला असे केव्हा समजायचे? त्याला उत्तर देताना गुरुदेवांनी दासबोध दशक दहावा (प्रचिती निरुपण) समास आठवा, ओव्या क्रमांक २१ ते २३ सांगितल्या. त्या ओव्या खाली दिल्या आहेत –

**पापाची खंडणा झाली । जन्मयातना चुकली**
**ऐसी स्वये प्रचित आली । म्हणिजे बरे ।।२१।।**
**परमेश्वरास बोळविले । आपण कोणसे कळले ।**
**आत्मनिवेदन झाले । म्हणिजे बरे ।।२२।।**
**ब्रह्माण्ड कोणे केले । कासायाचे उभारले ।**
**मुख्य कर्त्यास बोळखिले । म्हणिजे बरे ।।२३।।**

समर्थ रामदास या ओव्यांना, २५ व्या ओवीत परमार्थाचे वर्म म्हणतात. गुरुदेवांनी आत्मानुभवाच्या जोरावर पूर्ण साक्षात्काराची स्थिती सांगितली.

### २. साक्षात्कार हेच श्रेष्ठ जीवनमूल्य

गुरुदेवांनी ईश्वराचा साक्षात्कार स्वत:साठी करून घेतला. त्याप्रमाणे इतरांसाठीही करून त्यास सर्वश्रेष्ठ जीवनमूल्य मानले. प्राण असेपर्यंत त्यांनी हेच केले – स्वत:साठी व इतरांसाठीही.

गुरुदेवांनी त्या संदर्भात काढलेले उद्‌गार - 'देवांनी मानवास आपल्या स्वरूपात निर्माण केले' हे बायबलमध्ये म्हटलेले आहे, असे सांगून गुरुदेव पुढे म्हणतात, ''मनुष्य हे देवऋण ईश्वराच्या साक्षात्कारामध्ये, म्हणजे ईश्वराला स्वत:च्या स्वरूपात पाहून फेडतो.''

''सोहम्'च्या अनुभवात हेच अभिप्रेत आहे.

**३. जीवनमूल्याचे कथन :**

गुरुदेवांनी ह्या सर्वश्रेष्ठ जीवनमूल्याविषयी - साक्षात्कार शास्त्राविषयी आपल्या विविध ग्रंथांतून विचार मांडले आहेत. त्यांच्या ग्रंथलेखनाचा हेतू पण हाच होता. ''ईश्वरप्राप्ती हे मानवी जीवनाचे ध्येय व ते साध्य करण्याचे साधन, ही दोन्ही प्राचीन काळापासून आहेत तीच आहेत.''

ईश्वरविषयक प्रश्न हाच सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. म्हणून परमार्थिक जीवन हेच उच्चतम जीवन होय. हा सिद्धांत तत्त्वज्ञानाला व तर्कशास्त्राला मान्य आहे, हे आजही दाखविणे आवश्यक आहे, असे आपल्या A Constructive Survey of Upanishadic Philosophy (उपनिषद रहस्य) ह्या जगप्रसिद्ध झालेल्या पहिल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत गुरुदेव म्हणतात, ते पुढे लिहितात, ''बुद्धिनिष्ठ साक्षात्कार हे आज परस्परविरोधी शब्द मानले जातात, परंतु हा सर्वमान्य सिद्धांत झाला पाहिजे. माझ्या ह्या ग्रंथाने त्या कार्याला थोडे जरी साह्य झाले तरी आपल्या श्रमाचे सार्थक झाले असे मला वाटेल.''

वरील विचार गुरुदेवांनी जरी आपल्या उपनिषदांवरील ग्रंथांत मांडले असले तरी, त्यांच्या सर्व ग्रंथांतून हेच स्पष्ट जाणवतात. त्यांच्या सर्व ग्रंथांचे हेतू, मुख्य शिकवण व केंद्रीय सिद्धांत हेच आहेत. त्यांचे तत्त्वज्ञानही हेच सांगते. ते म्हणजे ''विश्वाच्या उत्पत्ति-स्थिती-लयाचे एकमेव अविनाशी कारण, सर्वांचा स्वामी, सच्चिदानंद, अनंत, अव्यय, इत्यादी अनेक गुणांनी धर्मशास्त्रात व तत्त्वज्ञानात वर्णिलेला, तो ईश्वर,

ब्रह्म, आत्मा (सर्व शब्द सामान्यत: समानअर्थी आहेत.) म्हणजे केवळ कल्पना नव्हे. तो प्रत्यक्ष आहे. विशिष्ट साधना करून आपण त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकतो. त्या अनुभवाने मनुष्याला परमानंद होतो, अमरत्व लाभते, जीवन मरणाचा फेरा चुकतो, पापांची खंडणा होते, तो ईश्वरच ब्रह्मच होतो, आत्म्याशी एकरूपता पावतो. तो आनंदच होतो. कारण ब्रह्म आनंदमय आहे. अर्थात त्याचे जीवन कृतार्थ होते.''

एखाद्या ग्रंथाच्या मूल्यमापनासाठी मीमांसा शास्त्राने जे निकष सांगितले आहेत, त्यात उपक्रम (सुरुवात), अभ्यास (पुन्हा पुन्हा सांगणे) उपसंहार (शेवट) वगैरेंचा समावेश आहे. गुरुदेवांच्या संपूर्ण लेखन संपत्तीचे संकलित मूल्यमापन करायचे झाले तर नित्यनेमावलीची प्रस्तावना (नित्य नेमावली ही त्यांनी गुरुच्या आज्ञेनुसार तयार केलेली संप्रदायाची भजनावली – त्या भजनावलीस आपले नाव न घालता त्यांनी लिहिलेली अप्रतिम प्रस्तावना) ही सुरुवात (उपक्रम) व The Bhagavadgita as a Philosophy of God Realisation (भगवद् गीता : आत्म साक्षात्काराचे तत्त्वज्ञान) हा ग्रंथ उपसंहार म्हणता येईल. बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवादाच्या सिद्धांताची ह्या प्रस्तावनेत सुरुवात होऊन इतर सर्व ग्रंथांतून त्याचा अभ्यास (दृढीकरण) होत होत उपसंहारात त्याचा कळस झाला आहे. कालक्रमाचा दृष्टिकोन व तार्किक दृष्टिकोन यांचा याहून सुंदर मिलाफ, सुरस संगम सापडणे कठीण.

**४. ग्रंथलेखनाची शैली :**

ग्रंथातील विचारांकडे वळण्याआधी त्यांच्या शैलीबद्दल विचार करणे जरूरीचे आहे. ''आपुली स्थिती अनुमाना । येवोच नेदी ।'' ह्या समर्थ वाक्याप्रमाणे आपले पहिले ग्रंथ त्यांनी लिहिले. त्यामध्ये स्वत:चा उल्लेख निक्षून टाळला आहे. आपली मते त्यांनी स्वतंत्रपणे मांडली नाहीत, ते संतांच्या मुखातून बोलतात. त्या पाठीमागे संतश्रेष्ठांनी जगाला इतके देऊन ठेवले आहे, मग आणखी नवीन काय सांगावयाचे ही भूमिका

असावी. सिद्धांतांचे विवरण करताना, ते सिद्धांत कुणीतरी पूर्वीच्या विचारवंतांनी सांगितले आहेत, असा त्यांचा उगम सांगून आपण मागे राहतात. त्यामुळे सिद्धांतातील मतांची अधिकृतता आपोआप सिद्ध होते.

ते प्रत्येक ग्रंथ लेखनाआधी मूळ ग्रंथांतून आपल्या तत्त्वज्ञानाशी सुसंबद्ध असे वेचे निवडत. त्या वेच्यांमधून योग्य प्रकारे सुसंबंद्ध प्रणाली तयार करत. हे मूळ वेचे व त्यामधील विचारांची विशिष्ट हेतुपूर्वक केलेली मांडणी हा त्यांचा विधायक मीमांसा पद्धतीचा पाया (Foundation) आहे.

**पहिला टप्पा**

**५. साक्षात्कारशास्त्राच्या तत्त्वज्ञानाचा ग्रंथातून घडणारा विकास व वृद्धी :**

मूळ सिद्धांताची जडणघडण करताना त्यांनी साक्षात्कार शास्त्राच्या तत्त्वज्ञानाचा विकास आपल्या ग्रंथांतून कसा केला हे स्पष्ट होते.

**५ (अ) अंतिम सत्याच्या स्वरूपाचा प्रश्न :**

विश्वाच्या अंतिम सत्याचा साक्षात्कार हा ईश्वराचा साक्षात्कार असून त्याचे दर्शन घडवणे असेल तर त्या ईश्वराचे, अंतिम सत्याचे स्वरूप काय आहे हे ठरविणे प्रथम क्रमप्राप्त आहे. उपनिषदावरील समालोचनाच्या ग्रंथामध्ये गुरुदेवांनी ह्या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केली आहे.

ते म्हणतात, ''जर आपण तत्त्वज्ञानातील मतप्रणालीच्या इतिहासाकडे पाहिले तर अंतिम सत्याच्या स्वरूपाच्या प्रश्न उकलण्यासाठी जिज्ञासू लोकांनी अनेक प्रकारे प्रयत्न केल्याचे दिसते. त्यातील तीन मुख्य दृष्टिकोन : विश्वशास्त्रीय, आधिदैविक व मानसशास्त्रीय. Dr. Caird (केअर्ड) यांच्या म्हणण्यानुसार मनुष्य स्वभावास अंतिम सत्याचा विचार करताच येत नाही. ते म्हणाले,

''त्यास बाह्य सृष्टीकडे पाहता येते. नंतर आत आलेल्या 'मी'कडे, अंतरातील जीवात्म्याकडे पाहता येते, मग वर असलेल्या देवाकडे दृष्टी वळविता येते. जो अंतर–बाह्य जगास एकत्र करतो व दोन्हीमध्ये व्यक्त होतो!''

उपनिषद्कालीन ऋषींनी अंतिम सत्याचा शोध ह्या तीनही प्रकारांनी केला.

**५ (ब) विश्वशास्त्रीय दृष्टिकोनातून शोध :**

छांदोग्य उपनिषद, अध्याय ६, खंड १२ मधील ही गोष्ट आहे.

पिता श्वेतकेतूस सांगतात, ''पुत्रा, वडाचे फळ इकडे आण.'' 'भगवन हे घ्या.', 'ते फोड पुत्रा', फोडले महाराज', पिता विचारतो. ''त्यात तुला काय दिसते आहे?'' ''भगवन्, मला ह्या असंख्य लहान बिया दिसत आहेत.''

''त्यातील एक बी फोड.'', ''फोडली महाराज.'' परत पिता पुत्रास ''त्यात काय दिसते?'' ''काही नाही महाराज?''

जेव्हा त्यास पिता म्हणाला, ''हे सोम्य, वटबीज फोडले असताही, तू ज्या वटबीजाच्या मूलतत्त्वास, (essence) आणि आत्म्यास पाहू शकत नाहीस त्याच तत्त्वाचा हा महान वटवृक्ष होऊन उभा आहे. हे सौम्य, सूक्ष्म सत् पासूनच ही स्थूल नाम उपयुक्त सृष्टी निर्माण झाली आहे. यावर विश्वास ठेव. ते जे तत्त्व आहे तेच सत्य आहे. ते म्हणजे आत्मा व हे श्वेतकेतो, हे तत्त्व म्हणजे जो आत्मा तो तू आहेस.''

बाह्य सृष्टीचे तत्त्वसार जाणण्याच्या प्रयत्नावर म्हणजेच विश्वाच्या उत्पत्तीचा शोध घेण्याच्या प्रयत्नावर पडणारी मर्यादा उल्लंघण्यास मानसशास्त्रीय वर्गीकरणाचा (Categories) आधार घ्यावा लागतो. मानसशास्त्रीय सृष्टीच्या मागे असणारे तत्त्व हेच बाह्यसृष्टीचे सारभूत तत्त्व आहे, हे मान्य करावे लागते.

### ५ (क) आधिदैविक दृष्टिकोनातून शोध :

बृहद् आरण्यकामधे शाकल्य व याज्ञवल्क्य ह्यांच्या वादविवादामध्ये याज्ञवल्क्यांनी शाकल्यास ''जगात देव किती आहेत?'' याचे प्रथम उत्तर ३०३ असे दिले. ही संख्या शेवटी कमी करत एकाच देवावर येऊन, पृथ्वी ज्याचे शरीर आहे, अग्नि डोळे आहेत, ज्योती ज्याचे मन आहे व जो सर्व जीवात्म्यांचे आश्रयस्थान आहे, तोच विश्वाचा खरा अधिपती व ईश्वर आहे, असे दोघांचे एकमताने ठरले.

श्वेताश्वेतरमध्ये रुद्र म्हणजेच तो देव होय, जो आपल्या सामर्थ्याने सर्व विश्वाचे राज्य चालवितो. तोच सर्वांचा आधार. निर्माणकर्ता व संहारक आहे. काळाचा काळ आहे. असा हा सगुण ईश्वर, जगाचे आदिकरण व सर्व जीवांचा आत्मा आहे.

आधिदैविक विचार प्रणालीलादेखील आत्मरूप देवच, अंतिम सत्य असल्याचे म्हणावे लागले.

### ५ (ड) ईश्वराची सर्वव्यापकता :

सर्व चराचर व्यापून प्रत्येक जीवामध्ये ईश्वर असल्याच्या निर्णयास उपनिषदकार पोहोचले होते.

छांदोग्य उपनिषदामधील एका गोष्टीमध्ये याचे मार्मिक वर्णन आहे. एका गुरुने आपल्या शिष्यास मिठाचा एक खडा रात्री पाण्यात टाकून ते पाणी सकाळी घेऊन येण्यास सांगितले. शिष्य त्याप्रमाणे करून ते पाणी घेऊन आला. गुरुने मिठाचा खडा दाखविण्यास सांगितले. मीठ विरघळल्यामुळे शिष्यास खडा दाखविता येईना. जेव्हा गुरुने त्यास वरचे, मधले व खालचे अगदी थोडे पाणी चाखण्यास सांगितले. शिष्य तसे करून सर्वच पाणी खारट लागले आहे असे म्हणाला. पण ''मीठ जरी अदृश्य झाले असले तरी ते पाण्याच्या प्रत्येक अणूमध्ये भरून राहिले आहे, त्याचप्रमाणे आत्मा जरी डोळ्यास दिसत नसला तरी वस्तुत: तो सर्व विश्व भरून राहिला आहे,'' असे गुरुने त्यास सांगितले.

## ६. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून शोध :

## ६ (अ) शरीर व मनाच्या पृथक्करणाच्या साहाय्याने शोध :

केन उपनिषदात म्हटले आहे, ''आत्मा कानाचा कान, मनाचे मन, वाचेची वाचा, प्राणाचा प्राण, डोळ्याचा डोळा आहे. अशा आत्म्याचे ज्ञान ज्यास होते, ते इहलोकाच्या बंधनापासून मुक्त होऊन अमर होतात. ...जे वाचेला सांगता येत नाही व ज्याच्या शक्तीमुळे वाचा प्रकट होते तेच ब्रह्म जाण; लोक ज्याची उगीच ब्रह्म म्हणून उपासना करतात ते खरे ब्रह्म नव्हे. ज्याविषयी विचार करण्यास मन असमर्थ आहे, व जे मनाविषयी विचार करते तेच ब्रह्म जाण; जे डोळ्यास पाहता येत नाही व जे डोळ्यास पाहते तेच ब्रह्म जाण; जे कानास ऐकता येत नाही व ज्यामुळे आपणास कानाचे ज्ञान होते तेच ब्रह्म जाण; ज्याचा प्राणास श्वासोच्छवास करीता येत नाही व जे प्राणाचाच श्वासोच्छवास करीते तेच ब्रह्म परम सत्य आहे असे जाण.''

याप्रमाणे जाणीव/चैतन्य/आत्मा हाच आंतरिक अस्तित्व आहे व इतर शारीरिक व मानसिक विषय म्हणजे आत्म्याची उपाधीरूप बाह्य आवरणे आहेत, अंतिम सत्य नव्हेत अशा निर्णयापर्यंत उपनिषदकार आले.

## ६ (ब) जाणिवेच्या अवस्था :

छांदोग्य उपनिषदात मनाच्या सर्व अवस्थांचे सूक्ष्म पृथक्करण करून जागृती–स्वप्न–सुषुप्तीमधील जाणीव म्हणजे खरा आत्मा नसून त्यात खरे ब्रह्मज्ञान होत नाही, असा निष्कर्ष काढला. नंतर आत्मा हा शुद्ध स्वसंवेद्य स्वरूपाचा आहे हे सत्य कथन केले आहे. प्रजापती, इंद्राच्या १०१ वर्षांच्या तपश्चर्येनंतर हे गुह्य समजावून देतात. प्रजापती म्हणतात, ''इंद्रा हे सत्य आहे की हे शरीर नाश पावणारे आहे. पण तसेच ते अविनाशी आत्म्याचे आवरणपण आहे. जेव्हा आत्मा शरीर धारण करतो, तेव्हा त्यास सुख–दु:खाची जाणीव होते. शरीराचा त्याग

केल्यानंतर त्यास सुखही नाही व दु:खही नाही. ज्याप्रमाणे वायु व अभ्र, विद्युत व मेघगर्जना ह्यास शरीर नाही आणि ती आकाशात उत्पन्न होऊन स्वत:च्या स्वरूपात प्रकट होतात, त्याचप्रमाणे ही संप्रसन्न (Serene) आत्मा या मर्त्य शरीरातून निघून परमज्योतीत मिळून मग स्वस्वरूपाने प्रकट होतो. हाच परम पुरुष होय. अंतिम स्वरूप हे स्वसंवेद्य स्वरूपाचे आहे'', हे यावरून स्पष्ट होते. जे आपल्या स्वत:च्या साह्याने आपल्यास पाहते, जे स्वसंवेद्य परा (Supreme) विद्येच्या प्रकाशात आपण आत्मरूप आहोत असे ओळखते, तेच अंतिम सत्य असे जाणावे. अंतिम सत्याची अवस्था, ज्यामध्ये आत्म्यास केवळ स्वत:चीच जाणीव असते ती कल्पनागम्य, उन्मन व स्वयंसाक्षी असते.

**७. सत्ताशास्त्रीय (ontological) व्यक्तिवाद :**

ऐतरेय उपनिषदात म्हंटले आहे 'सर्व स्वर्गीय देव, पृथ्वीवरील सर्व अंडज, जारुज, स्वेदज व उद्‌भिज्ज प्राणी व स्थिर आणि चर प्रत्येक वस्तू स्वसंवेद्य स्वरूपात, स्वसंवितात (self-consciousness) मध्ये स्थित–प्रतिष्ठित आहेत. स्वसंवित्‌च ब्रह्म आहे!

येथे नि:संदिग्धपणे सत्ताशास्त्रीय सिद्धांत दिसतो. तो म्हणजे अंतिम अस्तित्वाची ओळख स्वसंवितात आहे. स्वसंवित् हे एकच अंतिम सत्य आहे.

**८. स्वसंवित्‌चे महत्त्व :**

या नंतर सर्वात मोठा प्रश्न उपनिषदकारांपुढे उभा राहिला तो म्हणजे, स्वसंवित्‌च जर अंतिम सत्य आहे, तर ते जाणून घेण्याचा मार्ग कोणता? केवळ बुद्धीच्या जोरावर अंतिम सत्याचे ज्ञान मिळविता येते, का बुद्धिगम्य नसलेल्या एखाद्या श्रेष्ठ मार्गाचा अवलंब केल्याने ते प्राप्त होते? ह्याचे उत्तर देताना ते म्हणतात बुद्धीचा येथे काही उपयोग होत नाही, ती पंगु होते स्वसंवित् हे अनुभवायचे असते. याचा विचार पुढे येईल.

प्रथम स्वसंवित्‌चा विचार इंद्रिय ज्ञानदृष्ट्या (epistemologically) करू या.

'ज्ञान' या शब्दाचा पारिभाषिक अर्थ म्हणजे एखाद्या जड वस्तूचे इंद्रिय व मनाद्वारे होणारे संस्कार व त्यातून प्रतित होणारा, निष्कर्ष काढलेला त्या वस्तूचा अर्थ. या प्रकाराचे आत्म्याचे ज्ञान होणे शक्य नाही, असे उपनिषदात अनेक ठिकाणी प्रतिपादले आहे.

आत्म्याचे खरे स्वरूप अज्ञेयच आहे, असे उपनिषदकार म्हणतात. केनोपनिषद म्हणते, 'जेथे चक्षु पोहोचू शकत नाही, जेथे वाक् अथवा मन जाऊ शकत नाही, त्याबद्दल कोणती कल्पना करता येणे शक्य आहे? केवळ असे म्हणता येईल की सर्व ज्ञात व अज्ञात वस्तूंच्या पलीकडे आहे.'

आत्म्याच्या या अज्ञेयत्त्वाविषयी उपनिषदकारांनी दुसऱ्या प्रकारे पण विचार केला आहे. 'ज्यास सर्वांचे ज्ञान आहे त्यास कोण जाणणार? विज्ञात्याचे ज्ञान होणे अशक्य आहे.' 'आत्मा अदृश्य राहून सर्वांस पाहतो; आपण श्रवणाचा विषय न होता सर्व ऐकतो; आपण विचारातील असून सर्वांचा विचार करतो; आपण अज्ञात राहून सर्व जाणतो; त्याच्याशिवाय या दुसरा कोणीही पाहणारा, ऐकणारा, विचार करणारा किंवा जाणणारा नाही.'

आत्मा निखिल सृष्ट पदार्थांचा सनातन ज्ञाता असून त्याचा ज्ञाता दुसरा कोणीही नाही, असे गृहीत धरले तरी त्या अनादी सर्वज्ञास आपल्या स्वतःचे ज्ञान होते काय? असा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न येथे उपस्थित होतो.

बृहदारण्यकोपनिषदात एके ठिकाणी हाच अत्यंत सूक्ष्म प्रश्न याज्ञवल्क्याने केला असून त्याने त्याचे मोठे सुंदर व समर्थक उत्तर दिले आहे. ''ज्ञात्यास आपल्या स्वतःचे ज्ञान होणे पूर्णपणे शक्य आहे. इतकेच नव्हे तर वस्तुतः आत्मज्ञान किंवा स्वसंवित् म्हणजेच

अस्तित्वाची (सत्याची) अंतिम अवस्था होय असे ठामपणे व निःसंदिग्धपणे प्रतिपादले आहे. आत्मा किंवा स्वसंवित् हे अस्तित्वाचे अंतिम सत्य आहे म्हणून स्वसंवित शक्य नसेल तर कोणत्याच प्रकारचे ज्ञान शक्य नाही, असे याज्ञवल्क्याचे मत आहे. आत्मनिरीक्षण व आत्मज्ञान ही अनुभवजन्य अंतिम सत्ये आहेत असे तो म्हणतो. आत्मज्ञान, स्वसंवित् या परतत्त्वज्ञानातील सत्याशी, आत्मनिरीक्षण ही मिळती-जुळती मानसिक प्रक्रिया आहे व आत्मनिरीक्षणानेच आत्मज्ञान, स्वसंवित् प्राप्त होते. आपल्या स्वतःचेच दोन परस्परविरोधी विभाग करण्याची परमश्रेष्ठ शक्ती आत्म्याच्या जागी आहे. इंद्रियजन्य ज्ञानास लागणारी साधने व परिस्थिती आत्म्यास लागू नाहीत. त्यास स्वतःच ज्ञान व ज्ञेय होता येते.''

याज्ञवल्क्य जनकराजास उत्तर देतो, ''चंद्र, सूर्य मावळल्यानंतर व अग्नी विझल्यावर स्वतः आत्माच आपली ज्योति आहे.'' ही संकल्पना ॲरिस्टॉटल जिला 'थिओरिया' चिदानंदाची अवस्था म्हणतो तिच्याशी साम्य दर्शवते. जी शुद्ध आत्मरत विचारांची वृत्ती असते. ज्यामध्ये आत्माच अत्यंत गूढपणे ज्ञात व ज्ञेय होतो.

**दुसरा टप्पा**

इ. स. १९२६ साली उपनिषदांवरील आपल्या ग्रंथानंतर इ. स.१९३३ साली Mysticism in Maharashtra या ग्रंथाची प्रसिद्धी केली.

या ग्रंथामधील विस्तृत प्रस्तावना व संदर्भ ग्रंथांचा संक्षिप्त रीतीने घेतलेला आढावा या दोन्हीमध्ये मांडलेले तौलनिक साक्षात्कार शास्त्रातील विचार अत्यंत बहुमोल आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये त्यांचा विचार करणार आहोत.

**९. साक्षात्काराची व्याख्या :**

प्रस्तावनेची सुरुवात ''Mysticism denotes that attitude

of mind which involves a direct, immediate, first hand, intuitive apprehension of God'' अशा व्याख्येने होते.

''साक्षात्कार मनाची एक अशी वृत्ती आहे, ज्यामध्ये ईश्वराचे प्रत्यक्ष, तत्काळ, साक्षात व प्रातिभ (इंद्रियातील) ज्ञान होते.''

ही व्याख्या अत्यंत सोपी व स्पष्ट आहे. ह्या व्याख्येमुळे साक्षात्कारशास्त्र व इतर मानवी मनास अगम्य असणारी शास्त्रे, ज्यांच्याभोवती गूढतेची वलये असतात, ह्यांना विभागणारी रेषा स्पष्ट होते, व्याख्या व्यापकही आहे. ती पारमार्थिक अनुभवांचे गुणधर्म दर्शविते. ते प्रतिभा शक्तीमुळे प्राप्त होतात हे स्पष्ट करते व त्यामधील दैवी मोलावर अचूक बोट ठेवते. जरी पारमार्थिक अनुभव प्रत्यक्ष असले तरी ते इंद्रियजन्य नसून इंद्रियातीत असतात. जणू काही इंद्रियातर्फे झाल्याप्रमाणे वाटतात.

अनुभव तात्काळ असल्यामुळे वाहवत जाणारे (non-discursive) नसतात. साक्षात्कार म्हणजे देवाचे भक्तिपूर्ण प्रातिभ दर्शन. mysticism चा अर्थ तोंड बंद ठेवणे म्हणजेच उपनिषदातील 'मौन' असा आहे. देवाचा शांतपणे घेतलेला परमानंद शब्दांकित करणे अशक्य आहे.

**१०. साक्षात्काराची वैशिष्ट्ये**

गुरुदेवांनी साक्षात्काराची तीन वैशिष्ट्ये सांगितली आहेत :

(अ) साक्षात्कार प्रातिभ आहे – Intuitive

(ब) तो अंतर्निर्मित आहे – centrally initiated.

(क) तो अतींद्रिय आहे – Supersensousness.

गुरुदेवांच्या साक्षात्कार मंदिराचे हे स्तंभ आहेत. म्हणून मूळ इंग्रजीतील उतारे खाली देऊन अर्थ दिले आहेत. महत्त्वाच्या गोष्टींबद्दल ही पद्धत अवलंबिली आहे.

**(आ) Intuitive (प्रातिभ) :**

It has been very often supposed that, for mystical

experience, no seperate faculty like intuition need be requisitioned, but that intellect, feeling and will might suffice to enable us to have a full experience of God. Now it is a matter of common knowledge that even for heights to be reached in artistic, scientific or poetic activity, a certain amount of direct, immediate, intuitive contact with reality is required. Far more this is the case in the matter of mystical experience. Intuition far from contradicting intelligence, feeling or will does penetrate and lie... the back of them all. Intuition will not deny to Mysticism a title to philosophy if intellect requires it. As it cannot be determinative effort towards the acquisition of Reality; it implies a definite prolonged and continuous exercise of the will. As feeling brings the subject and object into more intimate contact than any other pyschological process; it also becomes a vital part of the process of realisation. Thus it seems that intelligence, will and feeling are all necessary in the case of mystical endeavour. Only intuition must back them all..."

**अर्थ :-** 'अनेकदा असे मानण्यात येते की साक्षात्कार होण्यासाठी एखाद्या वेगळ्या शक्तींची गरज असू शकते असे नाही. केवळ बुद्धी, इच्छाशक्ती व भावनेच्या बळावर देवाचे पूर्ण ज्ञान अनुभवता येते. परंतु सर्वसाधारणपणे असे दिसते की, उच्चतम कलाकृतीच्या निर्मितीसाठी, वैज्ञानिक शोधासाठी वा काव्यकृती घडण्यास थोडा तरी प्रत्यक्ष, तात्काल व प्रातिभ ब्रह्मसंपुष्य आवश्यक असतो. तर मग

साक्षात्कारासाठी काही वेगळे का असेल? प्रातिभशक्ती-बुद्धी, इच्छाशक्ती व भावनेशी विसंगत नसून ती त्यांचा भेद घेत मुळाशी जाऊन, त्यांच्या मागे कार्यरत असते. बुद्धी जर तत्त्वज्ञानासाठी वेगळी संज्ञा शोधील, तर प्रातिभशक्ती साक्षात्कारासाठी ते नाकारणार नाही. साक्षात्कार होण्यास दीर्घ, निरंतर, अविरत श्रमांची निकड असते. हे जबरदस्त इच्छाशक्तीशिवाय अशक्य आहे. कुठल्याही मानसिक प्रक्रियेपेक्षा भावना, ज्ञेय व ज्ञात्यातील अंतर परिणामकारकरीत्या कमी करू शकली, तर मग भावांची साक्षात्कारामध्ये महत्त्वाची भूमिका असते. यावरून असे दिसून येते की, साक्षात्कारासाठी करावयाच्या प्रयत्नांमध्ये बुद्धी, इच्छाशक्ती व भावना या तिन्हींची गरज आहे.''

गुरुदेव परत एका ठिकाणी म्हणतात :-

'तत्त्वज्ञानाची भिंत अथवा त्याचे तारेचे कुंपण, धर्माचे संरक्षण आत घुसणाऱ्या भटक्या जनावरांपासून करते. बुद्धीही जन्मजात तिच्या सहज प्रवृत्ती प्रातिभ शक्तीच्या मध्ये अधिष्ठित असते. सहज प्रवृत्ती ही बुद्धीची न्यूनतम पातळी, तर प्रातिभ शक्ती ही उच्चतम होय. प्रातिभ शक्तीस दृष्टीची तात्काळता व प्रत्यक्षता असते. सहज प्रवृत्तीही बुद्धीची न्यूनतम पातळी, तर प्रातिभ शक्ती ही उच्चतम होय. प्रातिभ शक्तीस दृष्टीची तात्काळता व प्रत्यक्षता असते व निश्चित स्वरूपात असते. दृष्टीची तात्कालता व प्रत्यक्षता क्षणिक असते.

शिवाय तत्त्वज्ञान्यांचे कार्य म्हणजे चिंतन करणे, तर्क करणे व मुद्दे मांडून मनाचे समाधान करणे होय. प्रातिभ शक्तीस देवाचे अनुभवजन्य ज्ञान तर्क न करता होते. नेहमीची अनुमाने या बाबतीत कुचकामी ठरतात. तसेच नेहमीचे 'प्रत्यक्ष' पण असमर्थ होय. कारण ते इंद्रियांना घडणारे असल्याने शारीरिक स्वरूपाचे असते. निश्चित निकष म्हणजे अनुभूती जी संम्राधनच्या अवस्थेत घडते; ज्यात यौगिक तऱ्हेचे प्रत्यक्ष व प्रातिभ दर्शनामुळे पूरक असे अनुमान स्थित असते.'

गुरुदेवांनी ब्रह्मसूत्र ३.२.२४

**'आपि संराधने प्रत्यक्षानुमानाभ्यां ।।'**

प्रातिभ शक्तींमुळे साक्षात्कार घडतो हे सांगण्यास घेतले आहे. ते म्हणतात,

"The word Samradhana in the sutra means samyak aradhana - worshipful contemplation. If mere is another entity, man can worship.But where there is no. there is no worship. It is philosophical meditation. The ordinary kind of Pratyaksa is out of court here as there cannot be a sense perception of God. Badarayana (implies) Atindriya Pratyaksa in his mind, not ordinary perception but intuitive vision."

**अर्थ :-** 'सम्राधना म्हणजे सम्यक आराधना पूजनातील प्रेमादराने केलेले अवलोकन - पूजेस समोर दुसरे काही तरी हवे. (ज्याची पूजा करावयाची, ते). साक्षात्कारात, पूर्ण अद्वैत अवस्थेमध्ये पूजा नाही. ते तत्त्वज्ञानी अंतर्निरीक्षण आहे. (ध्यान अंतर्निरीक्षणानेच साध्य आहे.) नेहमीचे प्रत्यक्ष येथे विसंवाद ठरते. कारण देवाचे ज्ञान इंद्रियास होत नाही. बादरायणाच्या मते हे अतिंद्रिय प्रत्यक्ष असून नेहमीचे दिसणे नव्हे तर प्रातिभ दर्शन होय.'

**साक्षात्काराचे ज्ञान प्रामाण्य प्रातिभतेमध्येच का?**

भारतीय तत्त्वज्ञान प्रणालीतील पुरस्कर्ते व त्यांनी ग्राह्य मानलेली प्रमाणे खाली दिली आहेत.

१) चार्वाकांना - 'प्रत्यक्ष' हेच प्रमाण होते.

२) वैशेषिकांना - प्रत्यक्ष व अनुमान हे प्रमाण मान्य होते.

३) सांख्यांना - प्रत्यक्ष, अनुमान व शब्द हे तीन प्रमाण मान्य होते.

४) तैय्यायिकांना – प्रत्यक्ष, अनुमान, शब्द व उपमान हे प्रमाण ग्राह्य होते.

५) प्रभाकराला – प्रत्यक्ष, अनुमान, शब्द, उपमान व अर्थापत्ती हे प्रमाण ग्राह्य होते.

६) किमारिलास – प्रभाकराचे पाच व अनुपलब्धी असे सहा प्रमाण ग्राह्य होते.

वरील प्रमाणांचा विचार तीन टप्प्यांमध्ये गुरुदेवांनी केला आहे तो असा.

१) अनुपलब्धी व प्रत्यक्ष.

२) अनुमान, उपमान व अर्थापत्ती.

३) शब्द.

**(अ) अनुपलब्धी :**

अभावाचे अथवा अस्तित्वात नसलेल्या गोष्टींचे ज्ञान होण्यासाठी अनुपलब्धीने योजना केली आहे. एखादे पुस्तक नाही याचे ज्ञान ते पुस्तक दृष्टीस न पडल्याने घडते. अनुपलब्धीने होते. परंतु अभावास स्वतंत्र वर्ग किंवा प्रकार म्हणून मानण्याचे काहीच कारण नाही. त्यामुळे अनुपलब्धीचे प्रामाण्य कोसळते.

अनुपलब्धीची योजना 'अभावाचे' ज्ञान घडण्यासाठी केली आहे, असे चोरास पकडण्यास दुसऱ्या चोराने नियोजन करावे. जे काही अस्तित्वात नाही त्याचे ज्ञान होण्यास अनुपलब्धीची आवश्यकता आहे, असे म्हटल्याचे होईल.

अभाव म्हणजे अस्तित्व नसणे. म्हणजेच नकारार्थी कल्पना. नकारार्थी गोष्टींसाठी प्रामाण्याची योजना करणे म्हणजे नसलेल्या गोष्टीचे अस्तित्व मान्य करण्याजोगे आहे. हा प्रयत्न हास्यास्पद आहे. जोपर्यंत 'अभाव' हे पूर्णत: नकारात्मक आहे, तोपर्यंत त्यासाठी प्रामाण्याची गरज नाही. जेव्हा त्यास सकारात्मक अथवा अस्तित्वाची भूमिका आपण


देऊ तेव्हा 'प्रत्यक्ष' प्रामाण्याने त्याचे ग्रहण करता येईल.

प्रत्यक्ष : आपला दैनंदिन व्यवहार, आपणास इंद्रियाद्वारे प्रत्यक्ष होणाऱ्या ज्ञानावर अवलंबून असतो. हे आपण जाणतोच. ज्यास आपण प्रत्यक्ष म्हणून संबोधतो ते ज्ञान, अगदीच अप्रत्यक्ष किंवा परोक्ष आहे.

**'इंद्रियार्थसन्नकर्षजन्यं ज्ञान प्रत्यक्षात् ।'**

अशी प्रत्येक ज्ञानाची व्याख्या वैयायिकांनी केली आहे. प्रत्यक्ष ज्ञानामध्ये इंद्रियाचा त्यात या विषयाशी सन्नकर्ष म्हणजे संबंध किंवा स्पर्श प्रस्थापित होण्याने प्रत्यक्ष ज्ञान उत्पन्न होते. येथे मुख्य भर या संबंधावर दिला आहे.

डेसकार्ट आपल्या अनुमानाची सुरुवात इंद्रियांकडून होणारे ज्ञान हे फसवे आहे या उक्तीपासून करतो. आपल्याला दृगोच्चर होणारा सूर्य एका तबकडीएवढा दिसतो. भ्रम निर्माण करणाऱ्या देखाव्यावरून इंद्रियं आपणास फसवतात हे स्पष्ट होते. वेटोळ्यात पडलेला दोर रात्रीच्या वेळी आपल्या मनात सर्प असल्याचा भ्रम निर्माण करतो.




वरील चित्रातील रेघा 'अब' व 'कड' सारख्याच लांबीच्या आहेत. पण दृष्टीस 'कड' रेघ 'अब' पेक्षा लांब दिसते.

तेव्हा इंद्रिय ज्ञानास अनुमानाने पडताळून योग्य निष्कर्ष घ्यावा लागतो. या प्रमाणेच माणसाचे वर्तन घडते. हे झाले लौकिकातील प्रत्यक्ष म्हणजेच अतिंद्रिय ज्ञानाबद्दल पुढे बघणार आहोत.

**उपमान :**

वैयायिक व मीमांसकांच्या मते उपमान हे एक स्वतंत्र प्रमाण्य आहे. भिन्न गोष्टींतील साम्य दर्शविण्यासाठी (उदाहरण – हृदय पंपासारखे

आहे) केलेल्या विधानास उपमान म्हणतात. अशी विधाने फक्त साम्य सूचित करते. निश्चित रूपाने निष्कर्ष काढीत नाही.

समजा दोन प्रशाला आहेत, दोन्ही वास्तू तीन मजल्यांच्या आहेत. दोन्हींची पटांगणे, विद्यार्थी संख्या इत्यादी सारख्याच आहेत. त्याचा अर्थ असा होत नाही की, एक प्रशाला दुसरीपेक्षा चांगली आहे. साम्य फक्त सूचित करते. त्यावरून अनुमानच घ्यावे लागते. म्हणून उपमान हे स्वतंत्र प्रामाण्य ठरू शकत नाही.

**अर्थापत्ती :**

अर्थापत्तीस ध्वन्यर्थ असे म्हणता येईल.

**'लठ्ठ देवदत्त दिवसा खात नाही,'**

असे विधान घेतले. यावरून असे म्हणता येईल, देवदत्त रात्री खातो. (तो लठ्ठ आहे व दिवसा खात नाही म्हणून)

अर्थापत्तीहून संभाव्य गृहीत गोष्ट कळू शकते. नक्की निष्कर्ष घेता येत नाही. जर अर्थापत्तीतून अनुमान काढावयाचे झाल्यास अर्थापत्तीची गरजच काय?

**अनुमान :**

अनुमानाचे सुप्रसिद्ध घाऊक विधान म्हणजे –

सर्व मानव मर्त्य आहेत.

सॉक्रेटिस एक मानव आहे.

म्हणून सॉक्रेटिस मर्त्य आहे.

अनुमान ज्ञान संपादण्याचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे.

पण काही तत्त्वज्ञांच्या मते अनुमान जर तर्काधिष्ठित विधान असते, तर त्याच्या खंडनासाठी दुसरे तर्काधिष्ठित विधान मांडता येते व ही साखळी अशीच चालू ठेवता येईल.

अनुमानास स्वतंत्र प्रामाण्याचा दर्जा द्यावयाचा असेल तरी ते दोषरहीत होऊ शकत नाही.

**शब्दप्रामाण्य :**

प्रसिद्ध प्रमाणांपैकी सर्वप्रथम जर कोणते प्रमाण उपयोगात येत असेल तर ते म्हणजे शब्दप्रमाण होय. आईला शब्दोच्चार करून बालकाच्या ठिकाणी प्रत्यक्ष ज्ञान मिळविण्याचे सामर्थ्य उत्पन्न करावे लागते. जसे की 'हा कुत्रा आहे', 'ही काकडी आहे' इत्यादी.

या शब्दज्ञानाच्या मदतीशिवाय बालकाचे ज्ञान पांगळे राहील. जेथे शब्दज्ञानाशिवाय प्रत्यक्ष ज्ञानही शक्य होत नाही, तेथे अनुमान कसे काही करू शकेल? म्हणून शब्द हे प्राथमिक प्रमाण.

तत्त्वज्ञान्यांची शब्दप्रामाण्याबद्दल अनेक मते आहेत. वैशेषिक शब्द प्रमाण मानतच नाहीत. उपनिषदात... सांख्य दृष्टिकोन दिला आहे, असे मानून सांख्य प्रमाणास ग्राह्य धरतात. नैयायिकाना ते मान्य आहे; पण देवास शब्दासमोर गौण करतात. सांख्यांच्या मते देवापेक्षा शब्दप्रमाण वरचे आहे, तसेच त्यांना देवाचे अस्तित्व मानण्याची जरूरी पण नाही. जास्तीतजास्त देव म्हणजे देवता.

जर शब्दाचा अर्थ आपण अनादि ध्वनी – ज्याचे फक्त अनुभवजन्य ज्ञानच शक्य आहे, असा न घेतल्यास शब्दप्रामाण्य कर्मकांडातील विशिष्ट शिकवण यापुरतेच मर्यादित राहील.

यावरून असे दिसून येईल की, 'अनुभव' हा सत्याचा एकच निकष आहे.

**अनुभव हाच अपरोक्ष ज्ञानाचा निकष**

अनुभवाचे स्वरूप मानसिक व परतत्त्वज्ञान दृष्टिकोनातून पाहिल्यास अनुभवांचे स्वरूप तात्कालिक, साक्षात, माध्यम विरहीत व प्रक्षेने घडणारे असे दिसते.

हे ज्ञान संज्ञेने होते यासंबंधी विचार करू.

(अ) पातंजल योगसूत्र ४८

**ऋतंभरा तत्र प्रज्ञा ।।**

जो साधक समाहित चित्त... निर्विचार समाधीची विशारद्य ही अवस्था प्राप्त करून घेतो, व्याख्या चित्तात विपर्यस्त ज्ञानाचा गंधही उरत नाही. ते केवळ ऋत म्हणजे यथार्थ – सत्य अशा ज्ञानाचेच ग्रहण करीत असल्यामुळे समाहित चित्त योग्याच्या प्रज्ञेला 'ऋतंभरा प्रज्ञा' अशी संज्ञा योगशास्त्रात दिली आहे.

**(ब) ऋतानुमान प्रज्ञाभ्यामन्याविषया विशेषार्थत्वात् ।।४९।।**

श्रुत म्हणजे आगम वेद. वेदांच्या शब्दांपासून जे ज्ञान होते ती श्रुतप्रज्ञा. अनुमान प्रमाणाने जे ज्ञान होते ती अनुमान प्रज्ञा. या दोन्ही प्रज्ञांच्या योगाने होणाऱ्या सामान्य ज्ञानापेक्षा वरील ऋतंभरा प्रज्ञेचा विषय अन्य म्हणजे त्या दोहोंच्या विषयांहून भिन्न असतो. कारण तिच्या योगाने विशेषार्थाचे ग्रहण होत असते.

ज्ञानेश्वर म्हणतात –

**'जे दिठीही न पविजे । ते दिठीविण देखिजे ।**
**जरी अतिंद्रिय लाहिजे । ज्ञानबळ ।।३।।'**
**'तिये सिद्ध प्रज्ञेचेनि लाभे । मनाचे सारस्वते दुभे ।**
**मग सकळ शास्त्रे स्वयंभे । निघती मुखे ।।४५ ४।।'**

अध्याय ६ वा

ऋतंभरा प्रज्ञेचे उपकारित्व खालील सूत्रामध्ये मांडले आहे.

**तज्ज्रः संस्कारोऽन्यसंस्कार प्रतिबंधी ।।५।।**

या ऋतंभरा प्रज्ञेचा संस्कार इतर संस्कारांना प्रतिबंध करणारा असतो.

श्वेताश्वेत उपनिषद म्हणते :

**'न संदृशे तिष्ठति रुपमस्य न**
**चक्षुषा पश्यति कश्चनैनम् ।**
**हा दा हदिस्यं मनसा य एनमेव**
**विदुरमृतास्ते भवन्ति ।।२०।।'**

**अर्थ :** या ईश्वराचे निविशेष स्वरूप चक्षुरादि इंद्रियांतल्या विषयामध्ये स्थित होत नाही. ते इंद्रियांचा विषय होत नाही. कोणी याला चक्षूने पहात नाही. जे... ने नियत झालेल्या शुद्ध बुद्धीने हृदयात स्थित असलेल्याला अशा प्रकारे जाणतात ते अमृत अमरणधर्मी होतात.

**टीप :** हदामनसा – म्हणजे हृदयाने–मनाने म्हणजेच साक्षात्कार घडविणाऱ्या ऋतंभरा प्रज्ञेमुळे होय.

मंडुकोपनिषद म्हणते :

**'न चुक्षषा गृह्यते नापि वाचा**
**नान्यर्देवस्तपसा कर्मणा वा**
**ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्व**
**साततस्तु तंपश्यते निष्कलं ध्यानमान:'**

**अर्थ :** आत्म्याचे शब्दांकन करणे शक्य नाही. तसेच तो दृष्टीसव इंद्रियास दिसत नाही अथवा कर्मकांड किंवा तपाने पण दिसत नाही. पण जेव्हा मन मलिनत्व घालविलेल्या आरसा किंवा जल त्याप्रमाणे प्रसन्न, स्वच्छ, शांत होऊन राहते तेव्हा ज्ञानाचा प्रसाद होतो. (ऋतंभरा प्रज्ञेचा उदय होतो.) नंतर ध्यानात मग्न असलेल्या ब्रह्माचा साक्षात्कार होतो.

ज्ञानेश्वर म्हणतात :

**'तेणे कारणे मी बोलेन । केली – रुप दावीन ।**
**अतिंद्रिय परीं भोगवीन इंद्रिया करवी ।।३६।।'**

**टीप :** नामरूप नसलेल्या परब्रह्माचे दर्शन जे इंद्रियांना कधीच भोगता येत नाही, कारण ते अतिंद्रिय असे असते; तरी देखील इंद्रियाकरवी भोगवीन असे म्हणतात.

सांख्य ज्यास तन्मात्रा म्हणतात – नाद, स्पर्श, रस, रूप व गंध जिथे या प्रकारचे दृश्य जगाकडे ज्ञात होते, त्याच प्रकारामध्ये परमेश्वराचा साक्षात्कार घडतो, असे माऊलीस अभिप्रेत आहे.

**(ब) Centrally Initiated अंतर्निर्मित :**

येथपर्यंत, आत्मा म्हणजेच ब्रह्म होय. ब्रह्म सर्व चराचरास व्यापून आहे. ते प्रत्येकांत आहे व त्याचे ज्ञान प्रातिभ आहे हे पाहिले. आत्मा आपल्यात असल्यामुळे त्याचे ज्ञान आतूनच घडते, ते अंतर्निर्मित आहे. कसे ते पाहूया.

गुरुदेव म्हणतात :-

'ध्यानात शरीरातील इतर ऊर्जेचे पारमार्थिक ऊर्जेत रूपांतर होते. ही तयार झालेली पारमार्थिक ऊर्जा, मणक्याच्या हाडातून पाठीच्या कण्याच्या बाजूने असणाऱ्या द्रवामध्ये मिसळते. हा द्रव म्हणजे (Cerebro-spinal fluid (CSF)

या द्रवास गुरुदेवांनी, दृश्य जगातील आत्म्याचा आविष्कार म्हटले आहे. पारमार्थिक ऊर्जेचा प्रवास या द्रवातून सुरू होतो व शेवटी ही ऊर्जा मेंदूतील पोकळीमध्ये शिरते. या ऊर्जेस भारतीय औषधप्रणालीत 'ओजस' म्हणतात. हिंदी संत तिचा 'अमिरस' म्हणून उल्लेख करतात. मनोवैज्ञानिकांच्या मज्जा रासायनिक ऊर्जेच्या पलीकडे याची वाटचाल असते.

मेंदूमध्ये जाणीव असणाऱ्या पेशी असतात. शरीराचे अंतिम संतुलन (CSF) मार्फत घडते हे वैज्ञानिकांनी शोधले आहे. या द्रवाचा उपयोग आत्म्याचा वाहक म्हणून होतो. द्रव तयार होण्याचे सर्वात वरचे शरीरातील ठिकाण म्हणजे आत्म्याच्या वास्तव्याचे पीठ होय. (येथे या द्रवाचे (CSF) चे गुणधर्म उत्पत्ति, प्रवासमार्ग इ. शरीरशास्त्रातील तपशील प्रस्तुत लेखकाने विस्तारभयाने व दुर्बोधता टाळण्यासाठी दिलेले नाहीत.) आत्म्याचा आविष्कार प्रत्येक पेशीमध्ये ऊर्जेच्या रूपात घडत राहतो. (जीव/प्राण असे पर्यंतही क्रिया होत राहते. आत्मा शरीरामध्ये सेंद्रिय रूपाने मिसळून स्थित आहे.) या ऊर्जेचा बोध म्हणजेच आत्म्याचे आकलन. हे आकलन आंतरबाह्य असते. संवेदना

आतील आत्म्यातून येत असतात. त्यांचे स्फुरण अंतरात होत असते.... ललित असे त्यांचे स्वरूप आहे.

ही पारमार्थिक ऊर्जा, आत्मा, अनंत, देव, देवी, शक्ती सर्व एकाचीच विविध नामे होत. निर्माण झाल्यानंतर ऊर्जेच्या अखेरच्या प्रवासातील टप्प्यांमध्ये ही मेंदूतील पोकळ्यांमध्ये असणाऱ्या व ज्यामधून अनुभव निर्माण होतात (इंद्रियजन्य ज्ञान दृश्य जगातील येणाऱ्या संवेदनांतून निर्माण होते), त्या केंद्रस्थानांना भिडते व त्यांचे उद्दीपन करते. या उद्दीपनांचे रूपांतर नाद, बिंदू, कला इ. पारमार्थिक अनुभवांत होते. हीच साक्षात्काराची सुरुवात.

**(क) Supersensousness अतिंद्रियत्त्व.**

**'राजविद्या राजगुह्यं पवित्रामिद मुत्तमम् ।**
**प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तमण्यअम् ।।'** गीता ९.२

गुरुदेव वरील ओळीवर भाष्य करताना म्हणतात, ''नवव्या अध्यायाच्या एका प्रसिद्ध ओवीमध्ये गीता साक्षात्काराचे 'प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमण्यअम्' असे वर्णन करते. हे शब्द फार अर्थपूर्ण आहेत. साक्षात्काराचे सर्व निकष, प्रत्यक्षावगमं, सुसुखं व अण्यमम् या तीन शब्दांमध्ये आले आहेत. याचा अर्थ पाहू. पहिला शब्द आहे प्रत्यक्षावगमं. जर आपला अनुभव प्रत्यक्षाची वस्तु झाल्यास खरा म्हणावायाचा. तर मग हे प्रत्यक्ष काय आहे? का जे सोदाहरण प्रकटन आहे? चर्म चक्षूस दिसणारी ती गोष्ट आहे अथवा अंतर्चक्षूस प्रतित होणारी वस्तू आहे.?'' भगवद् गीतेने 'प्रत्यक्ष' शब्द भौतिकशास्त्र किंवा शरीर विज्ञानदृष्ट्या नियोजला नसून तो अतिंद्रिय साक्षात्कारी स्वरूपात घेतला आहे. अतिंद्रियता म्हणजे इंद्रियांच्या आकलनाच्या पलीकडील गोष्ट.''

याबाबतीत गुरुदेवांनी एक सुंदर उदाहरण घेतले आहे ते असे :

**'तत्रोपस्पृश्य पानीयं पीत्वा मृष्टं मणिप्रभम्।**

वृक्षषण्डमुव्रज्य सरामोरथ माविशत् ।।३९।।
अक्रूरस्तावुपामन्त्र्य निवोश्य च रथोपरि ।
कालिन्द्या ह्रदमागत्य स्नानं विधिवदाचरत् ।।४०।।
निमज्ज्र तस्मिन्सलिलेजपन् ब्रह्म सनातनम् ।
तावेव ददृशेऽ क्रूसे राम कृष्णौ समन्वितौ ।।४१।।
तौ रथस्थौकथमिहं सुतावानकदुन्दुभेः ।
तर्हि स्वित् स्पन्दने न स्त इत्युन्मज्ज्य व्यचष्मः ।।४२।।
तत्रापि च यथापूर्वमासीनौ पुनरेव सः
व्यमज्जद् दर्शनं यन्मे मृषा किं सलिले तयोः ।।४३।।
भूयस्तत्रापि सोऽ द्राक्षीन् स्तुयमानमहीश्वरम ।।
सिद्धचारणगन्धर्वैसुरैर्नत कन्धरैः ।।४४।।

श्रीमद भागवत १०.३९

**अर्थ :** 'तिथे त्याने (कृष्णाने) हात तोंड धुऊन यमुनेचे निळेशार व अमृताप्रमाणे असणारे पाणी प्राशन केले. नंतर बलरामाबरोबर सावलीत उभ्या असलेल्या रथात कृष्ण बसला.

अक्रूराने दोघांना रथावर बसल्याचे बघून त्यांची आज्ञा घेऊन तो यमुनेच्या कुंडात विधिपूर्वक स्नान करू लागला.

कुंडात स्नान करून नदीत डुबकी मारून गायत्री पठण सुरू केले, तर पाण्याच्या आत अक्रूरास कृष्ण व बलराम दोघे बसल्याचे दिसले.

अक्रूराच्या मनात शंका आली की वासुदेवांच्या मुलांना मी रथामध्ये बसवून आलो होतो, तर ते दोघे पाण्यात कसे आले? कदाचित रथात नसतील म्हणून डोके पाण्याबाहेर काढून त्याने पाहिले.

तर कृष्ण व बलराम दोघे रथातच बसल्याचे दिसले. त्याला वाटले आपणास भ्रम झाला असेल म्हणून परत डुबकी मारली.

परत त्यास पाण्यात शेषशायी कृष्णाचे दर्शन झाले व सभोवती यज्ञ, किन्नर, गंधर्व आदी भगवंताची स्तुती करीत व उभे असल्याचे

दिसले.'

गुरुदेव म्हणतात,

"The Experience which Akrura got as described in the Bhagavata (x.39, 39-45) of the form of Krisna while he had dipped in the Yamuna and again while he was looking at Krisna's form in the chariot outside, is a compound of the mystical and the visual, each being a corroboration of the other.'

**अर्थ** : 'अक्रूरास यमुनेच्या पाण्यामध्ये डुबकी मारल्यानंतर झालेले कृष्णाचे दर्शन व पुन्हा पाण्याबाहेर डोके काढून रथाकडे पाहिल्यावर दिसलेले कृष्णाचे रूप हे एक साक्षात्कारी व प्रत्यक्ष (चर्मचक्षूंना गौर झालेले) अनुभवांचे संयुग आहे, ज्यात एक अनुभव दुसऱ्या अनुभवास पुष्टी देतो.'

ज्ञानेश्वरांच्या खालील ओव्या हेच सांगतात.

**'मोटके गुरुमुखे उदैजत दिसे ।**
**आणि हृदयी स्वयंभचि असे ।**
**प्रत्यक्ष लावो लागे तैसे । आपैसयाचि ।।'** ज्ञा. ९.४८

अतिंद्रियत्वाच्या पैलूची उकल नानकाच्या 'काहे रे बन खोजन जाई' या पदावर भाष्य करताना गुरुदेव म्हणतात.

नानकाच्या पदाच्या ओव्या अशा –

**'काहे रेबन खोजन जाई ।।ते।।**
**बाहर भीतर एकहि जानो**
**यह गुरु ज्ञान बताई ।।४।।'**

ही एक अप्रतिम कल्पना आहे. नानक म्हणतात, ''मला देवाचे रूप आत व बाहेर दिसले.'' येथे बाहेरच्या व आतल्या अनुभवात साम्य आहे. मानसशास्त्राच्या दृष्टीने हा एक अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत आहे.

समजा, जर बाह्य जगातील एखादी वस्तू पाहून तुम्ही डोळे मिटल्यास त्याचे बिंब दिसते. त्या प्रतिमेस Positive अथवा Negative म्हणतात. प्रतिमा वस्तूच्या रंगाची किंवा पूरक रंगाची असू शकते. पण नानक स्पष्टपणे तोच देव त्यांनी आत व बाहेर पाहिल्याचे सांगतात.

तुम्ही जर एखादी वस्तू बघून डोळे मिटून घेतलेत व तिची आठवण केलीत आणि तुम्हास ती दिसल्यासारखी भासली तर या घटनेस महत्त्व नाही. पण जर तुम्हास एखादी वस्तू आत (डोळे मिटलेले असताना) दिसली व नंतर डोळे उघडून पाहिल्यावर तुम्हास ती वस्तू तशीच दिसली. तर तो मानसिक अनुभव एक आधीभौतिक आणि साक्षात्कार शास्त्रीय सत्य ठरते. ज्यास मी आत बघतो तेच मला बाहेर दिसते. म्हणून पारमार्थिक वस्तू दर्शनाची खरी प्रक्रिया अशी –जे आत प्रथम दिसते, तेच बाहेर दिसले पाहिजे. देवाच्या समदर्शनाची आतील व बाहेरील सत्यता साक्षात्काराचे एक प्रधान गमक आहे.

पुढे गुरुदेव म्हणतात –

"The internal and external perception of God must be alike. If here is internal perception to which nothing external corresponds, it may be a case of imagination, hallucination or illusion. If on the other hand, there is something external to which nothing internal corresponds, then it cannot be evidently a case of supersensous experience and may be ultimately unreal."

**अर्थ** : 'देवाचे प्रचितीस येणारे आतील व बाहेरील रूप एक सारखेच पाहिजे. जर आत होणाऱ्या आकलनाशी बाहेरील कोणत्याही गोष्टीबरोबर साम्य नसेल तर ती एक कल्पना, भ्रम अथवा मनाची फसवणूक ठरेल. उलटपक्षी, एखाद्या बाहेरील गोष्टीचे आत आकलन

होणाऱ्या गोष्टीबरोबर काहीच साम्य नसेल, तर तो नक्कीच अतिंद्रिय अनुभव नसेल व शेवटी असत्यच राहील.'

गुरुदेवांनी मांडलेले साक्षाकारशास्त्र बुद्धिनिष्ठ व तर्कशुद्ध असल्याचे इथवर पाहिले. गुरुदेवांनी Mysticism चा पाया Rational असल्याचे दाखविले. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा गूढवाद, जादूटोणा, मंत्र सामर्थ्याने भूत-भविष्य जाणणे व इतर चमत्कारास जागा नाही. तसेच डोक्यावर हात ठेवून शिष्यास मुक्त करण्याचीही बाब नाही. सद्गुरुकडून सबीज नाममंत्र प्राप्त झाल्यानंतर त्याचे दीर्घ, निरंतर व भावयुक्त स्मरण करीत राहिल्यानंतर व देवाची कृपा झाल्यानंतर येणारे प्रातिभ अनुभव म्हणजेच साक्षात्कार.

**११. आत्मानुभवांच्या सत्याची कसोटी**

पारमार्थिक अनुभव सत्य आहेत यास प्रमाण काय? कोणत्या निकषावर घासून तो खरा असल्याचे ठरवायचे?

गुरुदेवांनी आपल्या प्रत्येक ग्रंथांमधून पौर्वात्य व पाश्चिमात्य निकषांबद्दल चर्चा केली आहे. त्यातील काही निकष जसे चिद्वाद (Idealism). वस्तुस्थिती वाद (Realism) व उपयुक्ततावाद (Pragmatism) ह्या तीन प्रणाली पारमार्थिक अनुभवाची सत्यता पडताळण्यासाठी अत्यंत विश्वसनीय निकष पुरवितात. ते निकष म्हणजे एकसूत्रता (Coherence) साधर्म्य (Correspondence) किंवा स्वतंत्रता (Independence) व समाधान (Satisfaction) होत.

**११. (अ) एकसूत्रता :**

सर्व काळातील व देशातील संतांना येणाऱ्या अनुभवांचे सूत्र एकच आहे. ते म्हणजे ब्रह्म. अनंत ब्रह्माचे ज्ञान अनंत रूपाने अनेक संतांना झाले, होत आहे व होईल. होणारी दर्शने रूपाची, नादाची, सुगंधाची, स्पर्शाची, अमृत चवीची इ. प्रकारात मोडणारी असतात, पण तपशील वेगळा असू शकेल. त्यातील वैयक्तिकता मान्य केली तरी एकसूत्रता

असतेच.

**११ (ब) साध्यर्म :**

पारमार्थिक अनुभव आत व बाहेर एकच पाहिजे. अक्रूरास ज्या कृष्णाच्या रुपाचे प्रत्यक्ष दर्शन पाण्यात डुबकी मारल्यावर झाले, तेच बाहेर दिसले हे याचे प्रसिद्ध उदाहरण आहे.

**११. (क) समाधान :**

समाधान एकीकडे शारीरिक सुखाकडे तर दुसरीकडे पारमार्थिक आनंदाकडे  झुकते. एका पाश्चिमात्य तत्त्वज्ञाने म्हंटले आहे, ''संतुष्ट मूर्खापेक्षा असंतुष्ट सॉक्रेटिस होणे बरे.'' गुरुदेव म्हणतात, ''संतुष्ट सॉक्रेटिसपेक्षा असंतुष्ट आत्मज्ञानी बरा.''

संतांचे समाधान म्हणजे परमानंद, ब्रह्मानंद, समाधीसुख, त्रिपुटीलय, कबीराचे स्वादशास्त्र, निंबरगी महाराजांचे स्वराज्य – आत्म्यातील अविनाशी सुख होय.

**११. (ड) कॅटेलेप्सिया :**

अनुभवाविषयीचा हा निकष ग्रीक तत्त्वज्ञांचा आहे. ब्रह्मानंद मीमांसा म्हणजे पारमार्थिक अनुभवांची इंद्रियांवर सर्वव्यापी घट्ट पकड कशी असते याचे विवरण होय. एका उघड्या तळहातावर एक, दोन, तीन अशी क्रमाने पाचही बोटे मिटावयाची व दुसऱ्या तळहाताचा विळखा घालून ती सर्व घट्ट धरून ठेवावयाची. या कृतीस ग्रीक भाषेमध्ये कॅटेलेप्सिया म्हणतात. पारमार्थिक अनुभवात या प्रकारचा कॅटेलेप्सिया असतो. चक्षूंच्या अनुभवास कान, जीभ, त्वचा, गती, इत्यादींचे साहाय्य मिळते. अशा क्रियेस स्टोइक तत्त्वज्ञ कॅटेलेप्सिया म्हणतात. या प्रकारच्या एकत्रित व संमिश्र अतिंद्रिय अनुभवांची रेलचेल झाल्यानंतर संतांचा हर्ष ब्रह्मानंदाचा असतो. ब्रह्मानंदाचे एक स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. त्याबद्दल गुरुदेवांना वेगळा ग्रंथ लिहावयाचा होता. ब्रह्मानंदाचा विचार सहा दृष्टिकोनातून करता येईल. ते म्हणजे परतत्त्वज्ञान, ज्ञानशास्त्र,

मानसशास्त्र व अध्यात्मशास्त्र आणि नीतिशास्त्र व मूल्यमापनशास्त्र होय. कोणत्याही दृष्टीने विचार केला तरी ब्रह्मानंद हे अंतिम ध्येय व त्याच्या प्राप्तीसाठीच जगातील सर्व संतांनी प्रयत्न केले. ब्रह्मानंदात नांदण्यासाठी प्रेरित होऊन संतांची मांदियाळी एकत्र बांधली गेली.

**११. (ई) क्रममुक्तीचा निकष :**

मानसशास्त्रीयदृष्ट्या पारमार्थिक अनुभवांचे अखंडत्व (continuity) हा एक निकष आहे. अनुभवात खंड पडता कामा नये. एकदा अनुभव आज आला व परत आला नाही, तो पुन्हा पुन: आला नाही, तर खरा नव्हे. अखंड व सतत येणारा अनुभव वाढत राहिला पाहिजे. त्यात सारखी प्रगती असावी. ही प्रगती Hyperbola (अपास्त) च्या Asymptote (अनंत स्पर्शरेषा) प्रमाणे, पारमार्थिक अंतिम ध्येयाच्या जवळ नेणारी व शेवटी अनंतात मिळून जाणारी असावी.

ज्या प्रमाणे सोळा नंबरचे सोने व साडेपंधरा नंबरच्या सोन्यामध्ये फरक असतो, तसा संत व ईश्वर ह्यांत फरक राहतो, असे ज्ञानेश्वर म्हणतात. देह टाकल्यानंतर संतास अनंतात मिळण्यास कोणतेच बंधन राहत नाही.

तर asymptote (अनंत स्पर्शरेषा) प्रमाणे सतत देवाजवळ जात राहणे व शेवटी एकरूप होणे, हे साक्षात्काराचे एक प्रमाण आहे. साक्षात्कार ही घटना नसून एक प्रक्रिया आहे. मीराबाई याला 'दिन दिन बढत सवाई' असे म्हणतात.

**१२. साक्षात्कारशास्त्रातील काही मानस शास्त्रीय व तात्त्विक प्रश्न :**

**(अ) आत्म्याची अंध:कारमय रात्र : (Dark Night of the Soul)**

परमेश्वराच्या साक्षात्कारासाठी प्रयत्न करत असता, प्रयत्नास हवे तसे यश येत नाही. त्यामुळे मन कच खाते. ईश्वरावरील श्रद्धा नाहीशी

होईल काय अशी भीती वाटते व प्रयत्न सोडून द्यावेत असे एका मनास वाटते. त्या स्थितीस आत्म्याची अंध:कारमय रात्र असे म्हणतात. ह्या नंतर प्रयत्नात यश येते. देवाचे दर्शन घडते. सेंट जॉन ऑफ द क्रॉस ज्या अवस्थेला 'आत्म्याची घनघोर रात्र' अशी संज्ञा देतात, ती अवस्था परमार्थाच्या पूर्णतेचा एक आवश्यक घटक आहे का? मराठी संतांपैकी श्री नामदेव व श्री तुकाराम या संतांना या अवस्थेचा पुरेपूर अनुभव आला. त्याच्या खालोखाल श्री रामदासांचा क्रमांक लागतो. श्री ज्ञानेश्वर या अवस्थेपासून बहुतेक मुक्त होते.

सेंट जॉन ऑफ द क्रॉस या अवस्थेची तीन कारणे देतात –

१) पारमार्थिक जीवनाचा आरंभ म्हणजे संसारी जीवन हे अज्ञानाने भरलेले म्हणून अंध:कारमय.

२) श्रद्धेच्या मार्गानेच आपणास प्रवास करावयाचा आहे तो मार्ग तमोमय आहे.

३) गाठावयाचे ध्येय अनंत असल्याने ते अज्ञात व अंध:कारमय आहे. एका संताच्या मते 'देवाच्या दिव्य झगझगीत तेजाकडे पाहता येत नाही. डोळे दिपल्यामुळे अंधार वाटतो.'

जगातील संतांच्या जीवनाकडे पाहिल्यास शारीरिक, मानसिक व नैतिक आपत्तीच्या तडाख्यातून सुटलेले थोडेच दिसतील.

एकंदरीत या प्रश्नाचा साकल्याने विचार केल्यास ही 'घोर रात्र' म्हणजे पारमार्थिक जीवनाचा थोड्या फार प्रमाणात आवश्यक घटक आहे.

मनाच्या पारमार्थिक आरोग्यास हा आजार आवश्यक आहे. रोगमुक्त झाल्यावरच या आरोग्याची किंमत कळते. शाश्वत नकारावस्थेतून, शाश्वत होकारात्मक आनंदावस्थेपर्यंत जावयाचे झाल्यास दोन्हींमधील उदास मध्य बिंदूमधून आत्म्याचे जाणे अपरिहार्य वाटते.

**१२. (ब) परमार्थ व विषयवासना :**

काही संतांनी आपला पारमार्थिक अनुभव कामवासनेच्या भाषेत व्यक्त केल्याचे दिसते. दोन्हींतील आनंदाची जातकुळी व पातळी अत्यंत भिन्न आहे. केवळ एक सदृश्य अथवा उपमा म्हणून ही योजना असावी. जीव–शिवाच्या नात्याशी जवळचे असे इहलोकातील सादृश्य दाखवायचे झाल्यास ते पती–पत्नीचे नाते होय.

या प्रश्नाचा समारोप गुरुदेव विलियम् जेम्सच्या शब्दात करतात. जेम्स म्हणतो, ''दोहोंमध्ये प्रत्येक गोष्टीत विरोध आहे. त्यांचे विषय, भावनाशक्ती व क्रिया या सर्वच भिन्न आहेत. सामान्यपणे कोणत्याही एकाचा दुसऱ्यात समावेश होणे केवळ अशक्य आहे. या दृष्टीने पारमार्थिक जीवन जननेंद्रियांइतकेच, प्लीहा, स्वादुपिंड व मूत्रपिंडावरही अवलंबून आहे असे म्हणावे लागेल.'' गुरुदेव म्हणतात, ''या दोन प्रवृत्तींच्या परस्पर संबंधाविषयी जेम्स यांच्या वरील वर्णनात आणखी भर घालणे शक्य नाही. इंद्रधनुष्याचे सौंदर्य जादा रंगांची भर घालून खुलविता येईल काय?''

**तिसरा टप्पा**

गुरुदेवांचा पुढील ग्रंथ Pathway to God in Hindi Literature १९५४ साली प्रसिद्ध झाला. ईश्वर साक्षात्कार ज्यांचे ध्येय आहे, त्याचा प्राप्तीपर्यंत कोणकोणत्या अवस्थांमधून जावे लागले, त्याचे विस्तृत वर्णन हिंदी संतांच्या पदावरून व दोह्यावरून केले आहे. पदांचा व दोह्यांचा संदर्भ ग्रंथ Hindi Parmarth Sopan या नावाने वेगळा प्रसिद्ध केला होता.

आपण देव–प्राप्तीच्या मार्गाचा विचार वरील पुस्तकाच्या आधारे करणार आहोत.

**१३. परमार्थ सोपान :**

गुरुदेव म्हणतात, ''जगातील सर्व तत्त्वज्ञानाचा व धर्माचा तुलनात्मक अभ्यास केला व विशेषत: निरनिराळ्या काळात व देशांत

व मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये ज्यांनी ईश्वर साक्षात्कार करून घेण्यासाठी जो मार्ग चोखाळला, अशा संतांच्या जीवनाचा व त्यांच्या शिकवणीचा विचार केला तर या सर्वांनी स्वीकारलेल्या ईश्वर प्राप्तीच्या मार्गात काही वैशिष्ट्ये स्पष्टपणे आढळतात. ह्यांचे विचाराच्या दृष्टीने पाच पायऱ्यांमध्ये वर्गीकरण करता येईल.

प्रथम गटात ईश्वरोन्मुख करणाऱ्या, पारमार्थिक जीवाकडे पाहण्यास लावणाऱ्या प्रेरणा होत. हिंदी संतांच्या बाबतीत त्यांना ईश्वरोन्मुख करणाऱ्या प्रेरणांमध्ये भ्रमाचा पाठलाग, सत्याबद्दलचे आंधळेपण, ईश्वराचे विश्वनिर्मितीमधील कौशल्य, कर्म व त्याचे फळ, पापशून्य व पुण्यमय जीवन कोणते, जरा–मरण इत्यादींचा समावेश होतो.

नंतरची पायरी म्हणजे नैतिक व आध्यात्मिक पूर्वतयारी. परमार्थ मार्गावर कोणत्याही प्रकारची प्रगती होण्यापूर्वी ही तयारी करावी लागते. हिंदी संतांनी केलेली नीतीची चर्चा, सद्गुण–दुर्गुणांचे विश्लेषण म्हणजे नीतिशास्त्रात घातलेली नवीन विचारांची भर आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटल, सिज्विक व ग्रीन सारख्या तत्त्ववेत्त्यांच्या विचारांशीही विचारसरणी मिळती जुळती आहे. या भाष्यामध्ये गुरुदेवांनी प्रथम सद्गुण व दुर्गुणांची यादी केली. त्यानंतर सद्गुणांचे वर्गीकरण वैयक्तिक, सामाजिक व पारमार्थिक सद्गुणांमध्ये करून, भक्ती सर्व सद्गुणांचा मुकुटमणी असल्याचे दाखविले आहे.

तिसरी पायरी मुमुक्षूंना आपल्या मन:चक्षूपुढे वर्तनाच्या व ध्येयाच्या दृष्टीने आदर्श अशी व्यक्ती ठेवावी लागते व त्याबर हुकुम आपले वर्तन ठेवावे लागते. परंतु ही गोष्ट साध्य व्हावयाची झाली तर परमेश्वराचे स्वरूप काय या विषयी मुमुक्षूंच्या मनात तात्त्विक व व्यवहारदृष्ट्या स्पष्ट कल्पना असावी लागते.

म्हणूनच की काय 'तत्त्वज्ञानाचा अभ्यास' (अंतिम विद्या) ह्या सद्गुणांचा समावेश गुरुदेवांनी आध्यात्मिक सद्गुणांच्या यादीत केला

आहे. हा अभ्यास स्वत:पुरता मर्यादित न ठेवता इतरांना उपयोगी होईल याप्रमाणे करावा अशी भूमिका मांडून ईश्वर विषयक ज्ञान मिळविणे हे पुढील मार्गक्रमणात ईश्वरावर अढळ श्रद्धा बसण्यास व भक्ती करण्यास अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

ह्या तिसऱ्या पायरीच्या संदर्भात हिंदी संतांनी मांडलेले ईश्वरविषयक काही महत्त्वाचे विचार खालीलप्रमाणे –

१) ईश्वर विश्वाच्या कानाकोपऱ्यात भरून राहिला आहे.

२) ईश्वराचा अनुभव प्रातिभ स्वरूपात रंग व सुवासामध्ये येतो. हा दुर्मिळ अनुभव आहे व एक पारमार्थिक ऊर्जा आहे.

३) ईश्वर दर्शनाने भ्रमनिरास होतो. विश्वाचे कोडे उलगडते.

४) ईश्वराच्या सान्निध्यात भक्ताचे संरक्षण होते.

५) संतांच्या मनात इच्छा निर्माण होण्याआधीच त्याची ईश्वराकडून पूर्ती होते.

त्यानंतर चौथी पायरी. संत व ईश्वर यांच्या संबंधी स्पष्ट कल्पना आल्यावर मुमुक्षूला हा साधनमार्ग चोखाळण्यासाठी सद्‌गुरु शोधून त्याच्याकडून अनुगृहीत व्हावे लागते. त्यानंतर सद्‌गुरुंच्या आज्ञेप्रमाणे वाटचालीस प्रारंभ करावा लागतो.

शेवटी या मार्गावर बराच वेळ चालून गेल्यावर, प्रवासातील शारीरिक व मानसिक कष्ट व यातना, नैसर्गिक व सामाजिक हालअपेष्टा यांचा पूर्ण अनुभव आल्यानंतर या मार्गावरील ईश्वराच्या मार्गदर्शक खुणा कोणत्या आहेत ते उमलू लागते व त्यांच्या साहाय्याने पुढील मार्ग आक्रमण्यास धीर येतो व आपले उद्दिष्ट व अत्युच्च ध्येय गाठता येईल, अशी खात्री वाटू लागते.

हिंदी संतविषयक वरील ग्रंथांप्रमाणे कन्नड संतांनी प्रतिपादलेला देवाप्राप्तीचा मार्ग हा ग्रंथ त्यांच्या व्याख्यानाद्वारे त्यांच्या पश्चात प्रसिद्ध झाला. ग्रंथामध्ये सद्‌गुरुंची लक्षणे व कार्य, गुरुशिष्य संबंध, नादमहिमा,

अनुभवांची सुरुवात व त्याच्या सत्याची कसोटी, अत्यंत श्रेष्ठ अनुभव, साक्षात्काराचे परिणाम इ., साक्षात्कार शास्त्राचे मानसशास्त्र व तत्त्वज्ञान या संबंधी प्रथमच त्यांनी केलेला उहापोह समाविष्ट आहे.

**१४. परमार्थिक अनुभवांचे प्रकार :**

यानंतर गुरुदेवांनी आपल्या ग्रंथांमधून उल्लेखलेल्या अनुभवांच्या तपशीलाकडे वळू. येथे महत्त्वाचे लक्षात ठेवणे जरूरीचे असे की, जो अनुभव गुरुदेवांना स्वतःस आला नाही व ज्याची सत्यता त्यांनी पडताळून पाहिली नाही, असा एकही अनुभव त्यांनी उद्‌धृत केला नाही. इतकेच काय असा अनुभव व कल्पनाविलास जर एखाद्या संतांच्या विचारात दिसला, तर तो परखडपणे बाजूला केला आहे.

**प्राथमिक अनुभव :**

रुपाचे–बिंदुल्याचे असतात. गुरुदेवांनी यालाच Spiriton शब्द योजला. Electron/proton प्रमाणे हे पारमार्थिक अणु.

**बिंदुले** – तिळाइतुके हे बिंदुले । तेणे त्रिभुवन कोंदटले (तुकाराम).

**मोती** – मोतियाची जाळी विखुरली (ज्ञानेश्वर)

**रत्न** – पायोजी मैंने राम रतन धन पायो (मीरा)

**शून्य** – एक एक चक्रे येतील व्योमाकार (जनाबाई)

**डोळा (महत्त्वाचा अनुभव** – डोळियांचा डोळा उघड झालिया (एकनाथ)

**चरण (उच्च अनुभव)** – मुख पहा सादर । पायावरी शीर ठेवोनिया (तुकाराम)

**अनंत** – बेहद के मैदान में रमै दास कबीर (कबीर)

**प्रकाश** – झिलमिल झिलमिल बरसे नूराँ (यारी)

न कळे दिवस रात्री । अखंड लागलिसे ज्योति (तुकाराम)

**वर्ण**– लाली मेरे लाल की जीत देखु तहाँ लाल (मीरा)

**सुगंध** – घसे चंदन चो वा बहुरी सुगंध (रामानंद)

परिमलु समनी जाई जुई मोगरे (निवृत्तीनाथ)

**नाद** – नको वाजवू मुरली (नामदेव)

सुनता है गुरु ग्यानी, गगनमें आवाज झिनि झिनी (कबीर)

**अमृतरस** – हो तो कोई पिय राम–रस प्यासा (कबीर)

**रामरस मीठा रे**

**यह रस मीठा जिन पिया**

**सो रस ही रहा समाच** (दादू)

रसाशी एकरूप होणे, रसच होणे हा स्वादवादाचा (Flavourism) कळस होय, असे गुरुदेव म्हणतात.

**स्वरूप साक्षात्कार :**

हा अत्युच्च व अतिमहत्त्वाचा अनुभव आहे. गुरुदेव म्हणतात, ''जोपर्यंत साधकास स्वत:च्या स्वरूपाचा अनुभव त्याच्या गुरुकृपेशिवाय होत नाही, तोपर्यंत तो अनुभवाच्या शिखराला पोहोचला असे म्हणता येत नाही.

आरशात स्वत:चे प्रतिबिंब पाहिल्याप्रमाणे पण बाजूचे व्यस्तीकरण (Lateral inversion) न होता, आराशाशिवाय आपल्या सारखेच आपल्या रूपाचे प्रातिभ दर्शन म्हणजे स्वरूप साक्षात्कार होय.

**स्वरूप साक्षात्काराची शिडी:**

या शीर्षकाखाली ब्रह्माचा विचार परतत्त्वज्ञान (metaphysics) दृष्टीने केला आहे. काही तत्त्वज्ञांच्या मते आत्मा व ब्रह्म पूणपणे भिन्न आहेत. (द्वैत मतप्रणाली), काहींच्या मते ते अंशत: एक आहेत (विशिष्टाद्वैत), तर काहींच्या मते ब्रह्म व आत्मा सर्वस्वी एक आहेत. (अद्वैत)

उपनिषदात सांगितल्याप्रमाणे परमार्थिक अनुभवांचा तत्त्वज्ञानदृष्ट्या विचार करून तो अनुभव एकापेक्षा एक उच्च अशा पाच पायऱ्यांमध्ये सिद्धांत रूपाने मांडता येईल.

१) बृहदारण्यकात ''आत्म्यास पाहावे' ह्या उक्तीप्रमाणे आपण जणू आत्म्याहून भिन्न आहोत असे मानून आपणामधील दिव्य तेजाचा अनुभव घेणे.

२) बृहदारण्यकात आपणात 'मी' असे म्हणणारा व वर्णिलेला आत्मा आहे, असा अनुभव घेणे.

३) आत्मा व ब्रह्म एकच आहे, हा अनुभव घेणे.

४) मी आत्मा आहे व आत्मा ब्रह्म आहे, तर मी ब्रह्म आहे (अहं ब्रह्मास्मि).

५) सर्वच ब्रह्म आहे. (सर्व खल्विदं ब्रह्म)

याप्रमाणे ही सोपानपंक्ती आपणास तत्त्वज्ञानाच्या अत्युच्च शिखरास नेऊन पोहोचविते. हेच खरोखर पूर्ण अद्वैत होय. ज्याचा अनुभव संत घेतात.

भव्योदात्त (Sublime) अनुभव :

कांटने तीन महान चिकित्सा ग्रंथ निर्मिण केले. १) तर्कबुद्धीची चिकित्सा, २) व्यावहारिक बुद्धीची चिकित्सा, ३) कलाभिरूचीची चिकित्सा.

पण कांटच्या ग्रंथात एक उणीव राहिली ती म्हणजे त्यांनी प्रातिभ शक्तीचा विचार केला नाही. त्यांच्या भाषांतरकारांनी Intuition शब्द जरी वापरला असला तरी त्याचा अर्थ इंद्रियजन्य ज्ञान (Perception) आहे.

याची उणीव गुरुदेवांनी आपल्या गीतेवरील ग्रंथामध्ये भरून काढली. हे विचार त्यांनी १९५४ साली राष्ट्रपती भवनामध्ये दिलेल्या व्याख्यानात स्पष्ट केले.

गीतेमधील विश्वरूप दर्शन हा पारमार्थिक भव्योदात्त अनुभव असून ज्यामुळे तो येतो ती प्रातिभ शक्ती कांटच्या Sublime शी व Otto च्या Holy शी समांतर आहे.

## १५) साक्षात्कारासाठी नीतिविचार क्रमप्राप्त :

जीवनसाफल्य देणारे परमसत्य तत्त्व म्हणजे आत्मा होय. त्याचे स्वरूप बुद्धीने शक्य तितके ठरवून त्याच्या प्राप्तीचे साधन शोधणे हे क्रमप्राप्त आहे. कारण, आत्म्याचे वैशिष्ट्य ज्ञान हे ध्येय नसून त्याची अनुभूती हे ध्येय आहे. आत्मप्राप्तीचे साधन म्हणून नीतीचा विचार येतो; तिच्या पूर्ततेसाठी साक्षात्कार मार्ग धरणे अवश्य आहे.

नीति ही इच्छाशक्तीची प्रेरणा आहे. इच्छा या शब्दातच सुखाची इच्छा व त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न या दोन्ही गोष्टी येतात. कोणत्या सुखांची इच्छा धरावी व त्यासाठी काय प्रयत्न करावा हे नीतीचे प्रश्न आहेत. विचार व आचार या दोन्हींचाही यात संबंध येतो.

गुरुदेवांनी साक्षात्काराचे साधन म्हणून नीति शास्त्राचा विचार केला आहे.

ते म्हणतात, 'अंतिम सत्याचे ज्ञान म्हणजे नीतिचा कळस. ... नीतिहीन साक्षात्कारी व्यक्ती, जर एखादी असेल, तर ती ओंगळ, हिडीस... असून मानवाच्या पारमार्थिक विकासातील एक कलंक ठरेल.'

नीतिबद्दलचे गुरुदेवांचे विचार पाहू या.

**(अ) नीति व साक्षात्कार :**

'नैतिक जीवनाचा सखोल विचार करता असे दिसून येते की, व्यावहारिक जीवनातील नैतिक आचार अंतिमः मानवीय किंवा सामाजिक एकात्मतेवर उभा आहे. ही एकात्मता केवळ मानवापुरती मर्यादित राहात नसून तिचे अधिष्ठान विश्वाच्या एकतेमध्ये आहे. अनेकातून एकतेकडे वाटचाल ही एकाच वेळी नीतिला व अस्तित्वाला अर्थ देणारी आहे. त्या दृष्टीने 'सत्य' किंवा 'सत्' हा शब्द अतिशय महत्त्वाचा आहे.' असे अ. ग. जावडेकर म्हणतात.

गुरुदेव म्हणतात, ''इतर कोणत्याही सद्‌गुणापेक्षा सत्यावर उपनिषदकारांची विशेष प्रीति दिसते...''

छांदोग्य उपनिषदात एके ठिकाणी सांगितले आहे की, ''जबाला या नावाची एक बाई तरुणपणामध्ये दासीभावाने राहात होती. तिचा पुत्र सत्यकाम हा मोठा झाल्यावर त्याने आपल्या आईस, ''माझा पिता कोण?'' असा प्रश्न विचारला. तेव्हा तिने त्यास सांगितले की, ''तुझा पिता कोण हे जरी मला निश्चितपणे सांगता आले नाही, तरी तू माझ्यापासून जन्मलास एवढे मात्र मी तुला खात्रीने सांगते!'' पुढ सत्यकाम ब्रह्मचर्याची दीक्षा घेण्यासाठी गुरुकडे गेला. तेव्हा गुरुने त्यास विचारले की, तुझे गोत्र कोणते व तू कोणत्या कुळात जन्मलास? तेव्हा सत्यकाम याने सरळ सरळ उत्तर दिले की, माझे गोत्र कोणते हे खरोखर मला माहीत नाही. मला फक्त माझ्या आईचे नाव माहीत आहे व ती स्वत: दासीभावाने राहात असल्यामुळे माझा पिता कोण हे तिलासुद्धा नक्की माहीत नाही. असे तिने सांगितले आहे. सत्यकामाचा गुरु त्यास म्हणाला, ''हं, हे शब्द अब्राह्मणाच्या तोंडून यावयाचे नाहीत. चल, मी तुला दीक्षा देतो. कारण तू सत्यापासून ढळला नाहीस'' (धा. ४.१ ते ५)

निर्भेळ व शुद्ध सत्य कळल्याने दासी स्त्रिच्या मुलासही ब्राह्मणाची पदवी कशी प्राप्त झाली हे वरील गोष्टीत सांगितले आहे. गुरुदेव ज्या निंबरगी संप्रदायातून उदयास आले, त्या संप्रदायाचे मूळ पुरुष श्री निंबरगी महाराज सत्याला अत्यंत महत्त्व देत असत. त्यांनी सांगितलेली वचने, बोधसुधा त्या नीतिशास्त्रावरील व अनुभव शास्त्रावरील एक लहान, पण उच्च दर्जाच्या ग्रंथात गुरुदेवांनी संपादित करून प्रसिद्ध केली आहेत. त्या ग्रंथाचे चार भाग आहेत. १) आचरणाचे मूलतत्त्व, २) दुर्गुण त्याग, ३) सद्‌गुण सेवन व ४) परमार्थ मार्ग.

सत्याबद्दलचे वचन सद्‌गुण सेवन या भागात आहे. ते मुळातून पाहू या.

**१२ (ब) सत्य–असत्य (बोधसुधा वचन ३.२)**

खोटे कधीही बोलू नये. खरेच बोलत असावे. म्हणजे आपले बोलणे

कधीही खोटे होणार नाही. आपण खोटे बोलल्यास आपण बोललेले सर्व खोटे होईल. खरे बोलल्यास बोलणे सर्व खरे होईल.

आपल्या अंगावर कोणताही प्रसंग आला तरी आपण खोटे बोलू नये. खोटे बोलण्याने तो जाईलच वाटते. परंतु तो अधिकच अंगावर येतो. प्रसंग अंगावर येवो अगर न येवो, आपण कदापि खोटे बोलू नये.

खरे बोलल्यामुळे घरदार, धनदौलत सर्व काही गेले तरी जावो. देणारा देव काही गरीब नाही. तो समर्थ आहे. तो देईल तेच पुरेल. लोक कितीसे देतील?

''खोटे बोलून जगण्यापेक्षा खरे बोलून मरणे बरे.'' प्राण गेला तरी खोटे बोलणार नाही असा आपण नेम करावा, म्हणजे आपल्या कामात देव आपणाला साहाय्य करतो.

परंतु यातही विवेक करावा. एखाद्या गोष्टीने इतरांचे कल्याण होत असल्यास आपला तोटा होणार असला तरी क्वचित खोटे बोलले तरी चालेल. इतरांचा प्राण जात असल्यास आपणाला अपाय होत असला तरी खोटे बोलून आपण त्याचा प्राण वाचवावा.

या विषयी एक जुनी कथा आहे. एकदा एका ब्राह्मणाने आपल्या बायकोस मारले. त्यामुळे ती मरण पावली. हे कबीरदास महाराजांनी पाहिले होते. त्या योगे त्यांची साक्ष घेतली गेली. तेव्हा ''मी खरे सांगतिले तर ब्राह्मणाचा प्राण जाईल, खोटे सांगितले तर माझ्या साधुत्वास कलंक लागेल'', असा त्यांनी विचार केला. विवेकाने काय करावे ते जाणून आत्म्याचे ध्यान करीत ते कचेरीत गेले आणि आत्मरूप जिकडे दिसत होते तिकडे तोंड वळवून उभे राहिले. हे पाहून ते वेडे आहेत असा समज होऊन महाराजांना सरळ उभे राहण्यास सांगण्यात आले. नंतर घडलेली हकीकत सांगण्यास न्यायाधीशांनी त्यांना आज्ञा केली. तेव्हा महाराज म्हणाले, ''देखनेवाला बोलता नहीं। बोलनेवाला देखता नहीं।'' हे उत्तर ऐकून न्यायाधीशांची हा खराच वेडा आहे अशी

खात्री झाली आणि पुरावा नसल्यामुळे त्या ब्राह्मणाची सुटका झाली. त्याचे प्राण वाचले.

याप्रमाणे दुसऱ्यांच्या हिताकरीता एखाद्या वेळी विवेकाने खोटे बोलल्यास चालेल, परंतु आपल्या स्वार्थाकरता केव्हाही खोटे बोलता कामा नये.

***

बोधसुधेतील वचन संपले. गमतीची गोष्ट अशी की, निंबरगी महाराजांच्या जीवनात असाच प्रसंग घडला. रानात ध्यानास बसलेले असताना एक मनुष्य घाबरून तिथे आला. त्याने आपल्या दुराचारी पत्नीस ठार केले होते. तिचे आप्त त्यास मारण्यास त्याच्या मागे लागले होते. कथा सांगून त्याने महाराजांना आपणास वाचविण्यासाठी विनंती केली. त्यास गवताच्या गंजीत लपण्यास सांगून शोध घेत मंडळी आल्यानंतर ''तो पुढे पळत गेला'' असे महाराजांनी खोटे सांगितले. त्या मनुष्याचा प्राण वाचला.

''त्याचा प्राण वाचावा, म्हणून माझी जीभ असत्य बोलली. त्याची शिक्षा मला होईल. मृत्यूपूर्वी तीन तास माझी वाचा जाईल'' असे महाराज म्हणाले व त्याप्रमाणेच घडले.

अशा नैतिक विचारसरणीतून गुरुदेवांचे विचार स्वानुभवावर घासून परिपक्व होऊन प्रकट झाले व त्यांनी नीतिचा कळस म्हणजे साक्षात्कार म्हटल्यास नवल ते काय? ते म्हणतात –

१२ (क) नीति व अनुभव (पारमार्थिक) ही आत्मज्ञानाची दोन अंगे होत

आत्मानुभूतीची नैतिक व आध्यात्मिक अशी दोन अंगे असून त्याचा छांदोग्य उपनिषदात एके ठिकाणी गोड समन्वय केला आहे. तसा इतरत्र कोठेच केलेला दिसून येत नाही. या ठिकाणी 'मनुष्य कर्म करण्यास का प्रवृत्त होतो?' या प्रश्नास 'सुख मिळविण्याच्या इच्छेनेच तो

कोणतेही कर्म करण्यास उद्युक्त होतो', असे उत्तर दिले आहे. कारण कर्म केल्याने जर त्यास दु:ख प्राप्त झाले असते, तर ते कर्म करण्यास प्रवृत्तच झाला नसता. पुढे याच उपनिषदात म्हटले आहे की, अनंताच्या दर्शनाने जे सुख होते तेच खरे सुख हो. बाकीची सुखेही नुसती नावाची आहेत व या सुखाची तुलना केली असता ती अगदीच क्षुद्र ठरतात. या उपनिषदकाराच्या मते अगदी परस्परविरोधी व भिन्न अशी दोन प्रकारची सुखे असून त्यातील एकास 'भूमा' व दुसऱ्यास 'अल्प' म्हणजे क्षुद्र म्हटले आहे. जेव्हा मनुष्य आम्याशिवाय दुसरे काही पाहात नाही, ऐकत नाही व जाणत नाही त्यावेळी त्यालाच 'महासुख' म्हणतात. आत्म्याशिवाय अन्य वस्तू पाहणे, ऐकणे व जाणणे हेच 'अल्प' सुख होय. 'भूमा' सुख अमर आहे, तर 'अल्प' सुख नाशवंत आहे. हे महत्सुख कशात आहे? असा कोणी प्रश्न विचारला, तर त्याला हेराक्लाइटसच्या धर्तीवर उत्तर देता येईल. ''ते स्वत: भूमाच्या मोठेपणात आहे. कदाचित त्यातही नसेल!'' गाई, घोडे, हत्ती व सोने, नोकर व भार्या, शेते आणि घर इत्यादीकांत महत्सुख आहे, असे लोक म्हणतात. परंतु, या उपनिषदकारांच्या मते यात मोठेपणा नाही. कारणही सर्व परावलंबी आहे.

ब्रह्म स्वावलंबी आहे. 'हे ब्रह्मच वर-खाली, पुढे-मागे, उजवीकडे व डावीकडे भरलेले असून ते सकल वस्तुजातीशी एकरूप आहे.' असा अनुभव येतो. तेव्हा महत्सुख होते. आपल्या शरीरात आपणास 'मी' म्हणून घेणारे आत्मतत्त्व वर-खाली, मागे-पुढे, आजूबाजूला कोंडले आहे व ते सर्व सृष्ट पदार्थांशी एकरूप आहे, असे प्रत्ययास येते तेव्हा, आत्मा हाच वर खाली, पुढे-मागे, उजवीकडे व डावीकडे भरलेला दिसतो व तो निखिल वस्तूंशी एकरूप आहे असे मानण्यात येते तेव्हा महत्सुख प्राप्त होते. ज्यास ब्रह्म, मी (अहं) व आत्मा अशा त्रितत्त्वात्मक अद्वैताचा अनुभव येतो व ज्यास अहं ब्रह्मास्मि या महावाक्यातील रहस्य

प्रतित होते, तोच सर्वात श्रेष्ठ प्रतीचे सुख उपभोगण्यास पात्र होतो.

याचे ज्यास प्रत्यक्ष ज्ञान होते व जो याचे मनन व ध्यान करतो त्यास 'स्व-राज्य' प्राप्त होते; तो आत्मरत होतो. आत्म्याशीच क्रीडा करतो. आत्मसंगीताचा आनंद अनुभवतो व आत्मानंदातच बेहोष होऊन राहतो. या त्रितत्वात्मक अद्वैताचा प्रत्यक्ष अनुभव हेच ध्येय आपल्यापुढे ठेवून तत्प्राप्त्यर्थ अनन्यभावाने प्रयत्न करण्यात साधकाचे पराकाष्टेचे नैतिक कल्याण आहे. छांदोग्य VII २२.२५

लोकमान्य टिळक म्हणतात, ''ग्रीक पंडितांनी या स्थितीचे (स्थितप्रज्ञाच्या स्थितीचे) जे वर्णन केले आहे ते कोणत्याही एका वास्तविक पुरुषाचे नसून शुद्ध नीतिची तत्त्व व लोकांच्या मनात भरण्यासाठी सर्व नीतिचे मूळ जी 'शुद्ध वासना' तिलाच मानवदेहधारी बनवून ग्रीक पंडितांनी परमावधीच्या ज्ञानी व नीतिमान पुरुषाचे हे चित्र आपल्या कल्पनेने तयार केले आहे. पण ही स्थिती काल्पनिक नसून मनोनिग्रहाने व प्रयत्नाने इहलोकीच प्राप्त होते. असा आमच्या शास्त्रकारांचा सिद्धांत आहे व तसे प्रत्यक्ष अनुभवही आमच्याकडे आलेले आहेत.

स्थितप्रज्ञावस्था किंवा जीवन मुक्तावस्था ज्यास प्राप्त झाली आहे त्या कार्यकार्यांनी नीतिशास्त्राचे नियम घालून देण्याचे काहीच कारण नसते. कारण परमावधीची शुद्ध, सम व पवित्र हेच काय ते नेतिचे सर्वस्व असल्यामुळे अशा स्थितप्रज्ञ पुरुषास नीतिनियम लागू करणे म्हणजे स्वयंप्रकाश सूर्याजवळ अंधकार असेल असे कल्पून त्यास मशाल दाखविण्याइतके असमंजस होय. (गी. र. ३५३/५४)

वरील पार्श्वभूमीवर गुरुदेवांनी आपल्या गीतेतल्या पुस्तकात प्रतिपादलेला नीतिवाद, अतिनीतिवाद आणि आत्मानंदवाद पाहू या.

### १२ (ड) नीतिवाद

कर्मयोग म्हणजे नीति हा महत्त्वाचा सिद्धांत जर गीता सांगतेच;

पण ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागणे म्हणजे नीति, असा जो एक सिद्धांत उपनिषदाच्या अभ्यासकांना माहीत आहे, त्याचाच पुनरुच्चार भक्ती म्हणजे नीति असे गीता सांगून करते. १२ व्या अध्यायात १३ ते १९ श्लोकांमध्ये भक्ताचे सद्गुण वर्णिले आहेत. येथे भक्तीला सर्व सद्गुणात मुख्य स्थान दिले आहे. तेराव्या अध्यायात ७ ते ११ श्लोकांमध्ये अनेक सद्गुण सांगून हे सद्गुण म्हणजे ज्ञान असे म्हटले आहे. सोळाव्या अध्यायाच्या पहिल्या तीन श्लोकांत दैवी-संपत्ती म्हणून काही सद्गुणांचा उल्लेख केला आहे. शेवटी १८ व्या अध्यायात ४२ इत्यादी श्लोकांत चारी वर्णाचे मुख्य सद्गुण दिले आहेत.

१३ व्या अध्यायातील गीतेतले विचार जवळजवळ सॉक्रेटिससारखे आहेत. सद्गुण म्हणजे ज्ञान, 'एतज्ज्ञांनमिती प्रोक्तम - ज्ञानं ययतो उन्मया।' (३.११) सद्गुण म्हणजे ज्ञान हे सॉक्रेटिससारखे मत.

सर्व सद्गुण ही भक्तीचीच विशिष्ट स्वरूपे किंवा उदाहरणे आहेत व भक्ती हे सद्गुणातील ऐक्याचे मध्यवर्ती सूत्र आहे हे दाखविण्यासाठी गुरुदेवांनी खालील सद्गुण निवडले आहेत.

अ १२ : करुणा, समता, शुचिता

अ १३ : अहिंसा, आत्मविनिग्रह, आसक्ती

अ १६ : अभय यज्ञ, शांती.

अ १८ : तेज, ईश्वरभाव, सेवा

वरील गुणांपैकी येथे चार गुणांवरचे विवेचन पाहू या.

**१) समता** : ही भक्तीला अवश्य आहे. थोडीफार समता असल्यावाचून ईश्वरप्राप्ती होणार नाही आणि ईश्वराचा साक्षात्कार झाल्यावाचून पूर्ण समता येणार नाही.

**२) आसक्ती किंवा अनासक्ती** : ईश्वर हा प्रियेतम आन्तरतर आहे, म्हणूनच इतर सर्व बाह्य वा आंतर गोष्टींविषयी अनासक्तीची वृत्ती ठेवली पाहिजे. ईश्वरासंबंधी आसक्ती म्हणजे इतर सर्व गोष्टींसंबंधी अनासक्ती.

ती नसेल तर भागवतातील जड भरताची अवस्था होईलय

**३) अभय** : उच्च साक्षात्काराला पोहोचल्यानंतर उपनिषदात सांगितल्याप्रमाणे त्या आत्मानुभवाचा परिणाम म्हणून अभय अंगी बाणते.

''आनंदं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन । न बिभेति कुतश्चन।'' या प्रमाणे साधुपुरुष सदैव निर्भयच असतो.

**४) तेज** : ईश्वरपदाला पोहोचलेल्या पुरुषाच्या विचारात व आचारात शौर्य व्यक्त झाले पाहिजे. म्हणून भक्तिमार्गात शौर्याची (तेजस) आवश्यकता आहे.

**१२ (इ) अतिनीतिवाद :**

अतिनीति–पाप–पुण्य, चांगले–वाईट यांच्या पलीकडे जाणे या तत्त्वाकडे दोन दृष्टींनी पाहता येते.

**नैष्कर्म्य सिद्धी**

नैष्कर्म्य या शब्दाचा मूलार्थ कर्मातीत होणे असा आहे. परंतु धर्मातीत होणे असाही त्याचा अर्थ होतो. नैष्कर्म्याच्या या दुसऱ्या अर्थानेच श्रीकृष्णाने सांगितले आहे की, सर्व धर्म, सर्व कर्तव्ये टाकून द्या आणि मला शरण या. माझे ध्यान करा.

''सर्वधर्मान् परित्यज्य मामेक शरणं वर्ज'' (१८.६६)

त्याचे आणखी असेही म्हणणे आहे की, कोणतीही कर्मे करा; माझा ... केलात तर त्या कर्माचा लेप तुम्हाला मुळीच लागणार नाही.

''सर्वंकर्मणम्यपि सा कुर्वाणो मद्व्यापाश्रय:।
मत्प्रसादाद्वाप्नोति शाश्वते पदं अव्ययम्।।'' १८.५६

कर्म व धर्म यांच्या अंकित होणे, पलीकडे जाणे म्हणजेच खरी नीतिमत्ता होय. असे म्हणण्यास हरकत नाही.

गीता १८.४१ मध्ये.

**''नैष्कर्म्यसिद्धी: परमा संन्यासेन हि गच्छति ।''**

म्हणजे ही गोष्ट वैशिष्ट्यपूर्ण आहे.

ज्याला अनासक्त वृत्तीने आलेली कर्मे करता येतात त्याला नैष्कर्म्य प्राप्त होईल, अशी नैष्कर्म्य सिद्धी गीतेला अभिप्रेत आहे. कर्माविषयी अनासक्त राहून कर्मा विषयाच्या आणि कर्मफलाच्या बंधनाच्या पलीकडे जाणे म्हणजे नैष्कर्म्यसिद्धी.

निस्त्रैगुण्य – गुणातीत होणे.

अव्याभिचारिणी अचल भक्तीनेच शेवटी गुणांच्या पलीकडे जाता येते.

''मां च योऽ व्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समती त्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ।।'' १४.२६

**स्थितप्रज्ञाची लक्षणे**

गीतेच्या मते मनुष्याला जोडता येण्यासारखे उच्चतम नैतिक ध्येय म्हणजे 'स्थितप्रज्ञ' होणे. स्थितप्रज्ञाची लक्षणे पाहू.

(i) मानसिक : इंद्रियापासून मन निवृत्त करणे हे स्थितप्रज्ञाचे मानसिक लक्षण होय. त्याचे मन इंद्रियाधीन होऊ देता कामा नये.

(ii) नैतिक : नद्यांच्या पाण्याचा ज्याप्रमाणे समुद्रावर परिणाम होत नाही (जरी शेकडो नद्या येऊन मिळाल्या तरी त्याला भरती येत नाही) त्याप्रमाणे स्थितप्रज्ञाच्या मनावर इंद्रियांचा काहीही प्रभाव पडू शकत नाही. हे त्याचे नैतिक लक्षण होय.

(iii) सामाजिक : स्थितप्रज्ञाला सर्वत्र समदर्शन होत असते. गाय, बैल, पक्षी, म्हैस, कुत्रे किंवा श्वापद, चांडाळ किंवा ब्राह्मण कोणीही असो, सर्व ठिकाणी त्याला एकच दर्शन होते. हे त्याचे सामाजिक लक्षण होय.

(iv) आध्यात्मिक – गी. ५.२६ मध्ये 'अभितो ब्रह्निर्वाणं वर्तते विदितात्मनाम्।।' या वचनात त्याचे शुद्ध आध्यात्मिक लक्षण दिग्दर्शित केले आहे. जिकडे तो दृष्टी फिरवितो तिकडे त्याला देवच दिसतो. समोर, मागे, आत–बाहेर, उजवीकडे, डावीकडे, खाली–वर सर्वत्र देवच

दिसतो.

अर्जुनाला झालेल्या विश्वरूप दर्शनाचे वर्णन ज्ञानेश्वरांनी असेच केले आहे. तुकाराम पण म्हणतात, 'हरि हा भोवे भोवताला!'

**१२ (फ) आत्मानंदवाद :**

आत्मानंद म्हणजे स्थितप्रज्ञतेचा मुकुटमणी, आध्यात्मिक लक्षणावरून आत्मानंदवादाचा विचार नजरेसमोर येतो. आत्मानंदवादाने नीतिवाद व अतिनीतिवाद या विरोधाभासाचा समन्वय होतो. स्थितप्रज्ञ या कल्पनेचे वैशिष्ट्य हे की त्यात नीतिवाद, अतिनीतिवाद व आत्मानंदवाद या तीनही नैतिक सिद्धांताच्या छटा संमिश्रित स्वरूपात दृष्टीस पडतात. तरीही स्थितप्रज्ञाचे खरे मूल्यमापन करावयाचे तर त्यातील आत्मानंदाला अग्रस्थान दिले पाहिजे.

आत्मानंदाचे विश्लेषण केल्यास त्यात तीन मुद्दे लक्षात येतात.

१) गी. अ. ६.२८ मध्ये सांगितल्याप्रमाणे 'ब्रह्म संस्पर्श' देवाचा स्पर्श, देवाशी संबंध हे पहिले लक्षण आहे.

२) भक्ताचे व देवाचे ऐक्य : आत उच्चतम आनंद भोगल्यावर व ब्रह्माशी एकरूप झाल्यास असा योगी निर्वाणाला, परमानंदाच्या अवस्थेला पोहोचतो. (गी. ५.२४)

**(१६) साक्षात्कार शास्त्रातील नूतन व सिद्धांत :**

गुरुदेवांनी साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानात अनेक नूतन गोष्टी प्रतिपादन करून मौलिक भर घातली आहे. त्याचा एक धावता आढावा घेणे शक्य आहे. त्यांचे जवळजवळ सर्वच ग्रंथ साक्षात्कार शास्त्रातील महान भाष्ये आहेत. त्यांना परमार्थ पाणिणी म्हणणे हे यथार्थ संबोधन आहे.

''गुरुदेवांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे विषयांची मांडणी शक्यतो इतर साक्षात्कारी संतांच्या भाषेत करावयाची व आपण मागे राहावयाचे. अर्थात त्यांनी स्वतःच्या अनुभवास न आलेली अशी दुसऱ्या संतांची कोणतीही गोष्ट आपल्या ग्रंथामध्ये घेतलेली नाही. इतरांचे अनुभव

स्वत:च्या अनुभवांच्या निकषाशी तोलून, मापून त्यांची सत्यता पडताळून मगच ते अनुभव त्या त्या संतांच्या भाषेत मांडतात. ही त्यांनी अनुसरलेली शैली आहे. त्यांच्या ग्रंथांचे सूक्ष्मतेने वाचन केल्यास त्यांचे म्हणणे काय असावे याचा थोडाबहुत उलगडा होतो.त्यांचे साक्षात्काराबद्दल काही महत्त्वाचे सिद्धांत पाहू या.''

१३ (अ) साक्षात्कार एक प्रक्रिया :

गुरुदेव म्हणतात, ''साक्षात्कार एक घटना नसून ती एक प्रक्रिया आहे. पूर्णत्वाकडे अखंड वाटचाल आहे. देव व भक्तांमध्ये पौर्णिमेचा चंद्र व चतुर्दशीचा चंद्र इतके अंतर राहतेच. मृत्यूनंतर, देह पडल्यानंतर मात्र देवाशी पूर्ण ऐक्य होते.

**(ब) ईश्वराच्या लक्षणातील विरोधाभासांचा परिहार :**

(अ) ईश्वराचे निगुर्ण स्वरूप भगवद्‌गीता अध्याय १३ ओवी १२ व १३ मध्ये नि:संदिग्धपणे करते. सगुण स्वरूपाचे वर्णन गीता अध्याय १५ ओव्या १७ व १८ मध्ये करते.

या विरोधाभासांचा समन्वय गीता ईश्वराला पिता, माता, इतकेच नव्हे तर प्रभव, प्रलय व स्थान म्हणून अ. ९ ए. १७–१८ मध्ये करते.

गुरुदेव म्हणतात, ''देव गुणातीत आहे.''

(ब) ईश्वर कर्ता व द्रष्टा :

याचा समन्वय करताना गुरुदेवांनी ईश्वराला मूळ प्रेरक म्हणले आहे.

**''समयाऽध्यक्षेण प्रकृति: सूयते संचराचरम्।।''**

गीता ९.१०

ईश्वराच्या अध्यक्षत्वामुळे, प्रेरकत्वामुळे प्रकृतिगुणांची साम्यावस्था किंवा निष्क्रियता भंगते. तद्‌नंतर प्रकृती पुढील उत्पत्तिकार्य करते. म्हणून ईश्वर साक्षी व कर्ता असल्याने प्रेरक ठरतो.

**(क) ईश्वर अंतर्यामी की सर्वातीत :**

गुरुदेव म्हणतात, ''ज्याप्रमाणे सूर्य व आकाश सर्व अलिप्त

असतात, त्या प्रमाणे देवही अलिप्त आहे. गीता अध्याय १३ ओवी ३२ व ३३ मध्ये ईश्वराचे सर्वातीत तत्त्व सांगते. उलटपक्षी त्याचे अंतर्यामित्व सांगणारी अनेक वचने गीतेमध्ये आहेत. उदाहरणार्थ गी. ७.७ याचा समन्वय गीता करताना म्हणते, ''माझ्या अगदी अल्पांशाने मी विश्व व्यापून टाकले आहे आणि अनंतपणे विश्वाच्या पलीकडे आहे.'' गीता १०.४२.

**(ड) अवतार :**

सर्वातीतता व अंतर्यामित्व हे दोन्ही गुण ईश्वरात आहेत. 'अवतार' या कल्पनेने या दोन्ही गुणांच्या विरोधाभासाचा परिहार होतो. ईश्वर जगाच्या पलीकडे आहे. परंतु अवतार घेऊन तो जगात उतरतो.

गुरुदेव म्हणतात, 'अव' या उपसर्गाचा असा अर्थ आहे. तसाच आम्ही करतो. पण 'अव' म्हणजे आध्यात्मिक दृष्टीने खाली, असा त्याचा अर्थ करतो. साक्षात्कारात साधकाच्या दृष्टीसमोर देवाचे रूप अवतरते. अशाप्रकारे साधकासमोर देवाचे रूप अवतरणे, उतरणे म्हणजे अवतार.

ईश्वर सर्वातीत असूनही तो जगात उतरतो, जगाच्या अंतरी येतो. त्याप्रमाणे सर्वातीत असून सर्वव्यापी होतो.

**(क) साक्षात्काराच्या सत्यतेचे निकष :**

या विषयाचा उहापोह गुरुदेवांनी जवळजवळ त्यांच्या सर्व गाथामध्ये केला आहे. प्रमुख निकष असे : सार्वत्रिकता, जाणिवेच्या सर्व अवस्थांमध्ये साक्षात्कार होणे, त्यामध्ये वाद पाहिजे, तो प्रातिभ, अंतरनिर्मित व अतिंद्रित असतो. तसेच त्यामुळे आनंद होतो. दुःखाचा स्पर्श नसलेले सुख होते व साक्षात्काराच्या परिणामामध्ये वाढत जाते.

ईश्वराचे अंतिम स्वरूप हे आनंद आहे. गुरुदेवांचा साक्षात्कारवाद म्हणजे ब्रह्मानंद होय. कबीर इत्यादी हिंदी संतांच्या परिभाषेत Flavourism ब्रह्मरस स्वाद वाद म्हणावा लागेल.

(ड) साक्षात्कार दिक्कलातील beyond space and time आहे.

**(इ) एक जग, एक मानवता, एक देव :**

William James च्या शब्दांमध्ये साक्षात्कार ineffable आहे. त्याचे शब्दांकन करणे शक्य नसते. केल्यास दुर्बोध ठरते. या कारण साक्षात्कारी संतांचे जणू एक समान ध्येयाने प्रेरित असे गुप्त संतकुलच बनते. त्यांचे नियम फक्त देवालाच ठाऊक असतात. त्या संतांना त्यांची कल्पना नसते. सर्व देशातील, कालातील, धर्मातील संत एकाच आध्यात्मिक जगात वावरणारे नागरिक असल्याने, ते आपल्या अनुभवांबद्दल एकाच भाषेत बोलतात. वंश, जाती, धर्म, देश यांच्यामुळे त्यांची मने दूषित वा विकृत होत नाहीत. त्यांचे पारमार्थिक अनुभव शाश्वत, मर्यादातीत व दिक्कलातीत असल्याने देशकालाशी त्याचा काही संबंध राहात नाही.

ईश्वराचा साक्षात्कार हेच मानवतेचे उच्चतम ध्येय, एकमेव धर्म आहे. या ध्येयामुळे सर्व जग व मानवता एक होईल. कारण एकाच देवाचे सर्व पाईक असतील.

गुरुदेवांचे हे भाकीत सत्यात केव्हा उतरेल ते एक देव व गुरुदेवच जाणोत.

गुरुदेवांनी मांडलेल्या साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानाच्या विवरणातील काही मुद्दे खोलवर पाहून व काहींचे निर्देशन करून पुरे केले. यानंतर त्यांचा आवडता पैलू साक्षात्काराचे मानसशास्त्र थोडक्यात पाहू या.

**१४) साक्षात्काराचे मानसशास्त्र**

जीवनातील अनिश्चितता, असहाय्यता व नित्य गरजांचा तुटवडा, ज्यामुळे दैनंदिन व्यवहाराच्या सुरळीतपणास खीळ पडते. अशा गोष्टी जर मनुष्यास साततत्याने सतावू लागल्या तर विवेकी मनुष्याची बुद्धी याचे उत्तर अनाकलनीय अतिताच्या प्रांतात शोधू लागते. या शोधामध्ये त्यास हे सर्व अंतिम उद्देशाच्या दृष्टीने अर्थपूर्ण भासते व परिस्थितीस

सामोरे जाऊन तडजोड करण्यातच आपले अंतिम हित सामावलेले आहे ही जाण येते.

गुरुदेवांनी कांटच्या भाषेत हे विचार मांडले आहेत :-

''थोर जर्मन तत्त्ववेत्ता कांट यास, त्याच्या पहिल्या तार्किक ग्रंथात केवळ तर्काच्या आधाराने ईश्वराचे अस्तित्त्व सिद्ध करता आले नाही. परंतु आपल्या दुसऱ्या तार्किक ग्रंथात, सद्‌गुणांना शेवटी योग्य फळ मिळणे अपरिहार्य असते. या नैतिक तत्त्वाचा आधार घेऊन कांटने ईश्वराचे अस्तित्व सिद्ध केले. तो म्हणतो ''या जगामध्ये सज्जन दु:ख भोगतात व दुर्जनाची भरभराट होते.'' सद्गुण व सुख यांचे समीकरण सिद्ध कसे करायचे ह्यास त्याने दोन प्रकारे उत्तर दिले आहे.

''प्रथमत: आत्म्याचे अमरत्व गृहीत धरावे लागेल. त्यास पुनर्जन्म आहे असे मानावे लागेल. म्हणजे या जगातील भोगलेल्या दु:खाची भरपाई पुढील जन्मी सुख मिळून होईल. सतत वाईट प्रवृत्तीने या जन्मी दुष्कृत्ये केलेल्यांना पुढील जन्मी योग्य ते शासन घडेल.''

दुसरे उत्तर म्हणजे ''सद्‌गुण व दुर्गुण यांचे योग्य फळ ठरविणार कोण? त्यासाठी सर्वश्रेष्ठ योग्य न्यायाधीश हवा. तो म्हणजे ईश्वर. ईश्वरच कर्म व त्याचे योग्य फळ ठरवू शकतो. ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करणारा हा नैतिक पुरावा होय.''

पण याचा आपल्याला काय उपयोग? ईश्वराने वा नियतीने सद्‌गुण व त्यांच्या फळातील सुव्यवस्था साधावी असे आपणास वाटणे व त्यासाठी प्रार्थना करणे हे आपले कार्य होत नाही का? समजा जर या दोघांत सुव्यवस्था साधली गेली नाही (असे नेहमीच घडते) तर आपल्या पारमार्थिक प्रयत्नाने ही सुव्यवस्था साधली जावी, येथेच व या क्षणी अशी इच्छा का धरू नये? निदानपक्षी आपल्या पारमार्थिक प्रयत्नाने आपल्यास हे समीकरण साधण्याची दृष्टी मिळेल. ज्यायोगे आपले प्रयत्न तीव्रतेने होतील?

हा सर्व खटाटोप पारमार्थिक दृष्टी मिळविण्यासाठी आहे, ज्या योगे जे घडले आहे, ते देवाच्या इच्छेनेच होत आहे व आपल्या अंतिम हितासाठीच आहे, हे अंत:करणात ठसून जाईल व खरे सुख सद्गुणांच्या फळात नसून, ईश्वराच्या साक्षात्कारात, त्याच्या आनंदात मग्न होण्यात आहे हे स्वानुभवाने पटेल व खात्री होईल. हे मनोमार्गानेच साधावयाचे आहे. म्हणून साक्षात्काराचे हे मानसशास्त्र, ज्याची व्याप्ती ईश्वराभिमुख होण्यापासून ईश्वर दर्शनापर्यंत पसरली आहे.

**१७. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती :**

गुरुदेवांनी आपल्या हिंदी व कन्नड देवप्राप्तीचा मार्ग ह्या दोन्ही ग्रंथांमध्ये संतांच्या जीवनाचे सार सांगितले आहे. खालील उद्‌गार त्यांच्या जीवन प्रवासात घट्ट बसतात. ते म्हणतात, ''अनुभूती अनिर्वचनीय व बुद्धिग्राह्य आहे. परंतु ती अतिद्रिंय असल्यामुळे सर्व साक्षात्कारी संतांचा एक समाज बनतो. तो इतरांपासून अज्ञात व गुप्त राहतो व त्यांच्या राहणीचे नियम फक्त त्यांनाच माहीत असतात. किंबहुना ते त्यांनासुद्धा माहीत नसतात. ते देवालाच ठाऊक असतात, असे म्हणणे योग्य होईल. संतांना पीडित व त्रस्त मानवतेबद्दल कळवळा वाटतो म्हणून अखिल मानवतेचे कल्याण व्हावे, तिचे जीवन जास्त सुखी व्हावे एवढ्याचकरीता त्यांचे जगणे असते. ईश्वराचा शुभसंदेश या ध्रुवाच्या टोकापासून त्या ध्रुवाच्या टोकापर्यंत, अनादि कालापासून अनंत कालापर्यंत, आकाशात घनगर्जना करीत परिभ्रमण करणाऱ्या एखाद्या मेघाप्रमाणे ते जगात गर्जून सांगतात.''

• • •

# गुरुदेवांचे भावाविषयी विचार

ईश्वरप्राप्तीच्या मार्गातील विघ्ने विशद करताना भावाचे महत्त्व अधोरेखित केले आहे ते असे. आता विघ्नांचा विचार करू. भाग्याने एखाद्याने परमार्थ मार्गाचें आक्रमण करण्यास सुरुवात केली असे गृहीत धरलें, तरी त्यावर अल्पस्वल्प प्रगती होण्यास देखील फार दीर्घ कालावधी लागतो; मग शेवट गाठण्याची गोष्ट तर फारच दूर!

**तत्स्वयं योगससिद्धः कालेनात्मनि विन्दति** ।। भ. गी. ४.३८

द्वि, त्रि किंवा पञ्च-वार्षिक योजना ईश्वरप्राप्ती करून घेण्याला उपयोगी पडत नाहीत. एका दृष्टीने ईश्वरप्राप्तीचा कालाशी काहीच संबंध नाही. ईश्वर प्राप्तीला अंत:करणातील भाव आवश्यक आहे, भाव निर्माण झाला की काल जिंकता येतो; मग ईश्वरप्राप्तीला वेळ लागत नाही. परंतु, भाव निर्माण होण्यासाठी अभ्यासाची आवश्यकता आहे. तरीही केवळ अभ्यास झाला म्हणजे सर्व काही झाले असेही नाही. भावाची विशिष्ट अवस्था गाठली की फार काल वा अभ्यास लागत नाही. परंतु, सामान्यत: मनुष्यात त्या प्रकारचा भाव नसतो, म्हणून त्याला काल व अभ्यास यांचा अवलंब करावा लागतो एखाद्याने पारमार्थिक साधनांत पन्नास वर्षे घालविली असली तर पहिल्या पांच, दहा वर्षांत त्याची जी आध्यात्मिक प्रगती झाली होती तिच्यापेक्षा उच्चतर अवस्थेला तो आता पोहोचलेला असेल असे म्हणता येईल. परंतु केवळ या दीर्घकालीन साधनांमुळे परमार्थ मार्गाचे अंतिम ध्येय त्याने गाठले आहे असे मात्र केव्हांही म्हणता येणार नाही.

**कर्मगती :**

येथेच पुढील विघ्न निर्माण होते; ते म्हणजे दैव किंवा कर्मगती. यालाच ग्रीक लोक 'मीरिया' म्हणतात. आध्यात्मिक जीवनात पुष्कळ प्रगती करण्याचा प्रयत्न कोट्यवधी लोकांनी केला तरी, इष्ट ती प्रगती होणे हे केवळ मनुष्याधीन नाही. तेथे भवितव्यतेचा किंवा योगायोगाचा प्रश्न येतो यालाच तत्त्वज्ञानांत 'अनिश्चितता' (Indeterminism) म्हणतात. धर्मशास्त्रात त्याला ईश्वराची इच्छा असे म्हणतात. केवळ ईश्वराच्या इच्छेनेच प्रयत्न करणाऱ्या लक्षावधी साधकांपैकी एखादाच साक्षात्काराच्या शिखराला पोहोचतो. आध्यात्मिक जीवनाचा शेवट गाठण्याच्या मार्गात हे अशा प्रकारचे अंतराय आहेत.

२) आध्यात्मिक चिंतन किंवा ध्यानाबाबत गुरुदेवांनी चार मुद्यांचा विचार केला आहे. तो म्हणजे त्यांच्याच शब्दात 'ईश्वराबद्दल नितांत प्रेम म्हणजे भाव किंवा भक्ती.' गुरुदेव म्हणतात,

आध्यात्मिक चिंतनातील भक्तिविषयक भागाचा विचार करू. हा फार महत्त्वाचा भाग आहे. नासिकाग्रीं दृष्टी ठेविली, प्राणायाम केला आणि मनातील सर्व विषय विचार व भोगलालसा दूर केली तरी त्याचा उपयोग काय? देवाविषयी ऐकान्तिक कळकळीची भक्ती, एकविध भाव वाटू लागल्याशिवाय साक्षात्काराच्या दृष्टीने दुसऱ्या कशाचाही काहीही उपयोग होणार नाही. भक्तिमय ध्यान यशस्वी होण्याला आवश्यक असलेल्या सर्व प्रक्रिया गीतेत एका सुप्रसिद्ध श्लोकांत संकलित केल्या आहेत. तो श्लोक पाहा –

**अनन्यचेताः सततं यो मा स्मरति नित्यशः।**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ।।** भ. गी. ८.१४

या श्लोकात तीन मुद्दे सांगितले आहेत. (१) आपल्या अंत:करणात देवाबद्दल एकांतिक, एकविध, भक्ती उत्स्फूर्त व्हावी, दुसऱ्या कशाचीही

ओढ किंवा आसक्ती मनाला असता कामा नये. ''अनन्यचेतस्त्व'', (२) एक क्षणही व्यर्थ न घालविता ध्यानाचा अभ्यास दिवसामागे दिवस, महिन्यामागे महिना, वर्षामागे वर्ष, असा आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत चालू ठेविला पाहिजे. ''नित्यशः व नित्ययुक्तत्व.''

**स तु दीर्घकालनैरंतर्यसत्कार सेवितो दृढभूमिः ।** यो. सू. १.१४

या सुप्रसिद्ध सूत्रात पतंजलींनीही याच तीन गोष्टी अत्यंत आवश्यक म्हणून सांगितल्या आहेत. या सर्व गोष्टी साध्य झाल्या म्हणजेच परमार्थ साधनांत यश मिळण्याची निश्चिती होते. परंतु हे विसरता कामा नये की, भाव किंवा भक्ती यांची साक्षात्काराला सर्वात अधिक, अगदी मूलगामी, आवश्यकता आहे. ज्याचा अर्थ कोणी आजपर्यंत सांगितला नाही किंवा सांगणे शक्य नाही असे ईश्वराबद्दल नितांत प्रेम म्हणजे भाव किंवा भक्ती. अशा प्रेमाच्या तुलनेने सतत, दीर्घकाल ध्यान इतकेच नव्हे तर अत्यंत एकाग्रतेने नामस्मरणही फार कमी महत्त्वाचे आहे. आपल्या भक्तींत शरणागतीची भावना उत्पन्न झाल्यावाचून व ईश्वराच्या इच्छेने होणार असेल ते होवो, अशा वृत्तीने आपण आपला हवाला सर्वस्वी देवावर टाकल्यावाचून परमार्थात विशेष यश मिळणार नाही असे गीतेने बजाविले आहे.

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।।** भ. गी.१८.६२

शेवटी गीता सांगते की केवळ अनन्य भक्तीनेच ईश्वराला जाणणे, पाहणे व त्याच्याशी एकरूप होणे शक्य आहे.

**भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।**<br>**ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ।।** भ. गी. ११.५४

हा भक्तीविषयक भाग झाला.

### ३) परमार्थ पथावर प्रगती आणि अष्टसात्त्विक भाव

**अष्ट सात्त्विक भाव (ज्ञानेश्वरी ११.२४५-५२)** साधकाची आत्मप्रचिती जशीजशी वाढत जाते, तशातशा तिच्या काही शारीरिक -

मानसिक, प्रतिक्रिया त्याच्यावर घडूं लागतात. अलंकार शास्त्रांत व साक्षात्कार शास्त्रात या प्रतिक्रियांना सात्त्विक भाव मानले असले, तरी ते आठच आहे, असें नाही. ते अधिकही असू शकतील. हे आठ भाव कोणते या विषयीही भावनासंबंधी लेखकांत ऐकमत्य नाही.

परमार्थ–पथावर प्रगती होत असता, सामान्यत: पुढील सात्त्विक भाव साधकाच्या ठिकाणी प्रकट झालेले दिसतात; **शारीरिक :** १. रोमांच, २) स्वेद, ३) अश्रु. अश्रु विशेषत: विशिष्ट मानसिक अवस्थेमुळें येतात. **शारीरिक-मानसिक (मिश्र) :-** १. कंप, २. स्तंभ किंवा ताटस्थ. कंप व स्तंभ हे वस्तुत: विरोधी भाव आहेत. परंतु असे विरोधी भावही साधकांमध्ये निरनिराळ्या वेळी उत्पन्न होता. **मानसिक :–** १. मौन, २. शांती, ३. आनंद. शारीरिक स्तंभामुळे मानसिक मौन उत्पन्न होते आणि मौनापासून शांती उत्पन्न होते. शेवटी मौन म्हणजेच शांती असे समीकरण होते. आता, शांती व आनंद याही विरोधी भावनाच आहेत. परंतु साक्षात्कारामुळे उद्‌भवणाऱ्या भावनांची अशी मौज आहे की, त्यांत अशा विरोधी भावनांचा संगम होतो. सारांश, परमार्थ–पथ आक्रमित असता साधकाच्या ठिकाणी पुढील भावना उत्पन्न होतात. रोमांच, स्वेद, अश्रु, कंप, स्तंभ, मौन, शांती आणि आनंद.

ज्ञानेश्वरांनी या भावांचे अत्यंत मनोज्ञ चित्रण केले आहे, ते मुळातच देत आहोत.

**''तेथ एक विश्व एक आपण । हे अळुमाळ होते जे दुजेपण ।**
**तेहि आटोनि गेलें अंत:करण । विरालें सहसा ।।**
**आंतुला महानंदा चेहरें जाहलें । बाहेरि गात्रांचें बळ हारपोनि गेलें ।**
**आपाद पां गुंतलें । पुलकांचलें ।।**
**वार्षिये प्रथमदशे । वोहळल्या शैलाचें स्वर्गीं जैसें ।**
**विरुढें कोमलांकुरीं तैसे । रोमांच आले ।।**
**शिवतला चंद्रकरी । सोमकांतु द्रावो धरी ।**

**तैंसिया स्वेदकणिका शरीरीं । दाटलिया ।।**
**माजीं सांपडलेनि अलिउळें । जळावरि कमळकळिका जेवीं आंदोळे ।**
**तेंवी आतुलिया सुखोर्मीचेनि बळें । बाहेरि कांपे ।।**
**कर्पुर केळीचीं गर्भपुटें । उकलतां कापुराचेनि कोंदाटें ।**
**पुलिका गळतीं तेंवी थेंबुटे । नेत्रोनि पडती ।।**
**ऐसा सात्त्विकांहीं आठां भावां । परस्परें वतृतते हेवा ।।**
**तेथ ब्रह्मानंदाची जीवा । राणीव फावली ।।**
**उदयलेनि सुधाकरै । जैसा भरलाचि समुद्र भरे ।**
**तैसा वेळोवेळां उर्मीभरें । उचंबळत असे ।।''** (ज्ञाने. ११.२४५-५६)

''केळनो हरि ताळनो'' ''देव ऐकणार नाही व सहन करणार नाही'' या श्री पुरंदरदासांच्या पदात श्री पुरंदरदास यांनी गायन व कीर्तन, भजन व ध्यान, यांचा 'स्मरण' म्हणजे शांतपणे मनातल्या मनात देवाच्या नामाची आठवण व ध्यान करणे, याचा अत्यंत निकट संबंध आहे असे प्रतिपादिले आहे. देवाविषयी प्रेम हेंच सर्व खऱ्या गायनाचे मुख्य व श्रेष्ठ लक्षण आहे. खऱ्या व तीव्र भक्तीने हे हरिगुण गाणाऱ्या नारद व तुंबर यांच्याशी तुलना केली असता तंबोरा, तबला इत्यादी साहित्याच्या साहाय्याने गाणारे गायक ढोंगी व भोंदू होत, असे वरील पदाप्रमाणे या पदातही श्री पुरंदरदासांनी म्हटले आहे. भक्तीने गायलेल्या पदापुढे निरनिराळ्या रागदारीची व स्वरांची मुळीच किंमत नाही. एकाग्र भक्तीने साधक देवाचें नाम गातो, तेव्हा त्याच्या अंतःकरणात अष्ट सात्त्विकभाव निर्माण होतात. आनंद, अश्रू, पावलोपावली रोमांच उठणे व श्वास बंद होणे व शेवटी आनंदाने हरिनाम गायन यांनी देवास प्रसन्न व्हावेच लागते.

**४) ''भक्ति भावनु नोडदे नंबिदवरिगे...''**

'भक्तिभावनु नोड दे... मुक्तिय पालिसुव', 'भक्ति-भाव याकडे न पाहता सद्गुरु शिष्यास मुक्ती देतात' हा मुद्दा भवतारकांनी मांडिला आहे. भक्तीभाव नसतानाही जे साधक सद्गुरुंवर पूर्ण विश्वास ठेवतात, त्यांनाही

ईश्वराची प्राप्ती होते, असे भवतारक सांगतात. 'जाणून' किंवा 'अजाणपणे' या शब्दाप्रमाणेच साधा–भोळा विश्वास इतर सर्व गोष्टींपेक्षा श्रेष्ठ आहे असे भवतारक प्रतिपादतात. प्रो जेम्स यांच्या 'मानसशास्त्राची तत्त्वे' या ग्रंथाचे वाचन केलेल्यांना प्रो. जेम्स याच मनोवृतीचे कसे समर्थन करीतो, हे सहज कळेल. विश्वास किंवा श्रद्धा म्हणजे अंतिम सत्याचा गाभा आहे. ईश्वर खरा आहे, याचे ज्ञान नसले तरी ईश्वर, इच्छा स्वातंत्र्य व अमरत्त्व ही खरी आहेत, असा विश्वास किंवा श्रद्धा ठेविली की, एक दिवस असा उजाडेल की, त्या दिवशी ही सत्य असल्याचे त्याच्या प्रत्ययास येईल. यास 'श्रद्धेचा उपयुक्तता वाद' असे म्हणता येईल. या उलट देवाविषयी अंत:करण भक्तिपूर्ण असावे असे बसवेश्वरांचे मत आहे. देवाबद्दल भक्तांचे अंत:करण पूर्णपणे भरलेले असावे. भक्तिशिवाय परमार्थात काहीच प्राप्त होणार नाही. हजारो वेळा 'मरा', 'मरा' असे निरर्थकपणे म्हणण्यात काही उपयोग नाही. 'बरिदे करेवरू' अजाणपणे, यंत्राप्रमाणे देवास हाक मारण्यात काहीच अर्थ नाही. भाव भक्तिशिवाय त्याचा धावा करण्यात काही उपयोग नाही. साधकाच्या अंत:करणात प्रेम व निष्ठा पाहिजे. भावभक्ति पाहिजे. देवाबद्दल पूर्ण भक्ती असली तरच देव तुमच्या हाकेस ओ देतो. नाही तर नुसते मोठ्याने ओरडला किंवा तुतारीच्या साह्याने किंवा शिंग फुंकून मोठ्याने त्याला बोलाविले (कोंब मेट्टि कूगेंदा) तरी देव तुमच्यापुढे येऊन मुळीच उभा राहणार नाही. देवास भक्तियुक्त अंत:करण हवे असते. नुसते यंत्राप्रमाणे शब्द पुटपुटणे नको असते. या पदात भवतारकांनी प्रतिपादलेल्या तत्त्वांचे हे सार आहे.

**५) भावाशिवाय 'वस्तु' कळणार नाही**

खरी भक्ती किंवा भाव असल्याशिवाय ही 'वस्तू' साधकास मिळणार नाही असे श्री महिपती निक्षून सांगतात. केवळ जपमाळ धरून माळा ओढीत जप केल्याने किंवा एकादशीच्या दिवशी कडक उपवास केल्याने

काही उपयोग होणार नाही. त्याने मन शुद्ध होईल, परंतु परमेश्वर दर्शन घडणार नाही. नुसते माळ ओढणे नको, तर खरी भक्ती पाहिजे. ज्यांच्या अंत:करणात भाव आहे, त्यांना याचे मर्म कळेल. ''भाविक बल्ल इदर होइला'' हा भाव म्हणजे काय हे मला कळू लागले आहे. माझे सद्‌गुरु या भावाबद्दल नेहमी बोलत असत. परंतु त्याचा अर्थ काय हे आम्हास त्यावेळी कळले नाही. पुढे श्री महिपती सांगतात की, ''ही वस्तू म्हणजे जीवन मुक्तीचे मूळ आहे.'' ''जीवन्मुक्तिगिदे मूळा'' हे विधान फार महत्त्वाचे आहे. तुम्ही ईश्वराचे रूप पाहिलें की, जीवन मुक्त झाला. हा जीवनमुक्तीचा 'स्वानुभव' असा अर्थ फार थोड्या लोकांनी दिला आहे. वेदान्त तत्त्ववेत्त्यांनी अनेक प्रकारच्या मुक्तीची चर्चा केली आहे. कर्ममुक्ती, विदेहमुक्ती व जीवनमुक्ती. परंतु ही जीवनमुक्ती म्हणजे काय, हे मात्र त्यांनी सांगितले नाही. देवाचे रूप पाहणे म्हणजेच जीवनमुक्ती, हे श्री महिपतींनी स्पष्टपणे सांगितले आहे. तुम्ही जिवंत असता व जिवंत असूनही मुक्त होता, हा मुद्दा जीवनमुक्तीच्या बाबतीत फार महत्त्वाचा आहे.

### ६) Plus something - अधिक काही तरी...

ईशप्राप्तीसाठी जी अंत:करणाची तयारी लागते ती त्यायोगे होणार नाही. ती भक्तीनेच होणार. हठयोगातील साधनेचा प्रारंभ व कित्येकदा शेवटही जडदेहातच होतो. कारण त्या मार्गात थोडे ज़री कोठे चुकले तरी मानसिक विकृतीसारखे भयंकर प्रकार संभवतात. उलट अंत:करण हे भक्तीचे स्थान असल्याने तिचा प्रारंभ होतो तोच मुळी कळसापासून. हठयोग तळापासून प्रारंभ करतो आणि बहुतेक करून तळातच राहतो. उलट भक्ती सरळ भावाचा कळस पकडते व तेथून प्रारंभ करून भक्ताचे जीवन आमूलाग्र व्यापून टाकते. याच अभिप्रायाने प्रो. रानडे एकदा म्हणाले होते, ''शेवटी आमचा पंढरपूरचा मार्गच श्रेष्ठ.'' शिवाय भक्तीत आसनादी क्रिया अनुस्यूत असून त्या आपोआप घडून येतात. परमार्थ

साधनात 'आसन कोणते?' हा प्रश्न साधक त्यांना नेहमी विचारीत. त्यांनी स्वत: काही काळ आसनांच्या मागे लागून त्यातील वैयर्थ्य ओळखले असल्यामुळे वरील प्रश्नास 'स्थिरसुखमासनम्' असे उत्तर ते देत. ज्या आसनावर बसल्याने निद्रा न येता नामस्मरण चांगले होईल ते आसन चांगले असे त्यांचे स्पष्ट मत होते. महत्त्व आसनास नाही, नामस्मरणास आहे. एकाप्रसंगी तर ते म्हणाले की, आसने आणि मुद्रा यामुळे आत्मदर्शन होत नसून आत्मदर्शनामुळें मुद्रा होतात. आविष्कारामुळे भाव उत्पन्न होतो असे नसून भावामुळे आविष्कार उत्पन्न होतो. हठयोगातील क्रियांनी अंत:करणातील भाव निर्माण करू पाहणे हे त्यांच्या मते नटाने आपल्या आविर्भावाने प्रेक्षकांच्या ठिकाणी मुळांत नसलेली भावना निर्माण करण्याप्रमाणे आहे. नट कुशल असेल तर भावनिर्मिती होईलही; पण ती अल्पकाळ टिकेल. जीवनव्यापी होऊ शकणार नाही. तसेच हठयोगामुळे थोडाफार अनुभव आला तरी त्यायोगे साधकाच्या अंत:करणात भाव निर्माण होणार नाही. हा भाव उत्पन्न होणे हे प्रो. रानडे यांच्या परमार्थ मार्गाचे खरे वर्म होय. 'भाव तेथे देव' हे एकनाथांचे वचन प्रसिद्धच आहे. ते स्वत: नेहमी म्हणत की, देवाच्या रूपाहून त्याचे नाव श्रेष्ठ व नामाहूनही साधकाच्या अंत:करणातील भाव श्रेष्ठ कारण, नामस्मरण हे भाव निर्माण करण्याचे एक साधन आहे. या दृष्टीनें काही शब्दांच्या व्याख्याही त्यांनी नव्याने बनविल्या होत्या. कर्मयोगाविषयीची रूढ कल्पना त्यांना मान्य नव्हती. देवाचा अनुभव येवो किंवा न येवो, देवाचें नाम सतत स्मरणे हा त्यांच्या दृष्टीने खरा निष्काम कर्मयोग होता. 'लपलासि तरी नाम कोठे नेसीं । आम्ही अहर्निशी नाम गाऊ' हा नामदेवांचा अभंग ते नेहमी म्हणवून घेत. हा भाव निर्माण व्हावा व तो वाढता राहावा यासाठी ते स्वत: जन्मभर झटले. तेव्हा भाव, भक्तिभाव हा त्यांच्या साधन मार्गाचा गाभा आहे असे म्हटल्यास चालेल. परंतु असा भाव अंत:करणात निर्माण झाला तरी तो टिकणे कठीण असते.

एका पत्रात ते लिहितात त्याप्रमाणे 'माया साधकाचे पाय नेहमी मागे खेचित असते.' अशा परिस्थितीत विवेक, नामस्मरण, परमार्थ श्रवण, संतसंग हीच त्याचा भाव टिकण्याची खरी साधने होत. कारण, शेवटी परमार्थ ज्याचा त्यानेच साधावयाचा असतो. संत फार झाले तर बीजारोपण करतील; परंतु त्या बीजाचे अनुभवाच्या वृक्षात रूपांतर करणे सर्वस्वी साधकाच्या हाती असते. त्याच्या साधनाचा जोर वाढता राहील तर देवाची कृपा त्याच्यावर आपोआप होईल. ज्या क्षणी साधकाचा भाव तीव्रतम होईल, त्या क्षणी ईशकृपेचा अनुभव त्याला येईल. परमार्थ केवळ विवेकाने, केवळ ध्यानाने, केवळ सत्संगतीने साध्य होत नसतो. तसेच साधन नेहमीच उत्साहाने व भावपूर्ण होते, असेही नाही. त्यात चढउतार होणे हा देहाचा व मनाचा धर्मच आहे. सिद्धावस्थेस जाऊन पोहोचलेले गुरुदेव रानडे जेथे स्वतःच्या साधनाविषयी बोलताना 'आज नेम उत्तम झाला', 'आज साधारण झाला' असे म्हणत, तेथे सामान्य साधकाच्या स्थितीची कल्पनाच केलेली बरी. रामदासांनी म्हणटले आहे, 'अवघाचि काळ साजे । तरी अवघेचि होती राजे । काही सजे, काही न सजे । ऐसें आहे ।।' हे साधनासही लागू आहे. तेव्हा विवेक, ध्यान, सत्संग इत्यादीवर दिलेल्या साधनांच्या आधारे काही एका पायरीपर्यंत जाता येईल. परंतु प्रो. रानडे ज्याला 'Plus something' (अधिक काही तरी) असे म्हणत, तो 'भाव' निर्माण झाल्यावाचून परमार्थातील अखेरची चढण साधक चढू शकत नाही.

परमार्थात time व space हे constituents आहेत, पण मनाचा आवेग वाढला पाहिजे. It all depends on the fervour. अंतःकरणाचा संवेग हवा. ''तीव्र संवेगानां आसन्नः'' Also हातधरणिया शिवे परतत्त्वातें. मनाचा हा जोर १) विचाराने व २) संगतीने येतो. संतांचे प्रत्यक्ष संभाषण, देणे घेणे राहू द्या, mere presence is enough सह. साध्या ५-६ तास साधनापेक्षा १ तास तीव्र संवेगाचे साधन श्रेष्ठ आहे.

प्रयत्न हा हवाच. कूर्मदृष्टीची कृपा असणे किंवा होणे हे desirable असले तरी Practicable नाही. Things have to be achieved by ourselves. परमार्थाला सत्संगती, सद्विचार, देवासाठी जीव द्यायची तयारी हवी. इतके असून शिवाय काही तरी (plus something) असावे लागते. हे plus something म्हणजे spiritual energy होय. ही spiritual energy काही stages पर्यंत acquire करता येते. पण पुढे ती अवतरते (descends). Spiritual energy descends through saints like ज्ञानेश्वर आणि modern तत्सम saints like निंबरगी महाराज or भाऊसाहेब महाराज. या संतांत spiritual energy चा साठा (reservoir) झालेला असतो. ही spiritual energy च Divine grace. ती पूर्ण शरणागती झाल्यावर होते एवढेच नव्हे तर त्या संताला त्याची जाणीवही होत नाही.

आणि शेवटी गुरुदेव म्हणतात, ''The grace of the spiritual teacher descends upon the disciple like a meteor or a shooting star.'

**७) संतांनी इतर संतांच्या भावाचे केलेले कौतुक (आठवणी)**

(बाबांनी व गुरुदेवांनी शारक्कांच्या भावाबद्दल केलेले कौतुक.)

पुढील सर्व आठवणी श्री. सुनील गजेंद्रगडकर लिखित 'स्वानंदाचा गाभा' (प. पू. शारक्कांचे चरित्र) ह्या पुस्तकातील आहेत. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

**१) अंतरीच्या भावामुळे प्रसाद सेवन**

श्रावणात श्रीबाबांचे दुपारचे जेवण आनीखिंडीकडे असे. एका एकादशीच्या उपवासाच्या दुसऱ्या दिवशी, द्वादशीस, शारक्कांच्या मनात 'आज दुपारी श्री बाबांनी आपल्याकडे प्रसाद घ्यावा' असे आले. आपल्या सद्गुरुंनी आपल्या प्रसादाचा स्वीकार करावा अशी त्यांची तीव्र भक्तिपूर्ण इच्छा असली तरी त्यांनी श्रीबाबांना काही तसे विचारले नाही. शारक्कांना

तसे घडण्याची अजिबात शक्यता वाटत नव्हती. आपल्या खोलीत दारात उभे राहून महाराजांच्या समाधी मंदिराच्या शिखराकडे पहात शारक्कांनी मन:पूर्वक हात जोडले, आणि उत्कट भावाने त्या मनातल्या मनात आपल्या गुरुंना म्हणाल्या, ''तुम्ही यावे असे मला वाटते. पण तुमची इच्छा!'' शारक्कांच्या डोळ्यात पाणी आले. एवढ्यात श्री बाबा स्वत:च तेथे आले आणि शारक्कांना म्हणाले, ''चल बाई, आज तुझ्याकडे प्रसाद घेतो.'' शारक्कांचा आपल्या कानावर विश्वासच बसेना. त्यांनी विचारले, ''बाबा, खरंच तुम्ही येता?'' तेव्हा श्री बाबा हसून म्हणाले, ''होय, मी येतो.'' क्षणभर थांबून ते म्हणाले, ''जेवणास बरोबर ब्राह्मण पाहिजे नाही कां? मी भटजीस घेऊन येतो.'' असे म्हणून आपले गुरुबंधू श्री. लक्ष्मण भटजी यांना आणावयास श्री बाबा गेले. शारक्कांचा आनंद गगनात मावेना. त्यांच्या भक्तीची हाक त्यांच्या गुरुंनी ऐकली होती. घाईघाईने त्यांनी खीर आणि इतर साग्रसंगीत स्वयंपाक केला. त्यांना स्वयंपाकास पुरेसा वेळ मिळावा इतका विलंब करून श्री. बाबा लक्ष्मण भटजींसह आले. शारक्का आनंदाने आपल्या सगुण परब्रह्मरूप सद्गुरुंना जेवावयास वाढत होत्या. जेवण झाल्यावर हात धुवून श्री. बाबांनी हसत विचारले, ''काय बाई, झाले ना तुझ्या मनासारखे?'' शारक्कांनी कृतज्ञतेने त्यांना नमस्कार केला. त्यांना धन्य धन्य वाटले. आपल्या शिष्याच्या अंतर्मनातील विचार समजून आत्मज्ञानी सद्गुरु शिष्यांच्या इच्छा त्यांच्या भक्तीनुसार पूर्ण करतात याचा अनुभव शारक्कांना प्रथम असा आला. त्यांची निष्ठा अधिक बळकट होऊ लागली.

२) पहिल्या दोन मुक्कात (निंबाळ आश्रमात) शारक्कांना गुरुदेव भेटले नाहीत. तिसऱ्या खेपेस अजूनही गुरुदेवांची भेट झाली नव्हती. एके दिवशी गुरुदेवांचे निष्ठावंत सेवक जगन्नाथ गुरुदेवांना हवे असलेले पिंपळीचे गाठोडे शोधत होते. ते त्यांना सापडत नव्हते. म्हणून शारक्काही स्वयंपाकघरात शोधू लागल्या. शारक्कांना ते गाठोडे एका फळीवर

सापडताच त्यांनी हाक मारून विचारले, ''पंत, सापडले! हेच का पहा.'' हातात गाठोडे घेऊन त्या वळल्या, एवढ्यात स्वत: गुरुदेवच तेथे आले आणि 'सापडले का?' असे म्हणून त्यांच्या हातातून गाठोडे घेऊन चटकन निघून गेले. ते इतके चटकन गेले की शारक्कांना त्यांचे नीट दर्शनही झाले नाही. स्टुलावर उभ्या असल्याने त्यांना गुरुदेवांना नमस्कारही करता आला नाही.

काही दिवस गेल्यावर शारक्कांचा गावास जाण्याचा दिवस उजाडला. तीनदा निंबाळास येऊनही त्यांना गुरुदेव भेटले नव्हते. शारक्कांना फार वाईट वाटले. आपली अत्यंत प्रेमाने विचारपूस करून देखभाल करणाऱ्या श्री बाबांची त्यांना फार तीव्रतेने आठवण आली. ''आता आमचे बाबा गेले, आम्हाला आता कुणी नाही'' असे त्यांच्या मनात आले आणि त्या खिन्न झाल्या. त्यांनी आपण गावास जात असल्याचा निरोप जगन्नाथबरोबर गुरुदेवांना पाठवला. निरोप ऐकून गुरुदेव, ''त्यांना सांग मी भेटायला येतो'' असे म्हणाले. तो निरोप घेऊन जगन्नाथ शारक्कांकडे पोचतो न पोचतो तोच गुरुदेव स्वत:च आपल्या नेहमीच्या जलद गतीने तेथे पोहोचले. गुरुदेवांना आपल्या खोलीच्या दारात उभे असलेले पाहून शारक्कांना आनंद व आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांनी गुरुदेवांना नमस्कार केला.

गुरुदेवांनी शारक्कांना, ''तुम्ही इंचगेरीस जात असता ना?'' असे विचारल्यावर त्यांनी ''नाही, आता बाबा नाहीत म्हणून तिथे जात नाही'' असे उत्तर दिले. हे ऐकताच गुरुदेव जोरात म्हणाले, ''कोण म्हणते बाबा तिथे नाहीत? बाबा आहेत. तुम्ही जात जा.'' श्री बाबा देहरूपाने नसले तरी ते आत्मरूपाने तेथे आहेत हे जाणणारे गुरुदेवच इतक्या जोरात असे सांगू शकत होते. शारक्कांनी 'बरं' म्हणून पुन्हा गुरुदेवांना नमस्कार केला. ज्याप्रमाणे श्री बाबांनी आपल्याकडे प्रसाद घ्यावा हा शारक्कांचा कूटस्थातील भाव कळला होता त्याचप्रमाणे गुरुदेवांनाही त्यांचे दर्शन न

झाल्याने शारक्कांच्या मनाची झालेली तळमळसुद्धा न सांगता कळली. शारक्कांच्या भक्तीकरता परमार्थाकरता गुरुदेव त्यांना भेटले, त्यांच्याशी बोलले आणि इंचगेरीस जाण्याची त्यांना आज्ञा केली. शारक्कांना अतिशय आनंद झाला. त्यांच्या मनात उमेद आणि परमार्थात उत्साह आला.

गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणे शारक्का पुन्हा इंचगेरीस गेल्या. तेथे पौष मासात महिनाभर राहून त्यांनी साधन केले. महिन्याच्या अखेर त्यांना एक दृष्टांत झाला. श्री बाबा आपल्या पलंगावर मच्छरदाणीत झोपलेले त्यांना दिसले. ते उठून बसले आणि आधी एक हाताने व नंतर दोन्ही हात हलवून त्यांनी शारक्कांना बोलावले. शारक्का उठून त्यांच्याजवळ गेल्या. श्री बाबांना पाहून त्यांना फार आनंद झाला. त्यांनी विचारले, ''बाबा, तुम्ही इथेच आहात?'' श्रीबाबा म्हणाले, ''होय बाई, मी इथेच आहे.'' श्री बाबा शारक्कांचे हात धरून उठले. खूप दिवसांनी लेकरू-मायबाप भेटल्याच्या आनंदाने ते दोघेही हातात हात घेऊन नाचू लागले. शारक्का आनंदाने धावत जाऊन नेमास बसलेल्या लोकांना 'बाबा इथेच आहेत, बाबा इथेच आहेत' असे सांगू लागल्या. महिन्याभराच्या साधनेनंतर झालेल्या या दृष्टांताने गुरुदेवांच्या शब्दाप्रमाणे श्रीबाबा इथे आहेत याबद्दल शारक्कांची खात्री पडली. त्यांची गुरुदेवांवरची श्रद्धा व भक्ती स्थिरावली, दृढ झाली, वाढली. शारक्का गुरुदेवांना श्री बाबांच्या जागी मानू लागल्या.

### ३) द्रौपदीची थाळी

शारक्कांच्या सेवेचा एक अलौकिक भाग म्हणजे प्रत्येक काम करताना त्यांचे नामस्मरण सतत चालू असे. निंबाळास गुरुदेव त्यांचे स्नान व नेम झाल्यावर स्वयंपाक पहात असत. आत्मज्ञ संतांची दृष्टी पडल्याने अन्नाचा प्रसाद होतो. एके दिवशी कुणीतरी गुरुदेवांकरीता थोडेसे आंबे आणले. गुरुदेवांनी त्याचा रस काढून सर्वांना वाढण्यास सांगितले. शारक्कांनी छोट्याशा पातेलीत मावलेला तो रस गुरुदेवांना दाखवला. पंगत

बसण्यापूर्वी गाडी आली आणि अपेक्षेपेक्षा बरीच माणसे गाडीतून उतरली. इतक्या माणसाना एवढासा रस पुरणे शक्यच नव्हते. परंतु गुरुदेवांची सगळ्यांना रस वाढण्याची आज्ञा होती. शारक्कांनी स्वत:च रस वाढण्यास घेतला. प्रत्येक हालचालीबरोबर नामस्मरण करत त्यांनी प्रत्येक पानात एकेक डाव रस वाढला. नामावर लक्ष केंद्रित झाले होते. शेवटच्या पानात रस वाढून झाल्यावर त्यांनी पातेल्याकडे पाहिले. त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. एवढ्या लोकांना वाढून पातेल्यात सुरुवातीस होता तेवढाच रस पुन्हा उरला होता! शारक्कांचे मन भरून आले. त्या तशाच तडक गुरुदेवांकडे गेल्या. त्यांना पाहताच गुरुदेवांनी विचारले, ''काय, रस पुरला ना?'' शारक्कांनी पातेले दाखवून मनोभावाने गुरुदेवांना नमस्कार केला. हे गुरुदेवांचे करणे होते हे त्यांना कळून चुकले होते. त्या रात्री सिटिंगच्या वेळेस गुरुदेव म्हणाले, ''द्रौपदीची थाळी फक्त त्याच काळात होती असे नाही. आजही आहे. विचारा शारक्कांना. त्यांनी रस कसा वाढला ते!'' शारक्कांच्या भक्तीचे गुरुदेवांनी कौतुक केले आणि नेहमीप्रमाणे आपण नामानिराळे राहिले.

**४) गुरुचरणी ठेविती भाव'**

परमार्थात श्रेष्ठ प्रतीचा भाव आवश्यक आहे. हा भाव निर्माण होणे हे परमार्थाचे खरे मर्म आहे. गुरुदेव म्हणत, 'देवाच्या रूपाहून त्याचे नाम श्रेष्ठ आणि नामाहूनही साधकाच्या अंत:करणातील भाव श्रेष्ठ.' ज्या क्षणी साधकाचा भाव तीव्र होईल त्या क्षणी इशकृपेचा अनुभव त्याला येईल. साक्षात्काराला अंत:करणाचे मार्दव व देवाबद्दल कळवळा असावा लागतो. तो असल्यावर देव दूर नाही. भाव वाढल्यावाचून, तो अनन्य झाल्यावाचून उच्च साक्षात्कार शक्य नाही, असे गुरुदेव सांगत. शारक्कांचा भाव इतक्या श्रेष्ठ प्रतीचा होता की गुरुदेवानी वारंवार त्याचे कौतुक व प्रशंसा केली.

एकदा गुरुराव मुंबईस असताना धारवाडास त्यांची थोरली मुलगी सुनंदा तापाने आजारी पडली. तिला खूप ताप आला. शारक्कांनी डॉक्टरांचे

औषध सुरू केले. परंतु ताप उतरेना. असेच दिवस जाऊ लागले तेव्हा शारक्कांना काळजी वाटू लागली की पोरगी हातची जाते की काय? त्या आईविना मुलीची जबाबदारी शारक्कांवर होती. हा मुलीच्या जीवाचा प्रश्न तर होताच, पण शारक्कांच्या जबाबदारीचाही प्रश्न होता. अशा संकटात साहजिकच शारक्कांना गुरुदेवांची आठवण आली. त्यांनी गुरुदेवांना पत्र लिहून मुलीचे प्राण वाचविण्याकरीता करूणा भाकण्याचे ठरविले. तेच यातून पार पाडतील असा त्यांचा विश्वास होता. परंतु पत्र लिहावयाचे ठरवताच त्यांच्या मनात आले, 'गुरुदेव प्रत्यक्ष परमेश्वर आहेत. ते अंतर्यामी आहेत. मी मनाने जे आता सांगते आहे ते त्यांना कळतच आहे. मला सकाळपर्यंत त्यांचे उत्तर मिळेल आणि मुलीचा ताप उतरेल.' अशा विलक्षण निष्ठेने, नितांत भावाने व निश्चयाने त्यांनी कापूर लावून प्रार्थना केली. सुनंदास अंगारा लावून त्या नेमास बसल्या. पहाटेस त्यांनी पाहिले तर सुनंदास घाम येऊन ताप उतरला होता. जो ताप डॉक्टरांच्या स्ट्राँग औषधांना जुमानत नव्हता, तो सद्गुरुंच्या कृपेने निघून गेला होता. शारक्कांना गहिवरून आले. त्यांचे गुरु त्यांच्या हाकेला धावून आले होते आणि आपल्या कृपेने त्यांच्या संकटाचे निवारण केले होते. शारक्कांनी तत्काळ गुरुचरणी धाव घ्यावयाचे ठरविले. वास्तविक इतक्या मोठ्या आजारातून नुकताच ताप उतरलेल्या मुलीस सोडून जाण्याचा कुणी विचारही केला नसता, परंतु शारक्का जाणत होत्या की त्यांची सर्व चिंता त्यांच्या गुरुस आहे. गुरुच्या चरणांशी आपली कृतज्ञता आणि मनोगत व्यक्त केल्याखेरीज त्यांना राहवत नव्हते. त्या निंबाळास निघाल्या. तेव्हाच गुरुरावही गावाहून आले आणि झालेली हकीकत ऐकून तेही शारक्कांबरोबर निघाले. निंबाळास पोहोताच शारक्का तडक गुरुदेवांकडे गेल्या. गुरुदेवांनी आपणास काहीच माहीत नसल्यासारखे त्यांना विचारले, ''काय शारक्का, अचानक आलात?'' शारक्कांना गहिवरून आले. ''आपण मुलीला वाचवलेत'' असे म्हणून त्यांनी गुरुदेवांना नमस्कार

केला. सर्व हकीकत ऐकून गुरुदेवांनी नेहमीप्रमाणे आपल्याकडे काहीही श्रेय घेणे नाकारले. ते म्हणाले, ''छे, छे शारक्का, मी काही केले नाही. हा तुमचा भाव आहे. ही तुमची महाराजांवरची भक्ती आहे.'' शारक्कांचा भाव इतका श्रेष्ठ होता की तो जाणून गुरुदेवांनी संकट निवारले होते. मुलीला तसेच सोडून गुरुचरणी धाव घेण्यातही शारक्कांचा उत्कट भाव प्रतीत होतो.

निंबाळास गुरुदेवांच्या कृपाछत्राखाली परमार्थ साधन करत शारक्का भक्तीच्या आनंदात असत. एकदा गुरुदेव काकू व इतर साधकांसह विजापुरास गेले होते. गुरुदेवांच्या परतीची गाडी येण्याची वेळ झाली होती. शारक्का घराच्या गच्चीवर उभ्या राहून गाडीची प्रतिक्षा करत होत्या. वाट पहात असताना त्या आपल्या सद्गुरुंना उद्देशून पुरंदरदासांचे 'बंद नोडिरी वेंकटा' (हा पहा वेंकटेश आला... सिंधुबल्लाळ लक्ष्मीबरोबर हसत आनंदात आला) हे पद मन:पूर्वक म्हणत होत्या. गुरुदेवांची गाडी आली. सर्व मंडळी घरात आल्यावर गुरुदेव एकदम शारक्कांकडे वळले आणि म्हणाले, ''शारक्का, मघाशी म्हणत होतात ते पद म्हणा.'' आपण इथे मनोभावे म्हणत असलेले पद गुरुदेवांना गाडीत पोहोचले हे उमजून कृतार्थतेने त्या पुन्हा ते पद म्हणू लागल्या. गुरुदेव हसले. त्यांनी शारक्कांच्या भावाची पोच तेच पद म्हणावयास सांगून दिली होती.

५) गुरुदेवांचा निरोप आल्यामुळे एकदा शारक्कांना निंबाळास जावयाचे होते. परंतु त्या दिवसात धारवाडास फार चोऱ्या होत होत्या आणि गुरुरावही गावात नव्हते. गुरुरावांच्या मुलांवर घर टाकून जाणे शक्य नव्हते. शारक्कांना तर गुरुगृही जावयाचे होते. त्यांनी गुरुरावांचे तबलजी श्री. दत्तंभट यांनी रात्री मुलांच्या सोबतीस राहण्याची विनंती केली. परंतु ते घराची जबाबदारी घेण्यास तयार होईनात. शारक्कांनी दत्तभटांना अत्यंत खात्रीपूर्वक सांगितले. 'तुम्ही फक्त सोबतीस राहा. तुमच्यावर काहीही जबाबदारी नाही. आमचे गुरु रक्षण करतील.' शारक्कांच्या या जबरदस्त

विश्वासाने दत्तभटांना धीर आला आणि या आश्वासनावर ते राहावयास तयार झाले. शारक्का निंबाळास जाऊन आल्यावर त्यांनी दत्तभटांना विचारले, ''काय दत्तभट घाबरला नाहीत ना?'' तेव्हा दत्तभट म्हणाले, ''छे, मला कसली भीती? मी पहिल्या रात्री जागा झालो तेव्हा एक म्हातारे गृहस्थ फिरताना पाहिले. तेव्हापासून मी निश्चिंत झालो.'' हे ऐकून शारक्कांना आश्चर्य वाटले. ते म्हातारे गृहस्थ कसे दिसत होते असे विचारल्यावर जसजसे दत्तभट वर्णन करू लागले तसतसा शारक्कांना धक्काच बसत गेला. ते सर्व वर्णन गुरुदेवांचे होते. शारक्कांनी घाईघाईने आपल्याजवळचा गुरुदेवांचा फोटो दत्तभटांना दाखवताच ते म्हणाले की हेच गृहस्थ इथे घरात रोज रात्री फेऱ्या मारत. शारक्का थक्क झाल्या. त्यांना वाईट वाटले. आपण आपल्या विश्वासाने गुरु रक्षण करतील असे म्हणालो, आणि आपल्या शब्दाकरता आपल्या गुरुंनी खरोखर इतके कष्ट घेतले, हे कळून त्यांचे मन भरून आले.

गुरुदेव भेटल्यावर शारक्कांनी त्यांना ही झालेली घटना सांगितली आणि वाईट वाटून, गहिवरून त्या म्हणाल्या, ''मी आपणास उगीच त्रास दिला.'' तेव्हा गुरुदेव म्हणाले, ''छे, छे शारक्का, मी काहीच केले नाही. मी इथेच आहे. हा तुमचा भाव आहे.'' गुरुदेव कशाचेच श्रेय आपल्याकडे घेत नाहीत हे जाणून शारक्का गप्प बसल्या. गुरुदेवांना पूर्वी कधीही न पाहिलेल्या दत्तभटांनी फोटो पाहताच राखण करणारे वृद्ध गृहस्थ गुरुदेवच होते हे झटकन ओळखले होते. शारक्कांच्या भावपूर्ण निष्ठेला सद्‌गुरुंनी प्रतिसाद दिला होता!

### ६) शारक्कांचा अनन्यभाव

एकदा रात्रीच्या गाडीने शारक्का निंबाळास गेल्या. त्यांची गाडी पहाटेस निंबाळास पोहोचत होती. आरतीस निंबाळास असणार म्हणून शारक्कांनी पहाटेचा नेम करून गाडीत भूपाळ्या म्हटल्या. सामान्यत: इतक्या पहाटे निंबाळ स्टेशन निर्मनुष्य असे. फार फार म्हणजे गाडीने कुणी आले आहे

का ते पाहण्यास जगन्नात येत असे. त्या काळात निंबाळास विजेचे दिवे नव्हते. जगन्नाथच्या कंदिलाच्या उजेडात गुरुदेवांच्या जुन्या घराची वाट दिसत असे. त्या दिवशी गाडी पोहोचली तेव्हा शारक्कांची अशीच अपेक्षा होती. पण गाडी पोहोचली तेव्हा त्याना स्टेशनवर बरीच माणसे दिसली. त्यांना आश्चर्य वाटले. गाडीतून उतरल्यावर त्यांना गुरुदेव स्टेशनवर आल्याचे कळले. एवढ्यात त्यांना गुरुदेवांनी बोलावल्याचा निरोप मिळाला. गुरुदेव स्टेशन मास्तरांच्या खोलीत बसले होते. त्यांना नमस्कार करून शारक्का म्हणाल्या, ''आपण इथे आला हे माहीत नव्हते.'' गुरुदेव त्यांना म्हणाले, ''तुम्ही येणार म्हणून आलो.'' इतक्या पहाटे आपल्या स्वागतास आपले गुरु स्टेशनवर आलेले पाहून शारक्कांना किती आनंद झाला असेल!

थोड्या वेळाने गुरुदेव शारक्कांना म्हणाले, ''शारक्का, तुमची आरती झाली.'' शारक्कांनी तर गाडीत फक्त भूपाळ्या म्हटल्या होत्या. अजून आरती म्हणावयाची बाकी होती. म्हणून त्या म्हणाल्या, ''हो! आरती व्हायची आहे.'' परंतु गुरुदेव पुन्हा म्हणाले, ''शारक्का तुमची आरती झाली.'' तेव्हा शारक्कांना त्यांच्या बोलण्याचा अर्थ समजला. त्यांनी गुरुदेवांना नमस्कार केला.

कर्नाटक युनिव्हर्सिटीने आयोजित केलेल्या 'कन्नड संत वाङ्मयातील परमार्थ मार्ग' या विषयावरील व्याख्यानाकरीता गुरुदेव धारवाडास आले होते. त्यांचा मुक्काम श्री. जमखंडी वकिलांच्या बंगल्यावर होता. तेथे आधीच जाऊन शारक्कांनी त्यांच्या मुक्कामाची सर्व व्यवस्था केली होती. गुरुदेवांना गूळ आवडतो म्हणून एका डब्यात उत्तम गूळ आणून ठेवला होता. रात्री नेमातून उठल्यावर गुरुदेवांनी श्री. मधुमामा नागपूरकरांना गूळ देण्यास सांगितले. परंतु ऐनवेळी इतका व्यवस्थित ठेवलेला डबा सापडला नाही. खरेतर गुरुदेव गुळाचा एखादाच खडा घेत. पण त्या दिवशी त्यांना हवा तेव्हा गूळ मिळाला नाही. नागपूरकरांनी ही गोष्ट दुसऱ्या

दिवशी शारक्कांना सांगितली. शारक्कांनाही फार वाईट वाटले. गुरुदेवांच्या सर्व गोष्टी देवाच्या आधीन असतात हे माहीत असल्याने आपण आणून ठेवलेला गूळ देवालाच मिळाला नाही, याचे त्यांना वाईट वाटले. शारक्कांनी पुन्हा उत्तम गूळ आणून, स्वच्छ करून, बारीक तुकडे करून एका डब्यात भरून नागपूरकरांकडे दिला. 'डबा तुमच्याकडेच ठेवा आणि गुरुदेवांनी मागितला की त्यांना द्या' असे त्यांनी सांगितले. त्या रात्री गुरुदेवांनी मागताच श्री. मधुमामा नागपूरकरांनी त्यांना गूळ दिला. गुरुदेवांना आनंद झाला. आदल्या दिवशीच्या पार्श्वभूमीवरून त्यांनी गुळ कुणी दिला हे विचारल्यावर नागपूरकरांनी शारक्कांनी आणून दिल्याचे सांगितले. ते ऐकून गुरुदेव म्हणाले, 'व्वा! काय शारक्क्कांचा भाव आहे!'' शारक्कांच्या एकविध भावाची त्यांच्या गुरुंनी पोच दिली.

**गुरुदेवांचे भक्तीसंबंधीचे विचार**

१) हिंदी संतांच्या काव्यामध्ये प्रकट होणाऱ्या भक्तीच्या विशिष्ट रुपांचे वर्गीकरण गुरुदेवांनी येणेप्रमाणे केले आहे.

अ) परतत्त्व ज्ञान दृष्ट्या – Metaphysical
आ) वैयक्तिक – Personalistic
इ) मानसिक – Psychological
ई) सामाजिक – Social
उ) साक्षात्कार – Mystical

वरील बाबींचे स्पष्टीकरणार्थ त्यांनी निवडलेली उदाहरणे पाहू या.

**अ) A. Metaphysical**

१. Supremacy of भक्ती to योग and ज्ञान.

**ऊधो हमहिं न जोग सिखै है ।**
**जेहि उपदेस मिलैं हरि हमको,**
**सो व्रत नेम बतैहै ।**
**मुक्ती रहै घर बैठि आपने,**

निगुण सुनत दुख पैहै ।।

२. God is an object from which no separation is possible

कहैया सुनैया तजौं, बाप और भैया तजौं
दैया! तजौ मैया,पै कन्हैया नाहिं तजिहौ ।

आ) **B. personalistic**

३. One Pointed devotion (ऐकान्तिक Or अनन्यभक्ती) :-

(a) मेरो मन अनत कहां सुख पावै ।
जैसे उडि जहाज कौ पंच्छी,
फिरि जहाज पर आवै ।

(b) एक भरोसो, एक बल, एक आस बिस्वास
एक राम घनश्याम हित, चातक तुलसीदास ।

४. Passion for liberation

कीजै प्रभु अपनेबिरद कीलाज ।
महा-पतित कबहूँ नहिं आयौं ।
नैकु तिहारे काज ।
... ... ...
लीजै पार उतारि सूर कौं
महाराज ब्रजराज ।

५. Pangs of separation

प्रीति लगी तुव नाम की,
पल बिसरै नाई,
नजर करौ मेहर की,
मोहिं मिलौ गुसांई
... ... ...
नैना तरसे दरस को

पल पलक न लागै ।
दर बन्द दीदार का,
निसि–बासर जागै ।

We may compare with this the विरहिणीs of ज्ञानेश्वर, एकनाथ and तुकाराम

**इ) C. Psychological**

**6. Intoxication of devotion :**

(a) दरस दिवाना बावला, अलमस्त फकीरा
ओ एक अकेला हवै रहा, अस्मत का धीरा

(b) ऐसा देस दिवाना रे लोगो,
जाय सो माता होय ।
बिन मदिरा मतवारे झूमै,
जनन मरन दुख खोय ।

(c) दधि को नांव बिसर गइ ग्वालिनि
हरि ल्यो हरि ल्यो बोलै ।
... ... ...
कृष्ण – रुप छाकी है ग्वालिनि
औरहिं औरै बोलै।

Compare with this the famous नारदसूत्र – मत्तो भवति, स्तब्धो भवति, आत्मारामो भवति – as well as the expression जडमूढ पिशाचवत्

**ई) D. Social**

7. God devotion, the bond of universal love

जाके प्रिय न राम–वैदेही
तजियेताहि कोटि बैरि सम
जद्यपि परम सनेही ।

... ... ...

नातो नेह राम के मनियत,
सहृदय सुसेव्य तहाँ लाँ।
अंजन कहा आँखि जेहि फूटइ,
बहुतक कहउँ कहाँ लाँ ।

Compare with this the Abhanga of Tukaram.

नारायणी घडे । जेणें अंतराय ।
होत बाप माय । त्यजावीं तीं ।

**उ) E Mystical**

**8. Mystical realisation as a reward for devotion**

(a) रुपासक्ति

साई अलख लपख में झलके,
लहलहाट बिजली चमके ।
मन नगर हुआ, मन गरक ।

(b) श्रवणासक्ति

जब तें अनहत घोर सुनी
इन्द्री थकित गलित मन हुआ,
आसा सकल भुनी ।

**(c) अनुभवासक्ति in general :-**

रम्भा नृत्य करे बिन पग सूँ,
बिन पायल ठनकारै ।
सिद्धि गर्जना अति ही भारी,
घुँघरूँ-गति झनकारै,
गुरु सुकदेव करै जब किरपा,
ऐसा नगर दिखावै ।
चरनदास वा पग के परसे

आवागमन नसावै ।।

## २) भक्तीचे काही प्रकार / भक्ती विश्वास की प्रेम

अध्यात्मरामायण व श्री तुलसीदास दोघांनी या त्रिविध भक्तीत संत-संगती 'संतन कर संगा गुरु पदपंकज सेवा', व गुरु देवापेक्षा श्रेष्ठ आहे ही भावना, या गुणांचा समावेश केला आहे. तिसऱ्या गटांत परमार्थ मार्गास उपकारक असे गुण आहेत. एकापेक्षा एक अधिक श्रेष्ठ अशी पांच प्रकारची भक्ती व सद्गुण येथे वर्णिले आहेत. देवाच्या गुणांचे गायन व त्याच्या पराक्रमाचे वर्णन हे भक्तीचे पहिले दोन प्रकार होत. त्याचे वक्तव्य व संदेश लोकांस समजावून सांगणे याचाही दुसऱ्या प्रकारच्या भक्तीत समावेश होतो. ईश्वरभक्ती मनात वाढण्यासाठी ईश्वराचे कीर्तन करणे, त्याच्या गुणांचे चिंतन करणे, त्याचे गुणवर्णन करणे व त्यांनी दिलेल्या मंत्राचे ध्यान करणे अत्यंत जरूर आहे. या गटातील भक्तीचा तिसरा प्रकार म्हणजे मंत्रजाप, देवाच्या नामाचे स्मरण करणे होय. चौथा व पांचवा प्रकार म्हणजे, देवास सर्वत्र पाहणे व त्याच्यावर दृढविश्वास ठेवणे हे होत. पांचव्या प्रकाराचे वर्णन वेदान्ती श्री मध्यवाचार्यांनी 'रक्षिष्यतीति विश्वासः' (देव आपले रक्षण करणार हा दृढविश्वास) या शब्दांनी केले आहे. 'परमेश्वर स्वर्गात आहे व जगाचे सर्व बरोबर चालले आहे' हे तत्त्व साधकास मार्गदर्शक व्हावे, व प्रगति पथावर त्याची पावले पुढे पडावी. 'मम भरोस' परमेश्वर कल्याणकर व समर्थ आहे असा पूर्ण विश्वास, म्हणजेच सर्वात श्रेष्ठ प्रकारची भक्ती होय असे श्रीतुलसीदासांचे मत आहे.

याच्याविरुद्ध नारदाचे मत कसे आहे, याचा आपण विचार करू. विश्वासाच्या शब्दांत खऱ्या भक्तीची व्याख्या करता येणार नाही असे श्री नारदांचे मत आहे. भक्तीची व्याख्या प्रेमविषयक शब्दांनीच करता येईल. 'सात्वस्मिन परमप्रेमरूपा.' नारद भक्तिसूत्रे वाचणाऱ्यास नारदांनी भक्तीची जी व्याख्या दिली आहे ती आध्यात्मिक स्वरूपाची आहे हे चटकन लक्षात येईल. 'यल्लब्धवा पुमान् सिद्धो भवति, अमृतो भवति, तृप्तो भवति

। यत्प्राप्यन किंचित वांछति, न शोचति, न द्वेष्टि न रमते, नोत्साही भवति । यज्ज्ञात्वा मत्तो भवति, स्तब्धो भवति, आत्मारामो भवति।' आपल्या भक्तिसूत्रामध्ये श्री नारद पराशर, गर्ग आणि शांडिल्य या ऋषींची भक्ती-विषयक व्याख्या देतात. परंतु आपल्या मतावरच शेवटी भर देतात व भक्ती म्हणजे देवाविषयी वाटणारी अत्यंत तळमळ ही व्याख्याच बरोबर मानतात. 'परमव्याकुलता' म्हणजे भक्ती.

भक्ती म्हणजे 'भरोस', विश्वास, का प्रेम हा जरा नाजूक प्रश्न आहे व त्याची येथे आम्ही विस्तृत चर्चा करू इच्छित नाही. श्री तुलसीदासांच्या दृष्टीने रामभरोस सर्व सद्‌गुणांचा शिरोमणी आहे, एवढे येथे सांगितले म्हणजे पुरे. त्यांनी नवविधा भक्तीचे सविस्तर वर्णन दिलेच आहे. श्रेष्ठ भक्ती म्हणजे नऊ पैलू असलेला एक हिरा आहे. प्रत्येक पैलू म्हणजे परमेश्वराकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन होय, व सर्व पैलू म्हणजे आमची परमेश्वराविषयी वाटणारी एकंदर तीव्र भक्तीयुक्त भावना होय. या सर्व प्रकारांची मिश्रित अशी भक्ती शबरीची होती. (सकल प्रकार भगति दृढतोरे) व ज्या संतांमध्ये ही नवविधा भक्ती पूर्णपणे बाणली नाही तो आदर्श संत नव्हे, असे श्रीतुलसीदास म्हणतात.

३) भक्ती हे सद्‌गुणातील ऐक्याचें मध्यवर्ती सूत्र – गीतेतील सद्‌गुणांचा विचार करताना अध्याय १२, १३, १६ व १८ ही त्यांचा उल्लेख करणारी महत्त्वाची स्थळे म्हणून सांगितली आहेत. त्यातील सर्व सद्‌गुणात ईश्वर भक्तीचे सूत्र अनुस्युत आहे, हे दाखविण्याला फार वेळ लागेल व त्रासही होईल. म्हणून वरील अध्यायातील प्रत्येकी तीन सद्‌गुण मी विवेचनार्थ निवडीले आहेत. अशा प्रकारे एकंदर बारा सद्‌गुरुणांचा रत्नहार तयार झाला आहे, ते सद्‌गुण असे :

अ. १२ – करुणा, समता, शुचिता;

अ. १३ – अहिंसा, आत्मविनिग्रह, असक्ती;

अ. १६ – अभय, यज्ञ, शांती;

अ.१८ – तेज, ईश्वरभाव, सेवा.

गीतेतील नीतीची उच्चतम शिकवण समजण्यास एवढे सद्‌गुण पुरे आहेत असे वाटते. सर्वच सद्‌गुणांची कल्पना यावरून येईल. आता हे सर्व सद्‌गुण भक्तीचेच आविष्कार कसे ठरतात ते अनुक्रमे पाहू :–

**१. करुणा –**

ईश्वराशी दयेची याचना करणे या भावनेचेच करूणा वा भूतदया हे एक स्वरूप आहे. ईश्वराजवळ जो दया भाकतो त्याने सर्वांना आत्मवत लेखले पाहिजे. हा अगदी मूलगामी सिद्धांत आहे. म्हणून जेव्हा जेथे प्रसंग येईल तेव्हा तेथे सर्वांवर करुणा दाखविणे अत्यावश्यक आहे.

**२. समता –**

समता ही भक्तीला आवश्यक आहे; थोडी फार समता असल्यावाचून ईश्वर प्राप्ती होणार नाही. आणि ईश्वराचा साक्षात्कार झाल्यावाचून पूर्ण समता येणार नाही.

**३. शुचिता –**

भक्तीने अंत:करण पूर्वतया शुद्ध होईल हे उघड आहे. ईश्वराने अंत:करण व्यापले म्हणजे कोणतीही कुकल्पना त्यात प्रवेश करू शकणार नाही. ईश्वर आपल्या सिंहासनावर कोणाही तोतयाला बसू देणार नाही.

**४. अहिंसा –**

सर्वांना आत्मवत् लेखले पाहिजे या तत्त्वातूनच अहिंसेचा जन्म आहे. कोणत्याही जीवाला त्रास देता कामा नये. भूतमात्राला सुखाने जगण्याचा हक्क आहे, हे अहिंसेचे बीज आहे. यातूनच अहिंसा हा सद्‌गुण जन्माला येतो.

**५. आत्मविनिग्रह किंवा इंद्रिय निग्रह –**

संपूर्ण इंद्रिय निग्रह केल्यावाचून ईश्वरप्राप्ती होणार नाही. आपल्या जीवाच्या आवडीचा प्रियोत्तम जो परमात्मा, त्याची प्राप्ती करून घ्यावयाची असेल तर इंद्रियाधीन होऊन अनंत विषयांच्या मागे धावता कामा नये.

'प्रयोऽन्यस्मादान्तरतरो यदयमात्मा' असे बृ. आ. उपनिषदात म्हटले आहे. आत्मा हा सर्वांपेक्षा प्रिय आन्तरतर आहे.

**६. असक्ती किंवा अनासक्ती –**

ईश्वर हा प्रियोत्तम – आन्तरतर आहे, म्हणूनच इतर सर्व बाह्य वा आंतर गोष्टीविषयी अनासक्तीची वृत्ती ठेविली पाहिजे. ईश्वरासंबंधी आसक्ती म्हणजे इतर सर्व गोष्टीसंबंधी अनासक्ती. ती नसेल तर भागवतातील जडभरताची अवस्था होईल.

**७. अभय –**

उच्च साक्षात्काराला पोहोचल्यावर, उपनिषदांत सांगितल्याप्रमाणे त्या आत्मानुभवाचा परिणाम म्हणून अभय अंगी बाणते. 'आनंदं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन । न बिभेति कुतश्चन।' या प्रमाणे साधुपुरुष सदैव निर्भय असतो.

**८. यज्ञ –**

ईश्वरासाठी सर्वस्वाचा त्याग करणे हे तत्त्व साक्षात्कारात अंतर्भूतच आहे. हाच यज्ञ शब्दाचा खरा अर्थ होय. ईश्वरासाठी सर्वस्व समर्पण केले की त्याबरोबरच निष्कामपणे परहित साधण्याची त्याग वृत्तीही येतेच.

**९, शांती**

खऱ्या साक्षात्कार प्राप्तीचे सर्वश्रेष्ठ प्रमाण म्हटले म्हणजे शांती. उच्च पारमार्थिक जीवनाने शांती लाभली पाहिजे. शांती आणि दिव्य आनंद परस्परावलंबी असून त्यांची उत्तरोत्तर वाढ बरोबरच होत असते. हे आपण मागे पाहिले आहे. परंतु दिव्यानंदाच्या प्राप्तीनंतर लागणारी शांती त्यापूर्वीच्या शांतीपेक्षा उच्चतर असते.

**१०. तेज –**

ईश्वर पदाला पोहोचलेल्या पुरुषाच्या विचारांत व आचारात शौर्य व्यक्त झालेच पाहिजे. म्हणून भक्तीमार्गात शौर्याची (तेजस) आवश्यकता आहे.

**११. ईश्वरभाव –**

तेजामागोमाग साक्षात्कारी पुरुषांत सर्वेश्वररत्व प्रकट होते. आपली सत्ता सर्वत्र आहे, असे त्याला दिसून येते. हाच साक्षात्कारी पुरुषाचा ईश्वरभाव. तो एखाद्या उत्तुंग गिरीशिखरासारखा आपल्या अनुपम वैभवात स्वस्थ, एकाकी उभा असतो. त्याच्याशी कोणीही सलगी करू शकत नाही. याबरोबरच आपल्यां इच्छेला येईल त्याप्रमाणे वाटेल तेथे वाटेल त्या वेळी कल्याण करण्याचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी असते.

**१२. परिचर्या (सेवा) –**

असे सर्वेश्वरत्व त्याच्या ठायी असूनही मानवत सेवा करण्यात त्याला संकोच वाटत नाही. खरे पाहता सेवा आणि ईश्वरभाव यात विरोध आहे, असे वरवर भासत असले तरी ईश्वरभावाची परिणती लोक सेवेंत होते. दुसऱ्यांच्या अंतरंगांत साक्षात्काराला अनुकूल अशी वृत्ती उत्पन्न करणे आणि साक्षात्काराला उपकारक अशी परिस्थिती त्यांना उपलब्ध करून देणे, यातच स्वत:ला झालेल्या साक्षात्काराची परमोच्च सफलता आहे. गीतेतील नैतिक शिकवणीचे परमोच्च, पूर्ण स्वरूप हे अशा प्रकारचे आहे.

भक्तीच्या प्रक्रियेत जे अष्ट सात्त्विक भाव निर्माण होतात ते अनुभवाचे उत्तम उदाहरण होत. हे भक्तीरसाच्या पार्श्वभूमीवर बागडत असतात. गुरुदेवांनी भक्तीस मूर्धन्यरसाची जागा देताना, भक्तीमध्ये इतर रस कसे नांदतात हे विस्ताराने दाखविले आहे, ते येणे प्रमाणे.

**४. भक्ती as मूर्धन्यरस**

**१. भक्त्यन्तर्गत श्रृंगाररस**

भक्तीरस putting on the apparel of शृंगार in Meerabai

**फागुन के दिन चार रे । होरी खेल मना रे ।**

**होरी खेलि पीव घर आये ।**

**सोई प्यारी प्रिय प्यार से ।**

२. भक्त्यन्तर्गत उपहास

उपहास = व्याजस्तुति = ultimate censure, but apparent praise

ऊधो धनि तुम्हरो बेवहार
धनि वै ठाकुर, धनि वै सेवक
धनि तुम बर्तनहार ।

३. भक्त्यन्तर्गत करुणरस

(a) नैनहीन को राह दिखा प्रभु
पग पग ठोकर खाऊं मैं

(b) अब की राखि लेहु भगवान
हम अनाथ बैठी द्रुम डरिया,
परारधि साध्यो बान ।

(c) तुम ललक उघारो दीनानाथ
मैं हाजिर नाजिर कब की खडी

४. भक्त्यन्तर्गत रौद्र – भयानक

We have already pointed out that रौद्र and भयानक are the objective and subjective counterparts of each other.

तौक पहिरावौ पाँव बेडी लै भरावौ,
गाढे बंधन बन्धावौ, औ खिचाओ काची खाल सों

... ... ...

गिरी ते गिरावौ, कारे नाग ते डसावो,
हा! हा! प्रिति न छुडावौ गिरधारी नंदलाल सों

In this respect we may compare the Bhagavad Gita which is on a superior level _

वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति
दंद्रष्ट्रा कारालानि भयानकानि ।

केचिद्विलग्ना दशनान्तरेषु
सन्दृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः । XI-27

५. भक्त्यन्तर्गत वीररस

उत्साह is the स्थायिभाव of वीररस. Compare

(१) नौकरी शरिअत से कराना । कुरुम पीर मुरशिद का रखना
... ... ... ...
अखी लगाकर मार निशानी । पीढे मत हटना
सीढी पकड कर चढना बेटा । धीरज से गढ लेना ।

६. भक्त्यन्तर्गत बीभत्सरस

बीभत्स रस looks like a contradiction in terms. बीभत्स seems to be just the opposite of रस to the extent of hideousness; yet it may be called रस if it produces. वैराग्य, which is the result of जुगुप्सा, घृणा or निर्वेद which are the स्थायिभावs of बीभत्स.

जगत पजरता देखि कै, कबिरा भया उदास

(b) घृणा

i) या देही कौ गरब न करिए,
स्यार काग गिध खै है।
तीननि मैं तन के विष्ठा कृमि ,
कै ह्वै खाक उडै हैं।

(ii) उडि के जाय बैठि मैले थल
गहिरे चोंच लगैहौ ।

(v) निर्वेद – which, for example, is the result of contemplating on the Seven Lives of Man as in the song दिवाने मन, भजन बिना दुख पैहौ.

७. भक्त्यन्तर्गत शान्तरस

(a) It is curious that some include भक्ति under शांत, on the other hand, we might call out instances of शान्तरस under भक्ती, e. g.

बिसर गई सब आप पराई,
जब ते साधू संगत पाई
... ... ... ...
जो प्रभु कीनो सो भल मानो,
यहै सुमति साधू ते पाई ।।

(b) भक्तिरस may also imply belief in the Law of Sufficient Reason _

घरकी तिरिया झिरझिर रोवै
बिछुडि गई मेरी जोडी ।
प्रभुदास तब उठि यों बोले,
जिन जोडी तिन तोडी ।।

८. भक्त्यन्तर्गत अद्भुत रस

अद्भुत lends a powerful support to भक्ती. The eleventh chapter of the Bhagavadgita is a superb illustration of अद्भुतरस in भक्ती. विस्मय is its स्थायिभाव. The following illustrations may be quoted from परमार्थ सोपान :

(a) **(i)** **रोम रोम दीपक भया, प्रगटे दीनदयाल ।**
**(ii)** **रोम रोम सुर उठत है, बाजत नाम तिहार ।**
**(iii)** **रोम रोम आनंद उपज करि आलस सहज भनी ।**

(b) दस अवतार एक रत राजैं,
अस्तुति सहजसे आनी हो ।
... .. .. ...
सरिता उमडि सिन्धको सोखै,

नहिं कछु जाय बखानी हो।

We may compare with the two last statements the phenomenon of the गंगासागर at Calcutta and of the recession of the नर्मदा at Bharuch, and the consequent swallowing by the sea water.

(c) बिन डोरी बिन खम्भे पौढल,
आठ पहर झनकार ।
... ... ..
छुटल जगत कर झुलना हो,
प्रेम पदारथ भईल निनार ।।

It is remarkable that those who have had mystical experience regard the अद्‌भुत रस as merely a स्वभावोक्ती. For the high status of अद्‌भुतरस in the scheme of the Alankaras, compare _

ज्ञानेश्वर – जेथ शांताचिया घरा
अद्‌भुत आला आहे पाहुणेरा।
आणि येरां ही रसा पांतिकरा ।
जाहला मानु ।।

९. भक्तन्र्गत भक्ती.

There is no other object of adoration for the devotee except his ultimate self (अभेदभक्ती). Compare :

(a) भगवद गीता
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ।

(b) ज्ञानेश्वरी
पै दर्पणाहूनि चोखें । दोन्ही होती सन्मुखें ।
तेथ येरीं येर देखें । आपण पें जैसे ।

तैसा देवेंसीं पंडुसुतु । आपणपें देवीं देखतु ।
पांडवेंसीं देखे अनंतु । आपणपें पार्थीं ।।

(c) परमार्थ सोपान –

(i) आनंद नहाया बन्दा खुदा, दोनो बिसर गया ।
बेनाम का नाम होकर, रहटाना राहा ।

(ii) स्वयं प्रतिमा बन पुजारी इस जगत में पुज रहा है।
मौन होकर साधना का भेद पूरा कह रहा है।।

**५) भक्तीचे नवरसात झालेले प्रतिष्ठान**

ध्वनीपूर्व व ध्वनी पंथाचे महाजन – भरत. भामा, दंडी, आनंदवर्धन, अभिनव गुप्ता, मम्मट हे, यांनी भक्तिस रसाचा दर्जा दिला नाही. मधुसुदन सरस्वतींनी हे प्रथम ज्यांनी भक्तिची प्रस्थापना नऊ रसामध्ये – योग्य ठिकाणी केली. त्यांच्या भक्तिरसायनम ह्या ग्रंथातील काही उदाहरणे पाहू या.

१) नवरस मिलितं वा केवलं वा पुमर्थम –
परमम् इह मुकुन्दे भक्तीयोगं वदन्ति ।।
निरुपमसुखसंवित रूपम् अस्पृष्टदु:खं
तम् अखिलतुष्ट्यै शास्त्रदृष्ट्या व्यनज्मि ।।१।।

**अर्थ** – या जगात केवळ मनुष्य प्राण्यासाठीच असलेला, नऊरसांनी युक्त असा (परमेश्वराच्या) मुकुंदाच्या ठिकाणी अत्यंत दृढ असा जो भाव त्याला भक्तीयोग असे म्हणतात. ज्याला दु:खाचा (पुसटसाही) स्पर्शसुद्धा नाही, उत्कट अनुपम अशा सुखाची जाणीवरूप असलेल्या त्या भक्तीयोगाची शास्त्रीय चर्चा अखिल मानव जातीच्या शान्ति-समाधानासाठी मी करत आहे.

२) संसाररागेण बलीयसा चिरं निपीडितै: तत्प्रशमे अतिशिक्षितम् ।
इदं भवद्भि: बहुधा व्ययतिगं निपीयतां भक्तिरसायनं बुध: ।।२२।।

अर्थ – हे विद्वतजनहो,संसाराच्या सततच्या आणि आत्यंतिक दृढ अशा आसक्तीमुळे पीडित झालेल्या तुम्ही हे अत्यंत संस्कारित आणि अनेक प्रकारे खर्च करूनही वाढत जाणारे असे भक्ति रसायन प्राशन करावे.

**३) द्रुतस्य भगवत् धर्मात्–धारावाहिकतां गता ।**
**सर्वेशे मनसः वृत्तिः वृत्तिः भक्तिः इति अभिधीयते ।।३।।**

भगवद् धर्माकडून परमेश्वराच्या ठिकाणी धावणाऱ्या मनाची प्रवाहित झालेली वृत्ती म्हणजे भक्ती, असे म्हटले जाते.

● ● ●

# सबीज नाम आठवणी

**आठवण १**
**परमपूज्य गुरुदवांच्या संतसभा (सिटिंग्ज)**
**वामन नारायण कुलकर्णी, सोलापूर**

परमपूज्य श्रीगुरुदेव व निंबाळ आश्रम याबद्दल माहिती मिळाल्यानंतर मी गुरुदेवांचे दर्शनास जाण्याचे ठरविले. गाडीत निंबाळला बसणारा मी एकटाच होतो. सकाळी दहाचे सुमारास निंबाळला पोहोचलो. सोलापूरचे व्ही. बी. जोशी माझ्याकडे आले व नाम घेणार का? म्हणून विचारू लागले. त्यांनी कुलदैवतेचे नाव विचारले. मी दोन अक्षरी नाव सांगितले. नंतर काकासाहेब कारखानीस यांनी बोलावले. मला एक चिठ्ठी दिली. त्यावर तीन अक्षरी नाम होते. मी सांगितलेल्या नामामागे 'श्री' लावून दिले होते, तुम्हास गुरुदेवांनी हे नाम दिले आहे म्हणाले...

पुढे मी निंबाळला गणपतराव कुलकर्णी यांच्याबरोबर आलो होतो. संध्याकाळी आठच्या सुमारास आम्ही नित्यनेमावली पुस्तकासाठी नव्या घरात गेलो. उंबरठ्याचे आत पाऊल टाकले तोच 'नारायण, नारायण, नारायण, नारायण' अशा अत्युच्च स्वरात गजर ऐकू आला. त्यात एक दैवी संगीत होते. आमच्या अंगावर रोमांच उभे राहिले. लेले म्हणाले, ''साहेब कसं आहे ना, प्रत्यक्ष सद्‌गुरुंच्या मुखातून उन्मनी अवस्थेत बाहेर पडलेले नाम ऐकून मला अवर्णनीय आनंद झाला. ते ऐकण्याची माझी फार इच्छा होती. मला मिळालेले नाम गुरुदेवांनीच दिले आहे असे जरी काकासाहेब कारखानीसांनी नामाची चिठ्ठी देताना सांगितले होते, तरी प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून ते नाम मी ऐकले नव्हते व त्यांचेकडून नाम मिळावे ही हुरहूर होती. मी मनोमन ठरविले की आजपासून नारायण

नामाचेच स्मरण करावयाचे. ते प्रत्यक्ष देवाकडून, स्वर्गातून आले होते. त्यापेक्षा श्रेष्ठ नाम कोणते असणार? ते दिव्य नाम होते.

रात्रीच्या गाडीने आम्ही सोलापूरला परत आलो. पहाटे नेमास बसण्यासाठी उठलो. पहाटेचे चार वाजले होते. मला दिलेल्या तीन अक्षरी नामाऐवजी 'नारायण' नामाचे स्मरण करू लागलो. किती वेळ गेला समजले नाही. पण सगळीकडे प्रकाश पसरला आहे. पांढरे शुभ्र ढग आकाशात फिरत आहेत व माझ्याशेजारी बसून कोणीतरी माझ्या तीन अक्षरी नामाचा मोठ्याने उच्चार करीत आहे, अशी मला जाणीव झाली. मी डोळे उघडले. प्रथम वाटले भास झाला असावा. मी परत पांघरूण घेऊन नामस्मरण करू लागलो तर पुन्हा तसाच अनुभव आला. तीन वेळा असे झाले. मला वाटले माझे नारायण नामाचे स्मरण गुरुदेवांना आवडलेले दिसत नाही. मी गुरुदेवांची मनात क्षमा मागितली व मला दिलेले तीन अक्षरी नामच स्मरू लागलो.

मी या अनुभवामुळे दुसऱ्या दिवशी एका अभूतपूर्व आनंदात व उत्साहात वावरत होतो.

ही गोष्ट मी कुणालाही सांगितली नाही. कारण ती सांगण्यासारखी नव्हती. तो अनुभव होता. दोन तीन दिवसांनी मी निंबाळास गेलो. मला गुरुदेवांनी पाहिले व बोलावून त्यांचे समोर बसण्यास सांगितले. नेहमी येथेच बसत जा असे म्हणाले. या दिवशी सिटिंगमध्ये एका हिंदी पदावर चर्चा चालू होती. ते पद होते 'अजर अमर एक नाम है, सुमिरन जो आवे.' त्या पदाचा गुरुदेवांचे ग्रंथात खालील प्रमाणे अर्थ दिला होता.

That name is अजर व अमर which reveals itself to your auditory sense at the height of meditation. म्हणजे नेमाचे वेळी समाधी अवस्थेत जे नाम आपल्या कानास ऐकू येते ते अजर व अमर असते. म्हणजे मला दिलेले व नेमात ऐकू आलेले नामच खरे होते, दिव्य होते. गुरुदेवांनीच दिलेले होते. माझे तीन अक्षरी नाम दिव्यनाम होते व आहे. पण ज्या 'नारायण' नामाच्या स्मरणाने ते ऐकू आले ते किती श्रेष्ठ असेल? असो. सद्गुरु महिमा अगाध आहे. केवळ त्यांचे

कृपेनेच ते ऐकू आले. कारण गेल्या ५० वर्षांत परत ऐकू आले नाही.

●●●

## २) श्री आंबूराव महाराजांच्या आठवणी – संग्राहक ग. वि. तुळपुळे

**तेचि वस्तु संतसंगे । स्वानुभवे कळो लागे ।**

जमखंडीचे कै. रा. बाबुराव म्हैसकर हे फार चिकित्सक बुद्धीचे, निश्चयी आग्रही, बुद्धिमान, उदार व निस्पृह गृहस्थ होते. ते १९१५ साली इंचगेरीस श्री बाबांचेकडे नाम घेण्यासाठी गेले. परंतु त्यावेळी श्रीबाबांनी त्यांना नाम दिले नाही. तरी मुळीच निरुत्साही न होता ते पुन्हा श्रीबाबांकडे गेले. त्यावेळीही त्यांना नाम मिळाले नाही. श्रीबाबा त्यावेळी त्यांना म्हणाले, ''श्रीभाऊसाहेब महाराजांनी तुला कोणते नाम द्यावयाचे ते मला दाखविले, परंतु ते मला वाचता आले नाही.'' तरीही बाबुराव निराश झाले नाहीत. ते पुन्हा १९२० साली श्री बाबांकडे गेले. त्यावेळी त्यांना इंचगिरीस नाम मिळाले. नाम दिल्यावर श्री बाबांनी त्यांना श्री भाऊसाहेबांचे समाधीजवळ नेमास जाऊन बसण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते नेमास बसले. थोडा वेळ झाल्यावर ते भिऊन ओरडत आले व धावतच श्री. बाबांकडे गेले. श्री. बाबा त्यांना म्हणाले की, ''एवढ्याने काय झाले आहे, तुला याहीपेक्षा भयंकर अनुभव येतील.'' तुम्ही का भ्यालात असे रा. बाबुरावांना विचारले असता ते म्हणाले, ''मी नेमास बसलो असता एक विजेचा लोळ माझ्या डोक्याकडून येऊन पायातून निघून गेला, असे मी पाहिले. तेव्हा या लोळाने आपण मरणार असे मला वाटले व मी भिऊन ओरडत उठलो.''

●●●

**पुस्तक : श्रीगुरुदेवांच्या आठवणी**

**– काकासाहेब कारखानीस**

### नाम देण्याचा अधिकार

नामाच्या थोर महिम्याचे वर्णन सर्व संतांनी केले आहे. गुरुदेवांनी दिव्य नामाचे महत्त्व अनेक वेळा अनेक ठिकाणी सांगितले आहे. श्रीगुरुलिंग जंगम महाराजांनी हे दिव्यनाम स्वर्गाहून आणले. हे नाम

देवापासून येते. बीजरूपाने देवच असलेले नाम शिष्यास गुरुकडून मिळते. सद्गुरुंनी दिलेल्या नामातून अनेक नामे उत्पन्न होणे हा परमार्थ मार्गावरील एक अत्यंत श्रेष्ठ साक्षात्कार आहे. असा सबीज नामाचा अनुभव म्हणजे 'नगारे वाजले'असे सांगितले आहे.

●●●

**नाना नाम श्रवण**

१९२० साली हिंचगेरीस असताना एके दिवशी श्री गुरुदेव मला म्हणाले, ''गणपतराव, गेले कित्येक दिवस कानात सारखे काही शब्द ऐकू येत आहेत. पण स्पष्टपणे काही ऐकू येत नाही. बाजारात गेलो म्हणजे जशी गडबड ऐकू येते, पण शब्द स्पष्ट नसतात. तसे काही तरी कानाजवळ सतत चालले आहे. हे काय बरे असावे?'' याचे उत्तर माझ्यासारख्या अनभिज्ञाने देणे कसे बरे शक्य होते? मी त्यांस एवढेच उत्तर दिले की, ''श्रीमहाराजांच्या कृपेने याचे उत्तर मिळेल. मी काय सांगणार?'' यानंतर किती दिवस गेले ते स्मरणात नाही, पण एके दिवशी श्रीगुरुदेव स्वतःच मजजवळ म्हणाले की, ''कानाजवळील ती गडबड आता स्पष्ट झाली आहे. अनेक संप्रदायांची नामे ऐकू येत आहेत.'' निदान आठ-दहा नामांचा त्यांस या वेळी साक्षात्कार झाला असावा.

ज्या दिवशी हा नामसाक्षात्कार झाला त्याच दिवशी रात्री पोथी, भजन, आरती इ. आटोपल्यावर श्रीबाबांचे (अंबुराव महाराज) खोलीत नेहमीप्रमाणे श्रीगुरुदेव गेले. मीही सांगाती होतोच. (स्व.) जगन्नाथ लेलेही बरोबर असावेत असे वाटते. संभाषणाच्या ओघात श्री गुरुदेवांनी वरील अनुभव बाबांस सांगितला. तो ऐकून त्यांस किती आनंद झाला होता हे मी कसे बरे सांगू! श्रीबाबांनी या आनंदाच्या भरात नाचावयाचे शिल्लक ठेवले होते. इतके त्यांस आनंदाचे भरते आले होते. त्या भरात ते श्रीगुरुदेवांस म्हणाले की, ''रामराया, निनगे नामक्के नाम आगिदे, ईग नीनु उपदेश कोडलिक्के योग्य आगिदी.'' (तुला नामाला नाम झालेले आहे. आता तू दुसऱ्यास उपदेश देण्यास योग्य झाला आहेस.)

यासंबंधी संप्रदायात अशी एक दृढ श्रद्धा प्रचलित आहे की, ज्या

साधकाला अशा रीतीने दिव्य नाममंत्र ऐकू वा दिसू लागले आहेत, तोच गुरु होण्यास योग्य पुरुष होय. त्यालाच संप्रदाय वाढविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे, असे समजावे. श्रीगुरुदेवांच्या मुखातून शेकडो साधकांनी पुढील गोष्ट ऐकलेलीच आहे. श्रीगुरुदेव सांगत की, श्रीभाऊसाहेब महाराज नेहमी म्हणत असत की, श्रीनिंबरगी महाराजांनी स्वर्गातून नाम आणले. याचाच अर्थ वरील श्रीगुरुदेवांच्या दृष्टांतात पाहावयास मिळतो. 'ऋषयो मन्त्रद्रष्टारः' असे प्राचीनांचे म्हणणे आहे. हे याच अर्थाचे आहे. अशा रीतीने साधनात ऐकू आलेले व दिसलेले (अर्थात ज्ञानचक्षूंना) नामच साधकास आपल्या संप्रदायात श्रीनिंबरगी महाराजांपासून मिळत आलेले आहे. श्रीभाऊसाहेब महाराज, श्री साधुबुवा, श्रीअंबुराव महाराज, श्रीशिवलिंगव्वाका ही सर्व मंडळी याच योग्यतेची होती. श्रीगुरुदेव हेही याच कोटीतील हे सांगणे नकोच.

● ● ●

### श्रीमहाराजांच्या इच्छेने दुसरा विवाह

श्रीगुरुदेवांच्या द्वितीय विवाहापूर्वीची ही गोष्ट आहे. किती दिवस अगोदरची हे आता स्मरत नाही. पण ती गुरुदेवांनी मला स्वतःच सांगितली आहे. तिची पूर्वपरंपरा पुढीलप्रमाणे आहे. मी त्या वेळी हिंचगेरीस नव्हतो श्रीगुरुदेव मात्र तेथेच होते. पहिल्या पत्नी जाऊन ३–३।। वर्षे तरी झाली होती. द्वितीय विवाहासंबंधी त्यांच्या जवळच्या नातलगांचा (विशेषतः त्यांच्या चुलत भगिनी स्व. (यमुनाक्कांचा) थोडा तगादाही लागला होता, असे वाटते. पण माझा स्वतःचा श्रीगुरुदेवांसंबंधीचा अनुभव असा की, कोणतीही गोष्ट ते स्वतःच्या बुद्धीने करीत नसावेत. वरून म्हणजे श्रीमहाराजांचा आदेश आल्याखेरीज ते कोणत्याही गोष्टीस प्रवृत्त होत नसत. ही माझी त्यांच्याविषयीची श्रद्धा त्यांच्या पहिल्या भेटीपासूनच उत्पन्न झाली होती. मग ही तर त्यांच्या विवाहासंबंधीची गोष्ट. असल्या महत्त्वाच्या प्रसंगी ते दुसऱ्याच्या विचाराने वागणेच शक्य नव्हते. या संदर्भात ते एकदा श्री. जगन्नाथ लेले यांस म्हणाले होते की, ''जग्या, माझे श्रीमहाराजांनी जर दुसरे लग्न केले तरच

ते होईल, नाही तर नाही.'' लौकिक गोष्टीसंबंधी श्रीगुरुदेव पूर्ण उदासीन असत. श्रीमहाराजांच्या इच्छेने जे घडेल ते खरे, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. आपला 'अहम्' त्यांनी श्रीमहाराजांच्यात पूर्णपणे विलीन केला होता, हे मी पदोपदी पाहात होतो. श्रीगुरुचरणी आपले सर्वस्व Sub-conscious state मध्ये सुद्धा (स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या देहांमध्ये वा जागृती, स्वप्न, सुषुप्ती व तुरीया या अवस्थांमध्ये) अर्पण केले होते. असे असल्याने ते या विवाहाच्या बाबतीत पूर्ण उदासीन होते. श्रीअंबुराव महाराजांनीही या बाबतीत खडा टाकून पाहिला होता. पण श्रीगुरुदेवांनी तिकडेसुद्धा लक्ष दिले नाही. शेवटी या संबंधी श्रीमहाराजांचा दृष्टांत झाला. (हे स्वप्न होते की, ध्यानाच्या वेळी घडले याचे मला आता स्मरण नाही.) तो असा– श्रीमहाराज श्रीगुरुदेवांस विचारतात की, ''याको, मदवी माडूदिल्येनो (का रे, लग्न करीत नाहीस का?'') श्रीमहाराजांच्या या प्रश्नास उत्तर न देता श्रीगुरुदेव स्तब्धच राहिले. यावर श्रीमहाराज म्हणतात की, ''वळ्ळेदु, नामकोट्टु कळसुत्तेने! (बरे आहे. नाम देऊन पाठवितो!)'' असा दृष्टांत होता व तो श्रीगुरुदेवांनी त्या वेळी मला हिंचगेरी मठाच्या उत्तरेस जी बाग आहे तेथे मुद्दाम नेऊन सांगितला. तो मी जसाच्या तसा येथे सांगितला आहे.

यानंतर लवकरच श्रीगुरुदेवांचा द्वितीय विवाह इस्लामपूरच्या वैद्यांच्या वंशातील मुलीशी झाला. मुलीचे माहेरचे नाव मनुताई व सासरचे नाव सौ. सीताबाई. विवाहोत्तर लगेच श्रीगुरुदेव या नूतन परिणीत पत्नीला घेऊन ताबडतोब हिंचगेरीस आले. कारण श्रीमहाराजांचा दृष्टांत अजून पूर्ण व्हावयाचा होता. आल्यावर श्रीबाबांची पोथी – दासबोधाचे प्रवचन चालू झाले. श्रीगुरुदेवांनी (स्व.) यमुनाक्कांस सांगितले की, ''पत्नीस घेऊन श्रीमहाराजांच्या समाधीजवळ बसा.'' त्याप्रमाणे त्या बसल्या. बाहेर पोथी चालू होती. बसल्या बसल्या श्री सीताबाईस किंचित डुलकी लागली. त्यात त्यांस असे दिसले की, कोणी एक गृहस्थ त्यांच्या समोर आले व त्यांस म्हणाले की, ''काय नाम पाहिजे होय?'' असे म्हणून त्यांनी श्री सीताबाईंस नाममंत्र दिला व असाच नामाचा जप करीत जा,

असे सांगितले. एवढे झाल्यानंतर श्री सीताबाई जाग्या झाल्या. थोड्या वेळाने त्यांस पुन्हा डुलकी आली व त्यांस पूर्वीचेच गृहस्थ दिसले. व त्यांनी विचारले की, ''सांगितल्याप्रमाणे नामजप केला ना? असाच करीत जा बरे!'' इतके बोलून ते गेले व सीताबाई जाग्या झाल्या. पोथी इत्यादी झाल्यावर श्रीगुरुदेवांनी यमुनाक्कांस विचारले की, ''पत्नीस काही तरी नवे दृष्टीस पडले काय?'' त्यावर श्री सीताबाईंनी झालेला वृत्तांत सर्वांस सांगितला. त्याचे तात्पर्य असे की, श्रीगुरुदेवांच्या पत्नीस प्रत्यक्ष श्री महाराजांनी नामोपदेश केला. पुढे लौकिकदृष्ट्या त्यांस श्री बाबांनी नाम दिले.

या हकीकतीस अनुसरून, श्रीगुरुदेवांनी मला एक कार्ड चिंचवडास पाठविले. ते कार्ड अद्याप माझ्या संग्रहात आहे. त्यात ते लिहितात की, ''दृष्टांताप्रमाणे पत्नीस नाम मिळाले. श्रीमहाराज लौकिकदृष्ट्या गेले असले तरी अद्याप आहेत.'' श्रीसमर्थांनी या संबंधी दासबोधात लिहिले आहे की, ''असो, ऐसे सकळहि गेले । परंतु एकचि राहिले । जे स्वरुपाकार झाले । आत्मज्ञानी ।'' ३.९.५९. श्रीगुरुदेवांस, श्रीनिंबरगी महाराज, श्रीभाऊसाहेब महाराज इत्यादींचेदर्शन प्रसंगविशेषी होत असल्याचे त्यांनी लेखकास व इतर काही सांप्रदायिक बंधूस कितीदा तरी सांगितले आहे.

●●●

### मुसलमानी धर्माच्या नामाचा बरडोलचा साक्षात्कार

निंबरगीस श्रीनिंबरगी महाराजांच्या समाधीच्या स्थापनेचा समारंभ होता. त्या वेळी श्रीगुरुदेवांच्या सांगाती मी, श्री. जगन्नाथ लेले व आणखी एक दोघेजण होतो. रात्रीची वस्ती बरडोलास त्या वेळच्या तेथील धर्मशाळेत होती. सकाळी प्रातर्विधी आटोपून सर्वजण निंबरगीस पायीच निघालो. श्री गुरुदेव मात्र बैलगाडीत होते. गाडी मार्गास लागल्यावर श्री गुरुदेवांनी सर्वांस भजन करीत जाण्यास सांगितले. काही वेळाने मला एकट्यासच जवळ बोलाविले व म्हणाले की, ''गणपतराव, बरडोलच्या धर्मशाळेची जागा किती पवित्र आहे बरे!'' मी म्हणालो, ''का, तेथे काय

चमत्कार झाला?'' तेव्हा त्यांनी सांगितले की, ''रात्री नेमाचे वेळी मुसलमानी धर्माच्या नामाचा साक्षात्कार झाला. ते ऐकू आले.'' हे ऐकल्यावर मी म्हटले की, ''श्री महाराजांनी सामर्थ्य दिल्यास त्या जागेवर मी मशीद बांधीन.'' माझे बोलणे ऐकल्यावर ते क्षणभर स्तब्ध होऊन आकाशाकडे पाहू लागले. त्यांस त्या वेळी काय दृश्य दिसले ते त्यांनाच माहीत.

● ● ●

**झरतुष्ट्र**

केव्हा तरी एके दिवशी निंबाळास मी असताना मला श्रीगुरुदेव म्हणाले की, ''पारशी धर्म संस्थापकाचे नाव झरतुष्ट्र असे होते का? झरतुष्ट्र म्हाताऱ्या उंटावर बसत असे काय?'' मी म्हटले ''मला काही माहीत नाही. पण तुम्ही हा प्रश्न का विचारता? काही विशेष घडले आहे का?'' त्यावर ते म्हणाले की, ''नेमाचे वेळी 'झरतुष्ट्र, झरतुष्ट्र' असे नाम ऐकू आले.''

● ● ●

**ख्रिस्ती धर्माच्या नावाचा साक्षात्कार**

सनातन धर्मातील नाना पंथांच्या उपास्यांची नामे, लिंगायत पंथांच्या उपास्यांची जी नामे त्यांनी प्रारंभी ऐकली होती ती एका वहीत त्यांनी उतरवून ठेवली होती. त्या वहीवरून मी ती नामे माझ्या एका वहीत उतरवून घेतली होती. श्रीगुरुदेवांनी पुढे केव्हा तरी ती माझी वही मागून घेतली व ती माझ्याजवळच राहू दे असे ते म्हणाले. मी अर्थातच ते मान्य केले. या दोन्ही वह्या निंबाळास अद्याप तेथील संग्रहात आहेत. या वह्यांचे स्मरण श्रीगुरुदेवांस देह ठेवण्यापूर्वी एक-दोन दिवस अगोदर झाले होते. त्यावेळी आम्ही चार पाच मंडळी त्यांचे समोर बसलो होतो. या वह्या ज्या ट्रंकेत ठेवल्या होत्या ती ट्रंक आणविली गेली. त्यात त्या सापडल्या नाहीत. म्हणून दुसरी ट्रंक आणविली गेली. त्यातही त्या वह्या सापडल्या नाहीत. मग ते थोडे रागावले होते

पुढील गोष्टीचीही पार्श्वभूमी आहे म्हणून हे एवढ्या विस्ताराने लिहिले

आहे. नाना उपास्यांची नामे, मुस्लिम धर्मातील नामे, पारशी धर्मातील नामे या सर्वांचा त्यांस साक्षात्कार झालेला होता. म्हणून एके दिवशी श्रीगुरुदेवांस विचारले की, ''ख्रिश्चन धर्मातील नामाचा साक्षात्कार झाला काय?'' त्यावर उत्तर मिळाले की, ''नाही.'' मी विचारले की, ''इतकी नामे झाली व हेच (म्हणजे ख्रिश्चन धर्माचे) कसे अद्याप झाले नाही?'' त्यावर त्यांनी उत्तर दिले की, ''श्रीमहाराजांची इच्छा.'' यानंतर वर्ष दोन वर्षांचा अवधी गेला असावा. पुन्हा एकदा सहज हाच प्रश्न विचारला की, ''ख्रिश्चन नामाचा साक्षात्कार झाला आहे काय?'' त्यावर स्वारी जोराने उद्गारली की, ''हो, हो, झाला आहे की!'' या वेळचे श्री गुरुदेवांचे उत्तर नेहमीप्रमाणे साधे नव्हते. जरा जोराचे होते. ते असे क्वचितच बोलत. पण या वेळी काय जोर आला होता कोण जाणे! ''हो, हो, झाले आहे की!'' असे जोरदार उत्तर होते.

परधर्मातील ही नामे काय होती हे आमच्या (श्री काकासाहेब तुळपुळे व मी) भाग्याने आम्हास पुढे पुढे त्या त्या धर्मीयांस ती ती नामे देण्याचे वेळी कळून आले. केवढी ही श्री गुरुकृपा, की स्वर्गाहून आलेले नाम आम्हास ऐकावयास मिळाले.

मुसलमानी नामाचा साक्षात्कार श्रीमुखाने ऐकल्यावर माझ्या स्वत:मध्ये फार मोठे परिवर्तन झाले. तोपर्यंत माझ्या मनामध्ये मुसलमानी धर्माबद्दल काडीचे प्रेम नव्हते व तो धर्म म्हणजे थोतांड आहे, असे मी मानीत होतो. या वेळेपासून मी त्या धर्माला मानू लागलो.

या व असल्याच प्रकारच्या श्री गुरुदेवांच्या साक्षात्कारामुळे 'नास्तिको वेदनिंदक:' या सनातनी व्याख्येवरील माझा विश्वास उडाला. माझ्या मते नास्तिकाच्या या सनातनी व्याख्येत अव्याप्तीचा दोष होतो. देवास न मानणारा तो खरा नास्तिक, वेदांस न मानणारा तो नास्तिक नव्हे. 'नास्तिको वेदनिन्दक:' असे मानले तर कुराणास न मानणारा तो काफीर, बायबलास न मानणारा तो हीदन् (Heathen) असे इतर धर्मीयांनी हिंदूस म्हणावे हे ओघानेच प्राप्त झाले.

या बाबतीत आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीकडे वाचकांचे लक्ष मी

वेधू इच्छितो. भगवान श्रीरामकृष्ण परमहंसांच्या चरित्रात असे वर्णन आहे की, त्यांनी मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी धर्मांचा साक्षात्कार त्या त्या धर्माची उपासना पद्धती काही काल स्वीकारून (दोन तीन दिवसांचा) करून घेतला होता व त्यास महंमद पैगंबर, जीझस ख्राइस्ट इत्यादी द्रष्ट्यांची दर्शने झाली होती व जितके धर्म तितके परमेश्वराकडे जाण्याचे मार्ग या सिद्धांतास ते पावले होते. यावर शंका उपस्थित होते की, हे सर्व खरे असेल; पण त्या त्या धर्मांचा साक्षात्कार करून घेण्यासाठी, त्या त्या धर्माचा स्वीकार अल्पकाळ का होईना, पण करून घेण्याची आवश्यकता का पडावी? 'एकं ज्ञात्वा सर्व विज्ञातं भवति' या औपनिषदिक सिद्धांताने कार्यभाग होत नाही काय? तज्ज्ञांनी याचा विचार करावा. तसेच या संबंधी दुसरी एक शंका उत्पन्न होते. ती ही की, नाम श्रेष्ठ की रूप श्रेष्ठ? ज्ञानी भक्तांचे असे मत वाचण्यात येते की, ते रूपापेक्षा नामाला अधिक महत्त्व देतात. याही गोष्टीचा विचार जाणत्यांनी करावा.

●●●

**श्रीगुरुदेवांची निंबरगी व उमदीबद्दलची भावना**

श्रीगुरुदेवांस श्रीनिंबरगी महाराज व श्रीभाऊसाहेब महाराज यांच्यासंबंधी काय वाटत असे याचे वर्णन करू शकत नाही. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी १३ व्या अध्यायात 'आचार्योपासनम्' वर जे अप्रतिम भाष्य केले आहे त्याचे साक्षात उदाहरण म्हणजे श्रीगुरुदेव अशी प्रस्तुत लेखकाची दृढ श्रद्धा आहे. उभयंता श्रीमहाराजांची जी दोन स्थाने व हिंचगेरी येथील दगडधोंडे सुद्धा त्यांस पूज्य वाटत. श्रीसमर्थांनी एके ठिकाणी म्हंटल्याप्रमाणे – श्रीगुरुक्षेत्रीचे दगड धोंडे श्वान । सर्वही पूजमान गुरुदासा ।। अशी श्रीगुरुदेवांची वरील तीनही स्थानांबद्दल भावना होती. लेखकास त्यांनी २–४ वेळा म्हंटले होते की, श्रीसमर्थांस पंचवटीसंबंधी जे वाटत असे तेच आम्हास या स्थानांसंबंधी वाटते. **जनस्थान गोदातटी । परम पावन पंचवटी । जेथे पडली कृपादृष्टी । रघोत्तम रायाची ।।** यातील जाड ठशातील वाक्य वरील त्रिस्थळीसंबंधी श्रीगुरुदेवांनी किती

वेळा तरी मजजवळ बोलून दाखविले आहे.

●●●

**बीज मंत्र व तारक मंत्र**

'बीजमंत्र' व 'तारकमंत्र' हे शब्द वाचून वा ऐकून साधी माणसे तर राहोत पण मोठमोठे विद्वानही घोटाळ्यात पडतात. संस्कृतच्या एका विद्वान प्रोफेसरांनी तर मला प्रत्यक्ष पत्र लिहूनच या संबंधी विचारले होते. तेव्हा मी यासंबंधी श्रीगुरुदेवांसच निंबाळास समक्ष विचारले की, बीजमंत्र म्हणजे काय? व तारकमंत्र म्हणजे काय? व हा प्रश्न मला कोणी केला आहे हेही सांगितले. त्यावर ते हसले व पुढीलप्रमाणे त्यांनी त्याचे स्पष्टीकरण केले. श्रीगुरुदेव म्हणाले, ''श्रीगुरुंनी दिलेल्या नामाने स्वतःचा उद्धार झाला असा अनुभव येईपर्यंत तो तारकमंत्र होय. पुढे त्या नामातून अनेक नामे उत्पन्न होऊ लागली म्हणजे तो बीजमंत्र होय.''

●●●

**श्रीगुरुदेवांचा आश्रम सर्वांस खुला**

अध्यात्म्यात श्रीगुरुदेव जातबीत मानीत नसत. या आश्रमात कोणत्याही जातीचा वा धर्माचा माणूस येवो, त्याला आश्रम उघडा आहे. मात्र तो देवाच्या भक्तीसाठी आलेला असावा. याचे प्रात्यक्षिक आम्ही अनेकांनी कितीदा तरी पाहिले आहे. एकदा सोलापूरचे एक जैन वकील श्री. शहा 'समाधिशतक' नावचा एक योगशास्त्रावरील आठशे वर्षां पूर्वीचा ग्रंथ घेऊन आले. त्यांनी तो संपादिला होता. श्रीगुरुदेवांना तो समग्र त्यानी वाचून दाखवून त्यावर त्यांचा अभिप्राय घेतला. एकदा निंबाळास नेहमीप्रमाणे मी आलो होतो. आश्रमात पोहोचल्यावेळी दुसऱ्या भजनानंतरची आरती चालू झाली होती. ही आरती हे वकील म्हणत होते. श्रीगुरुदेवांनी त्यांनाच ती म्हणावयास सांगितली होती व त्यांनीही ती मोकळेपणाने म्हंटली होती. पुढे ते दोन तीन दिवस तरी आश्रमात होते. त्या दिवसांतही आरतीचा प्रारंभ त्यानी करावयाचा व मग ती सांप्रदायिक पद्धतीने संपवावयाची.

●●●

**असेच दुसरे अनुग्रहीत, श्री. दामले मामलेदार**

अशाच प्रकराचे दुसरे अनुग्रहीत श्री. दामले मामलेदार हे पुढे सेवानिवृत्तीनंतर बेळगावास घर घेऊन कायमचे राहिले. ८०-८५ वर्षाचे होऊन ते निवर्तले. श्री गुरुदेवांनी एकदा मला समक्ष सांगितले की, ''श्री. दामल्यांस नाम देण्यासाठी मला निंबाळच्या ओढ्यात दोन तास नेम करावा लागला. त्यात जे नाम ऐकले ते त्यांस दिले.''

●●●

**येथे एक गमतीची गोष्ट बघू या.**

बाबांनी पण एकास धरून आणून नाम दिले. त्यांचे नाव गोविंद नारायण गोडबोले. ते सोलापूरचे. लहानपणी त्यांचे खेळण्याकडेच लक्ष होते. घरात दोन पिढ्या निंबरगी संप्रदायाची परंपरा होती. बाबा एकदा त्यांच्या घरी आले. मुलांच्या उद्योग पाहून बाबांना वाईट वाटले. बाबा एकदा नेमाला बसले असताना गोविंद रावांच्या खोड्या त्यांच्या कानावर आल्या. बाबा नेमातून उठून बाहेर आले आणि गोविंदरावांना धरून आणून घरातल्या न्हाणी घरात बसवले. पाण्याचा हंडा तापविला होता. त्यांच्या डोक्यावर दोन बादल्या पाणी ओतून स्नान घातले व नाम दिले.

------

प्रस्तुत लेखकाच्या (न. वि. कुलकर्णी) यांच्या वडिलांना फर्ग्युसन कॉलेजमध्ये गुरुदेवांचा विद्यार्थी होण्याचे भाग्य लाभले. वडिलांचे नाव विठ्ठलराव. ते पहिल्यापासून शंकराचे पारंपरिक उपासना करीत. आयुष्यातील शेवटची ३०-३५ वर्षे त्यांनी केवळ शंकराचे नामस्मरण सुरू केले. त्यांना काही काळानंतर ऐकू आले, ''तू शंकर म्हणतोस त्या ऐवजी श्री शंकर म्हण.'' त्याप्रमाणे ते करू लागले. अंतकाळी त्यांना गुरुदेवांनी दर्शन दिले. तेव्हा गुरुदेव म्हणाले, ''थांबलास का? तुला न्यायला आलो, अन् हात धरून निंबाळला आणले. (वडिलांचे निंबाळला पहिले व शेवटचे जाणे दृष्टांत रूपात घडले.)

●●●

**आंधळ्यास उपदेश**

मार्गशीर्षाच्या सप्ताह समाप्तीच्या आदल्या दिवशी नाम घेण्यासाठी बाबांच्याकडे एक गृहस्थ आले. ते जन्मांध होते. तो नाम देण्याचा दिवस नसल्याने, ''उद्या बघू'' असे त्याला सांगून बाबांनी त्याला त्या दिवशी मुक्काम करण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्योदयाबरोबर बाबांनी त्याला नाम दिले. पुढील वर्षी श्रावण सप्ताहास ते गृहस्थ आले. त्यांनी आपणास आलेल्या प्रचितीबद्दल बाबांना सांगितले. ते ऐकून बाबांना आनंद झाला. ''आंधळ्यानें देखिला ।'' असे त्यांना वाटलें. तेथे असलेल्या श्री. काकासाहेबाना बाबा म्हणाले, ''हे पहा साहेब. मागच्या मार्गशीर्ष सप्ताहाच्या वेळी हा आला आणि त्याने नाम मागितले. जन्मांधाला नाम कसे द्यावयाचे असा विचार मनात आला. आम्हाला ज्या ठिकाणी विचारावयाचे होते त्या ठिकाणी विचारून ह्याला नाम दिले. महाराजांच्या कृपेने ह्याला प्रचिती आली. मोत्यासारखें व ताऱ्याप्रमाणें आपल्याला काही तरी दिसते असे तो सांगतो. महाराजांची करणी अगाध आहे'', असे सांगून आपला मोठेपणा न सांगता, महाराजांच्या कर्तृत्व शक्तिवर भार घालून बाबा मोकळे झाले.

● ● ●

**नामाच्या अक्षराची ओळख**

या सालच्या जमखंडी मुक्कामात दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. जमखंडीस बाबांच्या प्रवचनास बरीच मंडळी जमत होती. एके दिवशी संध्याकाळची पोथी चालल्यावेळी तेथें दूर बसलेल्या एका वृद्ध गृहस्थाकडे बाबांचे लक्ष गेले. त्याला पाहिल्याबरोबर त्यांना काय वाटलें कीं हातानें खूण करून त्याला आपल्याकडे बोलावले. खेडवळ, फाटके व मळकट कपडे घातलेल्या त्या इसमास बाबा का बोलावतात, हे तेथे बसलेल्या लोकांना कळले नाही. सगळे आश्चर्यचकीत होऊन त्यांच्याकडे पाहू लागले. तो गृहस्थ बाबांच्या जवळ गेला. त्याच्याकडे पाहून आपल्या बोटाने खूण करून, ''तुझ्या नामाची अक्षरे इतकी आहेत ना?'' असा प्रश्न त्यांनी त्याला विचारला. ''होय महाराज,'' असे सांगून तो आपल्या जागेवर जाऊन बसला. त्या गृहस्थाने महाराजांच्याकडून नाम घेतले

होते. ही गोष्ट तेथे आलेल्या लोकांपैकी कोणालाच माहीत नव्हती. बाबांना त्याची ओळखदेखील नव्हती. तरी त्याला पाहिल्याबरोबर त्याने महाराजांकडून नाम घेतलेले व महाराजांनी दिलेले नाम देखील त्यांना कसे कळले असेल हें सांगणें कठीण. महाराजांच्याकडून नाम घेतलेल्या नामधारकांच्या नामाची अक्षरे त्यांना पाहिल्याबरोबर बाबा सांगत असत.

याच मुक्कामात याच्याहीपेक्षा चमत्काराची गोष्ट घडली. एके दिवशी बाबांच्या संध्याकाळच्या निरुपणास ग्वाल्हेरचे एक गृहस्थ आले होते. प्रवचन व दुपारचे भजन संपले. बाबांना नमस्कार करून मंडळी आपापल्या घरी जाऊ लागली. ग्वाल्हेरच्या गृहस्थांनीही सर्वांबरोबर बाबांना नमस्कार केला. बाबांना अगर त्यांच्याबरोबर असलेल्या इतर कोणालाही त्यांची ओळख नव्हती. त्याला पाहिल्याबरोबर आपल्याजवळ उभा असलेल्या गुरुबंधूस बाबा म्हणाले, ''ह्यांच्या गुरुंनी ह्यांना नाम दिले आहे खरें, परंतु त्या नामांत एक अक्षर कमी आहे.'' हे बोलणे त्यांनी ऐकिले. आपल्याबद्दलच ते बोलतात असे वाटून, ''महाराज काय म्हणतात?'' असा प्रश्न त्यांनी त्या गुरुबंधूस विचारला. बाबा काय म्हणतात हे सर्व त्यांनी त्या गृहस्थास सांगितले. ''तुमच्या गुरुंनी तुम्हाला इतक्या अक्षराचे नाम दिले आहे ना?'' असे बाबांनीच त्यांना विचारले. आश्चर्यचकीत होऊन त्यांनी 'होय' म्हणून सांगितले. ''तुमच्या नामात एक अक्षर कमी आहे.'' असे बाबांनी त्यांना स्पष्ट शब्दात सांगितले. आपण नाम घेतलेले, आपल्या नामाची अक्षरे हे सर्व बाबांना कसे कळले असेल याचा उलगडा त्या गृहस्थास झाला नाही. चौकशी केली असता, असे कळले की, त्यांनी ग्वाल्हेरला कोणाकडून तरी नाम घेतलेले होते व ते साधनही करीत होते. परंतु त्यांना अनुभव मात्र नव्हता. दुसऱ्या दिवशी ते गृहस्थ पुन्हा बाबांच्या निरुपणास आले आणि बाबा आपल्याला पुन्हा नाम देतील की कसे याची चौकशी केली. ह्याबद्दल बाबांना विचारता ते म्हणाले, ''दुसरे नाम देण्याचे कारण नाही. तेच नाम पूर्ण करून दिल्यास पुरे.'' असे बाबांनी सांगितल्यावर त्या गृहस्थास बरे वाटले. (बाबांकडून) आपले नाम पूर्ण करून घेऊन ते गेले.

• • •

ज्यांना अनुभव आला ते ब्रह्माबद्दल आपले निश्चित मत सांगू शकतात. ''इवन्यारू नोडुबारम्मा । कण्णु किवि काळू मूगु एनोंदिल्लवम्मा ।।'' (हा कोणआहे? ये बाई, पाहा बरे. याला डोळे, कान, नाक, पाय काही नाही.) या पदाचा अर्थ सांगताना बाबा म्हणाले, ''पूर्ण आत्मसाक्षात्कार व्हावयाच्या अगोदरच त्याने हे पद रचिले.'' (७)

परब्रह्मनामातीत आहे असे म्हंटल्यानंतर त्याला अनंत नामे असणे कसे शक्य आहे? ''ओमकार प्रणव उच्चार आत बघ कैसा । तो शब्द अवाङ्मय तो मी तो मी ऐसा ।।'' असे संतांनी म्हंटले आहे. सद्‌गुरुंना ध्यानात आत्म्याकडून नामे ऐकू येतात. किंवा त्यांच्या डोळ्यांसमोर दिसतात. हा अनुभव घेऊन गुरुंनी देवाचे नाम दिल्यानंतर शिष्याने जर त्या नामाचेच स्मरण केले तर देव 'ओ' देऊन दर्शन देतो.

तेव्हा (१९२० साली) तुम्हाला सहा नामे झाली होती. आता किती झाली आहेत? असे लक्ष्मण भटजींनी गुरुदेवांना विचारले असता, ''आता त्यांचा हिशोब नाही.'' असे गुरुदेवांनी उत्तर दिले.

अशा प्रकारे सद्‌गुरुंना देवाच्या अनंत नामांचा अनुभव येतो. त्यातील एक नाम ते शिष्यास देतात. त्या नामाचे स्मरण शिष्याने मनात केले तर त्याच्यासमोर वस्तू दिसते. ग्रंथ वाचून मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे शब्दपंडित ब्रह्माचे वर्णन नुसत्या दृष्टांताद्वारे करू शकतात. ते काही स्वानुभवाच्या गोष्टी सांगत नाहीत म्हणून ते शोभत नाही. अनुभवी ज्ञानी लोकांचे सांगणे फार निराळेच असते.

या ओवीच्या सुरुवातीच्या शब्दात 'जेथे वाचाने वर्तती ।' असा बदल महाराज करून घेत असत. देवाचे कोणतेही नाम मुखाने उच्चार करीत गेल्याने ब्रह्मप्राप्ती होत नाही. नुसते श्रम मात्र होतात. ध्यानात ऐकू आलेले, सिद्धवस्तूपासून निघालेले नाम गुरु शिष्याला सांगतात. ते नाम शिष्याने मौन धरून स्मरल्यास ब्रह्मप्राप्ती होते. वेद वगैरे ग्रंथाच्या अभ्यासाने सिद्धांत वचने सांगत जाणारे केवळ कृतिहीन वाचाळ होत. साधन न करणाऱ्यास ब्रह्मप्राप्ती होत नाही.

सद्गुरुंनी दिलेल्या नामाच्या नित्य स्मरणामुळे देव आत न राहता बाहेर येऊन नाना रूपाने दिसतो. निर्मल अंत:करणाने साधन केले तर वस्तू समोर निश्चल राहते. त्या अनुभवाने आनंद व शांती लाभते.

● ● ●

गुरुदेवांनी दिलेले नाम आपल्याला बरोबर आठवते की नाही अशी शंका सोलापूरच्या श्री. एन. आर. जेऊरकर (शास्त्री) यांना सतावत होती. त्यांनी गुरुदेवांना विचारून संशय दूर करून घेतला. तीच गोष्ट जेऊरकरांनी पुन्हा काढली. तेव्हा गुरुदेव म्हणाले, ''नाम-नाम म्हणून काय घेऊन बसता? 'सद्गुरु सद्गुरु' म्हंटले तरी पुरे.''

गुरुकडून नाम मिळाल्यानंतर त्याचे अनन्यभावाने स्मरण केले पाहिजे. इतर मार्ग बरोबर असतील का, हा संशय आला नाही म्हणजे तीच अनन्यता. ''मोदल भक्तिगे बदलवागदे।'' (प्रारंभी असलेल्या भक्तित बदल न होता) या नुसार असावे असे निरुपाधिसिद्धांनी उपदेशिले आहे. भक्ताच्या ठिकाणी अनन्यता असली म्हणजे त्या भक्तांची चिंता परमेश्वरालाच असते. ''चिंत्याक माडती । शिवने इद्दानेळु प्राणी ।'' (हे प्राण्या, चिंता का करतोस? सर्वकर्ता शिवच आहे.) असे निंबरगी महाराजांनी आश्वासन दिले आहे. आत्मसाक्षात्कार झाल्यावर देव भक्त एक होतात. तेव्हा देव सदोदित भक्तासमोरच असतो, त्याच्यापासून दूर होतच नाही. भक्तच देव होतो; देव त्याचा भक्त बनतो.

● ● ●

लोकरुढीनुसार महाराज संध्या वंदन करीत असत. ''संध्येत आपण गायत्री मंत्राचा किती वेळा जप करता?'' असे महाराजांना कन्नूरच्या हणमंतरावांनी विचारले. त्यावर, ''वेड लागले काय? गुरुंनी दिलेल्या नामाशिवाय दुसरे काहीही मी स्मरत नाही,'' असे स्पष्टपणे महाराजांनी उत्तर दिले. ''बीजमंत्र हा जप गायत्री !'' असे दुपारच्या भजनात आहे.

पूर्वी तीर्थाटण करून लोकांकडून श्रेष्ठ म्हणवून घेण्याची उत्कट इच्छा असे. आता तीर्थाटणाने कसलाही लाभ होत नाही असे समजले असल्याने केवळ साधनानेच परमेश्वराची प्राप्ती होणे शक्य आहे असा

मनाचा निश्चय झाला आहे. साधनाने साधकामधील अवगुण नष्ट होतात व सद्‌गुण अंगी बाणतात. साधनाने, ''आता हा पूर्वीसारखारहिला नाही,'' असे लोक म्हणू लागतात.

● ● ●

कन्नूरचे हणमंतराव लहान असताना, ''शाळेत जाताना तू काय करतोस?'' असे महाराजांनी एकदा विचारले. त्यावर ''वाटेत पडलेल्या वस्तू आणि करवंट्यांना लाथ मारत जातो. रस्त्यात झोपलेल्या कुत्र्यावर मित्रांना ढकलून देतो. गटारात दगड फेकून रस्त्याने जाणाऱ्यांवर चिखल उडेल असे करतो.'' असे बाल स्वभावाने केलेल्या खोड्यांबद्दल खरेखुरे हणमंतरावांनी महाराजांना सांगितले. ''असे तू केलास तर लोक तुला चांगला मुलगा आहे असे म्हणतात का?'' असे महाराजांनी विचारले. त्यावर हणमंतरावांनी नकारात्मक उत्तर दिले. ''असे करण्यापेक्षा घरातून बाहेर पडताच काकड आरती म्हणत जा. म्हणजे शाळेला पोहोचेपर्यंत काकड आरती संपेल व वाटेत पोरकट चेष्टा करण्याचे थांबेल,'' असे महाराजांनी समजावून सांगितले. हणमंतरावांनी त्याप्रमाणे करून हा चांगला मुलगा आहे असे लोकांकडून म्हणवून घेतले.

● ● ●

कन्नूरच्या हणमंतरावांना महाराजांनी दिलेल्या नामाचे स्मरण श्वासोच्छवासाबरोबर करताना अवघड जात होते. त्यांनी तसे महाराजांना कळविले. ''तुला मी कोणते नाम दिले?'' असे महाराजांनी विचारले. त्यावर हणमंतरावांनी आपल्याला सहा अक्षरी नाम दिल्याचे सांगितले. तेव्हा महाराज म्हणाले, ''हे नाम तुला कसे दिले? हे तर संन्याशांना द्यावयाचे नाम आहे. बरे, आता या नामातील तीन अक्षरे कमी करून उरलेल्याचे स्मरण करीत जा.''त्याप्रमाणे केल्यानंतर हणमंतरावांचे नामस्मरण सुरळीतपणे चालू झाले.

● ● ●

जमखंडीच्या हरीअण्णा कानिटकरांना महाराजांकडून उपदेश घेऊन दोन-तीन दिवस झाले असता लक्ष्मण भटजी हरीअण्णांना भेटावयास

गेले. ''मला दिलेले नाम मोठे आहे. ते श्वासाबरोबर घेताना फार त्रास होतो.'' असे भटजींजवळ त्यांनी सांगितले. ती गोष्ट भटजींनी महाराजांच्या कानावर घातली. तेव्हा महाराज म्हणाले, ''तो कर्मठ आहे. म्हणूनच त्याला तेरा अक्षरांचा मंत्र दिला आहे.''

नामस्मरण सोडून मन ऐहिक ऐश्वर्य वगैरे गोष्टींकडे आकर्षित होत असल्याने नामस्मरणात बाधा येते. अशा मनाला आपल्या ताब्यात ठेवून नामस्मरण करणाऱ्यास यमबाधाही होत नाही.

''पुण्यश्लोको नलो राजा । पुण्यश्लोको युधिष्ठिरः ।'' असे म्हणतात. म्हणून नल, युधिष्ठिर वगैरे पुण्यात्म्यांचे यशोगान पुण्यदायक होय. गुरुपादिष्ट नामाचे स्मरण करणारा पुण्यश्लोक होतो. गुरु विष्णु सहस्रनामामधल्या नामांचा उपदेश करीत नसून, ते स्वानुभवातून ऐकू आलेल्या हजारो नामांपैकी एक निवडून शिष्याला सांगतात. शिष्याने त्या नामाचे स्मरण केले असता परमात्मा त्याच्यासमोर पुण्याची साकारमूर्ती होऊन प्रकट होतो, असे घडल्यावर त्याच्या जन्माचे सार्थक होते.

सद्‌गुरु मुखातून ऐकलेले नाम प्राण असेपर्यंत (श्वास व उच्छवासाबरोबर) परावाणीने घेत जावे. ते नाम मनातल्या मनातच स्मरावे. असे केल्यामुळे देव संतुष्ट होऊन 'माझा भक्त' असे म्हणून त्याच्या डोळ्यांसमोर येऊन उभा राहतो. चक्रपाणी होऊन भक्ताचे संरक्षण करतो.

●●●

रबकवी मुक्कामी असता बाबा एका स्त्रीस उपदेश देण्यासाठी खोलीत घेऊन गेले. तेथे त्यांना नाम आठवले नाही म्हणून दुसऱ्या खोलीत तिला नेले. असा थोडा वेळ गेल्यानंतर, आता आठवले म्हणून सांगून त्यांनी तिला नाम दिले. तिला द्यावयाचे नाम कोणते हे त्यांच्या अनुभवात परमात्म्याकडून येण्यास वेळ लागला हेच याला कारण होते.

परमात्म्याला स्वानुभवाने ओळखलेले गुरु त्या अनामी असलेल्या परमात्म्यास नाव ठेवून ते नाम शिष्यांना सांगतात. प्रथम अशा गुरुंना शोधले पाहिजे. नंतर त्यांनी दिलेले नाम अनन्यभावाने स्मरावे. गुरु केला

नसता, नाम मिळाले नसता, अनुभव आला नसता, नुसती बडबड करण्याने काही उपयोग नाही. ''हे औषध चांगले आहे,'' असे सांगतात खरे, परंतु ''ते औषध घेऊन बरे झालेले लोक आहेत काय?'' असे विचारल्यास ते निरुत्तर होतात. गुरुंनी दिलेली नाममात्रा ''साधे औषध गुणवंत ।'' असे दासबोधात (१४.१.२) सांगितले आहे.

रुपाचा अनुभव आला नाही तर नामोपदेश घेतल्याचे प्रयोजन काय? अनुभव नसणारे, परमात्मा हा 'सर्वात्मा' सर्व चराचरांमध्ये असणारा आहे, असे अनुमानानेच सांगतात.

● ● ●

निंबरगी महाराजांनी आपला परमार्थ गुप्तच ठेवला होता. आपल्या पत्नीला नामोपदेश देऊन तिला मोक्षाच्या वाटेला लावावे असे त्यांना वाटले. पण ती नाम घेण्यास तयार होईना. ''मी या कडब्याच्या गंजीत बसतो, त्याला आग लाव. मी त्यातून न जळता सुरक्षित बाहेर आलो तर उपदेश घे.'' असे महाराजांनी तिला सांगितले. अशा कठीण परीक्षेला त्यांना कसे उतरवावयाचे असा विचार करून तिने त्यांच्याकडून नाम घेतले.

● ● ●

साधनाने दिसू लागलेली वस्तू दिसेनाशी होत नाही. गुरुंकडून नाम न घेता उगीच दृष्टी ठेवून बसल्यास अगर आपल्या मनाला येईल त्या नामाचे स्मरण केले तर वस्तू दिसणार नाही. ती दिसण्यासाठी गुरुकृपांजनच पाहिजे.

ती वस्तू जिकडे पाहावे तिकडे सर्वत्र भरून राहिलेली दिसते. गर्भवासात असताना नामस्मरण व प्रचिती दोन्ही होत्या. गुरुंकडून नाम मिळाल्यानंतर साधन केल्याने दिसू लागलेली वस्तू साधकाच्या आयुष्यभर त्याच्यासमोर असतेच असते. शिवाय त्याच्या मरणानंतरसुद्धा ती शाश्वत राहते. ती स्थिर व शाश्वत आहे. ती सतत डोळ्यासमोर राहावी अशी इच्छा असल्यास अखंड नामस्मरण करीत राहिले पाहिजे.

● ● ●

सद्गुरुंनी सांगितल्याप्रमाणे दृष्टी ठेवून साधन करून आत्म्यास

पाहावे. गुरु भगवंताकडून आलेले नामच सांगत असतात. म्हणून त्यांनी सांगिलेल्या नामाचेच स्मरण करावे. दुसऱ्या कोणत्या तरी नामाचे स्मरण केले असता देव सापडणार नाही.

रबकवीजवळ असलेल्या वेंकटापूरच्या रेड्डींच्या पांडप्पाला बाबांच्याकडे जाण्यास महाराजांनी स्वप्नात आदेश दिला होता. त्याप्रमाणे तो बाबांच्याकडे गेला. ''तुझ्या गुरुने तीन अक्षरांचे नाम तुला दिले आहे. त्यात दोन अक्षरे कमी आहेत'', असे सांगून बाबांनी ती दोन अक्षरे त्याला सांगितली.

नामस्मरणाने रूप दिसते व ते रूपच आपण होतो. म्हणजे साधन करीत गेल्याने साधकाला त्याचे रूपच दिसू लागले. ''तिळियबेकु । निजसुखद निलय सहजानंद ।'' (निजसुखाचा विश्राम सहजानंद अशा त्या आत्मस्वरूपास जाणावे.) असे निरुपाधिसिद्धांनी म्हटले आहे. तो अनुभव आल्यास नाम, रूप व साधक एकरूप होतात. शास्त्रांमध्ये सांगितलेले, गुरुंनी अनुभवलेले व साधकाने अनुभवलेले एकच असे वाटून मनाला ''होय, होय!'' (हे खरे आहे) असे वाटते.

साधन करून सत्य वस्तू पाहिली तर तीर्थक्षेत्रास जाऊन तेथील देवांचे दर्शन घेणे नकोसे वाटते. असत्य अशा बाहेरच्या देवांच्या मागे लागल्यास खरा देव सापडत नाही. खरा देव कोण, खोटा देव कोण हे तुम्हीच पाहिले पाहिजे. तुम्ही साधक आहात. गुरुंनी सांगितल्याप्रमाणे दृष्टी ठेवून नामस्मरण करून त्या सत्यवस्तूस पाहून घेतले असता ती वस्तू देवळातील देवांच्या मूर्तीवरसुद्धा तुम्हाला दिसू शकेल.

दृष्टी ठेवून साधन करणाऱ्यास त्या वस्तूस सतत पाहात राहावे, असे वाटते. साधन व रुपानुसंधान वाढत गेल्यास देव साधकाच्या रूपातच दिसू लागतो.  तेव्हा हा मार्ग खरा आहे, असे वाटून प्रचितीचे समाधान लाभते.

एकांतात बसून साधन करावे. देवाच्या दर्शनाशिवाय मला दुसरे काहीही नको, असे वाटून नामस्मरणातच तल्लीन होऊन साधन करावे. त्यामुळे अनुभव येतो.

नेमाची वेळ झाली म्हणजे कशाचीही भीड न ठेवता सारे व्यवहार बाजूला सारून कट्टाने ठरलेल्या वेळेपर्यंत नामस्मरणामध्ये मग्न असावे. दुसऱ्यांची संगत व देहस्वभाव सोडून नाम व वस्तू न सोडता, निरंतर साधन करून आत्मस्वरूप पाहून घ्यावे. देवाच्या दर्शन, स्पर्शन व संभाषणामध्ये वेळ घालवावा.

शरीरात अडकून पडून बंदिस्त झालेला आत्मा 'माझे माझे' म्हणत असतो. साधनामुळे तो शरीराबाहेर येऊन दिसतो. त्याला आपण देव म्हणून अभिमान नसतो. असे असल्यावर तुलाच का अहंकार असावा? तू सर्व संगत्याग करून साधन केले पाहिजेस. तेव्हा देव देहातच न राहता बाहेर येऊन दर्शन देतो. हे सर्व तुम्ही ऐकत आहात म्हणून मी सांगतो.

देहभाव हे अज्ञानाचे लक्षण होय. ते नाहीसे झाल्यावरच अनुभव प्राप्त होतो. 'मला ज्ञान झाले' ही भावनासुद्धा असता कामा नये. अनुभवामध्ये मग्न असताना कोणतीही वृत्ती राहत नाही.

''ज्ञानं यथार्थ ज्ञानं विज्ञानन्त्वनुभव: ।'' असे शास्त्रवचन आहे. शब्द ज्ञानाला महत्त्व न देता अनुभवामध्ये मग्न असावे.

नुसते शब्दज्ञान असणारे शब्दाद्वारे ब्रह्माचे वर्णन करतात. अगर देवळातील प्रतिमेची पूजा करतात. हे शुद्ध ब्रह्मज्ञानाचे लक्षण नव्हे. साधनाद्वारे अनुभवाला येणारी वस्तू म्हणजेच शुद्ध ब्रह्म होय. अनुभवाने त्याचे निश्चित ज्ञान होते. त्यामुळे कल्पनेच्या साम्राज्यात वावरणारे मन ताब्यात येते. समोर निजवस्तू पाहिल्यामुळे मनातील सर्व संशय दूर पळून जातात.

## त्रिवेणी संगम

**लेखिका विजया वि. आपटे (शकुंतला रानडे) पान नं. १६ व १७**

**''श्री गुरुदेवांच्या वेळेस आश्रमातील दैनंदिनीला ठराविक रूप नव्हते. त्यांच्या इच्छेनुसार कार्यक्रम चालत असत. श्री गुरुदेवांचे पारमार्थिक वाचन, त्यांच्या 'सिटिंग्ज' पू. श्री. काकाद्वय, श्री. बाबासाहेब संगोराम, कधी श्री. रामण्णा, प्रो. गजेंद्रगडकर, प्रो. तात्या दामले, प्रो. दाते, डॉ.**

पारिपत्यदार, श्री. कण्णूर मास्तर इत्यादी व सोलापूरची काही निवडक मंडळी व कधी गुरुगृहीची – म्हणजे इंचगिरी, निंबरगी मंडळी, त्यात प. पू. श्री महाराजांचे नातू वगैरे आले असताना होणारी चर्चा – त्यातून परमार्थाचा अनुबोध इतरही साधकांना होत असे. कधी त्यानुरूप भजन, आरती होई व मग नवीन घरातील सिटिंग संपत असे. इतर भजनाच्या वेळा जुन्या घरात सांभाळल्या जात. साधकांना नाम पू. श्री. काकाद्वयांमार्फत श्री गुरुदेवांकडून दिले जाई.

श्री गुरुदेवांच्या निर्याणानंतर नाम देणारे अधिकारी कोणी नाही. या काळजीत सर्व असतानाच, विजापूरच्या सुप्रसिद्ध शेंगामामींनी पू. मातोश्रींना कळवळून लिहिलेल्या पत्रात, ''मला पू. गुरुदेवांकडून नाम घ्यायचे होते; परंतु आता मला नाम कोण देणार?'' अशी विचारणी होती. ते पत्र पाहून ती. आई व इतर सर्व पूज्य मंडळींनाही आता पुढे कसे होणार? असा प्रश्न पडला. रोज स्नानानंतर माझी आई ती. बाबांनी आजन्म जपलेली श्री महाराजांची पोथी वाचत असे. त्यातूनच तिला पडलेल्या गूढ प्रश्नांची उत्तर मिळत असत, ते मात्र आश्चर्यच होय!

शेगामामींचे पत्र वाचल्यावर, ती आईने सर्वांच्या संमतीने पू. श्री. बाबासाहेब संगोराम, विजापूरचे बॅ. अंकलीकर व श्री. दाभाडे यांना मंत्रालय, रामकृष्ण मठ, सज्जनगड, आळंदी इत्यादी ठिकाणी पाठवून, नाम घेण्याच्या पद्धतीची चौकशी केली. कारण त्यावेळचा तो निर्णय प. पू. श्री. गुरुदेवांच्या पश्चात लगेचच घ्यावा लागणार असल्याने, परिक्षेचा ठरणार होता.

दोन–तीन दिवसांच्या आत सर्व थोरांची संमती घेऊन, समाधीवर चिठ्ठी ठेवून नाम घेण्याची पद्धत रुढ केली गेली. त्यानुसूर शेंगामामींना पाचारण केले गेले. बाराव्या दिवशी समाधी स्थापनेनंतर, शेंगामामींनी पू. श्री. काकासाहेब कारखानीसांच्या आदेशानुरूप, आपल्याला हव्या असलेल्या नामाची चिठ्ठी समाधीवर ठेवून, ते नाम जणू श्री गुरुदेवांनीच दिले आहे, अशा भावाने नामानुग्रह घेतला. श्री गुरुदेवांच्या समाधीवरील पहिल्या वहिल्या नामाला तत्काळ दोन तासांच्या आत बहर आला. मामी

विजापूरला पोहोचण्याच्या आत, त्यांना आकाशात सूर्यबिंबावर पहिला पारमार्थिक अनुभव आला व ते नाम अजरामर आहे, देवस्वरूप आहे, अशी प्रचिती आली. अशा रीतीने श्री सद्गुरु कृपेने, पू. श्रीगुरुदेवांच्या प्रेरणेने तीच नाम द्यायची पद्धत आजतागायत चालू असून ती सुफलित आहे. हे भक्तांना येणाऱ्या अनुभवातून प्रचितीस येत आहे. ही केवळ देवाचीच कृपा! 'मीच सर्व करतो आहे, अर्जुना, तू फक्त निमित्तमात्र हो.' 'निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ।' हे त्रिवार सत्य आहे."

●●●

# लेखक परिचय

नाव : नरहरी विठ्ठल कुलकर्णी.

जन्म : मार्च १९४३, पुणे.

शिक्षण : बी. ई. (इलेक्ट्रिकल) स्पेशलायझेशन एअर कंडिशनिंगमध्ये १९६३. पी. जी. डी. एम. एम. १९७६. पीएच. डी. २००३. गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानावर (God Realisation Summum Bonum of Human Life)

नोकरी : २० वर्षे मिलिटरीमध्ये. १९७३ च्या भारत-पाक युद्धात सक्रिय भाग. दोन प्रेसिडेंशल पदकांनी विभूषित

व्यवसाय : १० वर्षे स्वतंत्र व्यवसाय. एल. अँड टी.चा स्पेशालिस्ट कॉन्ट्रॅक्टर. फेडर लॉईडचा एअर कंडिशनिंग कन्स्लटंट.

पारमार्थिक वाटचाल : १) १९७१ साली समाधीवर नाम. गुरुदेवांचे शिष्य श्री. शंकरराव तेंडुलकरांच्या कन्येबरोबर विवाहामुळे संप्रदायात प्रवेश. गुरुदेवांनी शंकररावांकडून, निंबाळ आश्रमी श्रावण सप्ताहाची मुहूर्तमेढ रोवली. १९५२ ते १९९२ पर्यंत सप्ताहाची सुरुवात व सांगता शंकरराव करवी होत असे.

२) प. पू. शारक्का, काकासाहेब तुळपुळे, तात्यासाहेब दामले, य. श्री. ताम्हणकर यांचा प्रदीर्घ सत्संग लाभला.

३) २००४ साली अमेरिकेत गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानावर भाषण. (आय. आय. एस. आर. शिष्यवृत्ती तर्फे)

४) लेखन - श्री भाऊसाहेब महाराज एक शोधनिबंध. श्रीगुरुदेव रानडे चरित्रेवेल (प्रसाद प्रकाशन) श्रीगुरुदेव रानडे यांचे तत्त्वज्ञान (सावित्रीबाई फुले विद्यापीठ.)

५) २००७ साली गुरुदेवांच्या ५० व्या पुण्यतिथीस,

भारतीय विद्याभवन, पुणे येथे मुंबई, पुणे विद्यापीठ व आय. आय. एस. एस. आर. पुणे यांच्या विद्यमाने आंतरराष्ट्रीय परिषद घडविण्यात पुढाकार. परिषदेस आय.सी. पी. आर. दिल्ली केंद्र सरकारतर्फे रु. २.० लाखाचे योगदान. आय. सी. पी. आर. – इंडियन कौन्सिल फॉर फिलॉसॉफिकल रीसर्चच्या वार्षिक वृत्तांमध्ये गुरुदेवांचे नाम अजरामर झाले. परिषदेचा विषय ''अंतिम सत्याचे स्वरूप'' हा होता.

६) २००० ते २०१० पर्यंत गुरुदेवांवर भाषण व प्रवचन अलाहबाद विद्यापीठ, चेन्नई, बेळगाव, उद्गीर, गोवा, सोलापूर, मुंबई, पुणे, निंबाळ या ठिकाणी व परमार्थिक स्फुट लेखन जे आजपर्यंत गुरुदेवांच्या कृपेमुळे चालू आहे.

७) २००८ सा़ली इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड रिलीजनतर्फे रु. १ लाखाची शिष्यवृत्ती "Quantum and Consciousness" निबंधासाठी गुरुदेवांनी डिव्हॉईन सेल्फ कॉनशसनेस म्हणजे अंतिम सत्य असे प्रतिपादले आहे.

८) २००४ ते २०१४ पर्यंत टेंपलटन, अमेरिका व आय. आय. एस. आर., पुणे यांच्या विद्यमाने लोणावळा येथे चार दिवसांच्या आंतरराष्ट्रीय सिंपोसिझममध्ये सन्मानीय वक्ता व सदस्य म्हणून सक्रिय भाग. गुरुदेवांचे विज्ञान व आत्मज्ञानविषयी व साक्षात्कारशास्त्र बद्दल विचार मांडावयाची अनेकवार संधी मिळाली. Science and mysticism (विज्ञान व साक्षात्कार) Pathway to Reality (सत्याचा मार्ग) इ. संशोधनपर लेख इंटरनॅशनल पुस्तकांमध्ये प्रसिद्ध.

# श्रीगुरुदेव डॉ. रा. द. रानडे
## ए. सी. पी. आर.चे संस्थापकांविषयी



श्रीगुरुदेव डॉ. रामचंद्र दत्तात्रय रानडे, एम. ए., डी. लीट. हे आधुनिक भारतातील महान साक्षात्कारी संतांपैकी एक होते. डॉ. रा. द. रानडे यांनी प्रस्तावित केलेल्या प्रगल्भ विचारांनुसार, शांतीपूर्ण आणि आनंदी माणसांची विवादित एकता व सह अस्तित्वासाठी ''**मानवता**'' हा नवीन धर्म आणि ''**तर्कसंगत गूढवाद**'' (साक्षात्कारवाद) ही नवीन धर्मनिरपेक्ष भाषा विविधता व्यवस्थापित करण्यासाठी उपयोगी आहे असे मांडले. ते जगद्मान्य तत्त्वज्ञानी होते.

त्यांचे दार्शनिक साहित्यिक कार्य, त्यांच्या पुस्तकांतून, म्हणजेच ''अ कन्स्ट्रक्टीव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसॉफी'' ते ''द भगवद्गीता ॲज अ फिलॉसॉफी ऑफ गॉड-रियलायझेशन'' या द्वारे एक संस्मरणीय व तेजस्वी ठसा मागे सोडला आहे. ते अलाहाबाद विद्यापीठात तत्त्वज्ञान शाखेचे प्राध्यापक, प्रमुख व डीन तसेच विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून कार्यरत होते. 'ॲकॅडमी ऑफ कम्प्यरेटीव्ह फिलॉसॉफी ॲंड रिलीजन' (ए. सी. पी. आर) या आंतरराष्ट्रीय संस्थेची त्यांनी स्थापना केली आहे. या आधुनिक संदेष्टाने (**PROPHET**), ए. सी. पी. आर., बेळगाव या संस्थेद्वारे 'एकतेची जागृकता' हा जागतिक संदेश दिला आहे. श्रीगुरुदेव डॉ. रामचंद्र दत्तात्रय रानडे यांनी १९२४ साली पुणे येथे 'ॲकॅडमी ऑफ फिलॉसॉफी ॲंड रिलीजन' या संस्थेची संकल्पना मांडली. या संकल्पनेवर कार्यरत राहून त्यांनी १९५२ साली बेळगाव येथे ए. सी. पी. आर. या संस्थेची स्थापना केली.

ए. सी. पी. आर. ही संस्था म्हणजे त्यांनी जगाला दिलेला एक अजरामर वारसाच आहे. अशा महान संस्थापकाला एक योग्य श्रद्धांजली म्हणून भारतातील किंग - फिलॉसॉफर - स्पोक्समन, भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी या संस्थेचे उद्घाटन स्वेच्छेने करण्यात अभिमान बाळगला व ए. सी. पी. आर.च्या मुख्यालयाचे उद्घाटन १९६५ साली त्यांच्या हस्ते झाले. ए. सी. पी. आर. हे एक जागतिक दालन आहे, जिथे अनंत काळापर्यंत कुजबूज चालू राहील. एस. सी. पी. आर. हे एक ऐतिहासिक, तत्त्वज्ञानपर आणि आध्यात्मिक स्थान आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तत्वज्ञ, आध्यात्मिक व्यक्ती व राजकारणी लोक यांनी ए. सी. पी. आर. ला भेट देऊन स्वतःच्या जीवनात प्रेरणा, शांती आणि समृद्धीची भावना निर्माण करून घेतली आहे. ''**PATHWAY TO GOD**'' हे इंग्रजी त्रैमासिक ए. सी. पी. आर. प्रकाशित करते व ते जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवून शांतता व सौहार्दाचा संदेश देत आहे. ए. सी. पी. आर. चे संकेतस्थळ http://acprbgm.org आहे.

**www.gurudevranade.com** **किंमत रु. ३००**